म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. २५

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
ता.
ठाणें.

# मुलांची सुधारणा

“ शिक्षक ए अत्यंत कुशल कारीगर होवो जोइए. कुंभार माटीमां काम करे छे, सुतार लाकडामां काम करे छे, ज्यारे शिक्षकने जिवतांजागतां कुमळां बाळको साथे काम करवानुं होय छे. अमर आत्मा, सार्वभौम मन, अने ताराओ करतां पण विविध एवी वृत्तिओ साथे एनुं काम होय छे. बाळकोनी शारीरिक, मानसिक, सामाजिक बधी स्थिति समर्जाने एने चढाववानुं काम शिक्षकनुं छे. बाल्यकाळथी पुख्त यौवन सुधीनां जीवननो तेने विशाळ अने, ऊंडो अनुभव होवो जोइए. सजा करवी सहेली छे, तेटलीज ते निरर्थक पण छे. इलाज करवो एटलो सहेलो नथी, पण साची केळवणीनो रस्तो एज दिशामां छे.

काका कालेलकर

REFBK-0004810

न. ल. आठवले

[illegible]

# दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

नरहर लक्ष्मण आठवले

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि नं. ५५
ता. १५।१।५३
ठाणें.

REFBK-0004810

४८१०

शके १८५५
सन १९३३

पुणें
समर्थ भारत छापखाना

किंमत
१-८-०

मुद्रक व प्रकाशकः—सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी.ए., एल्‌एल्‌.बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा ‘ समर्थ भारत ’ छापखाना,
१४७ सदाशिव पेठ, पुणें २.

नत्वा ज्ञानप्रदं गुरुम् ।

नि. क्र. ८२ १५/१५

# प्रकाशकाचें निवेदन

शिक्षणविषयक मराठी वाङ्मयांत एका नवीन विषयाची भर घालणारें हें पुस्तक महाराष्ट्रीय पालक व शिक्षक यांचे हातीं देण्यास परम संतोष वाटतो. या पुस्तकाचे लेखक रा. आठवले यांना नवीन समर्थ विद्यालयाचे वसतिगृहाधिकारी या नात्यानें, मुलांचें अनेक प्रकारांचें दुर्वर्तन व तें सुधारण्याचे निरनिराळे मार्ग यांविषयीं कित्येक वर्षे प्रत्यक्ष अनुभव मिळाला, त्यांतच त्यांनीं त्या विषयावरील आजतागायतच्या इंग्रजी व अमेरिकन वाङ्मयाचें चिकित्सक व अभ्यासू वृत्तीनें परिशीलन करून, तात्त्विक बाजूची बहुमोल अशी भर घातली. या त्यांच्या परिश्रमाचें दृश्य फल असें हें पुस्तक पालक व शिक्षक या दोघांनाहि अत्यंत उपयुक्त होईल असा भरंवसा आहे; म्हणून नवीन समर्थ विद्यालयाच्या अनेकविध कार्यांपैकीं, विद्यार्थ्यांना चारित्र्यवान् व शीलसंपन्न करण्याबाबतचे हे अनुभव व विचार या पुस्तकाचे रूपानें जनतेपुढें मांडण्यांत येत आहेत. याचें जनतेकडून योग्य स्वागत व्हावें व या प्रकारचे आणखी कांहीं लहानमोठे ग्रंथ प्रकाशित करून नवीन समर्थ विद्यालयाच्या कार्याचा अल्पसा अंश जनतेला सादर करण्यास प्रोत्साहन मिळावें अशी उत्कट इच्छा आहे.

मुंबई इलाख्याच्या मध्यभागाचे शिक्षणनिरीक्षक खानबहादूर बी. एच्. काझी, एम्. ए., आय्. ई. एस्., यांनीं या पुस्तकाला गुणग्रहणपूर्वक अशी प्रस्तावना लिहून दिली याबद्दल प्रकाशक त्यांचा फार ऋणी आहे. येरवड्याच्या रेफर्मेटरीचे व्यवस्थापक या नात्यानें त्यांनीं कित्येक वर्षे काम केल्यानें या पुस्तकाचे विषयाचे बाबतींत त्यांचा अधिकार मोठा आहे, म्हणून त्यांना पुस्तकास प्रस्तावना लिहिण्यास विनंति केली, व कामाचा डोंगर पुढें असतांहि त्यांनीं ती मोठ्या आनंदानें लिहून दिली हें शीलसंवर्धनाविषयींच्या त्यांच्या कळकळीचेंच द्योतक होय.

# प्रस्तावना

" दुर्वर्तनी मुलांची सुधारणा " हें पुस्तक मी समग्र वाचून पाहिलें. हल्लींच्या दिवसांत सिनेमा, नाटकें, उपहारगृहें व दुसऱ्या इतर अनेक अनिष्ट गोष्टींमुळें दुर्वर्तनाकडे मुलांची प्रवृत्ति दिवसेंदिवस जास्त प्रमाणांत होत चालली आहे असें दिसून येतें. अशा वेळीं रा. आठवले यांनीं लिहिलेल्या " दुर्वर्तनी मुलांची सुधारणा " अशा पुस्तकाची फार जरूर होती व ती त्यांनीं योग्य प्रकारें भरून काढली यांत कांहीं शंका नाहीं. दुर्वर्तनी मुलांच्या सुधारणेचा प्रश्न हा नुसत्या बालजगाकरितां किंवा एकाद्या समाजाकरितां नसून राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. असें आढळून येतें कीं, शेंकडा नव्वद मुलें केवळ वाईट संगतीमुळें दुर्वर्तनी बनतात. प्रथम लहान लहान चोऱ्या करून त्या पचल्यावर पुढें पुढें मोठमोठ्या चोऱ्या करितात व कांहीं दिवसांनीं तीं पक्कीं बिलंदर बनतात. बिलंदर बनलेल्या गुन्हेगार मुलांपैकीं फार थोडीं मुलें शिक्षा करून निवळतात. तेव्हां दुर्वर्तनानें मुलें बिघडून पुढें पक्कीं बिलंदर बनल्यावर त्यांस शिक्षा करण्यापेक्षां लहानपणींच अशा मुलांची सुधारणा करणें सर्व दृष्टींनीं अत्यंत हितावह व जरूर आहे. येरवडा रिफॉर्मेटरी स्कूलचा सुपरिंटेंडेंट या नात्यानें जवळ जवळ १२ वर्षे काम केल्यामुळें दुर्वर्तनी मुलांशीं माझा बराच संबंध आला. दुर्वर्तनी मुलें हीं केव्हांहि चालतीं-बोलतीं माणसेंच आहेत व त्यांनासुद्धां इतर माणसांप्रमाणें विकार व भावना आहेत. त्यांच्याशीं प्रेमळपणानें वागल्यास त्यांस आपल्या दुर्वर्तनाची जाणीव होऊन पश्चात्ताप झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, प्रेमळपणाबरोबर तितकीच कडक शिस्तहि पाहिजे. शिस्तीशिवाय कोणतीहि शाळा चालणार नाहीं, शिस्तीशिवाय कोणतेंहि कॉलेज चालणार नाहीं, शिस्ती-शिवाय कोणतीहि संस्था चालणार नाहीं, इतकेंच काय पण शिस्तीशिवाय कोणतेंहि कुटुंबसुद्धां चालणार नाहीं. तेव्हां रिफॉर्मेटरी स्कूलसारख्या शाळेंत कडक शिस्त ठेवावी लागली तर त्यांत कांहीं विशेष आहे असें मला वाटत नाहीं. शिस्तीला प्रेमळपणाची जोड मिळाल्यावर कोणतेंहि मूल सुधारण्यास फार वेळ लागणार नाहीं. कांहीं कांहीं वेळां नुसत्या दोन प्रेमळ शब्दांनीं जो मनावर परिणाम होतो तो दहा छड्या मारल्यानें होत नाहीं.

या पुस्तकांत मुलें दुर्वर्तनी कशामुळें बनतात व दुर्वर्तनी झाल्यावर सद्वर्तनाचें शिक्षण व त्याचे मार्ग कोणते वापरावे वगैरे जरूर त्या विषयांवर अत्यंत मुद्देसूदपणें ऊहापोह केला आहे व त्यांत प्रदर्शित केलेले विचार मनास पटणारे आहेत. मला एकच गोष्ट सांगावीशी वाटते व ती ही कीं, नेहमीं अशा दुर्वर्तनी मुलांचा तिरस्कार करण्यापेक्षां त्यांच्यांत स्वाभिमान उत्पन्न केला तर खरोखर परावर्तन होऊन जरूर त्या सुधारणा झाल्याशिवाय राहणार नाहींत. प्रसिद्ध ग्रंथकार मॉर्गन यानें म्हटल्याप्रमाणें, मनुष्यास नुसती प्रामाणिकपणाची माहिती असल्यामुळें तो प्रामाणिक बनत नाहीं, किंवा दुसरा कसा प्रामाणिकपणें वागतो हें पाहूनहि तो प्रामाणिक बनत नाहीं, किंवा अप्रामाणिक वागणुकीबद्दल झालेली शिक्षा ही सुद्धां त्याला प्रामाणिक बनवूं शकत नाहीं. त्याच्या मतें सरळ व निष्कपटपणें वागण्याची प्रवृत्ति त्याच्यामध्यें उत्पन्न करा, प्रामाणिक होण्याची इच्छा त्याच्यांत जागृत करा आणि मग तो प्रामाणिक होतो कीं नाहीं तें पहा. हे बोल किती यथार्थ आहेत, मनाला किती पटणारे आहेत बरें. दुर्वर्तनी मुलांत किंवा मोठ्या माणसांत प्रामाणिक होण्याची इच्छा जागृत झाल्याशिवाय, त्यांच्यांत स्वाभिमान उत्पन्न केल्याशिवाय त्यांस प्रामाणिक कोण व कसें बनविणार? त्यांच्या अंतःकरणांत स्वाभिमानाच्या ज्योतीनें एकदां पेट घेतली कीं, सुधारणेचें काम सुरू झालें असें समजावें. मग केलेल्या वाईट गोष्टींबद्दल त्यांचे मनांत टोंचणी सुरू झाली कीं, चांगल्या गोष्टींकडे स्वाभाविकच प्रवृत्ति होऊं लागते. अशा वेळीं जवळ असणाऱ्या माणसानें निरनिराळ्या तऱ्हांनीं त्यांस उत्तेजन देऊन त्यांच्या स्वाभिमानाच्या अंकुरास पाणी घालून तो वाढविण्याचा प्रयत्न करणें अत्यंत जरूर आहे.

रा. रा. सरदेसाई यांनीं, माझ्या आयुष्यांतील १२ वर्षें ज्या कार्यांत मीं घालविलीं त्या कार्यावर लिहिलेल्या एका अत्यंत उपयुक्त पुस्तकावर प्रस्तावना लिहिण्याची संधी दिली याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. त्याचप्रमाणें रा. रा. आठवले यांनीं अत्यंत परिश्रम करून हें पुस्तक लिहून मराठी वाङ्मयांत एक चांगली भर घातली याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

शेवटीं रा. आठवले यांची ही कृति जनतेस आवडून त्याप्रमाणें प्रत्येक मुलास दुर्वर्तनापासून परावृत्त करण्याचा वेळींच प्रयत्न प्रत्येक जबाबदार माणसाकडून होईल अशी आशा करून ही लहानशी प्रस्तावना पुरी करतों.

पुणें,
तारीख १२ मे, १९३३. } **बदीउजमान एच्. काजी.**

# लेखकाचा खुलासा

शिक्षकाचा धंदा वर्षानुवर्षे करीत असतांना अनेक प्रकारच्या अनेक मुलांशीं माझा संबंध आला, व त्यांतील कित्येकांच्या वागणुकीकडे साहजिकच लक्ष वेधलें गेलें; आणि इतर शिक्षकांशीं व पालकांशीं संभाषणाचे योग जेव्हां जेव्हां आले, त्या वेळीं त्या मुलांविषयीं त्या सर्वांचीं निरनिराळीं मतें पाहून आश्चर्य वाटलें. हीं मुलें अशा तऱ्हेनें कां वागतात असा प्रश्न साहजिकच मनांत उभा राहिला आणि त्या-संबंधीं वाचन, सहवासांतील मित्रांशीं व मुलांशीं चर्चा आणि संभाषण करून जी माहिती संपादन केली तीच ह्या पुस्तकरूपानें पुढें मांडण्याचें धाष्टर्य करीत आहें.

मुलांच्या वर्तनाला वळण लावण्याचा–शीलसंवर्धनाचा–प्रश्न अतिशय बिकट आहे. त्याविषयीं अनेकांचीं अनेक मतें तर आहेतच; पण दहा बारा वर्षांत समाजाचें स्थित्यंतर इतक्या वेगानें होतें कीं, आजचीं मुलें ज्या समाजांत वाढत आहेत, तो समाज, पालक व शिक्षक ज्या समाजांत वाढले त्याहून किती तरी भिन्न होऊन जातो! त्यामुळें शीलसंवर्धनाच्या प्रश्नाची व्यावहारिक बाजू जास्तच बिकट होत चालली आहे. अशा वेळीं शीलसंवर्धनाचें सामान्य तात्त्विक विवेचन करण्यापेक्षां उनाड समजल्या जाणाऱ्या मुलांच्या वर्तनाची चर्चा पूर्वग्रह बाजूस ठेवून शास्त्रीय दृष्टींनें केल्यास शीलसंवर्धनाच्या प्रश्नास निराळ्या दृष्टीनें चालना मिळेल असें वाटतें. रोगानें आजारी झालेल्या मनुष्यांची शरीरप्रकृति काळजी-पूर्वक अवलोकन करून व शास्त्रीय दृष्ट्या तपासून त्यावरून काढलेल्या अनुमानांच्या योगानें सामान्य आरोग्यरक्षणासंबंधीं पुष्कळसे नियम निश्चित करतां येतात. त्याच प्रमाणें ज्यांचें वर्तन असमाधानकारक आहे अशा मुलांच्या मनोवृत्तींची चर्चा केल्यानें शीलशिक्षणाच्या सामान्य पद्धतीस निश्चितता आणणें पुष्कळ सुलभ होईल अशी माझी समजूत आहे. म्हणून ज्यांचें वर्तन अगोदरच बिघडलेलें आहे अशांचें वर्तन सुधारण्याच्या दृष्टीनेंच केवळ नव्हे, तर सामान्यतः मुलांना सद्वर्तनाचें वळण लावण्याच्या दृष्टीनेंहि ह्या पुस्तकाचा उपयोग व्हावा असें धोरण राखिलें आहे.

तरुण मुलांच्या वर्तनांशीं शिक्षकांपेक्षांहि पालकांचा संबंध जास्त येतो; म्हणून सामान्य सुशिक्षित पालकाला सहज समजूं शकेल अशाच स्वरूपाची चर्चा ह्या

पुस्तकांत करावयाची असें धोरण ठरविलें आणि पारिभाषिक शब्द किंवा पंडिती चर्चा शक्य तितकी टाळली. प्रत्येक प्रश्नाचें विवेचन करतांनाहि शास्त्रशुद्ध कांटेकोरपणापेक्षां सुगमतेकडे जास्त लक्ष दिलें आहे. मुलांविषयीं विचार करतांना प्रेमळ आईबाप आपली वात्सल्यपूर्ण दृष्टि सर्वस्वीं बाजूला ठेवूं शकतातच असें नाहीं, त्याचप्रमाणें मुलांच्या वर्तनाचा प्रतिकार करण्याचे त्यांनीं स्वीकारलेले मार्गहि शास्त्रशुद्ध क्वचितच असतात. मुलांच्या प्रत्येक क्रियेच्या मागें असलेल्या त्यांच्या स्वाभाविक प्रेरणा व आकांक्षा, आणि त्या क्रियांची प्रतिक्रिया करतांना पालकांची स्वतःची खरीखुरी असलेली मनोवृत्ति यांचा विचार करण्याकडे पालकांची दृष्टि वळवावी हा मुख्य हेतु आहे व तो अल्पांशानेंहि साधला तरी मला समाधान होईल.

पुस्तकांत दिलेल्या उदाहरणांपैकीं एकहि उदाहरण केवळ काल्पनिक नाहीं. कांहीं माझ्या स्वतःच्या अवलोकनांत आलेलीं आहेत, कांहीं माझ्या मित्रांनीं मला सांगितलेलीं आहेत व बाकीचीं ह्या विषयावरील पाश्चात्य शोधकांच्या ग्रंथांतून उद्धृत केलीं आहेत. उदाहरणें जशीं घडलीं तशींच दिलीं आहेत हें खरें; तरीहि स्थल, काल व व्यक्ति यांचा उल्लेख करतांना अर्थातच खऱ्या नांवांचा उपयोग केला नाहीं. परिस्थितीचें वर्णन करतांनाहि कांहीं गोष्टींत बदल केला आहे. मात्र असा बदल करतांना वर्तनाशीं संबंध असणाऱ्या अशा मूळ उदाहरणांतील सर्व बाबी तशाच राखून ठेविल्या आहेत. बहुतेक सर्व उदाहरणांची चर्चा बऱ्याच विस्तृत प्रमाणावर केली आहे. एखाद्या मुलाविषयीं विचार करतांना किती बाजूंनीं विचार करावा लागतो व त्याचें वर्तन सुधारण्याकरितां एकादा कार्यक्रम निश्चित ठरवितांना कोणत्या गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात याचें थोडेंसें दिग्दर्शन करण्याच्या हेतूनें इतकें विस्तृत विवेचन करणें अवश्य वाटतें.

ज्यांनीं आपल्या वर्तनानें ह्या विषयाचा अभ्यास करण्यास मला उत्तेजन दिलें त्या मुलांच्या ऋणाचा उल्लेख प्रथमच करणें योग्य. प्रो. न. ग. दामले, प्रो. शं. वा. दांडेकर, श्री. वि. मो. देशमुख यांनीं पुस्तकाचें हस्तलिखित वाचण्याची तसदी घेऊन महत्त्वाच्या सुधारणा सुचविल्या; या सर्वांनीं मला कायमचें उपकृत करून ठेविलें आहे. शिवाय आभार इतक्या प्रसिद्धपणें मानतां येत नाहींत अशा मित्रांची संख्याहि कांहीं थोडी नाहीं.

४५ बुधवार, पुणें २,
वैशाख कृ. १२।५५

न. ल. आठवले.

# अनुक्रमणिका


प्रकाशकाचें निवेदन ... ... ... (५)

प्रस्तावना ... ... ... ... (७)

लेखकाचा खुलासा ... ... ... (९)

प्रकरण पहिलें:-उपेक्षित पण महत्त्वाचा प्रश्न... ... १-९

मुलांच्या दुर्वर्तनाविषयीं सार्वत्रिक उदासीनता-३; समाजसेवकांच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाचें महत्त्व-६; पालकांच्या दृष्टीनें-७; शिक्षकांच्या दृष्टीनें-९.

प्रकरण दुसरें:-वर्तन, सद्वर्तन आणि दुर्वर्तन ... १०-२६

दुर्वर्तनाची व्याख्या-१०; नीतिमत्तेचें सामाजिक स्वरूप-११; सहजप्रवृत्ति ह्याच वर्तनाला आधारभूत असतात-१३; युद्धप्रवृत्ति-१५; संचयप्रवृत्ति-१६; रतिप्रवृत्ति-१७; प्रवृत्ति व विकार यांचा अन्योन्य संबंध-१९; नैतिक विकासाच्या तीन अवस्था-बाल्य-२१, शैशव-२२, पौगण्ड-२३; मनुष्याचें व्यक्तित्व ( personality )-२५.

प्रकरण तिसरें:-दुर्वर्तनाची कारणपरंपरा ... २७-३५

दुर्वर्तनाच्या वर्गीकरणाची अव्यवहार्यता-२७; कारणांचें विविध स्वरूप-२८; मनोवृत्तीच्या अभ्यासाचें महत्त्व-२९; पोषक व प्रेरक कारणें-३०.

प्रकरण चवथें:-आनुवंशिक संस्कार ... ... ३६-४३

दुर्वर्तन आनुवंशिक नसतें-३६; तर त्यास कारणीभूत होणाऱ्या विकृति आनुवंशिक असतात-३८; आनुवंशिक दोषांचें निराकरण-४०; व तत्संबंधीं उदाहरण-४१.

प्रकरण पाचवें:-शारीरिक दोष व दुर्वर्तन ... ... ४४-५३

शारीरिक दोषांचा वर्तनाशीं संबंध-४४; प्राग्जन्म संस्कार-४६; रोगांचा परिणाम-४७; अस्वाभाविक विकास-४७; अशक्त मुलांचें दुर्वर्तन-४९; सशक्त मुलांचें दुर्वर्तन-५१; तत्संबंधीं उदाहरण-५३.

प्रकरण सहावें:—पौगण्ड ... ... ... ५४–६९

पौगण्डकालीं होणारी दुर्वर्तनाची वाढ–५४; पौगण्डकालीं होणारी मनोवृत्तींची अस्थिरता–५६; त्या वेळीं क्रोध, द्वेष, चिडविण्याची हौस, संघ करण्याची प्रवृत्ति, या प्रामुख्यानें आढळतात–५७–६१; पळून जाणाऱ्या मुलांची मनोवृत्ति–६२; असत्य–६३; रति-शिक्षणाची आवश्यकता व त्याची दिशा–६४–६६; तत्संबंधीं उदाहरण–६७.

प्रकरण सातवें:—परिस्थितीचें महत्त्व ... ... ७०–१०४

परिस्थितीचे मनोवृत्तीवर होणारे परिणाम–७०; दारिद्र्यामुळें मनोवृत्ति असंतुष्ट राहते–७३; आकुंचित जागेंतील राहणीचे मानसिक दुष्परिणाम–७६; चोरी–मालकी हक्काची अपूर्ण कल्पना–७७; उदाहरणें–७८–८१; आत्मसंयमनाचा अभाव–८१; भंगलेलीं कुटुंबें–८२; एकुलता एक मुलगा कां बिघडतो?–८३; सावत्र आई–८४; प्रेम व कौतुक यांची आवश्यकता–८६; कुटुंबांतील शिस्तीचे निरनिराळे प्रकार व त्यांचे गुणदोष–८८; तत्संबंधीं उदाहरण–९१; शिस्तीची दिशा–९३; शाळेंतील शिस्तीचे मनावर परिणाम–९४; हस्तव्यवसायाचे उपयोग–९६; करमणुकीचीं योग्य व अयोग्य साधनें–९७; जुगार–९८; सिनेमा–९९; संगतीनें वर्तन बिघडतें काय? १०१.

प्रकरण आठवें:—अंतःकलह व इतर कारणें ... १०५–१२६

कलह हा अनेक अर्थांनीं आवश्यक आहे–१०५; मानसिक कलहांची सुरुवात कशी होते?–१०७; त्यांचीं व्यवहारांत नित्य आढळणारीं कांहीं उदाहरणें–१०९; आत्मवंचनाचे दुष्ट परिणाम–१११; मंदबुद्धी मुलें अधिक दुर्वर्तनी असतात काय?–११२; मंदबुद्धि कोणाला म्हणावें?–११४; त्यांना सुधारण्याची दिशा–११७; बुद्धिवान् मुलें दुर्वर्तनी कशीं होतात?–११७; भावनांचें सामर्थ्य–१२०; वर्तनावर परिणाम करणारीं कांहीं किरकोळ कारणें:–दुर्वर्तनाची संवय–१२२; हवामान–१२२; व्यसनें व हौशी–१२३; रोग–१२४; अंतःस्रावक ग्रंथि–१२५.

प्रकरण नववें:—सद्वर्तनाचें शिक्षण व त्याचे मार्ग ... १२७–१५३

शील हा एक मनःस्वभाव आहे–१२७; व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजहितबुद्धि–१२८; नीतिपाठापेक्षां संवयीचें महत्त्व अधिक आहे–१२९; समाजाच्या वातावरणाचे मनोवृत्तीवर परिणाम–१३१; सुधारणेच्या प्रयत्नांतील दोष–१३२; विध्वंसक व

विधायक प्रयत्न–१३३; मुलांची मनोवृत्ती लक्षांत घेतली पाहिजे–१३३; पालक-शिक्षकांची मनोवृत्ति–१३४; शारीरिक दोषांचें निराकरण–१३७; कुटुंबांतील शिस्त सुधारणें–१३८; करमणुकीचीं योग्य साधनें पुरविणें–१३९; शारीरिक शिक्षेचे गुण-दोष–१४०; मुलांच्या स्वतंत्र वसाहतीचे प्रयोग–१४१; सन्मित्रांची संगति–१४५; उच्च ध्येय व स्वाभिमान यांचा विकास–१४६; धार्मिक भावनांची जोपासना–१४७; मुलांचा आत्मविश्वास वाढविणें जरूर असतें–१४८; सहज प्रवृत्तींचें शोधन ( sublimation )–१४९; अवेक्षणाची (probation) पद्धति–१५०; फिरता शिक्षक–१५२.

संदर्भग्रंथ १५४

पारिभाषिक शब्द १५५

सूची १५६

# दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

## प्रकरण पहिलें

# उपेक्षित पण महत्त्वाचा प्रश्न

"Self-protection which is the duty of society, includes a program of well-being, for all members of the community, including offenders. The expanded altruism that is concerned with the welfare of the offender is really an essential part of a larger egoism."—Healy and Bronner: *Delinquents and Criminals.*

मोतीबाजारांतील एका सरदारी थाटाच्या भव्य वाड्यापुढें रिकामटेकड्या लोकांची बरीच गर्दी जमली होती. गांवांत चालू असलेल्या एका परिषदेकरितां आलेल्या प्रतिनिधींची उतरण्याची सोय त्याच वाड्यांत केली असल्यामुळें आंत साहजिकच थोडी गडबड होती. त्याचा फायदा घेऊन एक मुलगा शांतपणें आंत शिरला आणि वरच्या दिवाणखान्यांत जाऊन प्रतिनिधींच्या खिशांतील घड्याळें काढून घेऊन चालूं लागला. पण त्यानें इतक्या शिताफीनें केलेली ही चोरी साधली नाहीं आणि त्याला पोलिसच्या ताब्यांत ताबडतोब देण्यांत आलें.

शांतपणें आणि कौशल्यानें चोरी करून एखाद्या निढावलेल्या गुन्हेगारालाहि लाजविणाऱ्या ह्या मुलाचें—नारायणाचें—वय अवघें सोळा वर्षांचें होतें. नारायण शरीरानें किंचित् ठेंगणा आणि स्थूल परंतु सशक्त व सुदृढ होता आणि त्याच्या चेहऱ्याकडे पाहतांक्षणींच त्यावरील हुशारीची छटा कोणाचेंहि लक्ष सहज आकर्षून घेई.

आज केलेली घड्याळांची चोरी ही नारायणाच्या आयुष्यांतील कांहीं पहिली चोरी नव्हे. आपल्या वयाच्या पांचव्या वर्षापासून लहानमोठ्या वस्तू चोरून आणून कधीं उघड तर कधीं गुप्तपणें, त्यांचा विनियोग करण्याची त्याला संवयच जडली होती. सहज जातां जातां वाटेवरच्या दुकानांतून एकादी वस्तू हातोहात लांबविण्यांत त्याचें हस्तकौशल्य अनेक वेळां दिसून आलें होतें आणि अशा एकदोन प्रसंगीं पोलिसांशीं त्याची ओळखहि झाली होती. एकदां एक हिऱ्याची अंगठी आपण कशी चोरली याचें वर्णन तो मोठ्या

अभिमानानें करतो, "ती बाई नदीच्या घाटावर आंग धूत होती आणि आपली अंगठी हातांत काढून घेऊन ती धूत होती. मी संथपणें तिच्या मागें गेलों, तिच्या खांद्यावरून हात लांब करून तिच्या ओंजळींतील अंगठी अलद उचलली आणि बिलकूल धावपळ न करतां शेजारच्या गर्दीत दिसेनासा झालों." नारायणाच्या घराशेजारीं एक बाई राहत होती तिला आपली स्वकष्टार्जित मिळकत स्वस्त दरानें विकून टाकून कोणत्याहि प्रकारें गवगवा न करतां तो आपला उद्योग शांतपणें चालवीत असे.

नारायणाचा बाप असल्या मुलाला शोभण्यासारखा होता किंवा नाहीं याबद्दल निश्चित विधान करणें कठीण आहे. लहरीप्रमाणें काम करून त्याला जी थोडीबहुत प्राप्ति होत असे ती बहुतेक सर्व दारूच्या पायीं खर्च होऊन जात असे. नारायणाला चोरीची संवय लागल्याची जबाबदारी त्याच्यावर किती येते किंवा ती लागलेली समजल्यानंतर तिचा प्रतिकार करण्याचा त्यानें काय प्रयत्न केला हें समजण्यास मार्ग नाहीं; पण नारायणानें चोरून आणलेलें एक सोन्याचें घड्याळ तें चोरीचें आहे हें माहीत असतांहि तो बरेच दिवस वापरीत असल्याचें शेजारी सांगतात. नारायणाच्या आईला आपल्या प्रतापी मुलाचे उद्योग सर्व माहीत होते. पण नारायणाचें वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करण्यांत यश येण्याची तिला बिलकूल आशा नव्हती, म्हणून तिनें त्या बाबतींत आपण कांहींच करावयाचें नाहीं असें ठरविलें होतें. नारायणाच्या गोष्टी निघाल्या म्हणजे ती म्हणे कीं, "नारायण ना? तो असाच कायम राहणार. दोन वर्षांपूर्वी तो एकदां माडीवरून पडला त्या वेळीं त्याच्या डोक्याला एक जखम झाली होती. आणि तेव्हांपासून त्याचें डोकेंच बिघडलें आहे म्हणूनच तो असें करतो." अशा रीतीनें नारायणाच्या चोऱ्यांचें आणि स्वतःच्या उपेक्षेचें समर्थन करतांना त्या जखमेचे आतां कांहींहि अवशेष शिल्लक राहिले नव्हते या गोष्टीकडे किंवा नारायणाच्या चोऱ्यांचा इतिहास तो माडीवरून पडण्याच्या फार पूर्वीपासूनचा आहे या वस्तुस्थितीकडे तिचें लक्ष जात नसे. आणि तें जावें तरी कसें? नवऱ्याच्या निरुद्योगामुळें आणि मुलाच्या उद्योगामुळें कुटुंबास भासत असलेली पैशाची टंचाई दूर करण्याकरितां तिला बिचारीला शेजाऱ्यापाजाऱ्यांचे चार धंदे करावे लागत आणि इतक्या दगदगींतून मुलाच्या वर्तनाचा विचार करण्यास तिला बिलकूल सवड होत नसे.

अशा स्थितींत ईश्वरानें आपणांस दिलेलें उत्कृष्ट हस्तकौशल्य हेंच आपल्या उपजीविकेचें निश्चित साधन आहे याबद्दल इतक्या वर्षांच्या अनुभवानें नारायणाची पूर्ण खात्री झाली असल्यास नवल काय? त्याच्यासारख्या अत्यंत कुशल मुलाला, समाजांत जास्त मान्यता असलेलीं, कमी धोक्याचीं व अधिक सुखासमाधानाचीं उपजीविकेचीं अनेक साधनें उपलब्ध होऊं शकतील ही गोष्ट त्याच्या नजरेस आणून देण्याची खटपट करण्याची आवश्यकता कोणासच भासत नव्हती. आणि जरी ही आवश्यकता भासत असली तरीहि त्यानें स्वीकारलेल्या अप्रामाणिक मार्गापासून त्यास परत फिरवण्याकरितां करावे लागणारे प्रयत्न करण्यास—कांहींच्या मतानें हा अव्यापारेषु व्यापार करण्यास—सवड होती कोणाला?

*   *   *   *

## सार्वत्रिक उदासीनता

स्वत:च्या नैसर्गिक प्रवृत्तींचा आणि ईश्वरदत्त कौशल्याचा उपयोग समाजाच्या अहिताकरितां करणारे कितीतरी नारायण अहर्निश आढळतात. परंतु आश्चर्य हें कीं, अशा व्यक्तींच्या कृत्यांचे दुष्परिणाम निस्तरण्याकरितां आणि त्यांचेवर एका अर्थानें सूड उगविण्याकरितां जितके परिश्रम घेतले जातात, त्यांच्या निम्म्यानेंहि त्यांचें दुर्वर्तन थांबविण्याकरितां किंवा त्यांच्या वर्तनास योग्य वळण लावण्याकरितां घेतले जात नाहींत. शीलाचे पवाडे कोण गात नाहीं? शीलसंवर्धनाचें महत्त्व नेहमीं प्रतिपादन केलें जातें; पण समाजांतील तरुण मुलांचें भावी आयुष्य समाजास फायद्याचें होईल कीं तोट्याचें होईल याचा सांगोपांग विचार करणाऱ्यांची संख्या कांहीं फारशी नाहीं. “ काय करावें, आमचा बाबू अलीकडे फार उनाड झाला आहे,” असें थोडेंसें रागानें, थोडेंसें कौतुकानें, थोडेंसें निराशेनें म्हणण्यापलीकडे बाबूच्या उनाडपणाचा विचार जास्त काळजीपूर्वक करावयास पाहिजे असें आईबापांना वाटत नाहीं. शिक्षकांना शीलसंवर्धनाचें तात्त्विक महत्त्व पटत असतें, विद्यार्थ्यांचा उनाडपणा लक्षांत आल्याबरोबर शीलावर एकादें व्याख्यानहि ते देतात आणि लगेच आपला ज्ञानदानाचा उद्योग पुढें सुरू करतात; अशीच प्रवृत्ति बऱ्याच शिक्षकांची असते. सामान्य नागरिकांना

आपलें स्वतःचेंच व्यवसाय पुरून उरणारे असल्यानें लहान मुलांच्या वर्तनाचा विचार करण्यास त्यांना सवड नाहीं. व्यापारी आपल्या दुकानांतील मालाची काळजी घेतो; आपल्या मजुरांकडून व यंत्रांकडून भरपूर काम करवून घेऊन आपला कारखाना व्यवस्थित चालविण्याची खटपट कारखानदार करतो; पण समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या सामर्थ्याचा समाजाला जास्तींत जास्त उपयोग कसा होईल याचा विचार करणें हें आपलें काम आहे असें कोणी समजत नाहीं. एक मुलगा उनाड निघून तो वायां गेला तर त्याच्या आई-बापांना थोडेंसें वैयक्तिक सुखदुःख वाटेल तितकेंच; पण त्यापलीकडे विचार करून त्यामुळें समाजाची तितकी हानि झाली या दृष्टीनें तिकडे लक्ष देणारे जागरूक नागरीक किती ?

बालपणीं जडलेल्या हूडपणाच्या खोडयांचेंच रूपांतर पुढें भयंकर अपराधांत होऊं शकतें. तुरुंगाचे अखंड रहिवाशी बनलेल्या अपराध्यांचीं पूर्वचरित्रें पाहिलीं तर त्यांच्या अपराधी वृत्तीची सुरुवात तारुण्यांतच झालेली दिसते व त्या वयांत जडलेल्या लहानसान दुर्वर्तनाच्या संवयींनींच पुढील प्रचंड दुर्वर्तनाचा पाया घातला जातो. आपलें पूर्ववय सद्वर्तनांत घालविलेला मनुष्य मोठेपणीं आपलें आयुष्य अनीतीनें घालवील असा संभव फारच थोडा असतो. परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें किंवा इतर आनुषंगिक कारणांमुळें अपराधी वृत्तीचा उगम केव्हां केव्हां मध्यम वयांत दिसून येतो पण अशीं उदाहरणें अपवादात्मक म्हणून सोडून देण्याइतकीं थोडीं असतात.* तारुण्यांत उगम पावणाऱ्या ह्या दुर्वर्तनाच्या वृत्तीस वेळींच आळा घालण्यांत आला असता तर त्या व्यक्तींचें भावी आयुष्य तर सुखाचें झालें असतेंच, पण अशा व्यक्तींच्या अपराधामुळें समाजाची होणारी सांपत्तिक हानि व त्यांच्या सान्निध्यानें, अनुकरणानें किंवा उपदेशानें समाजांतील इतर व्यक्तींवर दुष्परिणाम होऊन होणारी समाजाची नैतिक हानीहि टळली असती.

---

* इंग्लंडमधील तुरुंगांतील अपराध्यांची पाहणी करतांना असें आढळून आलें कीं शेंकडा ५८ गुन्हेगारांनीं वयाच्या पंधराव्या वर्षापूर्वीच अपराध करण्यास सुरुवात केली होती. पंधरा व सोळा ह्या वयाच्या दरम्यान शेंकडा १४ मंडळी हें शिक्षण घेणारी निघाली व बहुतेक सर्व गुन्हेगारांनीं विसाव्या वर्षापूर्वीच आपल्या व्यवसायास आरंभ केला होता—Clay

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि नं. ८२९
ता. १०-१-९२



धैर्य, धाडस, चिकाटी इत्यादि सद्गुणांचा समाजांतील सर्व व्यक्तींच्या ठिकाणीं विकास होणें पाहिजे असें आपण प्रतिपादन करीत असतों; व त्याकरितां अनेक प्रकारचे प्रयत्न समाजांत अखंड चालू असतात; पण दुर्वर्तनी आयुष्य कंठण्यानें ह्या गुणांचा विकास जितक्या उत्कृष्ट तऱ्हेनें होतो तितक्या प्रमाणांत हे गुण सच्छील नागरिकाच्या ठिकाणीं फारच क्वचित् दृष्टीस पडतील. पोलिसांचा व समाजाचा अखंड जाच सहन करून, केवळ आपल्या सहकाऱ्यांच्याच मदतीनें आपल्या अपराधी वृत्तीचा व्यवसाय चालू ठेवणाऱ्या अट्टल दरोडेखोराला वर उल्लेखिलेल्या ह्या सर्व सद्गुणांची जितकी आवश्यकता भासते तितकी सुसंस्कृत समाजांत आपले शांत वृत्तीचे व्यवसाय करणाऱ्यांना क्वचितच भासत असेल. एकीकडे अशा सद्गुणांचा विकास व्हावा म्हणून खटपट करीत असतांना, ज्यांच्या ठायीं हे सद्गुण विकसित झालेले आहेत अशा व्यक्तींचा उपयोग समाजास कसा करून घेतां येईल इकडे समाजाचें लक्ष फार क्वचित् जातें. समाजाच्या हिताकरितां कांहीं व्यक्तींत ज्या सद्गुणांचा विकास व्हावा असें आपण म्हणतों तेच सद्गुण कांहीं व्यक्तींत उपजत असूनहि त्यांचा उपयोग समाजाच्या कार्याचा नाश करण्याकडे होत असतो. ह्या दृष्टीनेंहि मुलांच्या दुर्वर्तनाचा विचार समाजानें करावयास पाहिजे.

## कर्तव्यपराङ्मुख समाज

ज्या समाजांत आपण राहतों त्या समाजाचें हित पाहण्याची जबाबदारी त्या समाजाचे घटक असलेल्या प्रत्येक व्यक्तीवर आहे असें नेहमीं प्रतिपादन केलें जातें. समाजाचें हित साधण्याकरितां व्यक्तीच्या हिताकडे प्रसंगीं थोडें दुर्लक्ष झालें तरी तें क्षम्य समजलें जातें; आणि प्रत्येक व्यक्तीनें ह्या तत्त्वज्ञानास अनुसरूनच अखिल समाजाचें हित साधण्याकरितां थोडीशी झीज सहन करण्याची तयारी दाखवावी अशी अपेक्षा केली जाते. पण त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीच्या उन्नतीस मदत करण्याची व त्याच्या नैसर्गिक गुणांच्या विकासास भरपूर वाव देण्याची जबाबदारी समाजावर येते ह्या दृष्टीकडे मात्र फार थोड्यांचें लक्ष जातें. अरण्यांतील स्वच्छंदी जीवनक्रम सोडून देऊन मनुष्यप्राणी समाज करून राहूं लागला तो, अरण्यांत मनसोक्त विहार करून मिळणाऱ्या

स्वातंत्र्याच्या सुखापेक्षां सुसंघटित समाजांत प्राप्त होणारें सुख, स्थैर्य आणि संरक्षण यांची किंमत त्याला जास्त वाटली म्हणून. अर्थात् प्रत्येक व्यक्तीला आपल्या संरक्षणाचा फायदा मिळवून देऊन त्याच्या सर्वांगीण उन्नतीस पोषक होईल अशी परिस्थिति राखणें हें समाजाचें कर्तव्य आहे. दुर्वर्तनी मुलगा हाहि समाजांतीलच एक व्यक्ति असल्यानें, निदान त्यास समाजांतून बहिष्कृत केलें नाहीं तोंपर्यंत तरी, इतर व्यक्तींप्रमाणें त्याचेंहि संरक्षण करून त्याच्या उन्नतीकडे लक्ष देणें जरूर आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्यां ( त्यांतील दुर्वर्तनी मुलांच्यासुद्धां ) अंगीं असलेल्या सर्व गुणांचा उपयोग समाजाच्या प्रगतीस पोषक व्हावा या हेतूनेंच केवळ नव्हे, दुर्वर्तनी मुलांच्या दुर्वर्तनापासून समाजांतील इतर व्यक्तींस त्रास होतो म्हणूनहि केवळ नव्हे, तर स्वतःची सर्वांगीण उन्नति करून घेण्याचा प्रत्येक व्यक्तीस हक्क आहे आणि त्याकरितां समाजाची मदत मागण्याचा त्यास अधिकार आहे म्हणून मुलांच्या दुर्वर्तनाचा प्रश्न योग्य तऱ्हेनें सोडविणें आवश्यक आहे.

मनुष्याच्या नीतिबाह्य वर्तनाचा विचार करतांना समाजाचें स्थैर्य व समाजांतील इतर व्यक्तींची सुरक्षितता ह्या गोष्टींबरोबरच दुर्वर्तनी मनुष्यास सन्मार्गावर आणण्याचाहि विचार केला पाहिजे हें मान्य केलें म्हणजे असा विचार वय लहान असतांनाच करणें अत्यंत इष्ट आहे हें लक्षांत येण्यास वेळ लागणार नाहीं. वाढत्या वयाबरोबर अपराध करण्याची प्रवृत्ति वाढत जाऊन दीर्घकालीन संवयीमुळें ती अंगवळणीं पडते व सुधारण्याचा संभव कमी होत जातो. उलट लहानपणींच ह्या प्रवृत्तीस आळा घालण्याचा प्रयत्न झाल्यास पुढें येणाऱ्या बऱ्याच आपत्ति टळणें शक्य होतें. गुन्ह्याची प्रवृत्ति प्रथम जेव्हां दृष्टोत्पत्तीस येते त्या वेळीं तिचें स्वरूप जरी उपेक्षणीय वाटलें तरी लहान मुलांचे लहान अपराधच मोठेपणीं उग्र स्वरूप धारण करीत असतात, म्हणून ह्या वृत्तीचा ओघ जितक्या लहानपणीं बदलणें शक्य असेल तितका बदलण्याचा प्रयत्न करणें हिताचें असतें. पुष्कळ वेळां या प्रवृत्तीचा उगम तारुण्यांतील विशिष्ट परिस्थिती व भोंवतालचें वातावरण यांतच असतो. म्हणून ह्या प्रवृत्तीचा उच्छेद करतांना मुळाशींच हात घालावयाचा तर तरुण मुलांच्या भोंवतालीं असलेल्या परिस्थितीचा विचार

करणें ओघानेंच प्राप्त होतें. तारुण्य हा शरीर व मन यांच्या शक्तींचा विकास होण्याचा काल आहे. ह्या कालांत मनुष्याच्या मनोवृत्तीला वळण मिळून मनुष्याचें शील बनत असतें, अर्थात् वर्तनास योग्य तें वळण लावण्याची आशा तारुण्यांतच जास्त असते. शिक्षक व संबंधी मंडळी मुलाच्या वर्तनाच्या बाबतींत निराश झालेलीं नसतात. आपला मुलगा अद्याप निवळेल अशी त्यांस आशा असते; इतकेंच नव्हे तर मागील गोष्टी विसरून जाऊन पुनः पहिल्यापासून सुरुवात करण्याची व वर्तनांत बदल करण्याची मुलाची तयारी दिसल्यास शक्य तितकी संधि देण्याची व अन्य तऱ्हेनें मदत करण्याची त्यांची तयारी असते. गुन्ह्याच्या प्रवृत्तीचा पूर्ण विकास झाल्यावर ती दुरुस्त करीत बसण्यापेक्षां तिची वाढ मुळांतच खुडून टाकणें जास्त सुलभ होतें. म्हणून मुलांच्या वर्तनाचा विचार जितक्या लहानपणीं करतां येईल तितकें मुलांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीनें जास्त हितकारक होईल.

उनाड मुलांचा प्रश्न दुसऱ्याहि एका दृष्टीनें महत्त्वाचा आहे. मुलगा उनाडपणा करूं लागल्यावर तीं कृत्यें थांबविण्याकडे व त्याकरितां शक्य तितके निर्बंध घालण्याकडे पालकांची प्रवृत्ति असते. अशा वेळीं ज्या मनोवृत्तीमुळें मुलांच्या वागणुकींत बदल होतो ती मनोवृत्ति समजून घेण्याची वृत्ति पालकांनीं ठेवल्यास मुलांचें बिघडलेलें वर्तन सुधारण्यास मदत होईल, इतकेंच नव्हे तर मुलांना मानासिक शांति मिळून कुटुंबाच्या आनंदांतहि बरीच भर पडेल. सर्वच मुलांच्या कोंवळ्या मनावर प्रत्येक गोष्टीचा विशिष्ट तऱ्हेनें परिणाम होत असतो; व त्यांपैकीं एकाद्या मुलाचेंच वर्तन दुर्वर्तन या सदरांत बसण्याइतकें बिघडलेलें असलें तरी इतर मुलांच्या मनःस्थितीवर त्यांचा थोडाबहुत परिणाम झालेला असतोच. बाह्यतः हीं दुसरीं मुलें सुशील व सुस्वभावी दिसलीं तरी अंतर्यामीं त्यांच्या मनोवृत्तींचा झगडा चालू असतो व मधून मधन छोटीं छोटीं बंडें उभारून तो झगडा आपलें अस्तित्व प्रकट करीत असतो. अशा वेळीं ह्या लहान लहान बाह्य लक्षणांकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवून त्यांच्या मनोवृत्तींचा सहानुभूतिपूर्वक विचार केला तर पुढील अनर्थ टळतील, इतकेंच नव्हे तर कुटुंबांतील खटके कमी होऊन मुलांचे व आईबापांचे संबंध अधिक प्रेमळपणाचे होतील.

## शिक्षणसंस्थांची जबाबदारी

काांहीं प्रगतिपर शाळांचीं अपवादभूत असलेलीं उदाहरणें सोडून दिलीं तर सामान्यत: शाळांचें लक्ष मुलांच्या वर्तनाकडे वेताचेंच असतें. कांहीं विशिष्ट हेतूनें आंखला गेलेला परंपरागत अभ्यासक्रम ज्यांना मानवतो तीं मुलें शाळेंत रहातात आणि 'शिक्षण' घेतात. परंतु स्वतःच्या मनोवृत्तीमुळें किंवा इतर कारणांमुळें या अभ्यासक्रमाच्या पोलादी चौकटींत जे बसूं शकत नाहींत, ते आपला मार्ग 'सुधारतात' आणि यदृच्छेनें त्यांना जे बेरंवाईट क्षेत्र सांपडेल तेथें आपली कर्तबगारी दाखवितात. शिक्षणशास्त्राचा आणि शिक्षण देण्याच्या पद्धतींचा अनेकदां खल केला जातो आणि तज्ज्ञांच्या शिफारशींप्रमाणें शाळांतील शिक्षणपद्धतींत नानाविध गोष्टींचा समावेश केला जातो. मुलांच्या नैसर्गिक व सुप्त असलेल्या शक्तींचा आविष्कार करण्याचे हे प्रयत्न निःसंशय स्तुत्य व शिक्षणांतील प्रगतीचे निदर्शक आहेत. पण सर्वसामान्य शाळांमध्यें शारीरिक आणि बौद्धिक विकास साधण्याकडे ज्या प्रमाणांत लक्ष दिलें जात आहे त्या मानानें मुलांची मनोवृत्ति आणि परिस्थितीशीं संबंध आल्यामुळें उत्पन्न होणारे मनोविकार यांचेकडे दुर्लक्षच केलें जातें. या गोष्टींचे मुलांच्या वर्तनावर जे परिणाम घडतात त्यांचें महत्त्व तात्त्विक विवेचनांतून मान्य केलें जातें हें खरें, पण प्रत्यक्ष कृतींत तें अद्याप भासूं लागलें नाहीं. दिवसेंदिवस तीव्र होत जाणाऱ्या जीवनकलहांत यशस्वी होण्याकरितां किंवा समाजाच्या संस्कृतीची परंपरा अखंड राखण्याकरितां जें ज्ञान व जें कौशल्य मुलांना शिकविलें जातें, त्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग तीं आपलें व आपल्या शेजाऱ्यांचें जीवन सुखकर करण्याकडेच करतील, अशा तऱ्हेचें वळण मुलांच्या मनोवृत्तींना देण्याचें शाळांना अद्याप साधलें नाहीं. मुलांची बुद्धि, त्यांनीं संपादन केलेलें ज्ञान व कौशल्य यांचें त्यांच्या शिक्षणांत असलेलें महत्त्व कोणीहि नाकबूल करणार नाहीं. पण या ज्ञानाचा उपयोग जे हेतु किंवा ध्येय साधण्याकरितां केला जातो त्यावरूनच व्यक्तीचें शील आणि समाजाचें वळण ठरत असतें. शिक्षण आणि सामर्थ्य यांचा उपयोग स्वत:च्या आणि समाजाच्या कल्याणाकरितांच करावयाचा, अशा तऱ्हेची मनोवृत्ति उत्पन्न झाल्याखेरीज शिक्षणाचें ध्येय साध्य झालें असें म्हणतां येणार नाहीं. कारण स्वत:विषयीं आणि समाजांतील इतर व्यक्तींविषयीं मनुष्याची जी

मनोवृत्ति असेल तिची छाप त्याच्या वर्तनावर पडल्याशिवाय रहाणार नाहीं— मग त्याचा वर्गांतील अभ्यास आणि परीक्षांचे शेरे कसेहि असोत.

यंत्रशास्त्रांतील प्रगतीमुळें यंत्रांच्या शक्तीची वाढ होऊं लागली व अर्थात् व्यक्तीच्या सुखांत आणि समाधानांत भर पडूं लागली; पण त्याबरोबरच यंत्र चालविणाराच्या निष्काळजीपणामुळें किंवा कमकुवतपणामुळें धोक्यांची आणि अपघातांचीहि संख्या त्याच प्रमाणांत वाढूं लागली. त्याचप्रमाणें उत्कृष्ट शीलाच्या अभावीं शिक्षणानें संपादन केलेलें ज्ञान व्यक्तीच्या व समाजाच्या सुखांत भर टाकीलच असें निःसंशय सांगतां येणें शक्य नाहीं. सुदृढ शरीर आणि सुशिक्षित मन हेंच कांहीं शिक्षणाचें ध्येय नाहीं, तर शिक्षणाचें खरें ध्येय जें सच्छील वर्तन किंवा सुसंस्कृत समाजांतील नागरिकत्वाचीं कर्तव्यें पार पाडण्याची पात्रता हें साध्य करण्याचीं तीं फक्त साधनें होत ही गोष्ट अलीकडील शिक्षणशास्त्रज्ञांना पटत चालली आहे. शिक्षणाच्या इतर अंगांत सुधारणा करण्याची जी तत्परता दाखविली जाते, तीच तत्परता याविषयींचा विचार करण्यांतहि त्यांनीं दाखविली तर शिक्षणपद्धतींत एक महत्त्वाची क्रांति घडून येईल यांत शंका नाहीं.

अशा रीतीनें पाहतां मुलांच्या दुर्वर्तनाचा प्रश्न शिक्षक, पालक आणि समाजसेवक या सर्वांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याच्या महत्त्वाच्या मानानें जरूर तितकें सांगोपांग विवेचन या लहानशा पुस्तकांत होणें अर्थातच शक्य नाहीं. दुर्वर्तन घडवून आणणाऱ्या मनोवृत्तींचें निरनिराळ्या अंगांनीं अवलोकन करून त्या अनुरोधानें वर्तनांत बदल घडवून आणण्यास काय करतां येईल, याचें या पुस्तकांत विवेचन करण्याचें योजिलें आहे; आणि त्यास अनुसरून मनुष्याच्या सामान्य वर्तनाला आधारभूत असणाऱ्या मनःस्थितींचें थोडक्यांत विवेचन अगोदर करणें जरूर आहे.

प्रकरण दुसरें

# वर्तन, सद्वर्तन आणि दुर्वर्तन

"He needs help and help of the kind which springs not only from good will and kind intentions, although these too are necessary, but from scientific knowledge of human motives and behaviour." —Irwin and Marks: *Fitting the School to the Child.*

दुर्वर्तन या शब्दाचा सामान्य अर्थ जरी सर्वांना माहित असला तरी त्याची निश्चित व्याख्या करणें वाटतें तितकें सोपें नाहीं. अमुक कृत्यें करणें हें दुर्वर्तन अशा तऱ्हेचें विधान करणें तर मुळींच शक्य नाहीं. कारण निरनिराळ्या शाळांच्या व कुटुंबांच्या पद्धतिभेदानें आणि नियमांतील भिन्नतेमुळें एकच कृत्य सर्व ठिकाणीं सारख्याच प्रमाणांत दुर्वर्तन समजलें जात नाहीं. समाजाचा एखादा नियम—कायदा—मोडला तर तें कायद्याच्या दृष्टीनें दुर्वर्तन होऊं शकेल; परंतु नैतिकदृष्ट्या—समाजाच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीनें—तें दुर्वर्तन समजलें जाईलच असें नाहीं. उलट कायद्याच्या कक्षेंत राहूनहि सर्व नीतिमत्ता झुगारून देऊन स्वैर वर्तन करणें कांहीं अगदींच अशक्य नाहीं. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें दुर्वर्तनाची कांटेतोल व्याख्या करणें अशक्य आहे. एखाद्या समाजानें तत्कालीन परिस्थितींत वर्तनाचें जें परिमाण (standard) ठरविलें असेल त्याबरहुकूम आपलें वर्तन न ठेवणें असाच दुर्वर्तन या शब्दाचा सामान्य व थोडासा अनिश्चित अर्थ यापुढील विवेचनांत गृहीत धरला आहे.

## नीतिमत्तेचें स्वरूप

नीतिमत्ता किंवा सद्वर्तनाची कल्पना हिचें स्वरूप मूलतः सामाजिक असून सामाजिक चालीरीतींचा विकास होऊनच प्रस्तुतच्या काळांतील नैतिक बंधनांची उभारणी झालेली असते. केवळ नीतिमत्ता, तात्त्विक नीतिमत्ता ( absolute morality ) म्हणून कांहीं कल्पना आहे किंवा नाहीं, त्याचप्रमाणें समाजाच्या अस्तित्वाखेरीज वैयक्तिक नीतिमत्ता, वैयक्तिक सद्वर्तन

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि नं. ८२१



असूं शकेल कीं नाहीं इत्यादि तात्त्विक प्रश्नांचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे. पण एवढें मात्र लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, सद्वर्तन व दुर्वर्तन यांस विभागणाऱ्या मर्यादरेषा अनिश्चित असून सामाजिक परिस्थितीप्रमाणें बदलणाऱ्या असतात. दुसऱ्याची वस्तू घेणें हें सद्वर्तन समजलें जात नाहीं. पण सार्वजनिक हिताकरितां कायद्यानें दुसऱ्याच्या वस्तू सक्तीनें घेतल्या जातात. हत्या ही वाईट पण युद्धाच्या प्रसंगीं खून हे कर्तव्याच्या क्षेत्रांत येऊन बसतात. युरोपीय समाजांत स्त्रीपुरुषांची जी वागणूक चांगली समजली जाते, ती हिंदुस्थानांत निंद्य समजली जाऊं शकेल. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतहि सुशिक्षित व अशिक्षित समाजांत किंवा भिन्न भिन्न प्रांतांतहि सद्वर्तनाचीं परिमाणें ( standards ) भिन्नभिन्न आहेत. एका प्रकारच्या वर्तनावर एका समाजानें नीतिमत्त्वाचा व कायदेशीरपणाचा शिक्का मारला असला तरी तें वर्तन दुसऱ्या राष्ट्रांत नैतिक म्हणून चालूं दिलें जाईलच असें नाहीं. इतकेंच नव्हे तर एकाच समाजांतहि शिक्षणाची प्रगति झाल्याबरोबर ही मान्यता बदलण्याचा प्रसंग येऊं शकेल. अशा तऱ्हेनें देश, काल व परिस्थिती, समाजाची कमीअधिक उत्क्रांत स्थिति, व कुटुंबपद्धतीसारख्या सामाजिक संस्थांचा विकास इत्यादि गोष्टींच्या भिन्नत्वाबरोबर सद्वर्तनाची व्याख्याहि बदलते हें पाहिलें म्हणजे नीतिमत्ता सामाजिक चालीरीतींच्या विकासावरच कशी अवलंबून आहे हें लक्षांत येतें.

समाजांतील सर्व व्यक्तींना वर्तनाचें पूर्ण स्वातंत्र्य दिल्यास व्यक्तीच्या शारीरिक सामर्थ्यालाच महत्त्व येऊन ‘ बळी तो कान पिळी ’ अशी स्थिति होईल, ही गोष्ट समाजाच्या बाल्यावस्थेंतहि निदर्शनास येऊं शकेल. म्हणून समाजाच्या गरजा आणि परिस्थिति पाहून आणि सर्वांच्या सामुदायिक हिताकडे लक्ष देऊन समाजाचे अधिकारी व्यक्तीच्या वर्तनास जरूर तें नियंत्रण सुरुवातीसच घालूं लागतात; आणि हें नियंत्रण समाजांतील सर्व व्यक्तींना पाळावेंच लागतें. वारंवार पाळावीं लागलेलीं हीं नियंत्रणें, त्यांचें उल्लंघन केल्यास भोगावी लागणारी शिक्षा, आणि त्या नियंत्रणांचें पालन केल्यानें समाजाकडून मिळणारी प्रतिष्ठा ( approval ) यांच्या योगानें त्या नियंत्रणांबद्दल—त्या नियमांबद्दल—एक प्रकारची आदरबुद्धि वाटूं लागते. समाजाच्या नियमांप्रमाणें वागणें हें सुखसंपादनाच्या व शिक्षा टाळण्याच्या

दृष्टीनें हिताचें व शहाणपणाचें आहे, इतकेंच नाहीं तर अशा तऱ्हेनें वागणें हें चांगलें आहे, तें कर्तव्य आहे, अशा तऱ्हेची योग्यायोग्यतेची भावना त्याच्या मागोमाग उत्पन्न होऊं लागते. समाजाच्या उत्क्रांतीप्रमाणें, हळुहळू नवीन नियम करावे लागतात, आणि मनुष्याच्या सहज प्रवृत्तींवर अधिक नियंत्रणें घालावीं लागतात. पूर्वींच्या नियंत्रणांबद्दल वाटूं लागलेला आदर आणि स्वाभिमान या नवीन नियमांबद्दलहि आपोआप वाटूं लागतो; आणि अशा तऱ्हेनें समाजाचीं नैतिक परिमाणें ( standards ) आणि व्यक्तींचीं ध्येयें ठरलीं जातात. ही आदरबुद्धि आणि हा स्वाभिमान हींच मनुष्याच्या नैतिक कल्पनांना आधारभूत असतात आणि त्या अनुरोधानें आपलें वर्तन समाजाच्या नैतिक ध्येयाशीं सुसंगत राखण्याचा म्हणजे सद्वर्तनानें वागण्याचा प्रत्येक मनुष्य प्रयत्न करीत असतो. सर्वच मनुष्यें आपलें वर्तन पूर्ण नीतिमान् ठेवतात असें नाहीं. एखाद्या सर्वसमर्थ व्यक्तीनें सर्व कायद्यांची तंतोतंत अंमलबजावणी करण्याचें ठरविलें तर सर्वच व्यक्तींना तुरुंगांत जावें लागेल, आणि पहारा करण्याकरितां पोलिसच शिल्लक उरणार नाहीं! ही गोष्ट जरी बहुतांशीं खरी असली तरी हेंहि तितकेंच खरें आहे कीं, प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत नीतीची आणि सद्वर्तनाची जाणीव असते आणि तिच्याप्रमाणें वागण्याचा तो शक्य तितका प्रयत्न करीत असतो.

एक लहानसें उदाहरण घेऊन हें विवेचन आपण अधिक स्पष्ट करूं. मुलांची शाळा हा लहानसा समाज आहे, त्याचे ठराविक नियम आहेत व शाळेंतील मुलांवर ते बंधनकारक समजले जातात. अशा परिस्थितींत, जिन्यावरून जातांना पावलें वाजवूं नयेत, असा एक नवीन नियम करण्यांत आला. हा नवीन नियम केल्याबरोबर तो कोणत्या वृत्तीनें व कशा प्रकारें अंमलांत येतो यावरून त्या शाळेची शिस्त चांगली अगर वाईट ठरेल; म्हणजे त्या समाजांतील व्यक्तींच्या मनांत सामाजिक नियमांबद्दल कोणत्या प्रकारची भावना आहे हें दिसून येईल. शाळेचे नियम मोडले असतां विशिष्ट शिक्षा होते ही गोष्ट खरी, पण अशा शिक्षेच्या भीतीनें हा नवीन नियम पाळला गेला तर ती शिस्त मोठीशी स्पृहणीय समजली जाणार नाहीं. आजपर्यंतच्या वागणुकीमुळें शाळेच्या नियमांबद्दल आदर वाटूं लागून जिन्यावरून जातांना आपण पावलें वाजविलीं तर तें कृत्य आपण चांगलें

केलें नाहीं, अशी स्वतःची जाणीव उत्पन्न होऊन तो नियम पाळला गेला तरच तीं मुलें नीतिमान् ठरतील. अशा वेळीं पावलें वाजविण्याचे दुष्परिणाम सर्व व्यक्तींना पटलेले असतातच असें नाहीं. त्यांतील कांहीं व्यक्तींना ते पटले असतील व केवळ त्यांच्या अनुकरणानें व सहवासानेंच इतर मुलेंहि ती गोष्ट मान्य करितील. पण नियम पाळणें हेंच कृत्य चांगलें या बुद्धीनेंच सर्व मुलें वागतात. अर्थात् अशा तऱ्हेची नियमांबद्दलची आदरबुद्धि उत्पन्न होणें हेंच सामाजिक नीतिमत्तेचें खरें गमक आहे. त्या शाळेंतील शिक्षणाची पद्धति, शिक्षकांचें वर्तन, शाळेंत राखलेलें वातावरण इत्यादि अनेक गोष्टींवर ही शिस्त अवलंबून असते. त्याप्रमाणें समाजांतहि नियमांबद्दलची आदरबुद्धि म्हणजे नीतिमत्ता त्या समाजांतील संस्कृति, सामान्य वातावरण इत्यादि अनेक गोष्टींमुळें उत्पन्न होत असते.

## सहज प्रवृत्तींचे संस्कार

कांहीं क्रिया मनुष्य प्राणी जन्मतःच चांगल्या रीतीनें करूं शकतो, तर कांहीं पुष्कळ दिवसांच्या अनुभवानें व शिक्षणानेंहि त्यास चांगल्या तऱ्हेनें साधत नाहींत. मूल जन्माला आल्याबरोबरच श्वासोच्छ्वास करणें, अन्नाचें पचन करणें इत्यादि क्रिया आपोआपच होऊं लागतात. त्यानंतर पुष्कळ दिवसांच्या प्रयत्नानें तें चालण्यास व बोलण्यास शिकतें. हळुहळू स्वसंरक्षणाची जाणीव उत्पन्न होऊन केव्हां भीतीनें पळून जाऊन संरक्षण करण्याची, तर रागानें दुसऱ्यावर आघात करून स्वतःचें व्यक्तित्व निदर्शनास आणण्याची क्रिया तें करूं लागतें. वय वाढूं लागून त्याबरोबर नवीन इच्छा व आकांक्षा उत्पन्न झाल्यामुळें त्या पूर्ण करण्याकरितां अप्रिय गोष्टी टाळण्याचा व प्रिय गोष्टी संपादन करण्याचा मनुष्य प्रयत्न करूं लागतो. परिस्थितीमुळें आपल्या नैसर्गिक प्रवृत्तींच्या ओघास समाजाला मान्य होईल अशा तऱ्हेनें वळण द्यावें लागतें, हें वळण देतांना मूळच्या प्रवृत्तींत पुष्कळच बदल करावा लागतो, बालपणापासून लागलेल्या संवयींमुळें आणि स्नेह्यांच्या अगर वडील मंडळींच्या सहवासानें उत्पन्न झालेल्या नवीन ध्येयामुळें मनांतील इच्छा दाबाव्या लागतात, या सर्व क्रिया-प्रतिक्रियांचा परिणाम होऊन एक विशिष्ट

प्रकारची मनोवृत्ति तयार होते आणि त्या मनोवृत्तीमुळें घडून येणाऱ्या क्रियासमुच्चयास त्या मनुष्याचें वर्तन असें छोटेंसें नांव आपण देतों.

मनुष्याच्या वर्तनाचा मुख्य आधार त्याचे ठिकाणीं असलेल्या सहज प्रवृत्ति आहेत ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. जीवसृष्टीची उत्क्रांति होऊन हल्लींच्या स्थितीस येण्यास मनुष्याला ज्या अवस्थांमधून जावें लागलें त्या त्या अवस्थांत असतांना जीवनकलहांत टिकाव धरून राहण्याकरितां ज्या क्रिया त्याला उपयोगीं पडल्या असतील त्या त्या क्रिया करण्याची प्रवृत्ति मनुष्याचे स्वभावांत भिनली असावी आणि हल्लींच्या अवस्थेंत त्या क्रिया करण्याची प्रवृत्ति जन्मतःच उत्पन्न होत असावी. या प्रवृत्तींची संख्या किती, त्या कशा उत्पन्न झाल्या, त्यांचें निश्चित स्वरूप काय वगैरे-संबंधीं मानसशास्त्रज्ञांत अनेक मतें आहेत. त्या वादांत न पडतां आपणांस इतकें म्हणतां येईल कीं, या प्रवृत्ति सह-ज ( innate, inborn ) असतात आणि प्रत्येक मनुष्यास विशिष्ट प्रकारांच्या क्रिया करण्यास त्या प्रवृत्त करतात. या प्रवृत्ती जरी सह-ज असल्या तरी जन्मतः त्या पूर्ण विकासित स्वरूपांत असतात असें नाहीं. मनुष्याच्या वयाबरोबर त्यांचाहि विकास होत जातो आणि परिस्थिति व शिक्षण यांच्या योगानें या विकासास निरनिराळें वळण मिळत असतें. अगदीं लहान मुलाच्या ठिकाणीं दूध पिणें किंवा दुसऱ्याचें लक्ष आपणांकडे वेधून घेण्याकरितां रडणें अशासारख्या स्वसंरक्षणास अत्यंत अवश्य अशा क्रिया करण्याचीच प्रवृत्ती दिसून येते; पण त्यानंतर क्रमाक्रमानें अनेक प्रवृत्ती उत्पन्न होऊन मनुष्यास त्या निरनिराळीं कर्मे करण्यास प्रवृत्त करतात.

अगदीं लहान मुलांचें किंवा रानटी अवस्थेंतील मनुष्यांचें वर्तन पाहिलें तर एखादी प्रवृत्ति उत्पन्न झाल्याबरोबर तिची पूर्तता होत असलेली आपणांस दिसेल. खाण्याची इच्छा उत्पन्न झाल्याबरोबर मिळेल ती वस्तु मिळेल तेथें भक्षण केली जाते. पण शिक्षण व अनुभव यांच्या योगानें मनुष्य अधिक सुसंस्कृत होऊं लागला, म्हणजे या सहज प्रवृत्तींचें नियमन करून त्या व्यक्त करण्याच्या पद्धतींत तो बदल करूं शकतो. ठराविक वेळींच खाण्याची पद्धति अंमलांत येते; पण आयत्या वेळीं अन्न मिळेल अशी खात्री नसल्यानें विशिष्ट पद्धतीनें अन्न तयार करण्याची व तें सांठवून ठेवण्याची कलाहि

प्रचारांत येते. समाजाची संस्कृति ज्या मानानें उच्च असेल त्या मानानें या प्रवृत्ती व्यक्त करण्याची पद्धति बदलते आणि त्यामुळें अनेक कला व संस्था उदयास येतात. प्रत्येक व्यक्तीलाहि शिक्षण व अनुभव ज्या तऱ्हेचा येत जाईल त्या मानानें या सहज प्रवृत्तींचें नियमन करण्याची किंवा त्या व्यक्त करण्याची तऱ्हा निरनिराळी दृष्टीस पडते. अशा सर्व प्रवृत्तींपैकीं युद्धप्रवृत्ति, रतिप्रवृत्ति आणि संचयप्रवृत्ति या मनुष्याच्या वर्तनावर महत्त्वाचे परिणाम घडवून आणतात. म्हणून त्यांचें नियमन करितांना वर्तनांत कसा कसा बदल होत जातो हें थोडक्यांत पाहूं.

## युद्धप्रवृत्ति

अगदीं प्राचीन कालीं स्वसंरक्षणाकरितां व योगक्षेम चालविण्याकरितां शत्रूशीं युद्ध करणें हाच एक मार्ग होता, व त्या मार्गाचेंच अवलंबन करून मनुष्यास व समाजास जगणें शक्य झालें म्हणून ती प्रवृत्ति मानवी मनांत पूर्ण भिनलेली आहे. अगदीं लहानपणीं दुसऱ्याशीं भांडणें व आपणांस हवी असेल ती वस्तु दुसऱ्यास मारून स्वतःच्या शरीरसामर्थ्यावर संपादन करणें या गोष्टी लहान मुलें आपल्या सहज प्रवृत्तीस अनुसरूनच करतात. खेळांचे सामने करून त्यांत प्रतिपक्षावर जय मिळवून तरुण विद्यार्थी शिष्टसंमत अशा मार्गानें आपली युद्ध करण्याचीच हौस भागवून घेत असतात. दुसऱ्यानें अपमान केला असतां किंवा आपलें अतिशय मोठें नुकसान केलें असतां, रागाच्या भरांत मोठीं माणसेंहि दुसऱ्याशीं भांडतात किंवा त्यास इजा करतात तेंहि या प्रवृत्तीचेंच उदाहरण होय. या सहज प्रवृत्तीस इतक्या मोकळेपणानें समाजांत वाव दिला जात नाहीं व म्हणून आपल्या या प्रवृत्तीस विशिष्ट पद्धतीनें नियमन घालण्याचा आपण प्रयत्न करतों. आपलें नुकसान झालें असतां, ताबडतोब दुसऱ्यास इजा करून आपलें नुकसान भरून काढण्याऐवजीं आपण कायद्याची मदत घेतों, फिर्याद दाखल करतों व अशा तऱ्हेनें ही प्रवृत्ति व्यक्त करण्यास विशिष्ट मार्ग आंखून देतों. आपल्याला हवी असलेली दुसऱ्याची वस्तु शक्तीच्या जोरावर घेणें कमीपणाचें समजलें जाऊं लागल्यामुळें आपण ती वेगळ्या उपायानें हस्तगत करूं पाहतों. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचा मुलुख आपल्याला

हवा एवढ्याचकरितां तो ताब्यांत घेतांनाहि आपले हेतु शक्य तितके आंतरराष्ट्रीय समाजास पटतील अशाच तऱ्हेनें सिद्ध करतांना पाहिलें म्हणजे ही युद्ध करण्याची सहज प्रवृत्ति सुसंस्कृत राष्ट्रांसहि अजिबात दडपून टाकणें कसें अशक्य आहे हें पाहून आश्चर्य वाटतें.

## संचयप्रवृत्ति

मनुष्यप्राण्याच्या वर्तनाला इतर प्राण्यांच्या वर्तनापेक्षां अगदीं निराळें वळण लावणारी प्रवृत्ति म्हणजे संपत्तीच्या संचयाची होय. वस्तूची जरूर लागली म्हणजे ती संपादन करण्याचा प्रयत्न करणें एवढेंच खालच्या कोटीच्या प्राण्यांना माहीत असतें. परंतु अशा तऱ्हेनें प्रत्येक वस्तु जरूर भासेल त्या वेळीं मिळेलच अशी खात्री नसल्यामुळें जेव्हां मिळेल तेव्हां घेऊन संचय करून ठेवण्याची प्रवृत्ति मधमाशा, मुंग्या व पक्षी यांसारख्या खालच्या कोटींतील कांहीं प्राण्यांतहि दिसून येते. अगदीं प्राचीन काळीं अशाच स्वरूपाच्या आलेल्या अनुभवांवरून ही प्रवृत्ति मनुष्यप्राण्याच्याहि अंगवळणीं पडली असावी. सांपडेल ती वस्तु हस्तगत करण्याची लहान मुलांची प्रवृत्ति प्रसिद्धच आहे. शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या खिशांतून व पुस्तकांच्या पिशव्यांतून किती अनेकविध पदार्थांचा संग्रह असतो, हें प्रत्येक शिक्षकास माहीत आहेच. पोस्टाचीं तिकिटें, रंगीत दगड, काड्याच्या पेट्यांवरील चित्रें यांसारख्या निरुपयोगी वस्तूंचा संग्रह करण्याची प्रवृत्ति बालपणीं मोठ्या प्रमाणावर असते. मोठीं माणसेंसुद्धां निरनिराळ्या पदार्थसंग्रहालयांतून हीच प्रवृत्ति व्यक्त करीत असतात. द्रव्य संपादन करणें व पुढील पिढीकरितां त्याचा सचय करणें हें बहुतेक मनुष्यांचें मुख्य ध्येय होऊन राहिलेलें आहे.

आपल्याला हवी ती वस्तु विनहरकत संपादन करणें सर्वांना शक्य नसल्यामुळें स्वामित्वहक्काविषयीं विशिष्ट नियम करण्यांत आले. जमिनींतील रान काढून ज्यानें ती प्रथम लागवडीस आणली तो तिचा मालक झाला व त्यास योग्य मोबदला दिल्याशिवाय त्याचा मालकी हक्क काढून घेऊं नये, असें ठरविण्यांत आलें. जमीन, द्रव्य, गुरेंढोरें यांसारख्या मूर्त वस्तूंप्रमाणेंच विचार, कल्पना यांसारख्या अमूर्त वस्तूंवरील आपलें स्वामित्व अबाधित ठेवण्याची सोय करण्याकरितां पेटंट वगैरेंच्या कल्पनांची वाढ झाली आणि अमूर्त

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. ...... नं.
ता. ............



कल्पनादि ज्याच्या प्रथम लक्षांत आल्या त्याच्या मालकीच्याच आहेत असें ठरविण्यांत आलें. समाजानें केलेल्या नियमांस न जुमानतां दुसऱ्याचें स्वामित्व हिरावून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना शिक्षा करण्याकरितां दंडनीती( criminal law )ची वाढ झाली. धार्मिक किंवा समाजहितबुद्धीनें वैयक्तिक स्वामित्वाची प्रवृत्ति कमी करून त्याऐवजीं सामाजिक स्वामित्वाची कल्पना वाढविण्याकरितां आजपर्यंत अनेक प्रयत्न झाले व समाजसत्तावादी लोकांकडून अद्यापिहि होत आहेत. परंतु अशा प्रयत्नांना यश येणें किती कठिण पडतें हें पाहिलें म्हणजे संपत्तीच्या संचयाची व त्यावरील स्वामित्वाची ही प्रवृत्ति मानवी मनांत किती खोल रुजलेली आहे याची कल्पना येईल.

## रतिप्रवृत्ति

रति( sexual )प्रवृत्तींची पूर्तता मनुष्यप्राणी रानटी अवस्थेंत असतांना ताबडतोब करीत असे. परंतु या प्रवृत्तीचें नियमन व रूपांतर सुसंस्कृत समाजांत जितकें झालें आहे, तितकें दुसऱ्या कोणत्याहि प्रवृत्तीचें झालेलें नाहीं. या प्रवृत्तीचें नियमन करण्याकरितांच विवाहसंस्थेची वाढ झाली असून प्राचीन ग्रंथांतून विवाहाचे सांगितलेले आठ प्रकार, समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्यें या प्रवृत्तीचें नियमन कसकसें होत गेलें हें दाखविणाऱ्या पायऱ्याच होत. लहान मुलांना स्त्रीपुरुषभेदाची सुरुवातीस बिलकूल जाणीव नसते. परंतु अशा तऱ्हेची स्पष्ट जाणीव होण्याच्या पूर्वींच मुलांनीं व मुलींनीं वेगळ्या तऱ्हेचे कपडे घालावेत, वेगळ्या तऱ्हेनें बोलावें व वागावें अशासारखे समाजानें घातलेले नियम त्यांस शिकविण्यांत येतात. मुलांमुलींनीं परस्परांशीं ठेवावयाच्या संबंधांच्या बाबतींत समाजानें घालून दिलेले नियम मुलें फार लहानपणीं शिकतात. पुढील आयुष्यांत त्या प्रवृत्तीचें नियमन करणें सोपें जावें या हेतूनें आचरावयाचे सर्व नियम स्त्रीपुरुषभेदाची निश्चित जाणीव होण्याच्या पूर्वींच मुलांच्या अंगवळणीं पडलेले असतात. मुलगा मोठा होईपर्यंत हे सामाजिक नियम इतके बसून जातात कीं, या रतिप्रवृत्तीचें नियमन करणें बरेंच सुलभ जातें.

मानवी मनांत असलेल्या कांहीं महत्त्वाच्या प्रवृत्तींचें उदाहरणादाखल जें विवेचन केलें आहे, त्यावरून एक गोष्ट उघड दिसून येते. ती ही कीं,

रानटी मनुष्याला कार्यप्रवण करणाऱ्या ज्या प्रवृत्ती असतात त्याच प्रवृत्ति सुसंस्कृत मनुष्याच्या वर्तनाच्याहि मुळाशीं असतात. सामान्य मनुष्याला या प्रवृत्तींविषयीं किंवा त्या प्रवृत्तींच्या हेतूंविषयीं फारसें ज्ञान असो अगर नसो, परंतु त्याचें सर्व वर्तन या प्रवृत्तींमुळेंच घडून येत असतें. आतां इतकें खरें कीं बाल्यावस्थेंत या प्रवृत्ती जशा उघडपणें प्रतीत होतात, तशा सुशिक्षित मनुष्याचें प्रवृत्तींचें संयमन ( inhibition ) आणि नियमन ( regulation ) करण्याचें सामर्थ्य वाढलें असल्यामुळें त्या अवस्थेंत त्या दिसून येत नाहींत. केव्हां केव्हां तर सामाजिक आणि नैतिक ध्येयांचा परिणाम झाल्यानें मनुष्याच्या वर्तनांत त्या प्रवृत्ति ओळखूंहि येणें कठीण होतें.

अशा तऱ्हेनें प्रवृत्तींचें संयमन आणि नियमन करून आपल्या वर्तनास इष्ट असें वळण लावण्यास मानसिक सामर्थ्याचा बराच विकास व्हावयास पाहिजे. एखादें कृत्य करण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाल्याबरोबर आपण कोणतें कृत्य करणार आहोंत व त्याचे परिणाम काय होतील, याची निश्चित कल्पना मनश्चक्षूंपुढें उभी करतां आली पाहिजे; आपल्या कृत्यांच्या अनिष्ट परिणामामुळें पुढें होणाऱ्या दुःखाची आतां मिळणाऱ्या तात्कालिक सुखाशीं तुलना करून योग्य तो निर्णयहि ( judgment ) करतां आला पाहिजे; आणि त्या निर्णयाप्रमाणें आतां उत्पन्न झालेल्या प्रवृत्तींचें नियमन करण्यास इच्छा-( will, संकल्प )शक्तीचा उपयोग करतां आला पाहिजे. या सर्व गुणांची वाढ झाली नसेल तर केवळ कांहीं प्रवृत्तींचे दुष्परिणाम होतात एवढ्या जाणिवेनेंच त्या प्रवृत्तींचें नियमन करतां येणें शक्य नाहीं. दिव्यावर झडप घातल्यानें मृत्यु येतो, याचा पिढ्यानुपिढ्या अनुभव घेऊनहि अद्यापपावेतों पतंगानें दिव्यावर झडप घालण्याचें कांहीं सोडून दिलें नाहीं. तीच स्थिति माणसाची. अनीतीनें संपादन केलेल्या तात्कालिक सुखापेक्षां प्रामाणिकपणानें मिळविलेल्या मीठभाकरीचें चिरकालिक सुख श्रेष्ठ एवढें समजूनच केवळ भागत नाहीं, तर तात्कालिक सुखाकडे असलेला मनाचा ओढा आवरण्याइतकी इच्छाशक्तिहि प्रबळ असली पाहिजे. मुलांच्या वर्तनाचा विचार करतांना व दुर्वर्तनाचे परिणाम वाईट होतात हें पाहून त्यांनीं आपलें वर्तन बदलावें अशी अपेक्षा करितांना वर उल्लेखिलेल्या मानसिक गुणांचा योग्य विकास मुलांच्या ठायीं झाला आहे कीं नाहीं हें लक्षांत घेणें जरूर आहे.

# वर्तन, सद्वर्तन आणि दुर्वर्तन

## प्रवृत्ति व विकार

सहजप्रवृत्ति व विकार यांचा संबंध नित्य व निकटचा असतो. बालपणीं प्रवृत्ति फारशा विकसित झाल्या नसल्यानें त्या त्या प्रवृत्तीवर अवलंबून असणारे मनोविकारहि अस्तित्वांत नसतात. प्रवृत्ति उत्पन्न होऊन क्रिया घडूं लागते त्या वेळीं येणारे अनुभव व होणारी जाणीव यांच्या योगानें हे विकार उत्पन्न होत असतात; आणि म्हणून आदर, सौंदर्य-प्रीति, व्यवस्थितपणाची आवड, कामुक प्रेम यांसारखे मनोविकार क्रमाक्रमानेंच दिसूं लागतात.

सहजप्रवृत्तीस अनुसरून कार्ये करितांना त्याबरोबरच मनांत जे निरनिराळे विकार ( emotions ) उत्पन्न होतात त्यांचेंहि महत्त्व निःसंशय उपेक्षणीय नाहीं. मनुष्याच्या वर्तनाला वळण लावण्याचें मनोविकारांचें सामर्थ्य निर्णयशक्ति आणि इच्छाशक्ति यांच्यापेक्षांहि अधिक दिसून येतें. प्रेम, द्वेष, ईर्षा इत्यादि विकारांमुळें जगांत जीं बरींवाईट कृत्यें अहर्निश घडतात, तीं पाहिलीं म्हणजे या विधानाची सत्यता पटते. पुत्रप्रेमामुळें स्वतःची उपासमार करणारी माता, राष्ट्रभक्तीनें स्वतःचे प्रिय प्राणहि अर्पण करण्यास तयार होणारा देशभक्त, धर्माकरतां किंवा तत्त्वाकरतां कष्ट सहन करणारा तत्त्वनिष्ठ इत्यादिकांच्या मनांतील स्वसंरक्षणासारख्या मूलभूत प्रवृत्तिसुद्धां अजिबात नाहींशा झाल्या आहेत कीं काय असा भास होतो. संपत्तीचा संचय करण्याची प्रवृत्ति मनुष्यमात्रास स्वाभाविक असतांहि दुर्दैवी प्राण्यांच्या दुःखानें कळवळलेला सत्पुरुष आपल्या संपत्तीचा परोपकारांत अखंड व्यय करीत असतो. आपल्या आयुष्याचें विशिष्ट ध्येय ठरवून त्याकरितां अहर्निश प्रयत्न करणारे लोक आपल्या सर्वच प्रवृत्ति दाबून टाकीत असतात आणि आपली सर्व शक्ति त्या एका ध्येयाकरितांच खर्च करीत असतात.

## नैतिक विकासाच्या अवस्था

अनेक मानसिक शक्ति आणि परिस्थिति यांच्या अन्योन्य संबंधांमुळें सुसंस्कृत मनुष्याच्या वर्तनावर कसकसे परिणाम होत जातात हें आपण आतांपर्यंत पाहिलें. त्याचप्रमाणें एकाच व्यक्तीच्या आयुष्यांत ह्या नैतिक भावनेचा विकास कोणत्या प्रमाणांत होत जातो हें पाहणें दुर्वर्तनाच्या प्रश्नाचा पूर्ण विचार करण्याच्या दृष्टीनें जरूर आहे. सुशिक्षित आईबापांच्या मुलांमध्यें सुद्धां

## दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

नैतिक भावनेचें अस्तित्व अगदीं बालपणीं जवळजवळ नसतेंच. नैसर्गिक स्वरूपांत दृष्टीस पडत असलेल्या मुलांच्या सहजप्रवृत्तींना आळा घालण्याचा प्रयत्न बिलकुल झालेला नसतो. त्यानंतर नैतिक भावनेचा विकास क्रमानें होत जाऊन तो तारुण्याच्या सुरुवातीस म्हणजे सामान्यतः १८।१९ वर्षांच्या सुमारास पूर्णत्वास येतो. मुलांना आपल्या कृत्यांबद्दल कायदेशीर रीत्या जबाबदार धरलें जाण्याचा हाच काळ असतो. परंतु त्यापूर्वींच्या काळीं त्यांच्यावर कोणतीच नैतिक जबाबदारी नसावी असा मात्र ह्याचा अर्थ सामान्यतः समजला जात नाहीं. नैतिक दृष्टि, आपल्या कृत्यांचा नैतिकदृष्टया विचार करण्याची पात्रता, स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीस पटणाऱ्याच क्रिया करण्याचें व इतर–तद्विरोधी क्रियांना आवरण्याचें सामर्थ्य, या सर्व गोष्टी कांहीं मुलगा वयांत आल्याबरोबर एका रात्रींत उत्पन्न होऊं शकत नाहींत. वयाच्या मानानें व नैसर्गिक बुद्धिमत्तेप्रमाणें यांचा विकास हळुहळू अगदीं बालपणापासूनच होत असतो. मोठ्या मनुष्यावर आपल्या कृत्यांची नैतिक जबाबदारी ज्याप्रमाणें टाकतां येते त्याचप्रमाणें लहान मुलांवरही त्यांच्या कृत्याची जबाबदारी थोडीबहुत पडतेच; मात्र मुलांच्या वयाप्रमाणें व बुद्धीच्या विकासाप्रमाणें या जबाबदारीचें प्रमाण व क्षेत्र कमीअधिक असूं शकेल.

या नैतिक भावनांचा विकास कोणत्या प्रमाणांत होत असतो व त्या अनुरोधानें त्यांच्या कृत्यांची नैतिक जबाबदारी किती प्रमाणांत मुलांवर असते हें दर्शविण्याकरितां कांहीं स्थूल विभाग काल्पितां येतात. पण हे विभाग केवळ कल्पिलेलेच असतात; त्यांच्या मर्यादरेषा निश्चित नसून एक विभाग संपून दुसऱ्यास आरंभ कोठून झाला हें सांगणें शक्य नसतें. पहिला विभाग संपण्याच्या पूर्वींच दुसऱ्यास आरंभ होऊन गेलेला असतो, आणि 'व्यक्ति तितक्या प्रकृति' हा नियम मानसशास्त्रांतही अबाधित असल्यानें, किंबहुना तो जास्तच महत्त्वाचा असल्यानें, सामान्यतः कल्पिलेले हे विभाग सर्व व्यक्तींच्या ठायीं पूर्णपणें त्याच प्रमाणांत दिसतील असेंही नाहीं. शरिराचा, शारीरिक शक्तीचा व नैसर्गिक बुद्धिमत्तेचा विकास यांचा परिणाम नैतिक भावनांच्या विकासावर अतिशय होत असल्यानें कोणत्याही व्यक्तीचा विचार करतांना केवळ मार्गदर्शकत्वापलीकडे या विभागांचें महत्त्व नाहीं, ही गोष्ट दृष्टीआड होऊं देतां कामा नये.

# वर्तन, सद्वर्तन आणि दुर्वर्तन

## बाल्य

मुलांच्या आयुष्यांतील बाल्य ( infancy ) हा केवळ निर्नैतिक ( non-moral ) विभाग आहे. नीति, अनीति, चांगलें किंवा वाईट या कल्पना अजून अस्तित्वांतच नसल्यानें सर्व कृत्यें स्वतःच्या प्रवृत्तींस अनुसरूनच होत असतात. अमुक करावें अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, तिचे बरेवाईट परिणाम किंवा तिची योग्यायोग्यता यांचा विचार केल्याशिवायच त्या-प्रमाणें कृति घडून येत असते. जेव्हां केवळ स्वतःच्या प्रवृत्तींची तृप्तता करण्याकडेच असलेलें लक्ष कमी होतें, आपल्या वर्तनाविषयीं लोकांचा चांगला ग्रह व्हावा, लोकांत बरें दिसेल तेंच करावें अशी वृत्ति उत्पन्न होते व त्यास अनुसरून मुलाच्या वर्तनांत बदल होऊं लागतो, त्या वेळीं नीतिमत्तेच्या किंवा सद्वर्तनाच्या कल्पनेचा उगम झाला असें म्हणतां येईल. बाल्यावस्थेंत सर्व लक्ष स्वतःवरच केंद्रीभूत झालेलें असल्यानें त्या कालांतील मुलांच्या वागणुकीस नीतिदृष्ट्या कांहींच महत्त्व देतां येत नाहीं.

आपल्या व्यतिरिक्त बाहेर जग आहे व त्यांतील व्यक्तींच्या सोयीप्रमाणें आपल्याला कांहीं बाबतींत तरी वागलें पाहिजे, ही जाणीव वयाच्या तिसऱ्या वर्षाच्या सुमारास येऊं लागते. आपल्या प्रवृत्तींना नियमन करण्याची आव-श्यकता अनुभवानें पटल्यामुळें, वडील माणसांच्या आज्ञेमुळें व सहवासांतील व्यक्तींच्या उदाहरणामुळें थोडेंसें संयमन ( control ) या कालांत अंगीं येऊं लागतें. त्याजबरोबर अनुकरणाची वृत्तिहि याच कालीं जोरांत असल्यानें इतरांच्या कृत्यांचें अनुकरण तावडतोब केलें जातें. अर्थात् संवयीनें चांगल्या गोष्टी अंगवळणीं पडण्याला हाच काल योग्य असतो.

मोठेपणीं सद्वर्तनास अवश्य असणारे सद्गुण, चांगल्या संवयी व आत्म-संयमन यांची सुरुवात अशा प्रकारें याच कालीं होत असल्यानें यास नैतिक वर्तनाच्या पूर्व तयारीचा काल म्हणतां येईल. परंतु सत् आणि असत्, चांगलें आणि वाईट यांच्या कल्पना अद्याप निश्चित झालेल्या नसतात. जी गोष्ट वडील करूं देतात ती चांगली व जी गोष्ट करूं देत नाहींत ती वाईट याच्या पलीकडे या कल्पनांचा विकास झालेला नसतो. डाव्या हातानें जेवणें आणि शेजारच्या बाळूची रंगीत गाडी आणणें या दोन्ही गोष्टी

आईनें करूं नको म्हणून सांगितलें असल्यानें सारख्याच त्याज्य समजल्या जातात.

## शैशव

यानंतरचा काल सातव्या वर्षापासून सुमारें बाराव्या तेराव्या वर्षापावेतों धरतां येईल. या कालांत कर्तव्याची जाणीव उत्पन्न होऊं लागून नवीन नवीन परिस्थितींत येणाऱ्या नवीन अनुभवांच्या योगानें ही जाणीव हळुहळू विकास पावत असते. आपलीं कांहीं कृत्यें मान्य होतात म्हणजे तीं केलीं तर चालतात व इतर कांहीं कृत्यें मान्य होत नाहींत म्हणजे तीं केलीं तर शिक्षा होते अगर लोक नांवें ठेवतात, यावरून अमुक प्रकारचीं कृत्यें चांगलीं व अमुक वाईट ही जाणीव मुलाला येते. सदसद्विवेकबुद्धि किंवा बऱ्यावाईट गोष्टींच्या निश्चित कल्पना अद्याप तयार झालेल्या नसतात. परंतु शिक्षणानें कांहीं बाबतींत नीतीच्या कल्पना या कालांतही अंगवळणीं पडूं शकतात. उदाहरणार्थ, मालकी हक्काची कल्पना देऊन चोरी करणें त्याज्य आहे अशासारख्या गोष्टी शिकवितां येतात व शिक्षेच्या भीतीनें नव्हे तर त्याज्य म्हणून कांहीं गोष्टी न करणें अंगवळणीं पडूं शकतें. परंतु, अपक्व वयामुळें व या बाबतींत पालकांनीं अगर वडील मंडळींनीं फारशी काळजी घेतली नसल्यास नीतीची ही जाणीव या कालांत पूर्णपणें उत्पन्न होणार नाहीं. कांहीं मुलांमध्यें ही जाणीव स्पष्टपणें दिसूं लागून अमुक वर्तन चांगलें व अमुक वाईट यांची निश्चित कल्पना झालेली असते; परंतु मानसिक विकासाच्या अपूर्णतेमुळें अगर परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें सर्व मुलांना स्वतःच्या कर्तव्याची व चांगलें आणि वाईट यांची कल्पना पूर्णपणें आलेली नसते. वडिलांपासून व शिक्षकांपासून संपादन केलेलें नीतिमत्तेचें शाब्दिक ज्ञान मात्र या वयांत भरपूर असतें. अमुक वर्तन चांगलें, अमुक वर्तन वाईट, अमुक करूं नये, अमुक केलें तर पाप लागतें, यासारखी भाषा या वयांतील मुलांच्या तोंडून नेहमीं ऐकूं येते. पण त्यावरून त्यांच्या नीतिमत्तेच्या कल्पनांविषयीं कोणीं अनुमान बांधलें तर तें निःसंशय चुकेल. कारण नैतिक भावनांचा उगम स्वतःच्या अंतःकरणांत असतो आणि केवळ स्वतःच्या इच्छेनें त्याज्य वर्तनाचा त्याग करणाऱ्यालाच नीतिमान् म्हणतां येतें. या दृष्टीनें नीतीची कल्पना मुलांना वरील वयांत आलेली नसते.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. नि नं.
ता.



पौगण्ड

नैतिक भावनेची खरी उत्पत्ति बाराव्या तेराव्या वर्षाच्या सुमारास, पौगण्डावस्थेच्या ( adolescence ) सुरुवातीस होते. या वयांत सदसद्विवेकबुद्धीचा उगम होऊन तिचा विकास होऊं लागतो, शरिराची व इंद्रियांच्या शक्तीची वाढ पूर्ण होऊं लागते व तिच्याबरोबर नवीन नवीन प्रवृत्ति व मनोविकार हीं उत्पन्न होऊं लागतात. या नवीन उत्पन्न होणाऱ्या विकारांना आळा घालण्याचें शिक्षण अद्याप मिळालें नसल्यामुळें मुलांच्या वर्तनांत एक प्रकारचें चांचल्य किंवा विकारांचें प्राबल्य दिसून येत असतें. एकीकडे या नवीन उत्पन्न होणाऱ्या आशा, आकांक्षा, इच्छा व प्रवृत्ति हीं वाढत असतात तर सदसद्विवेकबुद्धीचा विकास व समाजाच्या नियंत्रणाची जाणीव हीं दुसरीकडे मनाला ओढीत असतात. अशा रीतीनें मुलांच्या मनांत या अवस्थेंत—विशेषतः सुरुवातीच्या तीनचार वर्षांत—तुमुल रण चालू असतें. मनःप्रवृत्ति व सदसद्विवेकबुद्धि यांच्यामधील हा झगडा पुष्कळ वेळां फार तीव्र होतो व त्याचे वर्तनावर झालेले परिणामहि दीर्घ काळ टिकतात. पण लहानपणापासून चांगल्या संवयी लागलेल्या असतील, शारीरिक व मानसिक विकास स्वाभाविक रीत्याच झाला असून तो आगंतुक दोषांनीं खुंटलेला नसेल, भोंवतालची परिस्थिति फारशी प्रतिकूल नसेल, तर या झगड्यांतून मुलगा सुरक्षितपणें निभावतो व त्याच्या नैतिक कल्पनांना व त्याच बरोबर वर्तनालाही स्थैर्य प्राप्त होऊं लागतें. वयाच्या सुमारें अठराव्या वर्षी हें नैतिक स्थैर्य प्राप्त होतें आणि त्यानंतरच्या दोनतीन वर्षांत कर्तव्याची व नैतिक जबाबदारीची जाणीव पूर्ण विकास पावते. स्वतःचा स्वार्थ व स्वतःवरील सामाजिक जबाबदारी यांचें आकलन मुलाला होऊं लागून समाजांतील इतर व्यक्तींच्या सुखांत व्यत्यय न आणतांच स्वतः सुखाचा उपभोग घेतला पाहिजे हें तत्त्व त्याला पूर्णपणें पटतें, इतकेंच नव्हे तर समाजाच्या हिताकरतां झटणें हाही आपल्या कर्तव्याचाच एक भाग आहे, याचीहि जाणीव त्याला पूर्णपणें होते.

पूर्वीच्या कालांतील शाब्दिक नीतिमत्ता जाऊन त्याऐवजीं आपण व समाज यांसंबंधींच्या भावना व कल्पना हळुहळू निश्चित होऊं लागतात व खऱ्या नीतिमत्तेचा उदय याच कालांत होतो. नैतिक ( म्हणजे समाजानें मान्य केलेलीं ) कृत्यें केल्यानें प्राप्त होणारें अंतःकरणाचें समाधान, किंवा

## दुर्वर्तनी मुलाची सुधारणा

अनैतिक (म्हणजे समाजानें अमान्य ठरविलेलीं) कृत्यें केल्यानें भासणारा मानसिक विषाद हीं याच काळांत भासूं लागतात. आपल्या कृत्यांची युक्तायुक्तता किंवा न्याय्यता त्याला पटूं लागते. शीलाचा पूर्ण विकास होऊन मनुष्याच्या आयुष्याला व वर्तनाला निश्चितता प्राप्त होण्याचा हाच काल असतो. आपल्या मनोविकारांना व प्रवृत्तींना कोठपावेतों मुभा द्यावयाची आणि केव्हां व किती प्रमाणांत त्यांचें नियमन करावयाचें याचा विचार त्याला करतां येतो; तसेंच परस्परविरोधी विकार मनांत उत्पन्न झाले असतां तारतम्य बुद्धीनें त्यांचा निर्णय करून आपलें स्थैर्य अढळ ठेवूं शकतो. आपल्या कर्तव्याच्या मर्यादा लक्षांत घेऊन त्या दृष्टीनें आपली जबाबदारी ओळखण्याचें महत्त्वाचें शिक्षण मनुष्य याच कालांत संपादन करीत असतो.

## संपूर्ण व्यक्तीची ओळख

प्रत्येक मनुष्याच्या मनांतील नैतिक भावनांचा विकास सामान्यतः वर दाखविल्याप्रमाणें होतो हें खरें असलें तरी परिस्थितिभेदानें व प्रकृतिभेदानें त्या क्रमांत पुष्कळच अंतर पडत असतें. समाजानें मान्य केलेल्या नीतितत्त्वांना अनुसरून वागण्याची आवश्यकता शिक्षण व अनुभव यांच्या योगानें हळुहळू पटूं लागते. पण नीतीचें हें शिक्षण चालू असतांना पुष्कळ मुलांचें वर्तन मधून-मधून नीतीच्या मर्यादा सोडून होत असतें. सामान्यतः ही स्थिति अल्प काल टिकणारी असते. प्रसंगविशेषीं घडलेलें हें अयोग्य वर्तन अपवादभूत ठरून तीं मुलें पुढें समाजांत उत्कृष्ट नागरिक म्हणून वागूं लागतात. पण कांहीं मुलांची वागणूक एकदां नीतीच्या मर्यादेच्या पलीकडे गेली कीं, ती पुनः योग्य मार्गावर कधींच येत नाहीं. जणुं काय शिक्षणाचा, अनुभवाचा व परिस्थितीचा त्यांच्या मनोवृत्तीवर कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं.

समाजानें ठरविलेल्या वर्तनक्रमास सोडून वागणाऱ्या या मुलांकडे साहजिकच सर्वांचें लक्ष जातें व शक्य तर त्यांस पुनः सन्मार्गावर आणण्याकरितां प्रयत्न करण्याच्या दृष्टीनें त्यांच्या वागणुकीचा विचार त्यांची संबंधी मंडळी करूं लागतात. अशा वेळीं ज्या एका विशिष्ट कृत्यामुळें लोकांचें लक्ष त्या मुलांकडे वेधलें गेलें असेल त्याच कृत्याचा विचार लोक करितात. परंतु दुर्वर्तनाचा शास्त्रीय दृष्ट्या विचार करावयाचा तर अशा तऱ्हेनें एखाद्या

कृत्याचा पृथक्‌पणें विचार करून चालणार नाहीं. मनुष्याच्या हातून घडणारी प्रत्येक बाह्य क्रिया त्याच्या अंतरांतील मनोवृत्तींचें दृश्य चित्र असतें. कोणतीही विशिष्ट क्रिया घडून येण्यास त्याच्या मनोवृत्तीची विशिष्ट ठेवण कारणीभूत असल्यानें प्रत्येक कृत्याचा अलगपणें विचार न करतां पूर्ण मनोवृत्तीचा विचार करावयास पाहिजे. रामानें चोरी केली किंवा गोविंदा शाळेंतून पळून गेला तर सामान्यत: त्या चोरीच्या किंवा पळून जाण्याच्या क्रियेचाच लोक विचार करतात व पुनः अशीं कृत्यें न घडावींत म्हणून आपापल्या बुद्धीप्रमाणें योजना करतात. पण रामानें किंवा गोविंदानें केलेल्या अनेक चांगल्या व वाईट कृत्यांपैकीं हें फक्त एक कृत्य आहे इतकेंच. हीं कृत्यें घडून येण्यास जी मनोवृत्ति कारण झाली त्या मनोवृत्तीचा ठाव पाहिला पाहिजे आणि त्यासाठीं त्याच्या सर्व वर्तनाचा समुच्चयानें विचार करावयास पाहिजे. त्या कृत्यांच्या पाठीमागें त्यांच्या मनोव्यापारांची जी सांखळी उभी असते, तिचा विचार व्हावयास पाहिजे. कारण दुर्वर्तन हा संपूर्ण वर्तनाचा फक्त एक लहानसा विभाग आहे.

पण तो विभाग लहान असला तरी तो इतर वर्तनापासून पृथक्‌पणें घडून येणारा नाहीं, इतकेंच नव्हे तर मनुष्याच्या सर्व वर्तनक्रमाशीं, त्याच्या मनःस्थितीशीं, किंबहुना त्याच्या सर्व जीवनाशीं त्याचा अविभक्त असा संबंध असतो. याकारितां प्रत्येक क्रियेचा स्वतंत्रपणें विचार न करतां पूर्ण व्यक्तीचा विचार करावयास पाहिजे. प्रत्येक निरनिराळ्या वर्तनविशेषांची बेरीज केली म्हणजे ती व्यक्ति होते असें नाहीं; तर या सर्व वर्तनविशेषांहून भिन्न पण त्या सर्व वर्तनास आधारभूत असलेलें मनुष्याचें व्यक्तित्व ( personality ) असतें व मनुष्याच्या व्यक्तित्वांतील भिन्नत्वामुळेंच त्याच्या प्रत्येक क्रियेंत भिन्न भिन्न छटा दिसून येतात. प्रत्येक मनुष्याच्या या व्यक्तित्वाचा विचार करावयाचा म्हणजे गर्भसंभवापासून आजतागायतच्या कालांतील त्या व्यक्तीच्या प्रवृत्ति, क्रिया व त्यावर परिस्थितीचे झालेले आघात व त्या आघातांना अनुसरून मनोवृत्तींत होणारा बदल या सर्वांचा विचार करावयास हवा. आनुवंशिक संस्कारांमुळें विशिष्ट तऱ्हेची शरीररचना व शरिराच्या वाढीची दिशा, ती वाढ होत असतांना उत्पन्न झालेल्या परिस्थितीचे शरिरावर व मनावर झालेले परिणाम, भोंवतालच्या परिस्थितीमुळें करावें

…लागलेलें वर्तन व त्या वर्तनाचे मनावर झालेले परिणाम, स्वतःची विचारपरंपरा व तत्कालीन समाजाची संस्कृति यांमुळें वर्तनांत झालेला फेरबदल वगैरे अनेक गोष्टी विचारांत घेतल्या नाहींत, तर त्या मुलाची—अगर मनुष्याची विशिष्ट व्यक्ति म्हणून आपल्याला पूर्ण ओळख होणार नाहीं आणि त्याच्या वर्तनाचा आपल्याला पुरेसा उलगडा करतां येणें शक्य नाहीं. सर्व प्रकारच्या पाण्याची रासायनिक घटना सारखीच असली तरीहि नदीच्या उगमापासून अखेरपर्यंत तेंच पाणी निरनिराळ्या परिस्थितींतून गेल्यामुळें प्रत्येक नदीचें पाणी वेगवेगळें असतें; त्याचप्रमाणें जन्मल्यापासून ज्या ज्या परिस्थितींतून मनुष्य जातो त्या सर्वांचा परिणाम त्याचेवर होत असतो. कोणत्याहि दोन प्राण्यांची परिस्थिति सर्वस्वीं सारखी असणें अशक्य असतें, त्यामुळें प्रत्येक मनुष्याचे अंगीं निरनिराळे व्यक्तिविशिष्ट गुण येतात व जगांत व्यक्ति तितक्या प्रकृति उत्पन्न होतात. जगांतील प्रत्येक व्यक्ति इतरांहून भिन्न असते, 'एकमेवाद्वितीयम्' असते, इतकेंच नव्हे तर ती भिन्न आहे म्हणूनच जगांत आनंद आहे. सर्व मनुष्यें सारखींच असतीं तर तीं एका छापांतील मूर्तींप्रमाणें नीरस व कंटाळवाणीं वाटलीं असतीं. पण या भिन्नपणालाहि कांहीं मर्यादा आहे. लहान मुलाच्या अस्वाभाविक वर्तनाचें सुरुवातीला जरी कौतुक केलें गेलें तरी त्याला आळाच घातला जातो; त्याचप्रमाणें समाजानें ठरविलेल्या मर्यादेच्या कक्षेबाहेरील वर्तन नाविन्याच्या सबबीवरही चालूं दिलें जात नाहीं. परंतु अशा तऱ्हेच्या वर्तनास आळा घालण्याचा अगर तें दुरुस्त करण्याचा प्रयत्न करितांना संपूर्ण व्यक्तित्वाचा—त्या व्यक्तीचे अंगीं असलेल्या सर्व विशिष्ट गुणांचा (traits)—विचार करून त्यांत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरच वर्तन बदलूं शकेल. वर्तन किंवा दुर्वर्तन हा त्याच्या व्यक्तिवैशिष्ट्याचाच एक विभाग असल्यानें संपूर्ण व्यक्तित्वांत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केल्याखेरीज वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करणें शक्य नाहीं.

## प्रकरण तिसरें

# दुर्वर्तनाची कारणपरंपरा

There is only one principle in penology that is worth any consideration ; it is to find out why a man does wrong and make it not worth his while.—Devon: *The Criminal and the Community.*

### वर्गीकरणाची अशक्यता

नीतिमत्ता व नैतिक भावना यांचा विकास इतका सावकाश होत असल्या-मुळें मुलांच्या उनाडपणाला किंवा दुर्वर्तनाला सामान्यतः अनीतीचें स्वरूप देणें योग्य नाहीं, ही गोष्ट आतांपर्यंतच्या विवेचनावरून उघड झाली आहे. एखादी गोष्ट करण्याची आपली अत्यंत इच्छा आहे, ती सर्वस्वीं योग्य आहे अशी आपली खात्री आहे, पण ज्या समाजांत आपण राहतों त्या समाजाचें एकंदर धोरण व नियम आपल्या प्रवृत्तीच्या विरुद्ध आहेत; अशा वेळीं विचारी व वयांत आलेल्या मनुष्यांचेंही वर्तन किती चमत्कारिक होतें! मग ज्यांच्या नीतीच्या कल्पना अद्याप संक्रमणावस्थेंत असून त्यांचा पूर्ण विकास व्हावयाचा आहे, अशा मुलांनीं केलेलें दुर्वर्तनाचें एखादें कृत्य एकदम अनीतीच्या किंवा गुन्ह्याच्या सदरांत ढकलणें अगदींच अयोग्य होईल. अशा मुलांच्या दुर्वर्तनांत नीतीचा संबंध पुष्कळ वेळां फार थोडा असतो. आपल्या प्रवृत्ति व मनोविकार यांना आवरून समाजानें ठरविल्या-प्रमाणें वर्तन ठेवण्यास शिकतांना सुरुवातीचे अयशस्वी झालेले ते प्रयत्न असतात इतकेंच.

दुर्वर्तनाच्या प्रकारांची यादी करून त्यांचें वर्गीकरण करणें अशक्य नसलें, तरी उपयोगी खास नाहीं. वर्गीकरण करावयाचेंच म्हटलें तर चोरी करणें, दुसऱ्याची वस्तु घेणें वगैरेसारखे अपराध एका सदरांत घालून त्यांना 'संपत्तिविषयक अपराध' असें नांव देतां येईल. भांडणें, मारामारी करणें यां-सारखे अपराध व्यक्तिविषयक होतील. शाळेंत न जाणें, पळून जाणें यांसारख्या समाजाचे नियम मोडण्याच्या प्रकारांना तिसऱ्या एका सदरांत घालतां

येईल आणि ही सदरांची संख्या हवी तितकी वाढवितां येईल. पण अमुक प्रकारचे अपराध अमुक कारणांनीं घडतात असें निश्चित सांगणें शक्य नसल्यानें या वर्गीकरणाचा उपयोग फारसा नाहीं. एखाद्या मुलानें केलेला अपराध अगर असमाधानकारक वर्तन कोणत्याहि एक किंवा अनेक दृश्य कारणांमुळें घडलेलें नसतें; तर आजपर्यंतच्या त्याच्या विशिष्ट मनोवृत्तीवर त्या दृश्य व तात्कालिक कारणांच्या झालेल्या आघातामुळें तें घडलेलें असतें. मनावर सभोंवतालच्या परिस्थितीच्या प्रत्यहीं होणाऱ्या आघातामुळें मनोवृत्तीला एक विशिष्ट प्रकारचें वळण लागत असतें व कोणत्याही दोन मनुष्यांना तंतोतंत समान परिस्थिति मिळणें अशक्य असल्यानें प्रत्येकाची मनोवृत्ति व वर्तन निरनिराळें घडतें. एखाद्या मुलानें अमुक एक गोष्ट चांगली अगर वाईट केली तर ती गोष्ट घडून येण्यास त्या व्यक्तीस आजपर्यंत जगांत जे अनुभव आले त्यायोगें त्याची जी एक विशिष्ट मनोवृत्ति तयार झाली त्या मनोवृत्तीचाच परिणाम महत्त्वाचा असतो. एकाच परिस्थितींत निरनिराळीं मनुष्यें निरनिराळ्या तऱ्हांनीं वागतांना आपण प्रत्यहीं पाहतोंच, त्याचें कारण तरी इतकेंच कीं, परिस्थिति जरी सारखीच असली तरी प्रत्येकाची मनोवृत्ति निरनिराळी असल्यानें त्याच परिस्थितीचा परिणाम प्रत्येकावर निरनिराळा होतो. एकच सूर्यप्रकाश पण तो आरसा, फोटोची कांच व वाळवंट यांवर भिन्नभिन्न फळें देतो, तोच प्रकार मनुष्याच्या मनावर परिस्थितीचा परिणाम घडण्यांतहि दिसून येतो.

## कारणांची विविधता

पुष्कळ वेळां ही गोष्ट लक्षांत न आल्यामुळें असमाधानकारक वर्तनाचीं नानाविध कारणें सांगण्यांत येतात. भूत लागणें किंवा करणी करणें हीं कारणें अजूनसुद्धां पुष्कळ वेळां पुढें केलीं जातातच. घरच्या गरिबीमुळें किंवा वडील माणसांचा धाक नसल्यामुळें मुलगा बिघडला असें केव्हां केव्हां सांगतात, तर आमचा मुलगा फार चांगला असून त्याला सोबत्यांनीं बिघडविला म्हणून दोषाचें खापर दुसऱ्याचे माथीं फोडण्याचा कांहींचा प्रयत्न असतो. दुर्वर्तन हें आनुवंशिक असतें असें कांहीं म्हणतात तर इतर कांहीं त्याचा संबंध शारीरिक व्यंगें अगर खाणाखुणा, किंवा मेंदूची स्थिति यांच्याशीं

स्थळ प्रत
नं. ........
ता. ........

लावतात. सूर्यावरील डागांचा परिणाम मनुष्याच्या वर्तनावर व मनःस्थितीवर पुष्कळ होतो, असें सांगून त्या डागांच्या संख्येमुळें किंवा चंद्र, मंगळ इत्यादिकांच्या संबंधामुळें पृथ्वीवरील दुर्वर्तनी लोकांची संख्या कमीजास्ती होते असेंहि कांहीं प्रतिपादन करितात.

मुलांनीं केलेल्या अपराधांचें विवेचन करितांना अमुक कारणांमुळें अमुक अपराध घडले असें निश्चित विधान करणें कठीण आहे. कारण दुर्वर्तनाचीं किंवा उनाडपणाचीं कारणें इतकीं गुंतागुंतीचीं असतात कीं, अशा तऱ्हेच्या सामान्य विधानांमुळें अगर त्यांस अनुसरून केलेल्या वर्गीकरणामुळें विवेचनास सुगमता येण्याऐवजीं दुर्बोधताच जास्त येते. आंकडे गोळा करून किंवा थोडेंसें विवेचन करून कांहीं वेळां असा कार्यकारणभाव सिद्ध केल्याचा भास उत्पन्न करणें अशक्य नाहीं; व केव्हां केव्हां तो थोडाबहुत खराहि असतो. परंतु यांत थोडेंबहुत तथ्य असलें तरी संपूर्ण तथ्य नसतें. आनुवंशिक संस्कारांमुळेंच दुर्वर्तन घडत असतें तर एकाच कुटुंबांतील कांहीं मुलें चांगलीं कां निघतात? किंवा एकाच कुटुंबांतील बरींचशीं मुलें दुर्वर्तनी निघालीं म्हणून दुर्वर्तन आनुवंशिक आहे असें म्हणण्यापेक्षां त्या कुटुंबाची परिस्थितीच दुर्वर्तनास ज्यास्त अनुकूल असणें संभवनीय नाहीं का? धार्मिक भावना व सामाजिक जबाबदारीची जाणीव कमी होत चालल्यानें दुर्वर्तन वाढूं लागलें असें जर म्हणावें तर धार्मिक भावनेचा ऱ्हास व अनीतीची वाढती प्रवृत्ति या दोघांसही कारणीभूत असें तिसरेंच एखादें कारण कां नसूं शकेल?

म्हणून दुर्वर्तनाचीं कारणें शोधतांना सामान्य विवेचनाचा हा मार्ग सोडून देऊन त्या प्रत्यक्ष व्यक्तीच्या मनोवृत्तीचा अभ्यास करून तेथेंच हीं कारणें शोधणें भाग पडतें. एका मुलानें पेटींतून पैसे चोरून नेले तर त्याला कोणतें कारण असलें पाहिजे हें निश्चयानें सांगणें कठीण आहे. त्याचे ठायीं असलेली संचयाची प्रवृत्ति जास्त तीव्र असेल अगर या प्रवृत्तीस आळा घालण्याचा किंवा योग्य मार्गानें विकास करण्याचा अद्याप प्रयत्न झाला नसेल. सकाळींच आईचें व त्याचें भांडण झाल्यानें आईच्या पेटींतील पैसे घेऊन सकाळच्या भांडणाचा सूड उगविण्याचीहि त्याला इच्छा झाली असेल; व हीं किंवा यांसारखींच अनेक कारणें असूनही एखाद्या दोस्तानें दिलेलें

उत्तेजन अगर हौसेची एखादी वस्तु खरेदी करण्याकरितां भासलेली पैशाची जरूरी यासारखें एखादें तात्कालिक कारण घडलें नसतें, तर त्यानें चोरी केलीच असती असेंहि निश्चयानें सांगणें कठीण आहे.

## अनेक पक्ष

दुर्वर्तनाच्या कारणांची शास्त्रीय दृष्ट्या उपपत्ति लावण्यांचा प्रयत्न करणारे अनेक पक्ष आहेत. प्रत्येक मनुष्य आपल्या इच्छेप्रमाणें कर्म करण्यास मोकळा असून तो दुर्वर्तन करतो तें स्वतःच्या इच्छेनें अर्थात् बुद्धिपुरःसर करतो, हा मनुष्याच्या इच्छाशक्तीला प्राधान्य देणारा एकान्तिक पक्ष होय. याच्या बरोबर विरुद्ध अशी एक उपपत्ति कांहीं शास्त्रज्ञांनीं प्रतिपादन केली आहे. दुर्वर्तनी मनुष्य हा अनुत्क्रांत (degenerate) स्थितींतील मनुष्य असून त्या तऱ्हेचें वर्तन करणें हा त्याचा स्वभावधर्म असतो; शरिरावरील कांहीं खाणाखुणांवरून अशा तऱ्हेचा मनुष्य तावडतोब ओळखतां येतो, असेंही ते प्रतिपादन करीत. सत् व असत् यांचा निर्णय करून असत् हें परिणामीं हानिकारक असतें, हें जाणून त्याचा त्याग करणाऱ्यास आपण सद्वर्तनी म्हणतों. या सर्व क्रिया करण्यास बुद्धीचा विकास बराच झालेला असावा लागतो हें उघड आहे. या गोष्टीस प्राधान्य देऊन मंद किंवा अपक्व बुद्धि हेंच दुर्वर्तनाचें आदिकारण मानणारा आणखी एक पक्ष आहे. मनुष्याच्या मनोविकारांचे त्याच्या वर्तनावर महत्त्वाचे परिणाम होतात, म्हणून मनोविकारांचें चांचल्य किंवा प्राबल्य हें महत्त्वाचें कारण मानणारा एक पक्ष अलीकडे पुढें येऊं पहात आहे. मनुष्याच्या मनोवृत्तींना महत्त्व देणाऱ्या या पक्षाप्रमाणें परिस्थितींतील अंग व उपांगांना महत्त्व देणारे अनेक पक्ष पडतील. कुटुंबपद्धतीचा ऱ्हास अगर जीवनकलहाची तीव्रता यांना मुख्य कारण मानणारे कांहीं पक्ष आहेत, तर कांहींच्या मतें समाजाच्या सुधारणेचा (civilization) दुर्वर्तन हा एक अपरिहार्य परिणाम आहे.

## त्यांचा समन्वय

हे सर्व पक्ष दुर्वर्तनाची कारणमीमांसा करितांना एकेका अंगालाच महत्त्व देत असल्यानें त्या सर्वांचा समुच्चय करून दुर्वर्तनाची मीमांसा करण्याची अलीकडील मानसशास्त्रज्ञांची प्रवृत्ति आहे. मनुष्याच्या सहज प्रवृत्तींना

कोणत्याही तऱ्हेचा निर्बंध न घालतां जर स्वैर संचार करूं दिला तर त्यापासून समाजांतील इतर व्यक्तींच्या सुखांत व्यत्यय येतो, याकरितां या प्रवृत्तींना आळा घालावा लागतो. कांहींचें पूर्ण संयमन करावें लागतें, पण बहुतेक प्रवृत्ति पूर्णपणें नाहींशा करणें अशक्य असल्यानें त्यांचें नियमन अगर रूपांतर करून त्या प्रवृत्तींना कांहीं प्रमाणांत वाव द्यावा लागतो. मनुष्याला या प्रवृत्ति एका दिशेकडे नेत असतात, तर समाजाचे नियम त्यास दुसऱ्या बाजूस जाण्यास भाग पाडीत असतात. या दोन परस्परविरोधी शक्तींचा परिणाम होऊन यांच्या क्रिया व प्रतिक्रिया यांपासून निष्पन्न होणारा मध्य ( resultant ) हें त्या मनुष्याचें वर्तन होय, अशीहि एक व्याख्या करितां येईल. व्यक्त स्थितीस येऊं पहाणाऱ्या प्रवृत्तींच्या शक्तीपेक्षां समाजानें मनुष्यावर लादलेल्या किंवा त्यानें स्वतःच्या इच्छाशक्तीनें अमलांत आणलेल्या संयमनाची शक्ति अधिक सामर्थ्यवान् ठरली तर त्याचें वर्तन सद्वर्तनाच्या कक्षेंत राहील. पण जेव्हां त्याचें वर्तन सद्वर्तनाच्या कक्षेच्या बाहेर जातें, जेव्हां त्याच्या वर्तनाचा समतोलपणा ढळतो, त्या वेळीं या दोन शक्तींपैकीं एका शक्तीचा जोर दुसरीपेक्षां अधिक झाला असला पाहिजे; म्हणजे एकतर, आत्मसंयमन अथवा समाजाचे नियम यांना न जुमानण्याइतका प्रवृत्तींचा जोर जास्त झाला असला पाहिजे किंवा या प्रवृत्तींना संयमन करण्याची त्याची स्वतःची अगर समाजाची शक्ति कमी झाली असली पाहिजे. अशा तऱ्हेनें या दोन शक्तींच्या समतोलतेंत बदल घडवून आणणाऱ्या सर्व गोष्टी दुर्वर्तनाचीं कारणें होऊं शकतील. ज्याच्या योगानें मानसिक प्रवृत्तींची तीव्रता वाढते म्हणजे पर्यायानें आत्मसंयमनाची शक्ति कमी होते अगर प्रवृत्तींना दाबांत ठेवणारीं सामाजिक बंधनें कार्यक्षम होत नाहींत अशीं कारणें अर्थात्च अनेक असून तीं सर्व दुर्वर्तनास कारणीभूत असूं शकतील.

## पोषक व प्रेरक कारणें

विवेचनाच्या सोयीकरितां या कारणांचे दोन पोटभाग कल्पितां येतील. ज्यांच्या योगें दुर्वर्तन सहज घडेल अशी मनःस्थिति तयार झाली त्या सर्व कारणांना ‘ पोषक ’ (predisposing) कारणें असें नांव दिलें तर दुर्वर्तनास प्रत्यक्ष कारणीभूत होणाऱ्या गोष्टींना ‘ प्रेरक ’ (exciting) कारणें असें नांव

देतां येईल. पोषक कारणांमुळें मनःस्थिति निर्माण केली जाते तर प्रेरक कारणांमुळें तसें वर्तन तत्काळ घडतें. पोषक कारणांमुळें मनःस्थिति व इतर परिस्थिति विशिष्ट तऱ्हेची तयार झाली नसती तर प्रेरक कारणांचा कांहीं परिणाम झाला नसता. उलटपक्षीं असेंही म्हणतां येईल कीं, मनोभूमिका आगाऊ तयार झाली असली तरीहि प्रेरक कारण घडलें नसतें तर त्या विशिष्ट प्रकारचें वर्तन झालें नसतें. पण अनेक कारणांमुळें मनोवृत्ति दूषित झाल्यावर कोणत्याहि क्षुल्लक कारणांमुळें वागणुकीवर परिणाम घडून येणें शक्य होतें; म्हणून पोषक कारणांचें व दूषित मनोवृत्तींचें महत्त्व तात्कालिक गोष्टींपेक्षां अधिक आहे हें उघड आहे. रामाचा बाप एकाएकीं वारल्यामुळें रामा उघडा पडला; नंतर शाळेला सोडचिठ्ठी देऊन उनाडपणाच्या उद्योगांत प्रगति करणें, अथवा प्रसंगीं घरांतून पळून जाऊन स्वातंत्र्याचें सुख उपभोगण्याची हौस फेडून घेणें, अगर बापाची आठवण अखंड काढून स्वतःची प्रकृतीसुद्धां बिघडवून घेणें किंवा आपला अभ्यास झटून करून आईशीं व कुटुंबांतील मंडळींशीं सहानुभूतीचें वर्तन राखणें इत्यादि अनेक मार्ग संभवतात. यांपैकीं कोणता मार्ग रामा पत्करील हें रामाचा स्वभाव, त्याची आजपर्यंतची वागणूक, घरांतील शिस्त—वळण—व त्यांमुळें त्यास जडलेल्या संवयी इत्यादि गोष्टींवरच जास्त अवलंबून आहे. बापाचा मृत्यु हें तात्कालिक कारण कमी महत्त्वाचें खास नाहीं; पण रामाच्या विशिष्ट मनोवृत्तीचा परिपोष ज्या गोष्टींनीं आजपावेतों केला, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल ? किंबहुना रामाच्या वर्तनांत इष्ट तो बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनें या मनोवृत्तीचा व तिचा परिपोष करणाऱ्या गोष्टींचाच जास्त उपयोग होणारा असतो.

दुर्वर्तनाच्या कारणांचा पोषक व प्रेरक असा भेद केल्यानंतर त्या प्रत्येकाचे पुनः पोटभेद किती प्रकारचे होतात तें पाहूं. मनुष्याच्या शरीराचा व मनाचा मानसिक प्रवृत्तींशीं संबंध निकटचा असल्यानें पोषक कारणांमध्यें यांचें स्थान केव्हांहि पहिलें ठरेल. शरीराचा व मनाचा योग्य विकास होण्यास ज्या ज्या गोष्टींनीं प्रतिबंध झाला असेल, त्या सर्व या सदरांत घालाव्या लागतील. मनुष्याचें वर्तन योग्य मर्यादेंत राखण्यास कांहीं सामाजिक गोष्टींची मदत होते; ती मदत ज्या कारणांमुळें योग्य तऱ्हेनें होऊं शकत नसेल त्या सर्व गोष्टी सामाजिक कारणांच्या पोटसदरांत पडतील. कुटुंबांतील अगर

## दुर्वर्तनाची कारणपरंपरा

**दुर्वर्तनाचीं कारणें**

- **पोषक**
  - **सामाजिक**
    - १ अयोग्य शिस्त
    - २ कौटुंबिक अनास्था
    - ३ वाईट संगति
    - ४ दारिद्य अगर तीव्र जीवनकलह
  - **शारीरिक**
    - १ आनुवंशिक दोष
    - २ पौगंड अवस्था
    - ३ शारीरिक व्यंगें
  - **मानसिक**
    - १ तीव्र प्रवृत्ति
    - २ विकारांचें प्राबल्य अगर चंचलपणा
    - ३ अपक्व अगर मंद बुद्धि
    - ४ स्वभावदोष—घाडसी अगर भित्रा स्वभाव, योग्य तऱ्हेची हौस नसणें, वगैरे
    - ५ दुर्वर्तनाची संवय लागणें
- **प्रेरक ( तात्कालिक )**
  - **सामाजिक**
    - १ कौटुंबिक आपत्ति पालकाचा मृत्यु वगैरे
    - २ वाईट संगति मित्रांचें उत्तेजन
    - ४ करमणुकीचा अपुरीं किंवा अयोग्य साधनें
  - **शारीरिक**
    - १ रोग जखम वगैरे
    - ३ व्यसनें दारू तंबाकू इत्यादि
  - **मानसिक**
    - १ अज्ञान
    - २ परस्पर विरोधी प्रवृत्तींमुळें उत्पन्न झालेली मानसिक अस्थिरता

शाळेंतील शिस्त, मित्रांची संगति, अगर सांपत्तिक परिस्थिति यांसारख्या गोष्टी याच सदरांत येतात. या किंवा अशासारख्या कारणांनीं मनोवृत्ति कायमची दूषित होते असें नाहीं. केव्हां केव्हां त्यांचा परिणाम तात्कालिक असतो. म्हणून पोषक व प्रेरक या दोन्ही प्रकारांच्या कारणांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक असे पोटभाग पाडावे लागतील. अशा तऱ्हेचें वर्गीकरण सोबतच्या तक्त्यांत विस्तारानें दिलें आहे, त्यावरून दुर्वर्तनाची कारणपरंपरा किती दूरवर पोहोंचूं शकते याची थोडीशी कल्पना येईल. त्यांतील सर्वच बाबींचें विस्तृत विवेचन करणें अर्थातच शक्य नाहीं. म्हणून विशेष महत्त्वाच्या कारणांचा जरा विस्तारानें विचार करून बाकीच्यांचा उल्लेख संक्षेपानेंच करणें भाग आहे. अर्थात् अमुक कारणांमुळें अमुक प्रकारचें दुर्वर्तन घडतें हें सांगणें मुळींच शक्य नाहीं. वैद्यकशास्त्रांत ज्याप्रमाणें अमुक कारणें घडलीं म्हणजे अमुक रोग झालाच पाहिजे हें निश्चयानें सांगणें शक्य नाहीं, प्रत्यक्ष रोग झाल्यानंतर प्रत्येक रोग्याचा वैयक्तिक विचार करून त्याची कारणमीमांसा व उपचार करावे लागतात, त्याचप्रमाणें दुर्वर्तनाच्या प्रत्येक उदाहरणांतही त्याचीं त्याचीं विशिष्ट कारणें सर्व परिस्थितीचा विचार करून शोधून काढावीं लागतात.

शिकागो येथील दुर्वर्तनी मुलांचीं उदाहरणें गोळा करून आढळलेली कारणपरंपरा दुसऱ्या* तक्त्यांत दाखविली आहे. एकूण ८२३ दुर्वर्तनी मुलांमुलींपैकीं ४५५ उदाहरणांत मानसिक दोष हें दुर्वर्तनाचें महत्त्वाचें कारण होतें तर १३५ उदाहरणांत तें दुय्यम कारण होतें. ( एकाच उदाहरणांत मुख्य कारण एकच असलें तरी अनेक दुय्यम कारणें असूं शकतात व म्हणून दुय्यम कारण या सदराखालील आंकड्यांची बेरीज एकूण संख्येपेक्षां पुष्कळच जास्त झाली आहे. ) आनुवंशिक दोष हें मुख्य कारण म्हणून एकदांहि आढळलें नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अमुक कारण जास्त महत्त्वाचें अशा तऱ्हेचीं विधानें आंकड्यांच्या आधारावर करणें शक्य नाहीं. कारण मुलाची मनोवृत्ति व तींतील सूक्ष्म छटा आंकड्यांनीं दर्शविणें केवळ अशक्य आहे. परंतु दुर्वर्तनाच्या मुख्य व दुय्यम कारणांचें क्षेत्र वाटतें त्यापेक्षां बरेंच विस्तृत आहे यांत शंका नाहीं.

---

* Healy: *Individual Delinquent*, p. 130.

# दुर्वर्तनाचीं कारणें

( एकूण संख्या ८२३—पैकीं मुलें ५६०, मुली २६३ )

| | मुख्य कारण किती वेळां | दुय्यम कारण | एकूण |
|---|---|---|---|
| मानसिक दोष | ४५५ | १३५ | ५९० |
| प्रतिकूल गृहस्थिति | १६२ | ३९४ | ५५६ |
| परस्परविरुद्ध मनोवृत्ति मनोवृत्तींचा लढा | ५८ | १५ | ७३ |
| वैषयिक संवयी वगैरे | ४६ | १४६ | १९२ |
| वाईट संगति | ४४ | २३५ | २७९ |
| शारीरिक दोष वगैरे | ४० | २३३ | २७३ |
| आनुवंशिक दोष | | ५०२ | ५०२ |
| वाईट नाद अगर हौस | १६ | ९३ | १०९ |
| उत्तेजक पेयें | | ९२ | ९२ |
| इतर | २ | | |
| | ८२३ | | |

प्रकरण चवथें

# आनुवंशिक संस्कार

He who is born with weak social instincts, runs more danger of becoming a criminal. But the certainty that he will become such, does not exist – that depends upon the environment.—Bonger.

## दुर्वर्तन आनुवंशिक नसतें

एखाद्या कुटुंबांतील लोक पिढ्यानुपिढ्या दुर्वर्तनी निघाल्याचीं उदाहरणें आपल्या पाहण्यांत किती तरी येतात. अशाच एका कुटुंबांतील मुलगा दुर्वर्तनी निघाला कीं तो आपल्या कुटुंबाच्या वळणावर गेला असें म्हणून दुर्वर्तन हें आनुवंशिक आहे असें पर्यायानें आपण ध्वनित करतों. पण समाजानें घालून दिलेले नियम झुगारून देण्याची ही वृत्ति किंवा हा गुण किती प्रमाणांत आनुवंशिक आहे याविषयीं विचार करून मत देणारे थोडे आढळतात. गुणांच्या आनुवंशिक संक्रमणाबद्दल अलीकडे पुष्कळ वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. कांहीं गुण आनुवंशिक आहेत असें आज सिद्ध केलें जातें तर ते तसे नाहींत असें म्हणणारा एखादा लेखक दुसरेच दिवशीं पुढें येतो. संपादित गुण आनुवंशिक आहेत किंवा नाहींत, असल्यास त्यांचें प्रमाण काय वगैरे प्रश्न अद्याप सुटले नाहींतच. अशा परिस्थितींत रोज नवीन नवीन उपपत्या पुढें येत असतांना दुर्वर्तनी वृत्तीचा किती भाग आनुवंशिक आहे याबद्दल निश्चित विधान करणें शक्य नाहीं. एखाद्या कुटुंबांतील पुष्कळ लोक एकाच प्रकारचें दुर्वर्तन करणारे निघाले तरी तेवढ्यानें कांहीं दुर्वर्तनी वृत्ति आनुवंशिक आहे हें सिद्ध होऊं शकत नाहीं. बापाच्या वेळची आणि मुलाच्या वेळची कुटुंबाची परिस्थिति सारखीच असेल तर ज्या परिस्थितीच्या योगानें बापाचें वर्तन बिघडलें त्याचाच परिणाम मुलाच्या वर्तनांत दिसून येणें संभवनीय आहे. मनुष्याचें वर्तन केवळ त्याच्या वैयक्तिक गुणांवरच अवलंबून नसतें, तर परिस्थिति, शिक्षण, सहवास इत्यादि अनेक गोष्टींचे एकमेकांवर परिणाम होऊन झालेल्या मनःस्थितीचें तें दृश्य फल असतें. म्हणून दुर्वर्तन आनुवंशिक आहे कीं नाहीं याचा

विचार करितांना त्या कुटुंबांतील किती लोक दुर्वर्तनी निघाले इतकेंच पाहून चालणार नाहीं; तर ज्या मुलाच्या वर्तनाचा आपण विचार करीत असूं त्याच्या बाबतींत व त्याच्या कुटुंबांतील इतर दुर्वर्तनी मनुष्यांच्या बाबतींत सर्व गोष्टींचा संपूर्ण विचार करावयास पाहिजे. दुर्वर्तनी वृत्ति हा कांहीं एक अविभाज्य ( किंवा ज्याचें पृथक्करण करतां येत नाहीं असा ) गुण नाहीं कीं, तो तसाच्या तसाच पुढील पिढींत उतरावा. ज्या अनेक गुणांच्या कार्यामुळें दुर्वर्तनी वृत्ति बनते ते गुण किंवा त्यांपैकीं कांहीं आनुवंशिक असूं शकतील. परंतु अशा आनुवंशिक गुणांचा समुच्चय दुर्वर्तन घडून येण्याइतका नेहमींच होईल असें सांगतां येणें कठीण आहे.

शरीराचा वर्ण, अवयवांची ठेवण, शरीरांतील जोम वगैरे आनुवंशिक असतात. त्याचप्रमाणें मेंदु व ज्ञानतंतु यांची स्थिति व त्यांची कार्यक्षमता हीहि बऱ्याच अंशीं आनुवंशिक असते. शरीराचा जोम, शारीरिक शक्तींचा विकास व बुद्धिमत्ता वगैरे मानसिक गुण यांवर वर्तन बरेंच अवलंबून असतें; म्हणून वर्तनांतील कांहीं प्रवृत्तीहि आनुवंशिक असणें शक्य आहे. परंतु या सर्व आनुवंशिक प्रवृत्तींचा परिणाम त्या कुलांतील प्रत्येक मुलावर एकाच दिशेनें होईल हें सांगणें कसें शक्य आहे ? या बाबतींत प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. हीली यांनीं परिश्रमपूर्वक गोळा केलेले आंकडे बरेच बोधप्रद होतील.*

| | संख्या | शें. प्रमाण |
|---|---|---|
| मानसिक किंवा शारीरिक दोष अगर विकृति आनुवंशिक असून महत्त्वाचें कारण असणारीं उदाहरणें | २३५ | ३५ |
| मानसिक किंवा शारीरिक विकृति आनुवंशिक असून दुय्यम महत्त्वाचें कारण असणारीं उदाहरणें .. | ५८ | ९ |
| आनुवंशिक विकृति कारणीभूत नाहींत अशीं उदाहरणें | ३६० | ५४ |
| संशयित उदाहरणें ... ... ... | १५ | २ |
| एकूण | ६६८ | १०० |

म्हणजे ६६८ मुलांच्या दुर्वर्तनाची कारणमीमांसा करितांना ३६० मुलांच्या बाबतींत ( शेंकडा ५४ ) कोणतेंहि आनुवंशिक कारण आढळून

* Healy: *Individual Delinquent*, p. 158.

आलें नाहीं. आनुवंशिक अशी मानसिक किंवा शारीरिक विकृति दुर्वर्तनाचें महत्त्वाचें कारण असणारीं उदाहरणें शेंकडा ३५ दाखविलीं आहेत. पण त्याचा अर्थ तितक्यां उदाहरणांत दुर्वर्तन आनुवंशिक आहे असा होऊं शकत नाहीं. ज्या मानसिक वा शारीरिक विकृतींचा परिणाम दुर्वर्तनांत झाला, त्या विकृति फक्त आनुवंशिक होत्या व त्या विकृतींच्या जोडीला इतर कारणें घडून आल्यामुळेंच दुर्वर्तन घडलें. सामान्यत: सद्वर्तनी समजल्या जाणाऱ्या मनुष्यांचे कौटुंबिक इतिहास जर आपण पाहिले तर अशा तऱ्हेच्या विकृति ( abnormality ) आनुवंशिक असल्याचीं उदाहरणें बरींच सांपडतील. अर्थात् हें प्रमाण दुर्वर्तनी मनुष्यांत जितकें जास्त सांपडतें तितकें सामान्य मनुष्यांत सांपडत नाहीं ही गोष्ट खरी. जेथें दुर्वर्तनाचें मुख्य कारण दुसरेंच असून आनुवंशिक विकृति त्यांच्या जोडीला दुय्यम कारण म्हणून आढळल्या अशीं उदाहरणें शेंकडा ६१ असल्याचा उल्लेख डॉ. हीली यांनीं आपल्या पुस्तकांत केला आहे. म्हणजे दुर्वर्तनी वृत्ति ही प्रत्यक्षतः आनुवंशिक नसून पर्यायानें आनुवंशिक आहे. जेथें जेथें दुर्वर्तन घडण्याजोगी परिस्थिति आगाऊच असते तेथें ह्या आनुवंशिक विकृतींच्या अस्तित्वामुळें दुर्वर्तनास जास्त प्रोत्साहन मिळतें एवढेंच म्हणतां येईल.

## विकृति आनुवंशिक असतात

दुर्वर्तनास कारणीभूत असणाऱ्या ज्या विकृति आनुवंशिक असतात त्यांपैकीं मंदबुद्धित्व हें महत्त्वाचें असून त्याचा विचार विस्तारानें पुढें करावयाचा आहे. त्याखेरीज ज्या महत्त्वाच्या प्रवृत्ति अगर विकृति आनुवंशिक असतात त्यांचें विवेचन येथें करूं. शारीरिक जोम हा पुष्कळ वेळां आनुवंशिक असतो. लहानपणींच झपाट्यानें वाढलेलें उफाड्याचें शरीर, त्याच्याच मानानें असलेली शक्ति व उत्साह, त्याच्याच जोडीस थोडीशी स्वच्छंदी वृत्ति व शक्तीच्या जोरावर स्वत:चें म्हणणें खरें करून दाखविण्याची धडाडी इतकी सामग्री परंपरागत असल्यावर उनाडपणा करण्याची कोणतीहि संधि सहसा वांया जाणार नाहीं. अशा मुलांना लहानपणापासूनच शक्तीच्या जोरावर कोणतेंहि कृत्य करतांना स्वतःची इच्छा व आवड यांपलीकडे दुसऱ्याचें सुख किंवा कायदेशीर हक्क यांकडे लक्ष देण्याची आवश्यकता भासलेली नसते; त्यामुळें

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...... नं. ......
ता. ............



मोठेपणींहि त्याच संवयी कायम राहतात व अशीं मुलें कोणतेंहि काम करतांना ‘मला असें वाटलें म्हणून मी केलें’ ह्यापलीकडे कोणतेंहि उत्तर देऊं शकत नाहींत. शरीरांतील जोमाला योग्य वाव न मिळाल्यामुळें उनाडपणाचीं कृत्यें करूनच त्यांना आपली हौस भागवून घ्यावी लागते. अशा मुलांचा वाढता जोमच त्यांच्या उनाडपणाचें खरें कारण असल्यानें त्यांना पुरेसा वाव मिळाल्याबरोबर त्यांचें वर्तन सुधारल्याचीं पुष्कळ उदाहरणें अवलोकनांत येतात.

चिडखोर स्वभाव हा बरेच वेळां आनुवंशिक असतो. ज्ञानतंतूंच्या स्थितीवर चिडखोरपणा बराचसा अवलंबून असल्यानें ज्ञानतंतूंबरोबरच हा गुण आनुवंशिक म्हणून येतो. परंतु पुष्कळ वेळां हा गुण आनुवंशिक आहे असा भासला तरी तो तसा नसतो. आई किंवा बाप यांचा स्वभाव चिडखोर असल्यास मुलाचाहि स्वभाव तसाच होतो, पण तो आनुवंशिक गुणामुळेंच असेल असें मात्र नाहीं. लहानपणापासून अशा आईबापांच्या संगतींतच जीं मुलें वाढलेलीं असतात त्यांच्या ज्ञानतंतूंवर आईबापांच्या चिडखोर स्वभावामुळें असह्य ताण पडतो, व त्यामुळें मुलांचाहि स्वभाव चिडखोर बनतो. शिवाय अज्ञानतः कां होईना पण आईबापांच्या स्वभावाचें व वागणुकीचें अनुकरण करण्याची मुलांची वृत्ति नेहमींच असते. अशा स्वभावाच्या मुलांना लहानपणापासून आत्मसंयमनाचें शिक्षण अर्थात् मुळींच मिळालेलें नसतें. बरोबरीच्या नात्यानें जगांतील मंडळींशीं वागूं लागल्यावर आत्मसंयमनाच्या अभावीं त्यांच्या हातून अनेक वाईट गोष्टी घडूं लागतात. हा गुण आनुवंशिक असो अगर आईबापांच्या संगतीनें लागलेला असो, पण तो लक्षांत आल्याबरोबर आत्मसंयमनाची संवय हळूहळू लावण्याची खबरदारी घेतली नाहीं तर ह्या मुलांना जगांत फार वाईट दिवस काढावे लागतात.

ह्या दोन प्रवृत्तींप्रमाणेंच आनुवंशिक असणारी तिसरी महत्त्वाची प्रवृत्ति रति( sexual )प्रवृत्ति होय. रतिप्रवृति वयाच्या मानानें योग्य वेळीं उत्पन्न होऊन तिचें नियमन व्यवस्थित रीतीनें झालें तर मुलांचें पुढील आयुष्य बरेंच सुखांत जातें. परंतु केव्हां केव्हां ही प्रवृति फार लहानपणीं दृग्गोचर होते व तिची तीव्रताहि सामान्य मनुष्याच्या प्रवृत्तीपेक्षां अधिक असते. अशा वेळीं लहान वयामुळें तिचें नियमन करण्याचें शिक्षण मिळालेलें नसतें. पालक व शिक्षक यांचें लक्ष सहसा तिकडे जात नसल्यानें ह्या तीव्र

प्रवृत्तीचे बरेच दुष्परिणाम मुलांना भोगावे लागतात. अशा वेळीं लहान मुलांच्या अज्ञानावर सर्व दोष लादून ह्या प्रवृत्तीची उपेक्षा न करतां तिचीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर योग्य ती खबरदारी घेणें जरूर असतें.

ह्याशिवाय कांहीं किरकोळ विकृति व शारीरिक दोष आनुवंशिक असतात व त्याचाहि परिणाम वर्तनावर होतो. अशक्त शरीरप्रकृति व त्या-योगें येणाऱ्या भित्रेपणासारख्या दोषांमुळें किती तरी मुलें दुर्वर्तनी बनतात. वडिलांस दारु, अफू यांसारखीं व्यसनें असलीं तर त्यांचा परिणाम मुलांच्या ज्ञानतंतूंवर व शरीरप्रकृतीवर होऊन मुलांच्या स्वभावावर व वर्तनावर त्याचा परिणाम होऊं शकतो. परंतु हे सर्व गुण आनुवंशिक असल्यानें त्या मुलांचें वर्तन सुधारण्याची आशा नाहीं अशी जर कोणाची समजूत असेल तर ती मात्र खरी नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्यांची आनुवंशिक परिस्थिति अनुकूल नाहीं अशा मुलांचें बिघडलेलें वर्तन सुधारण्याचा संभव फार कमी असतो असेंसुद्धां म्हणण्यास पुरेसा पुरावा नाहीं.*

## आनुवंशिक दोषांचें निराकरण

ह्या आनुवंशिक प्रवृत्तींनाहि विकास पावण्यास योग्य वातावरण मिळालें तरच त्या कार्यक्षम होऊं शकतात हें उघड आहे. तेव्हां दुर्वर्तनास कारणी-भूत असणारी एखादी विकृति आनुवंशिक आहे असें समजल्याबरोबर निराश होऊन स्वस्थ बसण्यानें कांहींच साधणार नाहीं. कोणत्या तऱ्हेच्या वातावरणांत ती विकृति विकास पावणार नाहीं याचा विचार करून तशा तऱ्हेचें वाता-वरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणें जास्त इष्ट व आवश्यक आहे. मुलांनीं चांगल्या तऱ्हेनें वागावें हा हेतु साधण्याकरितां व कारणास अनुरूप अशी उपाययोजना करण्यास सुलभ व्हावें ह्या दृष्टीनेंच कारणांचें विवेचन करा-वयाचें असतें. आनुवंशिकतेची सबब स्वतःचा आळस किंवा अनास्था झांकून ठेवण्याकरितां पुढें आणण्याचा मोह आवरिला पाहिजे.

कुटुंबांतील एखाद्या व्यक्तीच्या अनीतीचा उल्लेख करून 'हा अमक्याचा अमुक, त्याच्यासारखाच होणार' अशासारखी भाषा पुष्कळ आईबाप मुलांच्या देखत वापरतात. बापाचें किंवा थोरल्या भावाचें वर्तन चांगलें

---

*Healy and Bronner: *Delinquents and Criminals*, p. 97.

नाहीं हा कांहीं त्या मुलाचा अपराध नव्हे. शिवाय मुलाच्या देखत अशी भाषा वापरल्यानें मुलासंबंधीं आपल्या अपेक्षा कोणत्या स्वरूपाच्या आहेत हें आपण ध्वनित करीत असतों आणि साहजिकच ती अपेक्षा पूर्ण करण्याकडे मुलांचा कल होतो. ‘ आपल्या हातून चांगलें वर्तन घडून येणें शक्य नाहीं ’ किंवा ‘ अशा तऱ्हेनें वागलें म्हणून काय झालें ? ’ अशा स्वरूपाची स्वतःविषयीं निराशा व बेपर्वाई मुलाच्या अंतःकरणांत भिनून जाते, इतकेंच नव्हे तर पालक व शिक्षक मंडळीसुद्धां त्या वृत्तींना बळी पडतात आणि अशा रीतीनें मागील पिढींतील सर्व दोष पुढील पिढींत उतरण्यास अजाणतां मदत करीत असतात. मुलांच्या मार्गावर आनुवंशिक संस्काराचे खरे खोटे कांटे पसरून मुलांच्या प्रगतीस अडथळा करण्यापेक्षां पालक व शिक्षक जर आपल्या मनांतून सर्व पूर्वग्रह काढून टाकून मुलांना शक्य ती मदत करण्याकडेच लक्ष देतील तर पुष्कळ मुलांचें जीवित हल्लींपेक्षां कितीतरी अधिक सुखकर होईल.

## गणूः—आनुवंशिक मंदबुद्धि

राधाबाईच्या गणूच्या बाबतींत सुद्धां जर त्याच्या शेजारच्या सद्गृहस्थांनीं त्याच्या वर्तनाचा सहानुभूतिपूर्वक विचार केला नसता तर त्याचें आयुष्य स्वतःला व इतरानां दुःख देण्यांतच खर्च झालें असतें. राधाबाई स्वतः हुषार व सुशील होत्या खऱ्या, पण त्यांचे यजमान माधवराव हे ‘ सर्वगुणसंपन्न ’ होते. एखाद्या सच्छील स्त्रीला मठ्ठ बुद्धीचा व व्यसनें आणि कुसंगति यांच्या नादीं लागलेला पति मिळाला म्हणजे संसार कोणत्या स्वरूपाचा होतो हें कादंबरीच्या वाचकांना सहज समजूं शकेल. स्वतः राधाबाईची गृहस्थिति अशा स्वरूपाची होती कीं, माधवरावांच्या मृत्यूमुळें राधाबाईना वैधव्य आल्याबद्दल त्यांच्या आतेष्टांना वाईट वाटलें पण त्याच बरोबर ‘ सुटली बिचारी ’ म्हणून अंतःकरणांत पुष्कळांना समाधानहि झालें.

पतीच्या मृत्यूनंतर स्वतःचा आणि गणू व रामू या दोन मुलांचा चरितार्थ चालविण्याकरितां राधाबाईना लोकांच्या घरीं स्वयंपाक वगैरे सारखीं कामें करावीं लागत व त्यामुळें मुलांच्या अभ्यासाकडे किंवा वर्तनाकडे त्यांना लक्ष देण्यास सवड होत नसे. थोरला मुलगा गणू पुष्कळसा बापाच्याच वळणावर

गेला होता ही गोष्ट खरी. पंधरावे वर्षी हायस्कुलांत दुसरी इयत्ता तो शिकत होता आणि तेथेंहि शिक्षकांचें त्याचे विषयीं फारसें अनुकूल मत नव्हतें. शरीरप्रकृतीनें धष्टपुष्ट असलेला गणोबा अभ्यासांत 'गणोबा'च असला तरी वारंवार शाळेला बुट्टी देऊन नदीकाठीं अगर बागेंत सहल करणाऱ्या मुलांचा तो खरोखरच 'गणनायक' बनला होता. शिक्षकांकडून वारंवार मिळणाऱ्या शेलक्या शब्दांच्या आहेरामुळें ( आणि त्याच्या वर्गशिक्षकांच्या कोशांत अशा शब्दांचा भरणा बराच विपुल होता ) शाळेविषयीं, शिक्षकां-विषयीं आणि स्वतःच्या कर्तबगारीविषयीं गणू एक प्रकारें निराश झाला होता आणि उदासपणें वर्गाच्या शेवटल्या बाकावर काळ कंठीत होता.

शेजारच्या गोविंदरावांजवळ राधाकाकूंनीं एक दिवस गणूच्या वर्तनाचा पाढा वाचला आणि तुम्ही तरी त्याला दोन शब्द सांगून पहा म्हणून विनंति केली. गोविंदरावांनीं शाळेंत जाऊन त्याच्या मास्तरांची गांठ घेतली. "छेः हो! तो आपल्या बापाच्या वळणावर जाणार," असें आपलें प्रामाणिक मत मास्तरांनीं ठोकून दिलें. इतकेंच नव्हे तर, "तुम्हीं कशाला असल्या मुलाच्या नादीं लागतां?" असा उलट गोविंदरावांना उपदेश करण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. मात्र गणू शाळेंतून पळून जातो, व इतर मुलांच्या नादानें आडदांडपणा करितो याखेरीज दुसरा कोणताहि अपराध गणूच्या नांवावर त्यांना सिद्ध करून दाखवितां आला नाहीं.

## सुधारण्याची दिशा

गणू बुद्धीनें मंद होता, पण वारंवार निराशेचे शब्द कानीं पडल्यामुळें असलेल्या बुद्धीचाहि तो उपयोग करीत नव्हता ही गोष्ट गोविंदरावांच्या लक्षांत यावयास वेळ लागला नाहीं. एक दिवस सकाळीं त्यांनीं गणूला आपल्या घरीं बोलाविला. गणू आला तो आपल्याला आतां अभ्यासावर व नीतीवर एक व्याख्यान ऐकावें लागणार या आशेनें व तयारीनेंच आला. पण गोविंद-रावांनीं त्याची निराशा करून त्याला "माझ्या कपाटांतील पुस्तकें नीट लावावयाचीं आहेत तीं लावण्यास मी तुला बोलावलें," म्हणून सांगितलें. एखादें महत्त्वाचें काम करण्याइतकी आपली योग्यता आहे ही जाणीव गणूला आज प्रथमच आली. मोठ्या हौसेनें त्यानें कपाटांतील पुस्तकें खालीं काढलीं आणि गोविंदरावांच्या सांगण्याप्रमाणें विषयवार वर्गीकरण करून

कपाटांत व्यवस्थित लावून ठेविलीं. पुस्तकें लावीत असतांना गोविंदरावांनीं त्याच्याशीं अनेक विषयांवर संभाषण करून त्याच्या आवडी नावडी समजून घेतल्या आणि त्याप्रमाणें त्याला अभ्यासांत मदत करण्याचें ठरविलें.

दुसरेच दिवशीं व्यायाममंडळांत त्याचें नांव गोविंदरावांनीं दाखल केलें. आणि शरीरप्रकृति चांगली असल्यामुळें ह्या आपल्या आवडीच्या विषयांत गणूची प्रगति बरीच झाली. शाळेचा वर्ग हें कांहीं एकटें एकच कर्तव्य-क्षेत्र नाहीं, जगांत आपल्यालाहि कोठें तरी महत्त्वाचें स्थान आहे ह्या जाणी-वेनें गणूला नवीन हुरूप आला आणि तो अभ्यासहि आतां बराच झटून करूं लागला. व्यायामांतील प्राविण्यामुळें वर्गांतील त्याची लोकप्रियता वाढली, कांहीं बाबतींत वर्गांतील पुढारीपणहि त्याच्याकडे आलें व त्याच्या मागोमाग पुढाऱ्यांच्या जबाबदारीची जाणीवहि त्याला होऊं लागली. बुद्धीनें मंद असल्यामुळें शाळेंत त्याची प्रगति फार झाली नाहीं हें मात्र खरें. शाळा सोडून त्यानें आतां नोकरी धरली असून आपल्या आईचे कष्ट त्यानें बरेच कमी केले आहेत. धाकट्या रामूला मात्र खूप शिकवावयाचा असें तो म्हणत असतो.

गणूला सुधारण्याकरितां गोविंदरावांनीं कांहीं यक्षिणीच्या कांडीचा उप-योग केला नव्हता. आनुवंशिक संस्कारांमुळें आलेली मंद बुद्धि दुरुस्त करतां येण्यासारखी नव्हती हें खरें; पण गणूच्या अंगीं आलेली निराशेची व कर्तव्य-शून्यतेची वृत्ति घालविणें हेंच महत्त्वाचें काम होतें; आणि तें दीड दोन वर्षें गणूकडे सतत लक्ष ठेवून गोविंदरावांनीं साधलें नसतें तर गणू कोणत्या मार्गानें गेला असता हें सांगावयास नकोच.

प्रकरण पांचवें

# शारीरिक दोष व दुर्वर्तन

## शरीरावरील खुणा व मनोधर्म

मनुष्याच्या शरीरावरील खाणाखुणांवरून, हातापायांच्या रेषांवरून किंवा चेहरेपट्टीवरून मनुष्याचा स्वभाव, वर्तन, त्याची आयुष्यांतील कर्तबगारी वगैरे अनेक गोष्टी, भूतकालीन व भविष्यकालीनसुद्धां, सांगतां येतात असें म्हणणारे कांहीं लोक आहेत. एखादा मुलगा पाहिल्याबरोबर, "ह्याचे डोळे पहा कसे रामोशासारखे दिसतात," असे उद्गारसुद्धां वारंवार ऐकूं येतात. तुरुंगांतील निर्ढावलेल्या अपराध्यांच्या चेहरेपट्टीचा अभ्यास करून त्यावरून अमुक तऱ्हेच्या खुणा असलेला मनुष्य गुन्हेगार असतो अशीं विधानें करणारा शास्त्रज्ञांचाहि एक पक्ष होता. या अनुमानांच्या खरेपणाबद्दल सामान्य मनुष्य व शास्त्रज्ञसुद्धां आपसांत वारंवार वाटाघाट करितात, व अजूनसुद्धां हे वाद कोठें कोठें चालतात. पण मनुष्याच्या चेहरेपट्टीवरून किंवा त्याच्या शरीरावरील खाणाखुणांवरून त्याचा स्वभाव अगर वर्तन कितपत सांगतां येईल याविषयीं अलीकडील शास्त्रज्ञांस बरीच शंका आहे.

शरीराचा व मनाचा अत्यंत निकट संबंध असून प्रत्येक मनोविकाराचा शरीरांतील स्नायूंवर थोडाबहुत परिणाम होत असतो हें सर्वांच्या परिचयांतील आहेच. राग आल्याबरोबर हृदयाची गति वाढून डोळ्यांतील रक्तवाहिन्यांत रक्त जास्त प्रमाणांत येतें, हाताचे स्नायू जोरानें आकुंचन पावूं लागतात, ओठ कापूं लागतात, भिंवयांचें स्वरूप बदलतें व एकंदर चेहऱ्यांत इतका बदल होतो कीं त्या मनुष्याला राग आला आहे हें न सांगतांहि समजून येतें. अशाच तऱ्हेनें सूक्ष्मपणें अवलोकन करणाऱ्याला मनुष्याच्या मनांतील बहुतेक सर्व विकार त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालेले आढळूं शकतात. स्वभावधर्माप्रमाणें एखाद्या मनुष्यांत एखाद्या मनोविकाराची तीव्रता इतरांपेक्षां अधिक असल्यास त्याच्या चेहऱ्यावरील स्नायूंवर त्या विकाराची एक प्रकारची कायमची छटा राहते व त्यामुळें सूक्ष्म अवलोकन

करणारास त्याच्या स्वभावांतील विकारांचें प्राबल्य तावडतोब समजून येतें. रागीटपणा, प्रेमळपणा, धडाडी अगर कर्तबगारी यांसारखे अनेक स्वभाव-विशेष या रीतीनें त्याच्या चेहऱ्यांत कायमचे प्रतिबिंबित झाले असून आरशा-पेक्षांहि जास्त स्पष्ट रीतीनें त्याचा स्वभाव दर्शवीत असतात.

परंतु चेहऱ्यावरील छटांवरून स्वभाव सांगणें निराळें व कानाच्या, नाकाच्या किंवा डोळ्यांच्या ठेवणीवरून वर्तनाविषयीं अनुमान काढणें निराळें. वर्तनाचा संबंध मुख्यत्वें करून मनःस्थितीशीं असतो म्हणून अवयवांचा किंवा इतर खाणाखुणांचा संबंध मनुष्याच्या मनाशीं जोंपर्यंत निश्चितपणें लावतां येण्यासारखा पुरावा उपलब्ध होऊं शकत नाहीं तोंपर्यंत असें विधान करणें धोक्याचें आहे. दुर्वर्तनी मनुष्य हा एक अनुत्क्रांत ( degenerate ) स्थितींतील मनुष्य असतो, त्याची उत्क्रांति इतर मनुष्यांइतकी झालेली नसते असें मानणारा एक पक्ष आहे व मनुष्याची ही अनुत्क्रांत स्थिति त्याच्या शरीरावरील खाणाखुणांवरून समजूं शकते असें त्यांचें मत आहे. ह्या खाणाखुणांची एक विस्तृत यादीहि त्यांनीं केलेली आहे. ह्या चिन्हांवरून तो मनुष्य अनुत्क्रांत स्थितींत असून त्याचें वर्तन सामान्य मनुष्याच्या वर्तनाहून निराळें असतें असें सांगण्यांत येतें. हल्लींच्या समाजव्यवस्थेंत प्रत्येक व्यक्तीवर पडणारी जबाबदारी समजून ती पार पाडण्यास जरूर तितकी मानसिक उत्क्रांति ह्यांची झालेली नसते व म्हणून अशा व्यक्तींचें वर्तन समाजांत मान्य होत नाहीं असें ते प्रतिपादन करतात. परंतु अशा चिन्हांचा व वर्तनाचा कोणत्याच प्रकारचा संबंध अद्यापपावेतों निश्चितपणें सिद्ध होऊं शकला नाहीं व म्हणून त्यांचा जास्त विचार करण्याचें प्रयोजन नाहीं.*

ह्या अपक्रान्तीच्या चिन्हांचा दुर्वर्तनाशीं कार्यकारणभावाचा संबंध कितपत असेल हें निश्चित सांगतां येत नाहीं; पण शारीरिक परिस्थितीचा, विशेषतः शरीराची वाढ आणि शक्तीचा विकास होत असतांना जर ज्ञानतंतूंवर परिणाम होण्यासारखीं कारणें घडून आलीं तर ह्या झालेल्या शारीरिक दोषांचा दुर्वर्तनाशीं बराच संबंध असतो यांत संशय नाहीं. अर्थात् ही शारीरिक परिस्थिती किंवा हे शारीरिक दोष दुर्वर्तनाचीं प्रत्यक्ष कारणें असूं शकत नाहींत.

---

* Healy and Bronner : *Delinquents and Criminals*, p. 144.

पण त्यांच्या योगानें जी मनःस्थिति निर्माण केली जाते त्या मनःस्थितीचा मात्र वर्तनावर परिणाम होतो. एखादा आजार येऊन गेल्यानंतर जी मानसिक व शारीरिक अशक्तता येते त्याच्या योगें मनुष्याचें वर्तन बरेंच बदलूं शकतें हें सर्वांच्या परिचयाचें आहेच. त्याचप्रमाणें ही शारीरिक परिस्थिति दुर्वर्तनास पर्यायानें कारणीभूत होऊं शकते, प्रत्यक्षतः नव्हे, ही गोष्ट पुढील विवेचनाचे वेळीं लक्षांत ठेवणें जरूर आहे.

## प्राग्जन्म ( pre-natal) संस्कार

शरीराची वाढ होत असतांना त्या वाढीस प्रत्यवाय उत्पन्न करणारीं कारणें म्हणजे रोग, जखम वगैरे. त्यायोगें मेंदु किंवा ज्ञानतंतू यांच्या वाढीस अपाय झाल्यास मनुष्याच्या बुद्धिमत्तेवर व पर्यायानें वर्तनावर परिणाम होऊं शकतो. मूल गर्भावस्थेंत असतांना त्या गर्भावर होणाऱ्या परिणामांमुळें मुलांच्या वाढीस अपाय होतो. प्राण्यांच्या अंड्यांवर विद्युच्छक्तीनें किंवा रासायनिक द्रव्यानें प्रयोग करून आंतील प्राण्यांच्या वाढीवर परिणाम झाल्याचीं उदाहरणें शास्त्रज्ञ सांगतात. गर्भांतील मुलाचें पोषण मातेच्या रक्तामार्फतच होत असल्यानें ज्या ज्या कारणांनीं मातेचें रक्त दूषित होईल त्या सर्व कारणांमुळें मुलाची वाढ होण्यास हरकत येईल हें उघड आहे. मातेस क्षीणता आणणारा एखादा रोग झाला असेल तर त्यायोगें गर्भाचें पोषण नीट होणार नाहीं. मातेचे मानसिक विचार व विकार यांचा परिणाम गर्भावर पुष्कळ होतो अशी एक समजूत आहे. पण तसें मानण्यास कांहीं आधार नाहीं.* मात्र अशा मानसिक विचारांच्या योगानें किंवा अतिशय काळजी अगर मनास धक्का बसण्यासारखे प्रसंग घडून आल्यानें मातेच्या शरीरावर त्याचा परिणाम झाला असेल तर त्यायोगें गर्भावर परिणाम होईल. त्यामुळें गर्भाची वाढ, विशेषतः ज्ञानतंतूंची वाढ योग्य न झाल्यास त्या मुलाच्या वर्तनावर त्याचा परिणाम होईल. जुळ्या भावंडांपैकीं दोघांचें पूर्ण पोषण होण्यास पुरेसा वाव न मिळाल्यासहि त्यांपैकीं एखाद्याची वाढ अपूर्ण राहण्याचा संभव असतो.

मद्यार्क (alcohol) व उपदंशाचें विष यांचे गर्भावर व विशेषतः ज्ञानतंतुसंस्थेवर कायमचे परिणाम होतात; केव्हां केव्हां बुद्धि मंद होते, इंद्रियांची

* Tredgold : *Mental Deficiency*, p. 57.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्वत्र प्रत
सं.


शक्ति कमी होते किंवा त्यांत कांहीं दोष उत्पन्न होतात, व केव्हां केव्हां तर ज्ञानतंतूंवर इतका परिणाम होतो कीं (epilepsy), अगर वेड (insanity) या-सारखे भयंकर विकार जडतात. दुसऱ्या कोणत्याहि रोगापेक्षां मुलांच्या मेंदूवर उपदंशाचा परिणाम तीव्र होतो व अर्थातच दुर्वर्तनाची शक्यता वाढते.

## रोगांचा परिणाम

मूल जन्मल्यानंतरहि त्याला होणाऱ्या रोगांपैकीं कांहीं रोगांचा मेंदूवर परिणाम होऊं शकतो. कंपवात (chorea), (brain fever) किंवा (meningitis ) मेंदूच्या आवरणाचा दाह यांसारखे रोग झाल्यानंतर त्यांचा परिणाम मेंदूवर कायमचा होतो. अपघात किंवा इतर कारणांमुळें मेंदूच्या महत्त्वाच्या भागावर जखम झाल्यास त्याचेहि परिणाम वर्तनावर होऊं शकतात. लहान-पणीं योग्य व पोषक अन्नाच्या अभावीं शरीराची वाढ खुरटते व शरीरा-बरोबर ज्ञानतंतूंचीहि वाढ योग्य तऱ्हेनें होत नाहीं. अशा रीतीनें पोषक द्रव्याचे अभावीं अशक्त झालेल्या शरीरामुळें शाळेंतील अभ्यासाकडे किंवा इतर कामाकडे साहजिकच लक्ष लागणें कठीण होतें व त्याचा परिणाम दुर्वर्तनांत होतो. अशा मुलांची घरची परिस्थितीहि सामान्यतः विशेष चांगली नसते, त्यामुळें त्यांच्या वर्तनास आळा घालणें शक्य होत नाहीं; इतकेंच नव्हे तर पुढें पुढें हा प्रश्न इतका गुंतागुंतीचा होतो कीं ह्या मुलाच्या दुर्वर्तनाचें खरें कारण त्याच्या अशक्ततेंत आहे ही गोष्ट लक्षांत येणेंहि कठीण होतें.

## शरीराचा अस्वाभाविक विकास

जन्मास येण्यापूर्वीं आणि जन्मास आल्यानंतरहि शरीराची योग्य वाढ ज्या कारणांमुळें होऊं शकत नाहीं त्यांचें आतांपर्यंत विवेचन झालें. त्यांचे मुलांच्या वर्तनावर होणारे परिणाम महत्त्वाचे असले तरी एका अर्थानें अप्रत्यक्ष असतात. हीं कारणें पोषक कारणांच्याच सदरांत बहुशः पडतात, पण शरीराचा अस्वाभाविक विकास हें दुर्वर्तनाचें प्रत्यक्ष–प्रेरक–कारण पुष्कळ वेळां असूं शकतें. एखादा मुलगा त्याच्या वयाच्या इतर मुलांपेक्षां शरीरानें बराच सशक्त व हाडापेरांनीं धिप्पाड दिसतो तर ह्याच्या उलट दुसऱ्या एखाद्याचें शरीर त्याच्या पेक्षां किती तरी लहान वयाच्या मुलांच्या सारखें

दिसतें. शरीराची उंची, वजन किंवा शक्ति या बाबतींत सर्वच माणसें सारखीं नसतात; शरीराची पूर्ण वाढ झाल्यानंतरहि कांहीं शारीरिक दोष अगर व्यंगें किती तरी मनुष्यांत असतात. परंतु अशा तऱ्हेनें कायमची सदोष प्रकृति असलेल्या मुलांचा विचार ह्या सदरांत करावयाचा नाहीं. ज्यांच्या शरीरांत कायमचा कांहीं दोष नसतो, पण कांहीं काळ त्यांच्या शरीराची वाढ ठराविक नियमांस सोडून झालेली आढळून येते अशा मुलांच्या शरीराचा विकास अस्वाभाविक झालेला आहे असें म्हणतात. त्यांच्या या तात्पुरत्या अस्वाभाविक विकासाचे त्यांच्या मनोवृत्तीवर कोणते परिणाम होतात तें पाहूं.

एका विशिष्ट वयाच्या मुलांचें शरीर ज्या तऱ्हेचें असावयास पाहिजे त्या तऱ्हेचें शरीर कांहीं मुलांचें नसतें, पण त्यावरून तीं मुलें कायमचीं सदोष असतात असें नाहीं. तेराव्या किंवा चवदाव्या वर्षी एखादा मुलगा चांगला धष्टपुष्ट व सशक्त दिसतो. एक दोन वर्षांत झालेल्या त्याच्या शरीराच्या वाढीचें हेंच प्रमाण पुढें चालू राहिलें असतें तर तो एखाद्या राक्षसासारखा वाढला असता; पण पूर्ण वयांत आल्यावरहि तो तसा राक्षसासारखा न दिसतां सामान्य सशक्त माणसांसारखाच दिसतो. कारण सुरुवातीस जरी शरीराची वाढ झपाट्यानें झाली असली तरी वाढीचें तेंच प्रमाण कायम राहत नाहीं. त्याच प्रमाणें एखाद्याची वाढ सुरुवातीस सावकाश झाली असली तरी मागाहून ती प्रमाणांत येऊन तो मुलगा सामान्य मनुष्यांच्या पंक्तींत येतो. अशा मुलांच्या बाबतींत कांहीं काळ होणाऱ्या ह्या अनियमित व अस्वाभाविक विकासाचे वर्तनावर महत्त्वाचे परिणाम घडतात.

## शरीरविकासाची मंदता

शरीराचा, मनाचा व विशेषतः रतिप्रवृत्तीचा विकास हा सामान्यतः १३–१४ वर्षांच्या पुढें वेगानें होत असतो. हा विकास वयाच्या मानानें कमी अगर जास्त प्रमाणांत झाला असेल त्या धोरणानें दोन मुख्य वर्ग कल्पितां येतील. त्यांपैकीं जेव्हां हा विकास कमी प्रमाणांत अगर फार उशीरां होत असेल तेव्हां त्याचा परिणाम वर्तनावर जास्त महत्त्वाचा होत असतो. वयानें मोठा असला तरी शरीरानें अशक्त पण त्या मानानें हस्तकौशल्य व चापल्य जास्त असलेला आणि चेहऱ्यावर पोरकटपणाची झाक अजून दिसून येणारा असा मुलगा

पाहिला कीं तो बहुत करून आपल्या वर्तनानें बऱ्याच जणांना त्रासदायक होतो असा आपला सामान्य समज होतो व तसा अनुभवहि येतो. मॉरिसननें आपल्या पुस्तकांत इंग्लंडमधील आपला अनुभव देतांना (physical under-development ) शरीराचा अपूर्ण विकास हें* तरुण मुलांच्या दुर्वर्तनाचें फार महत्त्वाचें कारण असतें म्हणून म्हटलेलें आहे. शिकागो व बोस्टन येथील दुर्वर्तनी मुलांची शारीरिक तपासणी करून डॉ. हीली यांनीं जे महत्त्वाचे आंकडे गोळा केले आहेत त्यांवरूनहि दुर्वर्तनी मुलांत शरीराचा विकास अपूर्ण असल्याचीं उदाहरणें बरींच ( शेंकडा १५-२० पावेतों )† आढळून येतात. त्याच वेळीं वयाच्या मानानें शरीराची वाढ जास्त झालेल्यांची संख्या शेंकडा ४–५ इतकीच भरली. अर्थात् या सर्व आंकड्यांवरून शरीराचा अपूर्ण विकास हेंच दुर्वर्तनाचें निश्चित कारण असेल असें म्हणतां येणार नाहीं हें खरें. कारण दुर्वर्तनी मुलांतहि अव्यंग प्रकृति असणाऱ्यांचें प्रमाण शेंकडा ३०–३२ पर्यंत पडतें. शिवाय दुर्वर्तनी मुलांमध्यें शरीरप्रकृतीचें जें प्रमाण पडतें, तेंच प्रमाण सर्वसामान्य मुलांमध्यें, विशेषतः ज्या मुलांच्या समूहाचा आपण विचार करीत असूं त्यांच्याच वर्गांतील व सामाजिक दर्जांतील मुलांमध्यें, कोणत्या प्रकारचें असतें याचाहि विचार केल्याशिवाय केवळ शरीरप्रकृतीस दोष देणें शक्य नाहीं.

या बाबतींत दुसरीहि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं शरीरानें अशक्त व मनानें भित्रा अशा मुलानें केलेले अपराध उघडकीस जास्त येतात, व म्हणून अपराधी मुलांच्या संख्येंत अशा मुलांचा भरणा जास्त दिसतो. सशक्त व निढावलेलीं मुलें सहज सुटून जातात किंवा आपल्या अपराधाचें माप बेमालूमरीत्या दुसऱ्या एखाद्या बावळट मुलावर घालूं शकतात. पण ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या तरीहि ज्यांचा शरीराचा विकास योग्य प्रमाणांत झाला नाहीं अशा मुलांत दुर्वर्तनाचा संभव जास्त असतो हें उघड दिसून येईल. ज्या ठिकाणीं शरीराचा अस्वाभाविक विकास हेंच प्रत्यक्ष कारण आहे अशीं उदाहरणें शेंकडा ५–६ पर्यंत सांपडतात असें मागील कोष्टका( पान ३५ )वरून दिसून येईलच.

---

* Morrison: *Juvenile Offenders*, p. 102.

† Healy and Bronner: *Delinquents and Criminals*, p. 269

## दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

### त्यांची मनोवृत्ति

अशा तऱ्हेनें शरीराचा विकास थोडा कमी प्रमाणांत झाल्यास दुर्वर्तन कां घडावें याचें उत्तर देणें कठीण नाहीं. ह्या वयाचीं शाळेंत जाणारीं मुलें शारीरिक दोषामुळें साहजिकच वर्गांत मागें पडतात. अभ्यासाचा मानसिक ताण सहन करण्याइतकी ताकत नसल्यानें शिक्षकांची व वडील मंडळींची त्यांचे वरील मर्जी कमी होते व अशा रीतीनें निराश होत असलेल्या त्यांच्या मनाला दुर्वर्तन हें एक समाधानाचें स्थान वाटतें. केव्हां केव्हां 'येन केन प्रकारेण' प्रसिद्ध होण्याची त्यांची हांव तृप्त करण्याचा याशिवाय त्यांना दुसरा मार्ग दिसत नसतो. प्रत्येक बाबतींत अपयश येऊं लागल्यानें अयोग्य मार्गानें यश मिळवण्याची प्रवृत्ति होणें साहाजिक असतें. परंतु सर्वच मुलें शाळेंत जाणारीं नसतात. स्वतःच्या उपजीविकेकरितां, कुटुंबाच्या मदतीकरितां ज्यांना काम करावें लागतें अशांची संख्या कांहीं थोडी नसते. अशक्त मुलाला काम मिळविण्यास किंवा मिळालेली नोकरी टिकविण्यास किती प्रयास पडतील हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांची प्रवृत्ति दुर्वर्तनाकडे किती सहज वळते हें समजण्यास कठीण नाहीं.

अशा मुलांची कौटुंबिक व सांपत्तिक परिस्थितीहि तितकी समाधानकारक नसल्यास त्यांच्या मनःस्थितीचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा होतो. बहुशः अशा मुलांच्या कुटुंबांत कांहींतरी आनुवंशिक दोष असतो, व आईबापांची शिस्त ( किंवा धाक ) असावा तसा समाधानकारक नसतो. स्वतःच्या अशक्त व सदोष शरीरामुळें अशा मुलांना पुष्कळ गोष्टी साधत नाहींत व एखाद्या आडदांड मुलाशीं दोस्ती करून त्या गोष्टी साधण्याकडे यांची प्रवृत्ति साहजिकच होते; त्यामुळें वाईट संगतीचे सर्व दोष व दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतात. बहुशः एक दोन दुर्व्यसनें जडतात व त्यायोगें पूर्वीची अशक्त शरीरप्रकृति जास्त अशक्त होऊन व्यसनांमुळें होणाऱ्या अशक्त मनःस्थितीचीहि त्यांत भर पडते. शरीराचा विकास जरी झाला नसला तरी मानसिक शक्तींचा विकास झालेला असतो. वयास अनुसरून नाना प्रकारच्या इच्छा व आकांक्षा उत्पन्न होत असतात, व त्या सर्व तृप्त करण्याइतकी धमक शरीरांत आलेली नसते. बरोबरीच्या मुलांशीं बरोबरीनें वागणें त्यांस अशक्य होतें, त्यामुळें कष्टाचा पण सरळ मार्ग सोडून उनाडपणा करण्याची व दुर्वर्तनाच्या पण सोप्या मार्गानें जाण्याची प्रवृत्ति वाढत जाते.

पण अशा मुलांच्या बाबतींत यापेक्षांहि जास्त भीति असते ती अशी कीं पुष्कळ वेळां मोठीं मुलें त्यांस मुद्दाम दुर्वर्तनाचा धडा देतात. अशक्त शरीर पण त्या मानानें चपळता जास्त, वयाच्या मानानें विकसित झालेली बुद्धि, त्याच्याच जोडीला स्वतःच्या अशक्ततेमुळें थोडीशी असंतुष्ट असलेली व स्वतः होऊन साहस करण्यास न धजणारी भित्री मनोवृत्ति हीं सर्व साधनें अनुकूल असल्यावर एखाद्या निर्ढावलेल्या मुलाला ह्यांचा उपयोग करून त्यांच्या सहाय्यानें अनेक बरेवाईट उद्योग करण्याची बुद्धि झाली तर मुळींच आश्चर्य नाहीं. ह्या मुलाची सांपत्तिक स्थिति जर बऱ्यापैकीं असली तर वरील शारीरिक गुणांत पैशाचीहि भर पडावयाची!

सामान्यतः पौगण्डावस्था हा काल शारीरिक व मानसिक अस्वस्थतेचा असतो व त्यांतच ह्या अस्वाभाविक विकासाची भर पडली म्हणजे वर्तनावर जास्तच दुष्परिणाम होतात. सामान्यतः अशा मुलांना आरोग्यदृष्ट्या योग्य रीतीनें जपलें पाहिजेच. पण त्यांचा शारीरिक विकास योग्य प्रमाणांत येईपर्यंत त्यांची काळजी घेतल्याशिवाय त्यांच्या वर्तनास स्थैर्य येऊं शकणार नाहीं.

## वेगानें वाढणारें शरीर

वयाच्या मानानें शरीराची वाढ कमी असेल तर त्याचा मुलांच्या वर्तनावर जितका परिणाम होतो, तितका त्याची वाढ जास्ती प्रमाणांत झाली तर होत नाहीं असें आढळून आलें आहे. पण तेथेंहि शरीराची वाढ प्रमाणापेक्षां जास्त झाली व ह्या वाढलेल्या शक्तीचा योग्य उपयोग करून शरीर स्वाधीन ठेवण्याइतकें आत्मसंयमन व इच्छाशक्तीचा विकास झालेला नसला तर वर्तनावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. शरीर वाढलेलें असतें पण त्या प्रमाणांत मन वाढलेलें असत नाहीं. शरीराचा सामान्य आकार व शक्ति यांवरून शिक्षक व वडील माणसें सामान्यतः त्याच्यापेक्षां वयानें व बुद्धीनें जास्त असलेल्या मुलांशीं त्याची तुलना करितात; त्यास स्वतःसहि आपण मोठे आहोंत असें वाटून खरोखरी (वयानें व मनोविकासानें) त्याच्या बरोबरीचीं असलेल्या मुलांशीं बरोबरीनें वागणें त्याला आवडत नाहीं. शरीरसामर्थ्यामुळें त्यास एक प्रकारचा पुढारीपणाचा व मोठेपणाचा मान मिळतो; पण त्याचा योग्य व चांगल्या तऱ्हेनें उपयोग करण्याइतकी त्याला बुद्धि नसते. शरीरानें त्याच्या बरोबरीच्या (पण वयानें जास्त अशा) मुलांमध्येंहि

त्याचें समाधान होऊं शकत नाहीं, कारण शरीरानें जरी तो त्यांच्या बरोबरीचा असला तरी त्याची बुद्धि तितकी विकसित झालेली नसते म्हणून पुष्कळ वेळां त्या मुलांमध्येंहि मिसळणें त्याला शक्य होत नाहीं. शरीराची वाढ बरीच झपाट्यानें झाली असल्यामुळें, शरीरांतील सर्व स्नायूंचा प्रमाणबद्ध ( harmonious ) विकास झाल्यानंतर वागणुकींत जें एक प्रकारचें सौष्ठव ( delicacy ) येतें त्याचा त्याचे ठिकाणीं बराच अभाव असतो व त्यायोगें त्याच्या सर्व क्रियांमध्यें एक प्रकारचा आडदांडपणा किंवा खुळेपणा ( awkwardness ) दिसून येतो. ह्याचा साहजिक परिणाम त्याचा स्वतःचा असंतोष व इतरांची थट्टा यांत होतो.*

अशा तऱ्हेनें थोडेंसें आडदांडपणानें थोडेंसें चढेलपणानें वागण्याची सवय पडली म्हणजे पुष्कळ वेळां ती कायम राहते, व मागाहून सर्व शरीराचा व मनाचा विकास पूर्ण होऊन ही अस्वाभाविकता नाहींशी झाली तरीहि पूर्वीच्या वर्तनाची झाक कमी होत नाहीं. शरीराच्या वाढत्या सामर्थ्यास वाव देण्याकरितां त्याची अखंड धडपड चालू असते त्यामुळें वर्तनांत नेहमींच अस्थिरपणा राहतो, व कांहींतरी आडदांडपणाचीं कृत्यें अखंड चालू असतात. स्वातंत्र्याची इच्छा वाढूं लागल्यामुळें शिस्त नकोशी होते. कांहींतरी धाडसाचीं कृत्यें करून शौर्य गाजविण्याची इच्छा अत्यंत प्रबळ असल्यामुळें त्यांच्या दुर्वर्तनाचें स्वरूपहि सामान्यतः ह्याच प्रकारचें असतें. शहरांतील नाजूकपणाला अनुरूप वातावरण त्यांना कधींच मानवत नाहीं म्हणून अशीं मुलें आपल्या शक्तीला वाव देण्याकरितां साहजिकच दुर्वर्तनाचे प्रकार शोधून काढीत असतात. ह्यांच्या दुर्वर्तनाचें खरें कारण लक्षांत घेऊन त्याप्रमाणें त्यांच्या विकासास वाव देणारा व त्यांच्यावर छाप पाडून त्यांस योग्य शिस्तींत ठेवणारा कोणी भेटला नाहीं तर ह्या मुलांचें वर्तन कोणीकडे जाईल याचा नेम नसतो. केवळ कडक शिस्तीनें किंवा नियंत्रणानें त्यांची सुधारणा होणें अशक्य असतें. आरोग्यशास्त्रदृष्ट्या शरीराची जरूर ती काळजी घेणें व शरीराच्या व मनाच्या नैसर्गिक शक्तींना जरूर तो वाव मिळेल असा परिस्थितींत बदल करणें ह्या गोष्टी तर करावयास पाहिजेतच; पण त्यांच्याच जोडीला

---

* Burt: *Young Delinquent*, p. 215.

स्वतःच्या सामर्थ्यास ताब्यांत ठेवून आत्मसंयमन करण्याइतकें त्यांच्या स्वतःच्या इच्छाशक्तीचें सामर्थ्य वाढविण्याचेहि उपाय योजिल्याशिवाय बाह्य नियंत्रण अगदीं निरुपयोगी ठरेल हें उघड आहे.

**महादु:–वाढता जोम**

वरील विवेचनांत आलेले सर्वच नसले तरी त्यांतील बरेचसे महत्त्वाचे मुद्दे महादूच्या वर्तनांत स्पष्ट दिसून येतात. महादूचें वय अवघें पंधरासोळा वर्षांचें असलें तरी त्याची उंची ५ फू. ७ इं. होती आणि वजन १२५ पौंड होतें. शरीरानें धिप्पाड, हाडापेरांनीं मजबूत असलेला हा मुलगा सशक्त पहिलवाना-सारखा दिसे. बुद्धीनें सामान्यतः हुषार असल्यामुळें आजपर्यंत जरी तो वर्गांतून व घरांतून अनेक वेळां पळून गेला होता तरी अभ्यासांत फारसा मागें पडला नव्हता. घरांतून पळून गेल्यावर वाईट मित्रांच्या संगतीनें लहानमोठ्या चोऱ्या करण्यासहि त्यानें सुरुवात केली होती. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, आपल्या दुष्कृत्यांबद्दल पश्चात्तापाची आंच त्याच्या अंतःकरणाला मुळींसुद्धां कधींच शिवली नाहीं.

त्याचे आईबाप गरीब असले तरी सुवृत्त आणि सज्जन होते. आपला मुलगा हातचा गेला म्हणून त्यांना फार वाईट वाटे व तो आतां सुधारण्याची आशा त्यांनीं जवळजवळ सोडलीच होती. पण शारीरिक सामर्थ्याची झपा-ट्यानें झालेली वाढ आणि त्याबरोबरच उत्पन्न होणाऱ्या आकांक्षा हेंच महादूच्या उनाडपणाचें मुख्य कारण होतें. शहरांतील नाजूक मुलांच्या वातावर-णांतून काढून खेडेगांवच्या शाळेंत त्याला पाठविण्याबद्दल त्याच्या पालकांना केलेली सूचना त्यांनीं ताबडतोब मान्य केली. खेडेगांवांत त्याच्या आडदांड शरीराच्या वाढत्या जोमाला भरपूर वाव मिळेल अशी व्यवस्था केल्यानें त्याच्या मनाचें तर समाधान झालेंच; पण शाळेंतून पळून जाऊन उनाडपणा करण्याची व अर्थात् वाईट संगतीच्या नादीं लागण्याची शक्यताहि कमी झाली. अशा प्रकारें सतत दोनतीन वर्षेपर्यंत योग्य मनुष्यांच्या देखरेखी-खालीं ठेवल्यावर त्याचें वर्तन निवळूं लागलें आणि १७–१८ वर्षांच्या सुमारास त्याच्या इतर शक्तींचा विकासहि प्रमाणांत झाल्याबरोबर त्याची वृत्ति शांत झाली आणि वर्तनांत पुष्कळच स्थैर्य आलें.

# प्रकरण सहावें

# पौगण्ड

" उन्मादकारी च यौवनम् "

## उनाड मुलांची वाढती संख्या

मुलाचा हूडपणा त्याच्या वयाबरोबर वाढत जात जात चवदा पंधरा वर्षांच्या सुमारास तर तो कळसास पोहोंचतो असा सामान्यतः सर्व शिक्षकांचा अनुभव आहे. आईबापांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करणें, मित्रांच्या संगतीनें भटकणें, प्रसंगीं खोटें बोलून वडिलांशीं किंवा शिक्षकांशीं प्रतारणा करणें, क्वचित् प्रसंगीं लहानलहान चोऱ्या करणें, ह्यांसारखे अपराध ह्या वयांत इतके वाढूं लागतात कीं, आतां आमच्या बाळयाचे कान लांब होऊं लागल्याबद्दलचे उद्गार बहुतेक सर्व आईबापांकडून निघतात. हा सामान्य समज आहे इतकेंच नव्हे तर परदेशांत अभ्यासकांनीं गोळा केलेल्या आंकड्यांवरूनहि या समजास बळकटी येते. इटलींतील शाळांतील सुमारें तीन हजार मुलांच्या वर्तनाबद्दल माहिती मिळवून मॅरो ( Marro ) यांनीं तयार केलेला सुप्रसिद्ध आलेख* समोर दिला आहे. आपल्या देशांतहि जर अशा तऱ्हेचे आंकडे गोळा करण्याचा कोणीं प्रयत्न केला तर फारसें निराळें प्रमाण पडेल असें वाटत नाहीं. अकराव्या वर्षी सद्वर्तनाचें प्रमाण शेंकडा ७० पडतें तेंच बाराव्या वर्षी उतरावयास लागून चवदाव्या वर्षी ५८ पर्यंत जातें व त्यानंतर सुधारणेस सुरवात होऊन अठराव्या वर्षी बहुतेक मुलें ( शेंकडा ७४ ) सद्वर्तनी असतात असें म्हणावयास हरकत नाहीं. सर्वच उनाड मुलांचा समावेश ह्या आंकड्यांत होतो असें खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. कारण आईबापांच्या व शिक्षकांच्या मतानें सद्वर्तनी समजल्या जाणाऱ्या सर्वच मुलांचें वर्तन खरोखरी चांगलें असतेंच असें नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे उनाड मुलांचें ह्या वयांतील प्रमाण पुष्कळच जास्त पडेल. वयाच्या चवदा-पंधरा वर्षांच्या सुमारास वर्तनांत एकाएकीं इतका बदल घडण्याइतकें महत्त्वाचें कारण कांहींतरी असलें पाहिजे हें उघड आहे. दहाअकरा वर्षांच्या वेळीं सद्वर्तनी समजल्या जाणाऱ्या मुलांपैकीं शेंकडा सतरा मुलांचें वर्तन एक

---

* Stanley Hall : *Adolescence*, Vol. I, p. 346.

दोन वर्षांत बदलतें त्याला केवळ त्या मुलांचा स्वभावदोष किंवा दुष्ट इच्छाच कारणीभूत होत असेल असें म्हणतां येणार नाहीं. त्या वयाच्या शारीरिक अथवा मानसिक प्रवृत्तींत महत्त्वाचीं स्थित्यंतरें होत असल्यामुळें हा बदल घडत असतो, म्हणून त्याचा दोष सर्वस्वीं मुलांवर लादतांना मुलांनीं स्वेच्छेनें हा उनाडपणा केला नाहीं ह्या गोष्टीकडे बऱ्याच वेळां दुर्लक्ष होतें. ह्या वयांतील मुलांचें असमाधानकारक वर्तन सुधारण्याचे प्रयत्न नेहमीं होतातच असें नाहीं. संवयीनें अंगवळणीं पडलेलें वर्तन तसेंच पुढें चालू राहतें, आणि उनाडपणा करण्याची ही संवयच पुढील दुर्वर्तनास बऱ्याच अंशीं कारणीभूत होते. मुलांच्या भावी आयुष्याच्या व शिक्षणाच्या दृष्टीनें किंवा समाजाच्या नीतिमत्तेच्या दृष्टीनेंहि विचार करतां ह्या वयांतील मुलांचें वर्तन उपेक्षणीय नाहीं.

### सद्वर्तनी मुलांचें शेंकडा प्रमाण



# दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

## पौगण्डकालीन मनोवृत्ति

या वयाच्या सुमारास शरीराचा व मनाचा विकास झपाट्यानें होत असतो आणि त्यामुळें मुलांचें मन व त्याबरोबरच त्यांचें वर्तन इतकें अस्थिर होतें कीं, त्याचा परिणाम कोणाच्याहि सहज लक्षांत येण्याइतका स्पष्ट असतो. पण ज्यांच्या घरची शिस्त व वळण ( tone ) योग्य तऱ्हेचें असून ज्यांना पूर्वींच चांगल्या संवयी लागल्या आहेत, त्यांच्या बाबतींत हे परिणाम फार थोडा वेळ टिकतात लवकरच या नवीन प्रवृत्तींना नियमन करण्यास तीं मुलें शिकतात व त्यांच्या वर्तनास स्थैर्य येतें. परंतु ज्यांना शिस्तीनें वागण्याची संवय नाहीं, घरचें वळण आत्मसंयमनास पोषक नाहीं किंवा या काळांतील ज्यांच्या शरीराची वाढ थोडीबहुत अस्वाभाविक असते अशांचें वर्तन या कालांत तर समाधानकारक नसतेंच, पण कायमचेंहि तसेंच राहण्याचा संभव असतो.

पौगण्डावस्थेची सुरुवात सामान्यतः १२ व्या किंवा १३व्या वर्षापासून धरण्याची पद्धत आहे. तेथपासून सुमारें सातआठ वर्षांपर्यंत हा काळ समजला जातो. अर्थात् या मर्यादा केवळ मार्गदर्शक असून व्यक्तिपरत्वें या कालांत पुष्कळच अंतर पडतें. सामान्यतः सर्व शरीराची व इंद्रियांच्या शक्तींची वाढ या कालांत वेगानें होऊं लागते; उंची, वजन व स्नायूंची शक्ति यांत अल्प कालांत घडून येणारी वाढ कोणाच्याहि सहज लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. बीजोत्पादक इंद्रियांचा ( sex organs) विकास होण्यास सुरुवात होऊन या कालच्या अखेरीस बीजपेशी ( germ cells ) परिपक्क होतात. या सर्वांचा परिणाम शारीरिक शक्ति व जोम यांवर तर होतोच, पण मनोवृत्तीवर त्यापेक्षांहि जास्त होतो. या नवीन नवीन उत्पन्न होणाऱ्या शक्तींचा व प्रवृत्तींचा अनुभव नसल्यानें त्यांचें संयमन करण्याची किंवा त्यांचा योग्य उपयोग करण्याची तयारी झालेली नसते. झपाट्यानें वाढलेल्या शक्तीमुळें एक प्रकाराचा आडदांडपणा, फाजील आत्मविश्वास किंवा बेगुमानपणा वाढूं लागून मनाचा समतोलपणा नाहींसा होतो. या उत्साहाच्या जोडीनें कल्पनासृष्टींत भराऱ्या मारण्याचीहि प्रवृत्ति वाढत असते. भावी आयुष्याविषयीं नाना तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा बाळगून त्यांविषयीं कल्पनासृष्टींतच शेखमहंमदी किल्ले बांधण्यांत मुलांचे महिनेच्या महिने खर्च होतात. विचारशक्तीची वाढ या कालांत सुरुवातीच्या दोनतीन वर्षांत

ग्रंथ संग्रहालय
स्वतंत्र प्रत
नं. ....... नं. .........
ता. .........

जरी थोडी होत असली तरी अखेरी अखेरीस ती अतिशय झपाट्यानें होते व म्हणून प्रत्येक गोष्टीला तर्काची कसोटी लावण्याची व तात्त्विक वादविवाद करण्याची हांव ह्या कालांत प्रामुख्यानें दिसून येते. या कालाच्या सुरुवातीस शारीरिक शक्ति व इंद्रियांचा विकास झपाट्यानें होतो व विचारशक्तीचा विकास उशीरां होतो; त्याचा साहाजिक परिणाम असा होतो कीं, सुरुवातीच्या कालांतील उत्पन्न होणाऱ्या प्रवृत्तींना संयमन करणें अतिशय कठीण होतें. त्यामुळें उनाडपणाचीं बरींचशीं उदाहरणें ह्या प्रथमच्या कालांतीलच असतात. स्वतःच्या तर्कशक्तीवरच भिस्त ठेवून वागण्याची प्रवृत्ति उत्पन्न होत असते व त्याच्याच जोडीस नवीन नवीन प्रवृत्तींना वाव देण्याची इच्छा व आवश्यकता भासत असते त्यामुळें एक प्रकारच्या बंडखोरी वृत्तीचा उगम होतो; आपल्या भोंवतालच्या परिस्थितीमुळें मनाचें समाधान होईनासें होतें, व साहजिकच ती परिस्थिति बदलण्याचा किंवा परिस्थितीला न जुमानतां आपल्या प्रवृत्तींना वाव देण्याचा म्हणजे स्वच्छंद-वृत्तीनें वागण्याचा प्रयत्न केला जातो.

## तिचा वर्तनाशीं संबंध

पौगण्डावस्थेंत होणाऱ्या ह्या शारीरिक व मानसिक घडामोडींमुळें मनः-प्रवृत्तींत व त्यामुळें वर्तनांत येणारी अस्थिरता बहुतेक वेळां तात्पुरती असते.. शरीरांत येणारा नवीन जोम व त्याच बरोबर उत्पन्न होणाऱ्या नवीन प्रवृत्ती यांचा भोंवतालच्या सामाजिक परिस्थितीशीं मेळ घालतांना ( adjustment ) सुरुवातीस बरेंच कठीण जातें, परंतु वयाबरोबर इतर पूरक ( नियामक—counter-acting ) प्रवृत्तींचाहि विकास होऊन पौगण्डावस्थेच्या प्राथमिक अवस्थेंतील बावरलेली वृत्ति स्थिरावूं लागते, व परिस्थितीचा व या अंतःप्रवृत्तींचा मेळ ( adjustment ) घातला जाऊन वर्तनांत स्थैर्य येतें. सतराअठरा वर्षांच्या सुमारास वर्तनांतील उच्छृंखलपणा कमी होऊं लागतो व एक दोन वर्षांत स्वतःचें नवीन सामर्थ्य व प्रवृत्ती यांचें योग्य संयमन करून त्यांचा उपयोग करण्यास मनुष्य शिकतो. तारुण्याचें हें वादळ सुरक्षित निभावून गेलें तर त्याचे चिरकालिक असे कांहीं परिणाम राहात नाहींत; पण पुष्कळ वेळां या वयांतील मनोरचनेचा अनुभव आणि उच्छृंखल मनोवृत्तींना योग्य मार्गानें वळण लावण्याचें कौशल्य, या दोन्ही गुणांचा पालकांच्या किंवा

## दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

शिक्षकांच्या ठायीं अभाव असल्यानें मुलांच्या वर्तनास एकदां लागलेलें अनिष्ट वळण दुरुस्त होत नाहीं व सद्वर्तनास आवश्यक असलेले सर्व गुण अंगीं असूनहि संपूर्ण आयुष्य दुःखांत व क्लेशांत काढावें लागतें. या अवस्थेंत सामान्यतः बहुतेक मुलांच्याहि वर्तनांत थोडाबहुत बदल होतोच. मग ज्यांची प्रकृति मूलतः अशक्त असते, ज्ञानतंतू क्षोभनशील, उत्तेजनक्षम ( irritable ) असतात, किंवा मानसिक स्वास्थ्याचा अभाव असतो अथवा आत्मसंयमनादि गुणांचा विकास करण्याकडे लहानपणापासून लक्ष दिलें गेलें नसतें, अशांना या तारुण्याच्या तुफानाचा काळ किती अस्थिर व मनःक्षोभक जात असेल याची कल्पना सहज येईल.

वर वर्णन केल्याप्रमाणें या कालांत ज्या नवीन प्रवृत्ती उत्पन्न होत असतात त्यांचें संयमन करण्याच्या शक्तीचा अभाव असल्यामुळेंच वर्तनांत बदल घडत असतो. शारीरिक सामर्थ्याची जाणीव नवीनच होऊं लागल्यामुळें वृत्तींत थोडी बेपर्वाई येते; त्याच्याच जोडीला अनुभवानें येणाऱ्या दूरदृष्टीचा अद्याप अभाव असल्यामुळें त्याचाहि परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं; कात टाक-लेल्या सापाप्रमाणें एका अर्थानें पुनर्जन्म पावलेलें हें मन अद्याप नाजूक असून टक्केटोणपे खाऊन घटलेलें नसतें व त्यामुळें आघातांचा परिणाम त्यावर फार त्वरित होतो. स्वाभिमानी वृत्तीचाहि विकास वेगानें होत असतो. त्यामुळें अपमानाचीं क्षुल्लक शल्येंहि अंतःकरणाला मर्मभेदी जखमा करूं लागतात. गरीब कुटुंबांतील मुलांचें शिक्षण बहुधा याच वयांत संपून स्वतःच्या उदर-निर्वाहाकरितां व प्रसंगीं कुटुंबाच्या पोषणास मदत करण्याकरितां उद्योगधंदा पहाणें त्यांना भाग पडत असतें व त्यामुळें अंगावर नवीन जबाबदारी येऊन पडते. पण त्या दृष्टीनें पूर्वतयारी बिलकुल झालेली नसते. सामान्य मनुष्यालाहि इतक्या परिस्थितींत मनाचा समतोलपणा ठेवणें कठीण जाईल; मग पौगण्डा-वस्थेंत नुकत्याच प्रवेश केलेल्या मुलांची वृत्ति तुफानांत सांपडलेल्या जहाजा-प्रमाणें वाहवून जाऊन पुढील मार्ग निश्चितपणें दिसत नसल्यामुळेंच तीं मुलें आडमार्गांत शिरलीं तर आश्चर्य कोणतें ?

### क्रोध आणि द्वेष

पौगण्डावस्थेच्या सुरुवातीस मुलांच्या वागणुकींत महत्त्वाचा बदल घडवून आणणाऱ्या प्रवृत्तींमध्यें क्रोध व त्याच्या अनुषंगानें द्वेष व सूड घेण्याची

प्रवृत्ति या बऱ्याच प्रबळ झालेल्या आढळतात. पौगण्डावस्थेच्या पूर्वी राग आला असतां मुलें ताबडतोब विकारवश होऊन रडून अगर आरडाओरड करून आपला राग प्रदर्शित करीत असतात. तींच मुलें आतां राग आल्याबरोबर त्याचें प्रदर्शन करणें चांगलें नव्हे असें समजूं शकतात; पण त्यामुळें त्यांचा राग कमी झालेला असतो असें नाहीं; मनोवृत्तींत एक प्रकारचा नाजूकपणा येत असल्यामुळें मानापमानाच्या कल्पना फार तीव्र झालेल्या असतात; क्षुल्लक कारणांवरून राग येतो व तो ताबडतोब अंमलांत न येतां बराच वेळ धुमसत राहून त्याचें पर्यवसान सूड घेण्याच्या वृत्तींत होतें. एकीकडे ताबडतोब क्रोधवश होणारी मनोवृत्ति व दुसरीकडे रागाचें प्रदर्शन न करण्याची वृत्ति यांच्या परस्परविरोधी प्रेरणेमुळें मुलांच्या मनाची अवस्था अतिशय चमत्कारिक होत असली पाहिजे व त्या चमत्कारिक अवस्थेमुळें कांहीं भलतींच कृत्यें त्यांच्या हातून घडून यते असला पाहिजेत. अत्यंत कडक शिस्तीनें किंवा शिक्षेनें ह्या क्रोध, द्वेष किंवा सुडाच्या प्रवृत्ति नाहींशा करणें केव्हांहि इष्ट नाहीं. सहसा ह्या प्रवृत्ति नाहींशा होत नाहींत ही गोष्ट जरी खरी असली तरीहि मर्यादेच्या बाहेर त्यांचें संयमन करण्याचा प्रयत्न करण्यानें फायदा होण्याच्या ऐवजीं एक प्रकारचा नामर्दपणाच उत्पन्न होण्याचा संभव असतो. ह्या कालांत मारामारी करण्याची मुलांची प्रवृत्ति प्रसिद्ध आहे. पण तेथेंहि स्वतःच्या प्रवृत्तीला वाव देण्यापलीकडे–म्हणजे मारामारी करण्याची हौस भागविण्यापलीकडे–दुखापत करण्याचा हेतु नसतो. इतकेंच नव्हे तर मारामारी करतांना भलत्याच ठिकाणीं मार लागणार नाहीं किंवा प्रमाणाच्या बाहेर दुखापत होणार नाहीं याबद्दल मुलें किती काळजी घेतात हें सूक्ष्मपणें अवलोकन करणाराच्या तेव्हांच लक्षांत येतें. कुस्तीसारख्या प्रकारांना उत्तेजन देऊन ह्या कालांतील ह्या प्रवृत्तींना योग्य वळण लावण्यानेंच मुलांच्या शक्तींचा विकास योग्य रीतीनें होऊं शकेल व आडदांडपणाची प्रवृत्ति कमी होईल.

## चिडविण्याची हौस

आपल्यापेक्षां लहान किंवा अशक्त मुलांना चिडवून, त्रास देऊन किंवा अन्य तऱ्हेनें दुःख देऊन त्यांच्या दुःखानें समाधान करून घेण्याची प्रवृत्ति या वयांतील मुलांत स्पष्टपणें दिसून येते. अशक्त मुलाशीं मारामारी करून

किंवा त्यास न आवडणाऱ्या गोष्टी मुद्दाम करून, त्यास नानातऱ्हांचीं टोपणनांवें ठेवून किंवा भीति दाखवून, त्याच्याकडून अखेर 'मी शरण आलों' असें वदवून घेण्यांत मुलांना किती धन्यता वाटते याची कल्पना हे प्रकार प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज येणार नाहीं. हे चिडविण्याचे व त्रास देण्याचे प्रकार इतके असंख्य आहेत कीं, त्यांचा नामनिर्देश करणेंहि शक्य नाहीं, या वयांत वाढत असलेल्या युद्ध करण्याच्या किंवा स्वतःचें स्वामित्व प्रस्थापित करण्याच्या प्रवृत्तींचीं हीं दृश्य चिन्हें असावींत. या गोष्टी करण्यास त्यांना कारणहि लागत नाहीं व स्वतःची करमणूक करून घेण्यापलीकडे त्यांत हेतुहि नसतो. पण असें असलें तरी ह्या प्रवृत्तीकडे कायमचें दुर्लक्ष करणें हिताचें होत नाहीं. अजाणतां कां होईना पण त्याचे परिणाम केव्हां केव्हां भयंकर होतात हें जाणून त्या दृष्टीनें मुलांच्या मनोवृत्तीस वळण लावण्याचा प्रयत्न आगाऊ करणें जरूर असतें. अशक्तांवर सत्ता दाखविणें हें भित्रेपणाचें लक्षण असून तुल्यबलाशीं सामना करण्यानेंच खरें मोठेपण मिळतें हें मुलाला एकदां पटलें म्हणजे त्या मुलाच्या मनांतील या प्रवृत्ती जरी समूळ नाहींशा झाल्या नाहींत तरी त्या मर्यादेंत राहून त्यांचा दुष्परिणाम होण्याचें टळतें.

## मुलांचे संघ

मनुष्यप्राणी हा समाजांत संघ करून राहणारा असला तरीहि ही संघ करण्याची प्रवृत्ति पौगण्डकालीं विशेष जोराची असते. वर्गांतील मुलांत तट असून पुढारीपणाचे थोडेसे गुण अंगीं असलेला प्रत्येक मुलगा आपला स्वतंत्र तट निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो, हा अनुभव प्रत्येक शिक्षकाला असतोच. अशा तऱ्हेनें एकदां तट स्थापन झाल्यावर त्यांचा उपयोग प्रथम करमणुकीकडे व पर्यायानें अनेक तऱ्हांचा उनाडपणा करण्याकडे होऊं लागतो. त्यांतील एखादा मुलगा व्यक्तिशः भित्रा व अशक्त असला तरी त्याच्या त्या छोट्या समाजांत त्याला धैर्य येतें व जीं त्यानें एकट्यानें कधींहि केलीं नसतीं अशीं कित्येक धाडसाचीं व क्रूरपणाचीं कृत्यें तो करूं लागतो. अशा दोन किंवा अनेक तटांची चुरस वाढून नाना प्रकारचे राजकारणी डावपेंच व प्रसंगीं छोटींमोठीं युद्धें होण्यापर्यंतहि केव्हां केव्हां मजल जाते.

संघ करण्याची ही प्रवृत्ति विचार करून उत्पन्न झालेली नसते; म्हणजे संघापासून आपला स्वतःचा बराच फायदा होण्याचा संभव आहे, अगर संघांत राहूं लागल्यानें आपणा एकट्यास जीं सुखें मिळूं शकत नाहींत तीं मिळूं शकतात अशा जाणीवेनें हे संघ केलेले नसतात. ती एक सहज-प्रवृत्ति असून तिला अनुसरूनच हे संघ तयार होतात. मात्र एकदां संघ तयार झाल्यानंतर एकमेकांचे मनोविकार परस्परांना पोषक होतात व त्यामुळें ज्या गोष्टी एकटा मुलगा करूं शकत नाहीं, त्या संघाच्या सहानुभूतीनें करण्यास तो धजावतो. संघानें केलेल्या कृत्यांची जबाबदारी कोणाहि एकावर पडत नाहीं व फायदा मात्र सर्वांना मिळतो. त्यामुळें एकदां संघ झाल्यानंतर तो सोडण्याची इच्छा सहसा कोणाला नसते. अशा संघांत सामान्यतः कोणाच्या तरी एकाच्या नेतृत्वाखालीं सर्व कृत्यें केलीं जातात. सर्वांमध्यें बुद्धीनें अगर नीतिमत्तेनें जो श्रेष्ठ असेल तोच त्या संघाचा पुढारी असेल असें मात्र नाहीं. उलट तसा मुलगा पुढारी नसण्याचाच संभव जास्त. आपल्या सोबत्यांच्या मनोविकारांना उत्तेजन देऊन त्यांवर आपली छाप पाडूं शकणाराच मुलगा पुढारी होऊं शकतो व संघाचें सर्व धोरण तो स्वतःच्या व संघाच्या विकारांच्या तीव्रतेला अनुसरून ठरवीत असतो. पौगण्डावस्थेच्या पूर्वी मुलांना संघाची आवश्यकता फारशी भासत नाहीं. मुलें संघानें खेळत असली तरी त्यांत घटना, एकसूत्रीपणा, सांघिक धोरण यांचा अभाव असतो. खेळाची सुरुवात झाल्यानंतर वाटेल तेव्हां वाटेल त्या सोबत्यानें यावें व मनाला वाटेल तेव्हां निघून जावें अशाच स्वरूपाचे हे संघ त्या काळीं असतात. पण त्यानंतरच्या वयांत संघांची खरी सुरुवात होते व पंधराव्या वर्षाच्या सुमारास ही संघ करण्याची प्रवृत्ति कळसास पोहोंचते.

अशा तऱ्हेचे सर्व संघ दुर्वर्तनी मुलांचेच असतात किंवा त्यांचे परिणाम वाईटच होतात असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. सहजप्रवृत्तीस अनुसरून हे संघ होत असतात व त्यांचा योग्य उपयोग करणारा शिक्षक किंवा पालक भेटल्यास त्यांच्या दुष्परिणामांप्रमाणें चांगले परिणामहि पुष्कळ होऊं शकतात. मुलांच्या संघांवर बहिष्कार टाकून त्यांना दडपून टाकण्याऐवजीं या प्रवृत्तीचें रूपांतर खेळण्याचे संघ, तालमीचे आखाडे किंवा वाङ्मयात्मक संस्थांच्या रूपानें करून या प्रवृत्तीला वाव देण्याचा प्रयत्न करणेंच इष्ट असतें.

## पळून जाणारीं मुलें

घरांतून क्षुल्लक कारणावरून पळून जाणारीं मुलें बहुतेक या वयाचींच असतात. त्यांना घर सोडण्यास जीं कारणें घडतात तीं तितक्या महत्त्वाचीं असतात किंवा नाहीं हा प्रश्न विचारार्ह आहे. घरीं भांडणें असलीं किंवा स्वतःच्या इच्छेला वाव मिळण्याची आशा नसली अगर स्वतःच्या मनाला न आवडणारी गोष्ट करण्याचा वडील मंडळींचा आग्रह असला व त्याच समारास एखाद्या स्नेह्यानें दुसरीकडे जाण्यास उत्तेजन दिलें तर घरांतून निघून जाण्याची प्रवृत्ति सहज घडून येते, व एकदां घरांतून बाहेर पडल्यानंतर या कालांत स्वाभाविक असलेल्या मानापमानांच्या तीव्र भावना किंवा घरीं आल्यानंतर घरच्या मंडळींच्या सहानुभूतिशून्य बागवणुकीची कल्पना मनांत येतांच घरीं परत येण्यापेक्षां घराबाहेरील तीव्र परिस्थिति सहन करण्याचे अगर दुर्वर्तनाच्या बाबतींत त्यापुढेंहि पाऊल टाकण्याचे प्रसंग नाइलाजानें तो मुलगा पत्करितो. परंतु हीं सर्व कारणें कमी अधिक प्रमाणानें महत्त्वाचीं असलीं तरी खरें कारण असें असतें कीं, घराच्या बाहेर पळून भटकण्याची प्रवृत्ति या काळीं तीव्र असते व हीं वरील कारणें बाह्य स्वरूपाचीं व केवळ त्या प्रवृत्तीला पोषक अशींच समजलीं पाहिजेत. पौगण्डावस्थेंत उत्पन्न होणारी स्वातंत्र्याची जाणीव व घरांतील किंवा शाळांतील अस्वाभाविक व स्वातंत्र्याच्या प्रवृत्तीस आळा घालणारी शिस्त व शिक्षण यांचा विरोध उत्पन्न होतो व त्यामुळें भोंवतालच्या परिस्थितीचीं बंधनें झुगारून देण्याची ही प्रवृत्ति उत्पन्न होते. या कालांत नित्य नव्या नव्या कार्यक्रमाची आवड इतक्या थराला गेली असते कीं रोज रोज घडणाऱ्या गोष्टींचा वीट येतो, नवीन नवीन उत्तेजकांची आवड भासूं लागते व पुष्कळशा गोष्टी केवळ नवीन म्हणूनच केल्या जातात; अशा वेळीं बाहेरची मजा कशी असते याचा अनुभव घेण्याची इच्छा ही पळून जाण्याच्या वृत्तीच्या मागें असते. या वयांत या प्रवृत्तीची योग्य जोपासना करण्याच्या हेतूनें शक्य तितक्या प्रवासाच्या सोयी मुलांना करून देऊन योग्य मार्गदर्शकाच्या देखरेखीखालीं बाहेरच्या जगाची कल्पना आणून देणें हाच सर्वोत्तम मार्ग होय.

## असत्य भाषण

असत्य बोलण्याची प्रवृत्ति सर्व मुलांत अगदीं लहानपणापासून दिसून येते व ती तारुण्यावस्थेपर्यंत कमीअधिक प्रमाणांत असतेच. अर्थात् खोटें बोलण्याचे हेतु मात्र सर्व मुलांचे सर्वकाळीं सारखे नसतात. वयाच्या तिसऱ्या चवथ्या वर्षाच्या सुमारास मुलांची कल्पनाशक्ति इतकी तीव्र होते कीं, पुष्कळ वेळां त्यांना कल्पनासृष्टींतील गोष्टी सत्यसृष्टींतल्या इतक्याच खऱ्या वाटतात. बाबा घरीं येण्यापूर्वीच 'आई, बाबा आले' म्हणून मुलें सांगतात, तें कांहीं अगदींच असत्य नसतें. कारण त्यांच्या काल्पनिक जगांत बाबा घरीं आलेले असतातच. 'मी वाघ आहें', 'मी अमुक आहें' इत्यादि मुलांचे खेळ या वयांतच जास्त जोरानें चालतात; पण 'मी वाघ आहें,' म्हटलेलें आईला चालतें पण 'बाबा घरीं आले' किंवा यासारखें दुसरें एखादें असत्य कां चालत नाहीं, याचें मुलांना आश्चर्य वाटतें. कारण त्यांच्या काल्पनिक जगांत दोन्ही गोष्टी सारख्याच सत्य असतात. त्यानंतरच्या काळांत आपल्या अंगीं पुष्कळ गुण असून आपण फार मोठे आहोंत असें भासविणें हा असत्य बोलण्याचा हेतु असतो. शौर्य, धैर्य इत्यादि अनेक गुण आपणांत असावेत अशी इच्छा असते व म्हणून न केलेल्या मारामारीचें व न दाखविलेल्या धैर्याचें वर्णन मुलें पुष्कळ वेळां करीत असतात. यासारख्या उदाहरणांतून असत्य बोलण्याचा त्यांचा हेतु असतो असें नव्हे तर सत्याची मर्यादा आपण केव्हां ओलांडली हें त्यांच्या लक्षांतच येत नाहीं.

निढावलेलीं मुलें स्वतःच्या स्वार्थाकरितां किंवा मित्रीं मुलें शिक्षा चुकविण्याकरितां खोटें बोलतात, हें आपण नेहमीं पहातों. पण तींच मुलें आपल्या मित्रमंडळींत किंवा ज्यांच्यावर त्यांचें प्रेम असेल अशांशीं खोटें बोलत नाहींत. मुलांच्या व वडील माणसांच्या आवडीनावडी, काम करण्याच्या दिशा, हौशी वगैरे इतक्या भिन्नभिन्न असतात कीं, वडील माणसें हीं आपल्या जगांतील नाहींत अशी मुलांची भावना होते व म्हणून वडील माणसांशीं मोकळेपणानें तीं वागत नाहींत व त्यांच्याशीं खोटें बोलणें हा आपल्या मित्रमंडळींशीं खोटें बोलण्यापेक्षां कमी महत्त्वाचा अपराध तीं समजतात. तारुण्यांत प्रवेश करूं लागलेल्या मुलांची मित्रनिष्ठा फार जाज्वल्य असते, व अशा वेळीं आपल्या मित्राकरितां खोटें बोलून येईल तो त्रास ते सहन

करतात. अर्थात् त्यांची मैत्री शिथिल झाल्यावर केव्हां केव्हां या सर्व गुप्त (!) गोष्टी ते उघड करतात हा भाग निराळा. खरें बोलण्याची संवय लावतांना या निरनिराळ्या कारणांचा तर विचार करावयाला पाहिजेच; पण वडील मंडळींविषयीं मुलांना योग्य प्रकारचा आपलेपणा वाटावयास लागेल इकडे लक्ष द्यावें; त्याचप्रमाणें खरें बोलण्याचे परिणाम सहन करण्याइतकें धैर्यहि त्यांच्या अंगीं येईल अशी खबरदारी घ्यावी.

### रतिप्रवृत्ति

इतर कोणत्याहि प्रवृत्तीपेक्षां रतिप्रवृत्ति( sex instinct )चा विकास पौगण्डावस्थेंत प्रामुख्यानें होत असतो. किंबहुना हीच प्रवृत्ति या वयांतील मुलांच्या सर्व वागणुकींत प्रामुख्यानें दिसून येत असून इतर प्रवृत्तींचा विकासहि तिच्या विकासाच्या अनुरोधानेंच होत असतो. प्रजोत्पादनाचीं इंद्रियें पूर्णावस्थेस येऊं लागतात व त्याचबरोबर आजपावेतों न अनुभविलेले मनोविकार व भावना मनांत विलक्षण खळबळ उडवून देतात. शरीराच्या व इंद्रियांच्या शक्तींत भासूं लागणारा हा नवीन जोम व मनांत उत्पन्न होणारे हे तीव्र विकार समजून घेऊन त्यांचें योग्य संयमन करण्याचें शिक्षण बाळपणा-पासून मिळालें नसेल तर या कालांतील मानसिक खळबळ मुलांना संकटांत पाडल्याशिवाय राहणार नाहीं.

रतिप्रवृत्तीचा विकास मुख्यतः पौगण्डावस्थेंत होत असला तरी बीज-रूपानें ती प्रवृत्ति बालपणापासूनहि दृग्गोचर होत असते. घरांत नवीन जन्माला आलेलें बाळ कोठून आलें, याबद्दल मुलें तिसऱ्या किंवा चवथ्या वर्षींच प्रश्न विचारूं लागतात; पण ते सर्व प्रश्न कोणत्याहि प्रकारच्या रति-विषयक विकाररहित असतात. वारा कोठून आला, ताक कोणीं केलें यासारख्या केवळ माहितीवजा प्रश्नांच्या जातीचाच 'मनीला पिलुं कसें झालें' हा प्रश्नहि असतो. या सर्व प्रश्नांना साधीं व सरळ, परंतु सर्वस्वीं सत्य उत्तरें दिल्यानें मुलांचें समाधान किती थोडक्यांत होतें, हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय पटणार नाहीं. मुलांची ही जिज्ञासा अशा तऱ्हेची मोकळी व विकाररहित राहिल्यास तारुण्यांतहि मनांत उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या रतिप्रवृत्ति-विषयींहि तितक्याच निर्विकारपणें ते वडिलांशीं किंवा शिक्षकांशींहि बोलले असते व या बाबतींतील ओढवणारे पुष्कळ अनर्थ टळले असते.

## रति-शिक्षणाची ( sex-education ) आवश्यकता

जनन, मरण किंवा प्रजोत्पादन या विषयांसंबंधीं निर्विकारपणें फार थोडे जण विचार करूं शकतात. जननाचें रहस्य, मृत्यूची भीति व रति-विषयक अवास्तव लज्जा पुष्कळांच्या मनांत इतकी खोल रुजलेली असते कीं, या विषयांसंबंधीं मुलांनीं बोलणें केल्यास सरळ उत्तर देण्याचें तर लांबच, पण उलट मुलांची जिज्ञासा मारून टाकून त्यांच्या मनांत नसती भीति व लज्जा मात्र ते उत्पन्न करितात. पण असें केलें म्हणून मुलें हे विषय टाळतात असें थोडेंच आहे? वर्गांतील मित्रांकडून व प्रसंगीं हलक्या दर्जाच्या नोकरांच्या मार्फत रतिविषयक ज्ञान—पुष्कळसें अपूर्ण व परिणामीं हानिकारक असें ज्ञान—ते संपादन करितात. मुलांनीं तारुण्यांत केलेल्या रतिविषयक चुकांचा व वाईट संवयींचा उगम बहुशः अशा अर्धवट ज्ञानांत व तें संपादन करण्या-करितां जडलेल्या दुष्ट संगतींत असतो. पंधरा वर्षांचा झालेला माझा बाबू अगदीं लहान मुलासारखा निष्पाप(!) अंतःकरणाचा असून रति( sex )-सारख्या घाणेरड्या (!) गोष्टीसंबंधीं विचार त्याच्या मनास कधींहि शिव-णार नाहीं अशी आईबापांची भोळी समजूत असली तरी त्यांचा तो सरल-हृदयी बाबूच आपल्या सोबत्यांशीं कोणत्या विषयावर बोलतो व त्याच्या मनांत कोणते विचार घोळत असतात, हें जर त्यांना समजतें तर त्यांनीं आकाशपाताळ एक केल्याशिवाय सोडलें नसतें.* रतिविषयक गोष्टींची चर्चा समवयस्क मुलें आपसांत केल्याशिवाय राहणार नाहींत, हें जाणून सोबत्यांनीं चालविलेल्या गैरसमजुतीपासून मुलांचें रक्षण व्हावें म्हणून तरी

---

* अल्पवयी मुलीशीं रतिक्रिया ( sexual act ) केल्यानें शरीरप्रकृतीवर पुष्कळ चांगले परिणाम होतात, अशी एक गैरसमजूत कांहीं मुलांमध्यें बरीच रूढ झालेली एकदां आढळून आली. मुंबईच्या चाळीमध्यें जेथें समवयस्क मुलेंमुलीं सहज एकत्र येऊं शकतात, अशा ठिकाणीं ही गैरसमजूत एक महत्त्वाची गुप्त गोष्ट म्हणून मुलांमुलींमध्यें पसरली असतांना कोणते परिणाम झाले असतील याची कल्पना किती पालकांना होती? अशा कितीतरी गैरसमजुती मुलांत रूढ असतात आणि या घाणेरड्या (!) गोष्टींसंबंधीं निर्विकारपणें बोलणें शिष्टसंमत समजलें जात नसल्यामुळें त्या समजुती परंपरेनें मुलांच्या जगांत पिढ्यान्‌पिढ्या चालू राहतात.

पालकांनीं व शिक्षकांनीं त्यांना योग्य ज्ञान करून देऊन रतिविषयक ज्ञानाविषयीं निर्विकारपणें विचार करण्याची संवय लावणें जरूर आहे.

रतिविषयक योग्य ज्ञान असणें हें जितकें आवश्यक आहे त्याचप्रमाणें ज्या पद्धतीनें व ज्या वातावरणांत तें ज्ञान दिलें जातें तें त्यापेक्षांहि जास्त महत्त्वाचें आहे. रतिसंबंधीं गुप्ततेचें व अवास्तव लज्जेचें वातावरण पालकांनीं निर्माण करून ठेविलेलें असतें. म्हणून या विषयाची चर्चा सोबत्यांशीं गुपचूपपणें एकीकडे जाऊन हलक्या आवाजांत मुलें करितात त्या वेळीं यासंबंधीं उत्पन्न होणारी नैसर्गिक ऊर्मि व आपण एका अत्यंत वाईट गोष्टीविषयीं बोलत आहोंत अशी जाणीव या दोन परस्परविरोधी वृत्तींच्या कात्रींत सांपडून मुलांच्या मनोवृत्तींवर असह्य ताण पडतो; आणि केव्हां तरी याचा स्फोट होऊन मुलांचें वर्तन चमत्कारिक होतें. दुष्ट संवयीनें निढावलेलीं मुलें सरळ मनाच्या लहान मुलांना दुष्ट संवयींचा धडा देतात. तेव्हां पापाची भीति, लज्जा इत्यादि तीव्र मनोविकारांमुळें लहान मुलांच्या मनांत किती विलक्षण खळबळ उडून जाते हें थोड्यांच्याच लक्षांत येतें. स्वतःचीं औषधें खपविण्याकरितां कामोत्तेजक औषधें तयार करणारा वर्ग जें जाहिरातींचें वाङ्मय प्रसिद्ध करीत असतो त्याच्या योगानें मुलांच्या मनावरील हें विकारवशतेचें दडपण वाढण्यास मदत होते. मुलांना सन्मार्गावर आणण्याकरितां सद्धेतूनें प्रसिद्ध केलेल्या ब्रह्मचर्यविषयक वाङ्मयांतहि ब्रह्मचर्यभंगाचे दुष्परिणाम कोठें कोठें इतक्या भडक रंगानें व अतिशयोक्तिपूर्ण भाषेनें दाखविलेले असतात कीं, प्रत्यक्ष ब्रह्मचर्यभंगाचे जे दुष्परिणाम घडतात त्यांपेक्षांहि या एकान्तिक वाङ्मयामुळें होणारे मानसिक दुष्परिणाम जास्त भयंकर असतात. स्त्रीपुरुषभेद ही एक वस्तुस्थिति आहे अशा दृष्टीनें विचार करून, दोष, पाप, घाणेरडेपणा, लज्जा, भीति इत्यादि तीव्र मनोविकारांशीं त्याचें साहचर्य न राखतां निर्विकारपणें विचार करण्याची संवय मुलांना लावणें चांगलें.

### रति-शिक्षणाची दिशा

रतिप्रवृत्तीचा विकास प्रत्येक मुलांत इतक्या विविधतेनें होत असतो कीं, त्याविषयीं ठोकळ मानानें विवेचन करणें शक्य नाहीं. अशा वेळीं एखादा दोष मुलाच्या हातून घडून आल्यास अत्यंत भयंकर गोष्ट घडली अशा समजुतीनें स्वतःचें डोकें फिरवून घेण्याची कांहीं पालकांना

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वतंत्र प्रत पौगण्ड
सं.......... नं..........

व शिक्षकांना जी संवय असते तिचा निषेध करावा तितका थोडाच. निर्दयपणें शिक्षा करून किंवा इतर कडक निर्बंध घालून हे दोष थांबणारे नसतात. तारुण्यांत घडून येणाऱ्या स्वतःच्या शारीरिक विकासासंबंधीं योग्य ज्ञान, स्वतःवरील जबाबदारी, कुटुंबसंस्था व एकंदर समाज यांमध्यें रतिप्रवृत्तीचें महत्त्व आणि त्याकडे दुर्लक्ष केल्यानें घडून येणारी शारीरिक व सामाजिक हानि इत्यादि गोष्टींविषयीं मुलांना योग्य ज्ञान होणें अगत्याचें आहे; भोंवतालचें वातावरण शांत व अनुत्तेजक ठेविल्यानें व मुलांच्या मनाला एखाद्या आवडीच्या व्यवसायांत मग्न राखल्यानें मुलांना मानसिक शांति मिळूं शकते; रतिविषयासंबंधीं खोटा विनय किंवा लज्जेची भावना व उलट-पक्षीं अश्लील व उत्तान शृंगारिक भाषा हीं दोन्ही टोकें टाळून सभ्यतेचा मधला मार्ग अनुसरणें जरूर असतें; पतिपत्नीसंबंधाचा उत्कृष्ट आदर्श संभाषणांतून व वाङ्मयांतून डोळ्यापुढें ठेवून रतिविषयासंबंधीं उमदी मनो-वृत्ति घडवून आणावी लागते. अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं खबरदारी घेतली तरच मुलांना या बाबतींत सन्मार्गावर राखणें शक्य होतें. चुटकीसरशी घडून येणारी ही गोष्ट नाहीं, किंवा मधून मधून एखादे दिवशीं व्याख्यान झोडल्यानेंहि ही साधणार नाहीं. स्त्रियांविषयीं व स्त्रीपुरुषभेदाविषयीं आदरणीय अशी वृत्ति उत्पन्न करण्याचा प्रत्येक प्रसंग साधून हळुहळू मुलांच्या मनाला वळण लावावें लागतें व त्याकरितां मुलांवर अखंड व हितकारी देखरेख ठेवण्याचा कंटाळा करून भागत नाहीं.

**मगनलालः— पौगण्डकालीन अस्थिरता**

अगदीं सामान्य (दोषरहित) मुलाच्या मनाची अस्थिरता आपोआप कशी वाढते आणि अशा वेळीं मनाची अस्थिरता कमी होईपर्यंत शांत वातावरणांत मुलाला ठेवून सहानुभूतिपूर्वक शिक्षण देण्यानेंच त्याचें वर्तन कसें स्थिर होऊं लागतें हें दर्शविण्याकरितां एक उदाहरण खालीं दिलें आहे.

मुंबईमधील मध्यम स्थितींतील एका सुशिक्षित व्यापाऱ्याचा मगनलाल हा थोरला मुलगा होता. हायस्कुलांत चारपांच इयत्तेपर्यंत शिक्षण घेऊन त्यानें शाळा सोडली व एका व्यापाऱ्याच्या दुकानांत कारकुनाची नोकरी धरली. शाळेंत असतांना किंवा दुकानांत शिरल्यावरहि त्यानें आपल्या सुशील वर्तनानें व सुस्वभावानें सर्वांचें प्रेम संपादन केलें होतें. पण पंधराव्या वर्षाच्या

सुमारास त्याची मनोवृत्ति बदलूं लागली. आळस आणि निष्काळजीपणा वाढूं लागला; जास्त पगाराच्या सबबीवर पहिल्या दुकानांतील नोकरी सोडून तो दुसरीच्या मागें लागला; पण कोणत्याहि नोकरींत स्थिर न होतां भटकण्यास त्यानें सुरुवात केली. मधूनमधून तो लहान लहान चोऱ्याहि करूं लागला. दोनचार वेळां घरांतून पळून गेला आणि आपल्या एकंदर निष्काळजी वर्तनानें त्याच्या सुशील आईबापांना तो एक काळजीचा विषय होऊन राहिला.

त्याचे आईबाप दोघेहि सुशील असून दोघांच्याहि कुळांत आनुवंशिक दोष नव्हता. खुद्द मगनलाल शरिरानें सशक्त व बुद्धीनें सामान्यतः हुशार असून त्याच्यांतहि लक्षांत येण्यासारखें कोणतेंच वैगुण्य नव्हतें.

पहिल्या दुकानांत असतांना इमानें इतबारें काम करून आपल्या मालकाचा विश्वास त्यानें चांगलाच संपादन केला होता. पण त्याला सुस्ती येऊन कामाचा कंटाळा वाटूं लागला; दुसरें कांहींतरी काम करावें असें त्याला वाटूं लागल्यामुळें कमिशनवर माल खपविण्याचें काम त्यानें कांहीं दिवस केलें, पण त्यालाहि तो कंटाळला; जास्त पगाराची मागणी करून मालकानें ती नाकारल्यामुळें दुकानांतील नोकरी सोडली व भटकण्यास सुरुवात केली. त्याचें वर्तन आईबापांना न आवडून त्यांनीं केलेले उपदेशाचे दोन शब्द त्याला फार लागले व तो जास्तच उनाडपणा करूं लागला. एका दुकानां-तून अगदीं सहज, विचार केल्याशिवाय, त्यानें लहानशी चोरी केली पण तिचा बोभाटा झाला नाहीं. चोरी करणें इतकें सोपें असतें हें पाहून त्याला मौज वाटली आणि लहानलहान चोऱ्या तो करूं लागला. घरांतून पळून जाऊन लहर लागेल तेव्हां कोठेंतरी काम करावें व कंटाळा आला कीं घरीं परत यावें असा क्रम त्यानें कांहीं दिवस चालविला. रतिविषयक विचारांचें त्याच्या मनांत मोठें काहूर माजलेलें असे; पण त्या बाबतींत त्यानें कोणतेंहि दुर्वर्तन केलें नव्हतें. एका मित्रानें त्याला एकदां आपल्या बरोबर फिरावयास नेऊन वेश्यांच्या वसतिस्थानांतून त्याला मुद्दाम हिंडवलें. अशा प्रकारचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया शहरांतून उघडपणें राहतात हें पाहून त्याच्या मनाला इतका धक्का बसला कीं, त्याच्या मनाची बावरलेली वृत्ति कांहीं केल्या स्थिर होईना आणि अशा तऱ्हेच्या मनोवृत्तीमुळें कोणत्याहि व्यवसायांत त्याचें मन रमेना.

मगनलालचे वडील शांत स्वभावाचे व सहानुभूतीनें विचार करणारे असल्यामुळें मगनलालची मनोवृत्ति ते लवकर समजूं शकले. रागाचें किंवा इतर विकारांचें प्रदर्शन न करितां मगनलालशीं मोकळ्या मनानें बोलून त्याचा विश्वास ते संपादन करूं शकले आणि त्यामुळें त्याच्यावर जास्त सूक्ष्म व जागरूक देखरेख त्यांना ठेवितां आली. वयाच्या मानानें मनोवृत्तींत येणारी ही तात्पुरती अस्थिरता आहे ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घेतली व त्यास अनुसरून त्यांनीं त्याला शांत व मोकळ्या वातावरणांत वावरू दिल्याबरोबर मगनलालचें वर्तन निवळूं लागलें व पुनः पूर्ववत् तो सर्वांचा आवडता झाला.

## पौगण्डावस्थेंतील क्रांति

पौगण्डावस्था ही मुलांच्या आयुष्यांतील क्रांतिकारक अवस्था होय. मुलांचें भावी आयुष्य सुखाचें अगर दुःखाचें जाणें हें बहुतांशीं या अवस्थेंत मिळालेलें शिक्षण व लागलेल्या संवयी यांवर अवलंबून असल्यानें या अवस्थेचें महत्त्व विशेष आहे. समाजाशीं आपला संबंध दृढतर करून समाजाच्या नियमांशीं व व्यवस्थेशीं आपल्या प्रवृत्ती व वर्तन यांचा मेळ घालण्याचें, म्हणजे सद्वर्तनाचें, शिक्षण या वयांत संपादन करावयाचें असतें. आपण समाजांतील एक घटक आहों ही जाणीव या अवस्थेच्या सुरुवातीसच उत्पन्न होत असते व त्या अनुरोधानें त्यापुढील सातआठ वर्षांत मनुष्य आपला आयुष्यक्रम व वर्तनाचें धोरण निश्चित करीत असतो. म्हणून या वयांतील मुलांना शिक्षण देण्याचें व वळण लावण्याचें काम अतिशय जबाबदारीचें असतें. या वयांतील दुर्वर्तन हें नीतिदृष्ट्या किंवा मानसशास्त्रदृष्ट्या दुर्वर्तन नसतें. स्वतःच्या नवीन प्रवृत्तींचे प्रयोग या समाजांतील परिस्थितींत मुलें करीत असतात. बाल्यावस्थेंतील मुलें ज्याप्रमाणें एखादी नवीन गोष्ट करावयास शिकतांना अडखळतात, चुकतात व अनेक प्रयत्नांनंतर शिकतात, त्याचप्रमाणें नीति, समाज इत्यादि कल्पनांची जाणीव या पौगण्डावस्थेंत उत्पन्न होत असल्यानें त्या कल्पना अंगवळणीं पाडून त्याप्रमाणें वागण्यास शिकतांना मुलें चुका करितात व अशा चुका करतां करतांच नीतिमान् होण्यास शिकतात. नीतिमत्ता शिकतांना सुरुवातीच्या या निष्फळ झालेल्या प्रयत्नांनाच आपण दुर्वर्तन असें नांव देतों.

## प्रकरण सातवें

# परिस्थितीचें महत्त्व

"If our children are to build the finer aspects of their own characters, if they are to build the finer aspects of life into their characters, we must somehow provide such an environment as calls out the finer aspects of life."—Wm. Kilpatrick.

### परिस्थिति व मनोवृत्ति

मानवी मन ही किती अगम्य वस्तु आहे! प्रत्येकाच्या मनांतील विचार, विकार व इतर आनुषंगिक वृत्ति ज्याच्या त्याच्या पूर्ण मालकीच्या असून त्याच्या परवानगीशिवाय कोणालाहि त्यांचा गंध सुद्धां लागूं शकणार नाहीं. ज्ञानेंद्रियांमार्फत बाह्य सृष्टीचे मनावर होणारे आघातसुद्धां तत्त्वतः सर्वत्र सारखे असले तरी प्रत्येकाच्या मनोभूमिकेप्रमाणें त्यांचे परिणाम निरनिराळ्या व्यक्तींवर निरनिराळे होतात. त्या आघातांची जी प्रतिक्रिया होते तिचें स्वरूपहि त्या बाह्यसृष्टीवर अवलंबून राहात नाहीं, तर मनोभूमिकेच्या रचनेप्रमाणें भिन्न काळीं तें भिन्न प्रकारचें होतें. व्यावहारिक भाषेंत बोलावयाचें तर परिस्थितीप्रमाणें मनुष्य वागत नसून मनुष्याची मूळची मनोभूमिका, तीवर होणारे परिस्थितीचे परिणाम व या दोन्हींच्या संयोगामुळें तयार झालेली मनोवृत्ति, हीं त्याच्या वागणुकीचीं मुख्य मर्मस्थानें होत. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें अमुक एका विशिष्ट परिस्थितींत असलेल्या कुटुंबांतील मुलें दुर्वर्तनी निघतात अशा तऱ्हेचे आंकडे गोळा करून केवळ तेवढ्यावरून त्या परिस्थितीवरच सर्व दोष देणें योग्य होणार नाहीं. एकाच परिस्थितींत असणारीं अनेक कुटुंबें असतात. त्यांपैकीं सर्वच मुलें कांहीं कुमार्गानें जात नाहींत; इतकेंच नव्हे तर कांहीं अत्यंत सद्गुणी व सुशील निघून नांवारूपाला येतात. अशा तऱ्हेचीं परस्परविरोधी उदाहरणें अनेक सांपडण्यासारखीं असल्यामुळें दुर्वर्तन अथवा सद्वर्तन यास परिस्थिति किती प्रमाणांत कारणीभूत होऊं शकते हें निश्चित कोण सांगू शकेल?

मनुष्याच्या वर्तनाचा, मनोवृत्तींचा व मनोवृत्तींवर होणाऱ्या परिणामांचा विचार करतांना जीं निरनिराळीं कारणें पुढें मांडलीं जातात, त्या सर्वांचा समन्वय करून त्यांपैकीं प्रत्येकाकडे खरें प्रेरकत्व किती हें निश्चित करणें बरेंच कठिण जातें. जीवशास्त्राचा ( biology ) अभ्यास करणारा एखादा शास्त्रज्ञ आनुवंशिक संस्कारांचें महत्त्व प्रतिपादन करून कोणत्या परिस्थितीचा मनावर कोणत्या प्रकारचा परिणाम होईल हें जन्मतः असणाऱ्या मनुष्याच्या प्रवृत्तींवर अवलंबून आहे असें म्हणूं लागेल. समाजांत निरनिराळ्या परिस्थितींचा मनुष्यांवर निरनिराळा परिणाम पहात असणारा दुसरा एखादा समाजशास्त्रज्ञ असें म्हणेल कीं, मनःप्रवृत्तींचा योग्य किंवा अयोग्य विकास होण्यास ही परिस्थितीच कारणीभूत असल्यानें खरें महत्त्व या परिस्थितीसच दिलें पाहिजे. दारिद्र्याचे दुष्परिणाम किंवा मजुरांच्या चाळींतील परिस्थिति यांसारख्या सामाजिक गोष्टींपेक्षां आनुवंशिक संस्कारांचे नियम शास्त्रज्ञांस जास्त परिचित असतात म्हणून कोणत्याहि प्रश्नाचा विचार करितांना त्यांच्या दृष्टीपुढें आनुवंशिक गोष्टीच लवकर लक्षांत येणें साहजिक आहे. उलटपक्षीं मेंडेलच्या नियमांच्या सत्यतेपेक्षां परिस्थितीमुळें उत्पन्न होणारे विकार व त्यांचे परिणाम हे जास्त सत्य व प्रत्यक्ष असल्यानें समाजसेवकाचें लक्ष प्रामुख्यानें तिकडे जाणेंहि योग्यच होय.

येथें मुख्य गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, मनोवृत्तीस अनुसरूनच वर्तन घडत असल्यानें परिस्थितीचा मनोवृत्तींवर इष्ट किंवा अनिष्ट परिणाम झाला असेल तरच ती परिस्थिति वर्तनास कारणीभूत समजली जाऊं शकेल. एकाच परिस्थितीचा निरनिराळ्या मनुष्यांच्या मनोवृत्तींवर निरनिराळा परिणाम होऊं शकतो. अर्थात् ज्या तऱ्हेचा हा परिणाम असेल त्या तऱ्हेचें त्याचें वर्तन घडेल हें उघड आहे. जन्मापासून सुखांत व संपत्तींत वाढलेल्या गर्भश्रीमंताला संपत्तीचा दुरुपयोग करून नाना प्रकारांच्या दुर्वर्तनांत आयुष्य घालविणें हें जितकें शक्य, तितकेंच त्याला त्या संपत्तीचा दानधर्मांत किंवा राष्ट्रीय कार्यांत सद्व्यय करणें, किंवा बाळपणापासून उपभोगिलेल्या सुखामुळें संपत्तीचा वीट आल्यानें वैराग्य उत्पन्न होऊन अरण्यवास पत्करणें हेंहि शक्य आहे. यांपैकीं कोणता मार्ग एखादा श्रीमंत पत्करील हें ज्याप्रमाणें केवळ त्याच्याजवळ संपत्ति आहे म्हणून निश्चित सांगतां येणें शक्य नाहीं, त्याचप्रमाणें यांपैकीं

कोणताहि मार्ग त्यानें स्वीकारला तर त्यास संपत्ति हेंच केवळ कारण मानणें हेंहि युक्त होणार नाहीं. अनेक कारणांमुळें मनुष्याची एक विशिष्ट प्रकारची मनोवृत्ति बनत असते व त्या सर्व कारणांमध्यें संपत्ति व दारिद्य इत्यादि बाह्य परिस्थिति हेंहि एक कारण असूं शकतें. त्या मनोवृत्तींशीं या बाह्य परिस्थितीचा जसा व ज्या प्रकारचा संबंध असेल तितक्याच प्रमाणांत परिस्थिति वर्तनास कारणीभूत झाली असें म्हणतां येईल.

## परिस्थिति बदलण्याची शक्यता

आनुवंशिक संस्कार व परिस्थिति यांपैकीं विशेष महत्त्व कोणाला द्यावें हा प्रश्न बिकट आहे. कारण मनुष्याची मनोवृत्ति ही कोणत्याहि एका कारणामुळें बनत नाहीं; आनुवंशिक संस्कारांमुळें जन्मतः असलेल्या प्रवृत्ती व जन्मानंतर परिस्थितीमुळें आलेला अनुभव या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळें व आघातप्रत्याघातांमुळें ती बनत असते. यामुळें कोणत्याहि एका कारणाला जास्त महत्त्व न देतां सर्वांचा योग्य विचार करून एखाद्या मुलाची विशिष्ट मनोवृत्ति तयार होण्यांत कोणत्या गोष्टींचा त्याच्या मनावर परिणाम किती प्रमाणांत झाला याचा विचार करावयास हवा. एखादी प्रवृत्ति आनुवंशिक असली तरीहि तिचा विकास होणें अशक्य होईल अशा तऱ्हेची जर परिस्थिति राखतां आली तर त्या प्रवृत्तीचे परिणाम बरेचसे सौम्य होतील यांत शंका नाहीं. कांहीं रोगबीजें आनुवंशिक असलीं तरीहि जन्मापासून योग्य काळजी घेण्यानें जसा त्या रोगांचा प्रादुर्भाव थांबवितां येतो त्याचप्रमाणें परिस्थितींत जरूर तो फेरबदल केल्यास या प्रवृत्तींच्या विकासासहि इष्ट असें वळण लावणें अगदीं शक्य होतें.

दुर्वर्तनाच्या कारणांचा विचार करतांना आनुवंशिक संस्कार व परिस्थिति यांस बरोबरीनें महत्त्व देणें इष्ट व योग्य असलें तरी वर्तन दुरुस्त करण्याच्या दृष्टीनें परिस्थितीसच जास्त महत्त्व येतें. कारण एखाद्या मुलाच्या वर्तनांत आनुवंशिक कारणें जरी कितीहि महत्त्वाचीं असलीं तरी तीं आनुवंशिक असल्यानें अर्थात्च बदलणें शक्य नसतें; त्यामुळें वर्तन सुधारण्याच्या सर्व प्रयत्नांचें धोरण परिस्थितींत इष्ट असा बदल घडवून आणण्याकडेच राहतें व तें तसें ठेवल्याशिवाय गत्यंतरच नसतें. परिस्थिति बरीचशी बदलणें शक्य

असल्यानें दुरुस्तीच्या दृष्टीनें व तिच्या अनुरोधानें परिस्थितीचाच विचार जास्त महत्त्वाचा असतो.

## परिस्थितीचा व्यापक अर्थ

परिस्थिति हा शब्द येथें व्यापक अर्थानें वापरला आहे. स्वतःच्या शरीरप्रकृतीमुळें किंवा स्वतःच्या स्वाभाविक मनोविकारांमुळें मनःस्थितीवर जे परिणाम होतात त्यांखेरीज करून मनःस्थितीवर अगर वर्तनावर परिणाम घडवून आणणाऱ्या बाकीच्या सर्व गोष्टी दर्शविण्याकरितां परिस्थिति या सामान्य शब्दाची योजना केली जाते. ज्या समाजांत किंवा समाजाच्या भागांत मनुष्य वावरत असतो त्या समाजाची सांपत्तिक, औद्योगिक किंवा राजकीय परिस्थिति यांचा परिणाम मनुष्याच्या वर्तनावर होतच असतो, त्याचप्रमाणें त्या समाजाची संस्कृति—नीतिविषयक कल्पना व वर्तणुकीचे आदर्श—यांचेहि संस्कार प्रत्येक व्यक्तीच्या मनोवृत्तीवर सूक्ष्मपणें पण कायमचे झालेले असतात, म्हणून संस्कृति हाहि एक परिस्थितीचाच भाग समजला जातो. त्याचप्रमाणें कुटुंबांतील आर्थिक स्थिति, आईबाप व इतर संबंधी यांचे स्वभाव व परस्परांशीं असलेले प्रेमाचे अगर अन्य तऱ्हेचे संबंध, इतकेंच नव्हे तर त्यांचे विचार, सद्गुण, दुर्गुण वगैरे विषयीं असलेलीं त्यांचीं मतें या सर्व गोष्टींचा मुलांच्या मनावर परिणाम होत असल्यानें त्या सर्वांचा परिस्थिति या सामान्य शब्दांत समावेश केला जातो. या सर्व गोष्टींचे मुलांच्या मनावर कोणत्या प्रकारें परिणाम होणें शक्य आहे याचें क्रमशः विवेचन करूं.

## सांपत्तिक स्थिति

कुटुंबाच्या सांपत्तिक परिस्थितीचा परिणाम मुलांच्या मनावर सर्वांत जास्त होत असतो. व्यवहारांत संपत्तीचें महत्त्व पदोपदीं भासत असल्यामुळें त्याचें महत्त्व लहान मुलांनाहि जाणवतें, यांत आश्चर्य नाहीं. कोणत्याहि कामांत यश येण्यास संपत्तीची अनुकूलता हें फार महत्त्वाचें साधन आहे ही गोष्ट अगदीं लहानपणापासूनच मुलांच्या लक्षांत येऊं लागते. दारिद्र्यामुळें पुरेसें अन्नवस्त्र न मिळाल्याकारणानें शरीराची वाढ योग्य तऱ्हेनें होत नाहीं व त्याच्याच मागोमाग आजार, अशक्तपणा आणि त्याच्या अनुषंगानें येणारा

भित्रेपणा, मानसिक अशक्तता वगैरे गोष्टीहि येतातच. मनासारखीं खेळणीं न मिळाल्यामुळें मानसिक स्वास्थ्य नाहींसें होतें; इतकेंच नव्हे तर शेजारच्या मुलांपेक्षां आपण कमी आहोंत ही उणेपणाची जाणीव अखंड जागृत राहून एक प्रकारचें मानसिक असमाधान उत्पन्न होतें व त्यामुळें घरीं आणि बाहेर सर्व ठिकाणीं मुलांच्या वर्तनांतील स्वाभाविक मोकळेपणा नाहींसा होतो. शेजारच्या मुलांसारखीं खेळणीं घेऊन देण्याचें सामर्थ्य आपल्या आई-बापांना नाहीं याची जाणीव मुलांना कोठून असणार? आपल्यावर आई-बापांचें प्रेम नाहीं किंवा शेजारच्या आईसारखी आपली आई चांगली नाहीं अशीच त्यांची भावना होते व साहजिकच त्यांचेंहि आईबापांवरील लक्ष, प्रेम व विश्वास हीं कमी होतात. एकीकडून मुलांचीं मनें या प्रकारें दुरावत असतांना आईबापांनाहि आपल्या मुलांची हौस आपणांस पुरवितां येत नाहीं या जाणिवेनें मानसिक त्रास होतो. अशा परिस्थितींत दोघांची मनोवृत्ति निरनिराळी—एकप्रकारें त्रासलेली—असल्यामुळें कुटुंबांत नेहमीं खटके उडतात व मुलांच्या मनावर आणि वर्तनावर त्यांचा अत्यंत अनिष्ट परिणाम होतो.

दारिद्र्यामुळें मुलांना खाण्यापिण्याच्या व इतर आवश्यक वस्तु कमी पडतात व म्हणून मुलें चोरी करण्यास शिकतात अशीं विधानें केव्हां केव्हां करण्यांत येतात व क्वचित् प्रसंगीं तीं खरींहि असतात. दारिद्र्यामुळें चोरी करण्यास शिकलेलीं व पुढें कायमचीं दुर्वर्तनी झालेलीं मुलें आढळतात, हें खरें; पण उलट तितक्याच दारिद्र्यांत असलेलीं कितीतरी मुलें सद्वर्तनी असतात! शिवाय अन्नवस्त्रासारख्या आवश्यक वस्तु मुलांना सहसा कमी पडत नाहींत. प्रसंगीं स्वतःस कमी करूनहि या बाबतींत मुलांच्या गरजा भागविण्याचा आटोकाट प्रयत्न प्रेमळ आईबाप केल्यावांचून राहत नाहींत. मुलांना कमी पडतें तें त्यांच्या हौसेच्या वस्तूंत, खेळण्यांत व इतर करमणुकीच्या साधनांत. मुलें मोठीं होऊन शाळेंत जाऊं लागल्यावर ही उणीव जास्त तीव्रतेनें भासूं लागते. आपल्या सोबत्यांपेक्षां आपण कमी आहोंत ही हीनपणाची जाणीव मुलांना अखंड पछाडते व त्याकरितां आपल्या सोबत्यांशीं बरोबरी करण्याकरितां मुलें नाना प्रकारचे उपाय योजितात. श्रीमंत मुलांची चैन पाहून उत्पन्न होणाऱ्या आकांक्षा तृप्त करण्या-

करितां पैसे संपादन करण्याचा प्रयत्न कांहीं करतात, अशा मुलांच्या स्तुति-पाठकाचें काम पत्करून त्यांच्या चैनीबरोबरच आपलीहि हौस भागविण्याच कांहींना साधतें, तर द्राक्षें आंबट आहेत म्हणून टाकून देणाऱ्या कोल्ह्याचें अनुकरण करून चैन करणाऱ्या मुलांच्या कंपूला नांवें ठेवण्याचें काम करून कांहीं मुलें समाधान मानून घेतात. ह्या सर्व गोष्टींचा मुलांच्या मनोवृत्तीवर व स्वाभिमानावर महत्त्वाचा परिणाम होत असतो, व त्यांच्या वर्तनाची दिशा बदलत असते.

## वैयक्तिक दारिद्र्य

दारिद्र्यामुळें प्रत्येक बाबतींत काटकसर करून हांत आंखडता घेण्याची आवश्यकता असते; परंतु ती जाणीव मुलांना असणें शक्य नाहीं. त्यामुळें आईबापांचा स्वभाव चिडखोर बनतो व त्याचा मुलांना अतिशय त्रास होतो. एखादी बाहुली मोडल्याबद्दल किंवा एखादी पेन्सिल हरवल्याबद्दल गरीब कुटुंबांतील मुलाला कितीतरी बोलून घ्यावें लागतें! ज्या गोष्टी केल्या-बद्दल एखाद्या सुखवस्तु कुटुंबांत थोडेंसें प्रेमानें, थोडेंसें कौतुकानें, रागें भरण्यापलीकडे मजल गेली नसती, त्याच गोष्टींना गरिबांच्या घरीं अपराधाचें स्वरूप येतें. याचा साहजिकच परिणाम असा होतो कीं, मुलें छपवाछपवी करून आईबापांना फसवूं पाहतात व तीं अप्रामाणिक बनतात.

दारिद्र्यामुळें मनोवृत्ति असंतुष्ट राहते व त्यामुळें दुर्वर्तन घडतें, पण केवळ दारिद्र्य हें कांहीं दुर्वर्तनाचें मूळ कारण नव्हे, तर त्यामुळें मनोवृत्तीवर जो परिणाम होतो तो महत्त्वाचा असतो. ही गोष्ट लक्षांत ठेवून आपण विचार करूं लागलों म्हणजे दारिद्र्याचा विचार करतांना कुटुंबाच्या मासिक उत्पन्नाचे व खर्चाचे आंकडे पाहून केवळ भागणार नाहीं. संपत्ति कितीहि असली तरी आकांक्षांचें समाधान तिनें होत नसेल तर तें दारिद्र्यच समजलें पाहिजे; त्याच्या उलट संपत्ति कमी असूनहि वृत्ति समाधानी असल्यास दारिद्र्याचे दुष्परिणाम अर्थातच होणार नाहींत. गणिताच्या भाषेंत बोलावयाचें तर ज्याच्या अंशस्थानीं संपत्ति व छेदस्थानीं आकांक्षा आहेत असा दारिद्र्य हा एक अपूर्णांक आहे. वर्तनाचा विचार करतांना, सामाजिक दारिद्र्याचा म्हणजे समाजांतील इतर व्यक्तींच्या तुलनेनें ज्याला दारिद्र्य म्हणतां येईल त्याचा

विचार करण्यापेक्षां वैयक्तिक दारिद्र्याचा म्हणजे मुलांच्या आकांक्षा तृप्त करण्यास लागणाऱ्या संपत्तीचा विचार करावयास हवा.

या दृष्टीनें आपण विचार करूं लागलों म्हणजे सामान्यतः सुस्थितींत असलेल्या कुटुंबांतील मुलांच्याहि आकांक्षा जास्त तीव्र असतील तर दारिद्र्याचे दुष्परिणाम दिसून येतात. प्रथम श्रीमंत असलेल्या परंतु मागाहून खालावलेल्या कुटुंबांत अशी स्थिति नेहमीं दिसून येते. श्रीमंतीमुळें पैसे खर्च करण्याची किंवा लहानसान हेळसांडीकडे दुर्लक्ष करण्याची लागलेली संवय किंवा नाना प्रकारांच्या हौसेच्या वस्तु व खेळणीं वापरण्याची इच्छा या गोष्टी श्रीमंती ओसरल्याबरोबर लागलीच कमी होऊं शकत नाहींत. बदललेल्या परिस्थितीशीं आपलें वर्तन जुळवून घेण्याची कला मोठ्या माणसांनाहि किती कष्टसाध्य असते हें पाहिलें म्हणजे लहान मुलांना ती गोष्ट किती कठिण जात असेल याची कल्पना करितां येईल. या सर्व ठिकाणीं अर्थातच दारिद्र्य हें मूळ कारण नसून मनोवृत्तींना योग्य तऱ्हेनें वळण लावण्याच्या प्रयत्नाचा अभाव हेंच खरें कारण असतें. म्हणून वर्तनाच्या दुरुस्तीचा विचार करतांनाहि केवळ दारिद्र्यावरच सर्व भर न टाकतां इतर गोष्टीहि विचारांत घेणें जरूर असतें.

## आकुंचित जागेंतील राहणी

सांपत्तिक स्थितीच्या ऱ्हासाचा आणखी एक विशेष महत्त्वाचा दुष्परिणाम असा होतो कीं, मुंबईसारख्या शहरांतून फार थोड्या जागेंत सर्व कुटुंबाचा समावेश करावा लागतो. लहान मुलांना खेळण्याकरितां जरूर ती जागा न मिळाल्यामुळें त्यांचा तर कोंडमारा होतोच; पण विवाहित, अविवाहित, बाल व वृद्ध अशा सर्व प्रकारच्या मनुष्यांचे उठण्यापासून निजण्यापावेतोंचे सर्व व्यवहार थोडक्या जागेंत करावे लागल्यानें कुटुंबाची स्वाभाविक मर्यादा राखणें कठिण जातें. वडिलांचा मान किंवा आदर राखणें, व विवाहित स्त्रीपुरुषांना जरूर तो एकांत मिळणें या गोष्टी सारख्याच अशक्य होत चालल्यानें त्यांचा परिणाम मुलांच्या कोंवळ्या मनावर फार होतो. यायोगें मुलांचें वर्तन अमुक तऱ्हेनें बिघडतें असें नाहीं तर एकंदर कुटुंबाच्या नैतिक वळणावर व शिस्तीच्या वातावरणावर याचा महत्त्वाचा परिणाम होऊन कुटुंबाबद्दल आदर किंवा अभिमान हीं मुलांच्या मनांतून कमी होतात. या आकुंचित

जागेचा आणखीहि एक महत्त्वाचा परिणाम असा होतो कीं, लहानापासून थोरापर्यंत सर्व वयाचीं व सर्व मनोवृत्तींचीं माणसें एकाच लहानशा जागेंत आपले सर्व व्यवहार करतात. स्वतःची करमणूक, अभ्यास किंवा उद्योग तर तेथें करावे लागतातच, पण एकमेकांचे स्नेही सोबती आल्यास त्यांचें स्वागतहि तेवढ्याच जागेंत करावें लागतें. अशा तऱ्हेनें सर्व मनुष्यांना एकत्र राहण्याचा प्रसंग आल्यानें कोणालाहि पूर्ण व्यवहारस्वातंत्र्य मिळत नाहीं व त्यायोगें सर्वांचीच वृत्ति एकप्रकारें असंतुष्ट व संकुचित रहाते. अखंड सहवासानें एकमेकांचे दोष जास्त स्पष्टपणें नजरेस येतात, वारंवार खटके उडतात, भांडणें होतात व साहजिकच प्रत्येक मनुष्य आपला शक्य तितका वेळ घराच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो. अशा तऱ्हेनें कौटुंबिक प्रेमाचीं बंधनें शिथिल होऊन मुलांच्या मनाला सद्वर्तनाकडे वळविणारें एक महत्त्वाचें साधन तर नाहींसें होतेंच. पण त्याशिवाय मुलें आपला वेळ बाहेर घालवूं लागल्यानें तेथें त्यांना कोणत्या प्रकारचे अनुभव येतील व त्यांच्या वर्तनावर कोणते अनिष्ट परिणाम घडतील याची सहज कल्पना करितां येईल.

### मालकीहक्काची अपूर्ण जाणीव

चोरी हा मुलांचा सर्वसामान्य अपराध होय. मालकीहक्काची कल्पना मुलांना फार उशीरां येत असल्यामुळें आपणांस जरूर ती वस्तु बिनदिक्कत घेण्याची मुलांची लहानपणीं प्रवृत्ति असते. थोडेंसें वय झाल्यावर दुसऱ्याच्या वस्तु आपण घेऊं नयेत या गोष्टी त्यांना समजूं शकतात व चोऱ्यांचें प्रमाण कमी होतें. तारुण्याच्या सुरुवातीस चोऱ्यांचें प्रमाण वाढतें पण त्या वेळीं या चोरीच्या मुळाशीं धाडसाच्या प्रवृत्ति खेळत असतात. दुसऱ्याच्या शेतांतील अगर मळ्यांतील वस्तु चोरण्यासारखे अपराध करितांना त्या वस्तूंची मुलांना जरूर असते असें नाहीं, तर आपलें शौर्य दाखविण्याची किंवा भांडण उकरून काढण्याची हौस पूर्ण करून घ्यावयाची असते. मालक काय करील हें पहाण्याकरितांच केव्हां केव्हां या चोऱ्या केलेल्या असतात. हौसेच्या अगर करमणुकीच्या वस्तु चोरण्याची प्रवृत्तीहि याच वेळीं दृष्टीस पडते. चोरीच्या मागोमाग असत्य येतेंच व स्वतःविषयीं सहानुभूति उत्पन्न करण्याकरितां व इतर मुलांना आपल्या बाजूला ओढण्याकरितां त्यांना बिघडविण्यासहि सुरुवात याच वेळीं होते.

दारिद्र्यामुळें चोरीची प्रवृत्ति उत्पन्न होते असें म्हणणें म्हणजे संपत्तीनें दरिद्री पण शीलानें श्रीमंत असलेल्या असंख्य सुवृत्त नागरिकांचा अपमान करणेंच होय; आणि श्रीमंत आईबापांचीं मुलें चोऱ्या करीत नाहींत असें थोडेंच आहे? हें आपलें आणि हें दुसऱ्याचें असा भेद करून मालकीहक्काची कल्पना अंगवळणीं न पडल्यानेंच ही प्रवृत्ति मूळ उत्पन्न होते व त्यानंतर संवयीनें, वडील मंडळींच्या दुर्लक्षामुळें किंवा सोबत्यांच्या उत्तेजनामुळें ती वाढूं लागते. अर्थात् चोरीची संवय मोडतांना मालकीहक्काची जाणीव प्रथम उत्पन्न केल्यानंतर इतर आनुषंगिक गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे; कोणाला हा आपपरभेद लवकर समजूं शकतो तर दुसऱ्या एकाद्याला पुष्कळ त्रासानें अनेक वेळां चुका केल्यानंतर त्याची जाणीव होते. पण सर्वच मनुष्यांना या शिक्षणक्रमांतून एकदां तरी जावें लागत असतें, म्हणून मुलांनीं एखादी चोरी केल्याबरोबर अविचारानें मुलांचा छळ करण्याचें कांहीं कारण नाहीं. ह्या अवस्थेंतून बाहेर पडण्याचा मुलें प्रयत्न करीत असतातच. त्यांना ताळ्यावर आणण्याकरितां त्यांच्या या प्रयत्नांना मदत करणें हाच खरा मार्ग होय.

क्षुल्लक पुराव्याच्या आधारावर लहान मुलांवर, विशेषत: ज्यांच्या हातून पूर्वी एकदोन चुका घडल्या आहेत, अशा मुलांवर चोरीचे अगर दुसरे आरोप लादण्याची पुष्कळ पालकांना व शिक्षकांना संवय असते. मोठ्या मनुष्यावर एखादा आरोप निष्कारण केल्यानें त्याच्या स्वाभिमानाला जसा धक्का बसतो त्याचप्रमाणें मुलें लहान असलीं म्हणून त्यांच्या स्वाभिमानाला बसणारा धक्का कमी तीव्र भासतो असें नाहीं. शिवाय आरोप करणें व न्याय करणें आणि मग शिक्षा फर्मावून ती अंमलांत आणणें या सर्व भूमिका वडील मंडळींच्या ठिकाणीं एकत्रित झाल्या असल्यानें मुलांवर अन्याय होण्याची शक्यता कितीतरी पटींनीं वाढते. त्यांतच मुलांना वकील देण्याची तर सवलत नसतेच; पण अपक्व बुद्धि व अल्प वय यांमुळें स्वत:चा बचाव करण्याकरितां लागणाऱ्या कौशल्याच्या व भाषासौष्ठवाच्या अभावीं कितीतरी मुलांना आपलें निरपराधित्व सिद्ध करणें कठिण जातें.

## हरि:—संगतिचे दुष्परिणाम

चोरी करणाऱ्या मुलाचें नमुनेदार उदाहरण पहावयाचें असल्यास अकरा वर्षांच्या हरीचें उदाहरण पहावें. विड्या ओढण्याचें अमर्याद व्यसन जडलेलीं

कांहीं मोठीं मुलें त्याला पैसे देऊन बाजारांतून विड्या आणून देण्याकडे त्याची योजना करीत. अशा रीतीनें आपल्या अमोलिक सहवासाचा फायदा त्याला मिळवून देऊन आपल्या व्यसनाचीहि दीक्षा त्यांनीं त्याला दिली होती. त्यानंतर दुभत्याच्या पेटींत आईनें ठेविलेले पैसे उचलण्यास हरीनें सुरुवात केली; पण ही चोरी फार वेळ त्याला पचली नाहीं. आईच्या लक्षांत आल्याबरोबर त्याला तिनें ' जन्मभर आठवण ' राहील अशी शिक्षा केली आणि त्यानंतर त्याच्या चोरीचा बोभाटा आईच्या कानांवर मुळींच आला नाहीं.

हरीचे वडील त्याच्या लहानपणींच वारले होते आणि त्याच्या भावांचा सर्व खर्च त्याच्या आईला कष्ट करून भागवावा लागे. घरची गरिबी असली तरी आपल्या मुलांनीं सुवृत्त निघावें अशी आईची तीव्र इच्छा होती; आणि त्याप्रमाणें मुलांना वळण लावण्याइतका करारीपणा तिच्या अंगीं होता. हुशार मुलगा म्हणून वर्गांत हरीची ख्याति होती. पण अलीकडे वर्गांतील अभ्यासाकडे तो दुर्लक्ष करूं लागला होता आणि त्यांतच एक दिवस शाळेची घंटा होण्याच्या सुमारास वाण्याच्या दुकानांतील बिस्किटांचा पुडा चोरून आणून आपल्या सोबत्यांना वाटतांना तो आढळला. त्याच्या वर्गशिक्षकांनीं त्याबाबत पूर्ण चौकशी केली. तेव्हां चोरीचा सर्व दोष हरीचाच आढळला. हा माल चोरीचा असल्याबद्दलची माहिती जरी त्याच्या मित्रांना होती तरी चोरी करण्यास त्यांनीं त्याला प्रथम प्रोत्साहन दिल्याचें आढळून आलें नाहीं.

हरीसारखा हुशार मुलगा अशा तऱ्हेनें बिघडावा याबद्दल त्याच्या शिक्षकांना फार वाईट वाटलें व त्या बाबतींत थोडें लक्ष घालण्याचें त्यांनीं ठरविलें. हरीनें आपला अपराध ताबडतोब कबूल केला. दुसऱ्याच्या वस्तु अशा तऱ्हेनें घेतांना त्याच्या मोठ्या सोबत्यांना त्यानें पाहिलें होतें; दुकानाजवळ उभे असतांना बिस्किटांचा पुडा पाहून तो त्याला घ्यावासा वाटला आणि पूर्वी पाहिलेल्या आपल्या सोबत्यांच्या उदाहरणाचें अनुकरण करून त्यानें मुकाट्यानें तो पुडा घेतला. शिक्षकांनीं समजूत घातल्यावर आपण केलें हें वाईट केलें हें त्याला पटलें; पण आईजवळ आपला अपराध कबूल करण्याचें मात्र तो मान्य करीना.

## सुधारण्याची दिशा

एक गोष्ट उघड होती कीं, हरीचें आपपरभेदाचें ज्ञान अद्याप बरेंच अपूर्ण होतें. वस्तु पाहिल्यानंतर ती घ्यावीशी वाटली म्हणून घेतली यापलीकडे त्याला कांहीं सांगतां येईना. संगतीचा परिणामहि स्पष्ट दिसत होताच. अशा स्थितींत हरीचें वर्तन सुधारण्याकरितां तीन गोष्टी करणें जरूर होतें. केलेल्या चोरीमुळें वाण्याचें झालेलें नुकसान भरून द्यावयास पाहिजे व त्याकरितां हरीनें स्वतः कांहींतरी झीज सोसावयास पाहिजे. कारण असें केल्याशिवाय दुसऱ्याची वस्तु आपण घेतां कामा नये, हें तत्त्व त्याच्या मनांत बिंबलें नसतें. वाईट मित्रांची संगति सोडविण्याकरितां चांगल्या मित्रांची संगति लावणें हाच एक रामबाण उपाय होता. तिसरी आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं, हरीला आपल्या आईविषयीं जास्त प्रेम आणि विश्वास वाटावयाला लावणें जरूर होतें.

पहिल्या दोन गोष्टी सहज साधतां आल्या. एका अनुभवी शिक्षकाच्या नेतृत्वाखालीं चालविलेल्या स्काउटच्या तुकडींत त्याला दाखल करवून चांगल्या सोबत्यांशीं त्याचा सहवास घडवून आणतां आला. त्याचप्रमाणें दुकानदाराचें नुकसान भरून देण्याकरितां कांहीं दिवस कोणतीहि नवीन वस्तु न मागण्याचें त्याच्याकडून वचन घेण्यांत आलें. परंतु, आईच्या कडक स्वभावामुळें त्या दोघांचा सलोखा घडवून आणणें थोडेंसें कठिण गेलें. हरीनें आपला अपराध आईजवळ बरेच दिवसपर्यंत कबूल केला नाहीं. आईचें त्याच्यावरील प्रेम व त्याच्याकरितां ती सोशीत असलेले कष्ट यांची त्याला जाणीव करून दिल्यानंतरहि आईला सर्व गोष्टी सांगण्यास तो तयार होईना. अखेर शिक्षकांच्या आग्रहामुळें त्यानें जेव्हां आईला आपल्या चोरीची हकीकत कळविली, तेव्हां आईनें त्याला असा चोप दिला कीं, त्या शिक्षेच्या मुळाशीं आईचा सद्धेतुच होता हें हरीला पटवून देतांना त्याच्या शिक्षकांना अतिशय कष्ट पडले. परंतु इतर सर्व बाबतींत शिक्षकांनीं त्याच्यावर लक्ष ठेवून नवीन नवीन व्यवसायांत त्याचें लक्ष गुंतविल्यामुळें हरीच्या वागणुकींत इष्ट तो बदल होऊं लागला व आईविषयीं त्याच्या मनांत असलेली अढीहि कांहीं दिवसांनीं कमी झाली.

## बंडू:—आत्मसंयमनाची उणीव

कायद्याच्या व व्यवहाराच्या भाषेत बोलावयाचें म्हटलें तर हरीच्या मानानें बंडू हा मोठा बिलंदर चोर समजला पाहिजे; आणि चवदाव्या किंवा पंधराव्या वर्षी पांचसात महिन्यांच्या अवधींत मधूनमधून पद्धतशीरपणें चोरी करून आपल्या चुलत्याच्या दुकानांतून पांचपन्नास रुपयांपर्यंतची रकम लांबविणाऱ्या मुलाला बिलंदर कां म्हणूं नये ?

बंडू हा कांहीं वर्गांत मोठा हुशार समजला जात नसे. पण सामान्यतः बुद्धीनें मंद असला तरी वर्तनानें सच्छील असल्यानें सर्व शिक्षकांचें त्याच्याविषयीं चांगलें मत होतें, व त्यामुळें त्याच्यावरील हा चोरीचा आरोप ऐकून सर्वांनाच फार आश्चर्य वाटलें. शाळा सुटल्यानंतर दररोज संध्याकाळीं आपल्या चुलत्याच्या स्टेशनरी सामानाच्या दुकानांत जाऊन चुलत्याला मदत करण्याचा त्याचा परिपाठ होता. त्याच्या वयास अनुसरून हिंडण्याफिरण्याचा, प्रवासास किंवा पोहण्यास जाण्याचा त्याला बराच नाद असे. बहुशः दर रविवारीं अगर सुट्टीच्या दिवशीं लांबच्या प्रवासास स्नेह्यांना घेऊन तो निघे. या प्रवासाचा खर्च भागविण्याकरितां दुकानाच्या गल्ल्यांतून जरूर तितकी रकम तो उचलीत असे. त्याच्या चुलत्याचा स्वभाव थोडासा भोळा व त्याचा बंडूवर विश्वासहि जास्त. त्यामुळें या बाबतींत बरेच दिवस त्यांना शंका आली नाहीं. वर्षअखेर हिशेब तपासतांना चुलत्याच्या लक्षांत ही गोष्ट आली नसती तर त्याचा हा क्रम किती दिवस चालला असता कोण जाणे !

बंडूच्या घरच्या शिस्तींत नांव ठेवण्यासारखें कांहीं नव्हतें. त्याच्या थोरल्या भावाला चोऱ्या करण्याची सवय होती हें खरें. पण बंडूनें आजपर्यंत कोणतेंहि वाईट वर्तन केलें नव्हतें. त्याच्या आईबापांचा स्वभाव आनंदी व प्रेमळ असून बंडूच्या वर्तनाचा सहानुभूतिपूर्वक विचार करून त्यास सुधारण्याची संधि देण्यास त्यांची तयारी होती.

अशा परिस्थितींत बंडूनें चोरी कां करावी या प्रश्नाचा उलगडा करणें जरा कठीणच होतें. बंडूचा हा पहिलाच अपराध होता हें खरें; पण त्यानें केलेल्या चोऱ्या क्षणिक विकाराच्या भरांत केल्या नसून सहा सात महिनेपर्यंत पद्धतशीरपणें केलेल्या होत्या. दुसऱ्याची वस्तु घेऊं नये हें समजण्या-

## दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

इतका तो मोठा होता. त्याच्या सोबत्यांत वाईट वर्तनाचे कोणी नव्हते किंवा कोणीं त्याला चोरीला उत्तेजनहि दिलें नव्हतें. ह्या एका चोरीखेरीज त्याच्या वर्तनांत दुसरा दोषहि नव्हता; अशा स्थितींत त्याच्या चोरीचें एकच निदान शक्य आहे. त्याच्या चुलत्याचा स्वभाव भोळा असल्यानें त्यानें बंडूवर जास्त विश्वास टाकला. परंतु नेहमीं हातांत पैसे खेळूं लागल्यानें बंडूच्या मनाला जो मोह पडला त्याचा प्रतिकार करण्याइतकें आत्मसंयमनाचें शिक्षण त्याला मिळालें नव्हतें व म्हणून त्या मोहाला तो बळी पडला. खरा दोष कोणाचा असेल तर मोहाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य उत्पन्न करण्यापूर्वी त्याच्या मार्गांत मोह उत्पन्न करणाऱ्या त्याच्या चुलत्याचाच होता.

या चोरीबद्दल बंडूला शिक्षा करण्याचा एकच मार्ग होता, तो म्हणजे त्याचें आत्मसंयमन वाढविणें हा होय. त्याच्यावर विसंबून राहण्याऐवजीं दररोजच्या दररोज पैशाचा हिशेब चुलत्यानें त्याच्याकडून घेतला असता तर चोरीचा मोह त्याला उत्पन्न झाला नसता; आणि अखेर त्याच मार्गाचा अवलंब करून त्याचें वर्तन दोषातीत झालें. अर्थात् आत्मसंयमन पूर्ण बाणेतोंपर्यंत योग्य मित्रांशीं सहवास, करमणुकीच्या प्रकारांवर योग्य देखरेख व पैशांची अफरा-तफर करण्याची एकहि संधि त्याला मिळणार नाहीं यांविषयीं दक्षता इत्यादि गोष्टींकडेहि लक्ष देणें जरूर होतेंच.

## भंगलेल्या कुटुंबांतील शिस्त

कुटुंबांतील व्यक्तींच्या परस्पराशीं असलेल्या वर्तनाचा परिणाम मुलांच्या वर्तनावर अतिशय होतो. पाश्चात्य देशांत, विशेषतः अमेरिकेंत घटस्फोटांच्या अतिरेकांमुळें कुटुंबसंस्था जवळजवळ नामशेष होत चालल्यानें हा परिणाम ढळढळीतपणें दृष्टीस पडतो. आपणांकडे हा प्रश्न अद्याप तितका तीव्र झाला नसला तरी आईबापांचे एकमेकांशीं असलेले संबंध विशेष सलोख्याचे नसल्यास मुलांच्या मनाला अनिष्ट वळण अर्थातच लागतें. मुलांच्या मनोवृत्तींची योग्य जोपासना होण्यास आईचा प्रेमळपणा व बापाची शिस्त या दोघांचीहि आव-श्यकता असल्यानें जेथें त्यांपैकीं एकाचा अभाव असेल त्या मुलांच्या मनोवृत्तींत तितका उणेपणा अर्थातच राहणार. पुष्कळ वेळां कुटुंबांतील परिस्थितीमुळें मुलगा कोणाहि एकाच्या शिस्तींत फार वेळ रहात नाहीं. आज एका गांवीं

तर उद्यां दुसऱ्या ठिकाणीं अशा स्थितींत मुलांच्या जीवनास स्थैर्य रहात नाहीं. आज काकाच्या किंवा मामाच्या शिस्तींत रहात असला तर उद्यां दुसऱ्याच कोणाच्या घरीं त्यापेक्षां अगदीं निराळ्या शिस्तींत राहण्याचा प्रसंग येणार. अशा तऱ्हेनें वारंवार बदल झाल्यानें कोणतीच शिस्त व कोणत्याच संवयी अंगवळणीं पडण्यास अवसर मिळत नाहीं; मग मूलतः सुस्वभावी असणाऱ्या मुलाचेंहि वर्तन सुसंगत राहणें कसें शक्य आहे! सर्वांची वागविण्याची पद्धति चांगली असली तरीहि ती अंगवळणीं पडण्यास कांहीं अवसर लागणारच व तो अवसर मिळाला नाहीं तर त्याचे परिणामहि दिसणार नाहींत. पण पुष्कळ वेळां ही पद्धतीच चांगली नसते व अशा रीतीनें वाहत्या वाऱ्याच्या अनुरोधानें आपलें वर्तन पालटण्याचा प्रसंग मुलावर येतो. अर्थातच मुलाच्या भावी वर्तनांतहि स्थैर्य दिसेनासें होतें.

### एकुलता एक मुलगा

एकुलता एक मुलगा पुष्कळ वेळां बिघडतो असें आपण म्हणतों व पाहतोंहि. आईबापांच्या अति लाडानें मुलाला स्वच्छंदी वागण्याची संवय लागते व आत्मसंयमनाची जरूर केव्हांच भासत नाहीं. पण उलट असेंहि म्हणतां येईल कीं, योग्य संयमन व शिस्त राखून मुलांना स्वछंदी वागूं दिल्यास फारसे दुष्परिणाम न होतां उलट त्यांच्या मनोवृत्तीचा योग्य विकास होण्यास मदतच होते. संयमन व शिस्तीचा अभाव या गोष्टी एकुलत्या एकपणावर फारशा अवलंबून नसून आईबापांच्या कुवतीवर व शिक्षणाविषयींच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहेत. मुलगा एकुलता एक असल्यानें परिणाम होतो तो निराळ्याच दृष्टीनें होतो. घरांत लहान मूल एकटेंच असल्यानें साहजिकच सर्वांच्या प्रेमाचा ओढा त्याच्याकडे जातो. त्यायोगें त्याला अखंड अवलंबून राहण्याची संवय जडते व स्वतःच्या महत्त्वाविषयीं फार आढ्यतेची कल्पना उगम पावते. घरांतील सर्व माणसें आपल्या एकट्याच्या सेवेंत सदा तत्पर आहेत हें पाहून कोणाला आढ्यता वाटणार नाहीं? कुटुंबाच्या नाट्यभूमीवर नायकाचें काम करणारा हा छोटा मुलगा साहजिकच शेजारच्या मुलांत बरोबरीच्या नात्यानें वागावयास तयार होत नाहीं व मोठेपणींहि जगांत दुसऱ्यांच्या सहानुभूतीची अपेक्षा करीत बसून बरोबरीच्या नात्यानें जीवनकलहांत भाग घेणें त्याला शक्य होत नाहीं. त्याच्या बरोबरीच्या वयाचीं

मुलें घरांत नसतात व म्हणून स्वतःचें वर्तन आपल्या चिमुकल्या समाजांत चालण्यासारखें आहे किंवा नाहीं याची जाणीव त्यास करून देणारें कोणीच नसतें. त्यानें एखादी वाईट गोष्ट केल्यास वडिलांना ती समजत नाहीं, इतकेंच नव्हे तर आपल्या वर्तनाबद्दल आईला कळविणारें कोणीहि नाहीं या जाणीवेनें वर्तनावरील हा स्वाभाविक दाबहि नाहींसा होतो. मात्र या गोष्टी मुलगा एकुलता एक असतो तेव्हांच घडतात असें नाहीं. ज्या वेळीं मुलाच्या वयाचीं इतर मुलें घरांत नसतात अशा सर्व वेळीं परिस्थिति यासारखीच असते. पहिलें मूल झाल्यावर बऱ्याच वर्षांनीं दुसरें झालें असेल अगर मधलीं मुलें जगलीं नसतील अगर अन्य कारणांनीं मुलाच्या वयाचीं मुलें घरांत नसतील त्या सर्व वेळीं तो मुलगा एकुलता एकच असतो हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

एकुलता एक मुलगा आईच्या लाडांनीं बिघडतो; त्याचप्रमाणें सावत्र आईच्या मत्सरामुळें व दुर्लक्षामुळें मुलाला वाईट वळण लागतें असें म्हणतात. एखादी सावत्र आई स्वतःच्या मुलावरील प्रेमामुळें तुलनेनें सवतीच्या मुलाचा छळ करील, पण सर्वच सापत्न माता मत्सरी असतात किंवा सापत्न मुलांचा द्वेष करितात असें कोण म्हणेल ? तरीहि सावत्रपणाचा स्वाभाविक परिणाम कसा होतो हें दाखविण्याकरितां बाळचें उदाहरण खालीं दिलें आहे. सामान्यतः मध्यम स्थितींतील कुटुंबाची परिस्थिति कशी असते व त्याचे तीव्र बुद्धीच्या लहान मुलांवर कसे चमत्कारिक परिणाम होऊं शकतात याचें हें नमुनेदार उदाहरण असल्यानें त्याची चर्चा थोड्या विस्तारानें करणें अवश्य वाटतें.

### बाळ :—सावत्र आई

बाळ हा पाहिल्याबरोबर कोणाचेंहि मन आकर्षण करून घेणारा गोरा गोमटा आणि गुटगुटीत असा अवघ्या आठ वर्षांचा मुलगा होता. पण त्यानें आजपर्यंत असंख्य पापें (!) केलीं होतीं आणि अजून तो सारखीं करीत होता. घरीं जेवतांना तो माईला ( आपल्या सावत्र आईला ) अतिशय त्रास देई. हवें नको तें नीट सांगावयाचें नाहीं, चेष्टा करावयाच्या, अन्न नासावयाचें, असे प्रकार कोठवर वर्णावे ! खोटें तर तो नेहमींच बोले; आणि पुराव्यांनीं

सिद्ध केल्याशिवाय खरी गोष्ट कबूल करीत नसे. लहान मुलींशीं वात्रटपणाच्या गोष्टी बोलण्याचीहि त्याला संवय होती. वर्गांत हुशारपणाबद्दल त्याची ख्याति होती. त्याचबरोबर खोड्या करण्यांतहि तो प्रवीण होता. शिक्षकांच्या पाठीमागें वेडींवांकडीं तोंडें करून मुलांना हंसविणें, नाना प्रकारचे हातवारे करून नाचणें हे प्रकार तो नेहमीं करी. एकदां आपल्या एका सोबत्याच्या खिशांतील एक पैसा चोरून त्याचें पेपरमिंट त्यानें आणलें होतें. त्याबद्दल शिक्षकांनीं विचारिलें, तेव्हां त्यानें सरळ सांगितलें कीं, "मजजवळ पैसा नव्हता आणि मला पेपरमिंट हवें होतें." माईनें सांगितलेलें काम तर तो कधींच ऐकत नसे. निरोप सांगावयास त्याला पाठविलें तर सरळपणानें निरोप सांगून तो परत येईल असें सहसा घडावयाचें नाहीं. खेळावयास आलेल्या मुलामुलींशीं भांडणें, त्यांना त्रास देणें हें त्याच्या अंगवळणीं पडलें होतें. प्राण्यांना सुद्धां तो क्रूरपणें त्रास देई. एकदां एका मांजरीच्या पिल्लाला कोपऱ्यांत दाबून धरून त्याच्या पोटाला खिळ्यानें भोंक पाडण्याचा प्रयोग तो करीत होता.

बाळचे वडील रावसाहेब मोठे करारी व शिस्तीचे भोक्ते होते. पण बाळकडे ते फारसें लक्ष देत नसत. बाळ चारपांच वर्षांचा असतांनाच त्याची आई वारली व नंतर लागलींच त्याच्या वडिलांनीं दुसरें लग्न केलें. बाळची आई ही अत्यंत प्रेमळ, नम्र व पतीच्या आज्ञेंत वागणारी आर्य स्त्री होती. तिच्या कारकीर्दींत रावसाहेबांचा दरारा घरांत सर्वत्र असून ती त्यांच्या कलानेंच सर्व गोष्टी करी. पण माई आल्यानंतर तिच्या कलानें रावसाहेब वागूं लागले व माईचा अंमल घरांत सुरू झाला; अर्थात् माईसुद्धां हुशार, धोरणी आणि संसारांत दक्ष असे. "मला करतां येत नाहीं असें कांहीं नाहीं," असा तिचा दृढ आत्मविश्वास तिच्या प्रत्येक वागणुकींत स्पष्ट दिसून येत होता. सावत्र आई घरांत आल्यानंतर बाळच्या आजोळच्या मंडळींनीं त्याला आपल्या घरीं राहण्यास नेण्याची इच्छा दर्शविली होती. पण रावसाहेबांना तसें करणें आवडलें नाहीं.

लहानपणीं बाळ हा मोठा गोड मुलगा असून सर्वांचा आवडता होता. त्याची आई जात्याच प्रेमळ, त्यांत हा पहिलाच मुलगा; त्यांतहि तो अतिशय देखणा, हुषार आणि स्वभावानें आनंदी; मग त्याचें कोडकौतुक करण्यांत

याच्या आईचे तासचे तास केव्हांच निघून जात असल्यास नवल काय? त्याच्या आईच्या मृत्यूनंतर त्याचें संगोपन आत्याबाईंनीं केलें. त्यांचेंहि बाळवर प्रेम होतें; पण आईच्या इतके लाड व कौतुक अर्थातच त्यांनीं केले नाहीं. बाळची वागण्याची तऱ्हाहि याच वेळीं थोडीशी बदलली आणि माई घरांत आल्यानंतर उनाड मुलांच्या सदरांत तो जाऊन बसला. याच सुमारास माईचा भाऊ बाबू त्यांच्या घरीं राहण्यास आला. बाबू बाळपेक्षां दोन वर्षांनीं मोठा असून त्याच्याच शाळेत होता; आणि अभ्यासानें, वर्तनानें तसेंच स्वभावानेंसुद्धां तो एक आदर्श मुलगा होता यांत शंका नाहीं. बाळचें वर्तन सुधारण्याच्या हेतूनें त्याच्याशीं बोलतांना माई नेहमीं बाबूचें उदाहरण देत व बाबू त्याच्यापेक्षां कितीतरी श्रेष्ठ आहे हें त्याच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करीत. बाळचें मासिक प्रगतीचें कार्ड शाळेंतून घरीं आल्यावरहि ज्या विषयांत त्याला कमी गुण असतील त्याच्यावरच भर देऊन त्यांत प्रगति करण्यास त्याला सांगत व असें करतांना ज्या विषयांत त्याला चांगला शेरा मिळाला असेल त्याचा उल्लेखसुद्धां माई करीत नसत. बाळच्या आईनें त्याचे फाजील लाड करून त्याला बिघडवून टाकलें आहे, अशी त्यांची समजूत होती व म्हणून बाळशीं वागतांना थोडा कडकपणाच त्या दाखवीत; त्यांत मत्सराचा भाग किती होता हें कोणी सांगावें ?

## प्रेम व कौतुक यांची आवश्यकता

या परिस्थितींत विलक्षण असें कांहीं नाहीं. सामान्यतः मध्यम स्थितींतील कितीतरी कुटुंबांत यासारखीच परिस्थिति अनेक वेळां आढळते. असें असतांना बाळच्या वर्तनावर त्याचे इतके विलक्षण परिणाम कां व्हावेत हें लक्षांत येण्याकरितां बाळच्या मनोवृत्तीचें जरा सूक्ष्मपणें अवलोकन करूं. बुद्धीनें अत्यंत हुषार असल्यानें वर्गातील अभ्यास तो लीलेनें संपवून टाकी व उरलेल्या वेळांत दुसरें कांहीं काम नसल्यानें टवाळ्या करीत वेळ घालवी. रावसाहेबांच्या करारी व शिस्तबाज स्वभावाचे इतर पुष्कळ सुपरिणाम झाले असतील; पण बाळच्या आईच्या प्रेमळ स्वभावाला पोषक अशी वागणूक त्यांची तिच्याशीं राहिली नाहीं. हार्दिक पतिप्रेमाची अपेक्षा तृप्त न झाल्यामुळें तिच्या हृदयांतील प्रेमाचा सर्व ओढा बाळकडे वळला व प्रमाणाबाहेर बाळचे लाड होऊं लागले. बाळनें केलेल्या प्रत्येक कृत्याचें, त्यानें उच्चारलेल्या

बोबड्या बोलांचें, त्यानें दाखविलेल्या कौशल्याचें एकदांहि न चुकतां अखंड कौतुक होऊं लागल्यामुळें आपल्याकडे प्रत्येक व्यक्तीचें अखंड लक्ष असलें पाहिजे, अशी त्याला संवय लागली. आईच्या मृत्यूनंतर ही स्थिति एकाएकीं पालटली. इतरांचें त्याच्यावर प्रेम नव्हतें असें नाहीं, पण त्या प्रेमाचें प्रदर्शन तासन् तास कोण करीत बसणार? आणि अशा स्थितींत आपल्या बापाच्या प्रेमाचाहि सर्व मक्ता एका नव्या व्यक्तीनें [ माईनें ] स्वतःकडे घ्यावा, सर्वांच्या प्रेमाला आपल्याला पारखें करावें आणि उलट आपल्याला प्रेमशून्य वातावरणांत वागवावें हें पाहून कोणाची मनोवृत्ति बंडखोर बनणार नाहीं? आणि त्यांत भर घालण्याकरितांच कीं काय, पूर्वी आपलें जें कौतुक केलें जात होतें आणि ज्या स्तुतीचा वर्षाव अखंड होत होता तें कौतुक व ती स्तुति एका उपटसुंभाला [ बाबूला ] मिळावी आणि आपल्या हक्काच्या सिंहासनावर तो आरूढ व्हावा हें पाहिल्यानंतर त्याचें चित्त कसें स्थिर राहावें?

या दृष्टीनें बाळकडे पाहूं लागलों म्हणजे त्याच्या सर्व खोड्यांची संगति सहज लागते. बाबूची व त्याची अखंड तुलना होणें आणि त्याच्या हुशारीबद्दल जरूर तें कौतुकपूर्ण उत्तेजन न मिळणें हीं त्याच्या हूडपणाचीं खरीं कारणें होतीं. सरळपणें आपणांला न मिळणारें कौतुक मुलांच्या चेष्टा करून, त्यांना हंसवून, हातवारे करून, संपादन करण्याचे त्याचे प्रयत्न सुरू होते. बाबूपेक्षां आपण कमी नाहीं हें दाखविण्याकरितां लोकांचें लक्ष त्याच्यापेक्षांहि आपणांकडे अधिक वेधण्याचा एकच उपाय, आणि तो म्हणजे हूड वर्तन, हाच त्याला दिसला. माईकडून मिळत असलेल्या प्रेमशून्य वागवणुकीबद्दल सूड उगविणें म्हणजे माईला त्रास देणें व तिचें न ऐकणें हाच मार्ग त्याला मोकळा होता. त्याच्या कुशाग्र बुद्धीस अनुसरून इतर गोष्टींप्रमाणें रतिविषयक जिज्ञासाहि त्याची तीव्र होती हें उघड आहे. क्रूरपणाच्या कृत्यांचा संबंध रतिविषयक प्रवृत्तीशीं असल्याचें सर्वमान्य झालें आहेच.

या निदानास अनुसरून बाळला सन्मार्गावर आणण्याचा मार्ग उघड होता. तो ज्या वर्गात होता त्याच्या वरच्या इयत्तेत त्याला बसविण्यास कांहींच हरकत नव्हती; पण असें करणें शाळांच्या पोलादी शिस्तीस अनुसरून नसलें तरी त्याच्या तैल बुद्धीस पुरेल इतका तरी अभ्यास त्याला पाहिजेच, मग तो वर्गाच्या अभ्यासक्रमांतील असो अगर दुसरा कसलाहि असो. स्तुतीची

व कौतुकाची त्याची तहान तृप्त करणें जरूर होतेंच; आणि त्याच्या अंगच्या सद्गुणांमुळें व हुशारीमुळें त्या स्तुतीला तो पात्रहि होता. मग त्याच्या स्वभावास व संवयीस अनुसरून त्याला आपल्या हक्काचें वाटत असलेलें कौतुक, स्तुतीनें तो बिघडेल या सबबीवर, न देण्यांत हंशील काय ? लोकांचें प्रेम व कौतुक संपादन करावयाचें असल्यास त्याकरितां परिश्रम करावे लागतात, याचें शिक्षण बाळला देणें जरूर होतें हें खरें; पण त्याकरितां माईनें व रावसाहेबांनीं जो मार्ग पत्करिला होता तो निःसंशय चुकीचा होता. बाळनें केलेल्या परिश्रमांचें कौतुक करूनच परिश्रमानें प्रेम संपादन करतां येतें हें तत्त्व बाळला पटविणें शक्य होतें. बाळचे प्रमाणाबाहेर लाड करून त्याच्या मार्गांत कांटे पसरून ठेवण्याचेंच काम आपण करीत आहोंत ही जाणीव त्याच्या आईला असती तर त्याचें जीवन कितीतरी सुखाचें झालें असतें !

## कुटुंबांतील नैतिक वळण

घरांतील शिस्त किंवा आईबापांनीं राखलेलें नैतिक वळण यांचा मुलांच्या वर्तनावर अतिशय महत्त्वाचा परिणाम होतो. केवळ अयोग्य शिस्तीनें जितकीं मुलें बिघडतात, तितकीं दुसऱ्या कोणत्याहि एकाच कारणानें बिघडत नसतील. शिस्त योग्य असावी लागते; मुलांच्या स्वाभाविक प्रवृत्ति, इच्छा व आकांक्षा यांना योग्य वाव देऊन जरूर त्या प्रमाणांत त्यांना संयमन करण्यास शिकविणें व समाजांत योग्य तऱ्हेनें वागण्यास शिकविणें या गोष्टी योग्य शिस्तीशिवाय होणें अशक्य आहे. कांहीं कांहीं कुटुंबांतील शिस्त फार कडक असते. क्षुल्लक चुकीबद्दलहि कडक शिक्षा करीत गेल्यानें मुलांना योग्य वळण लागेल ही समजूत चुकीची आहे. त्यायोगें मुलगा मनांत कुढूं लागतो व शिक्षा टाळण्याकरितां खोटें बोलून आईबापांना फसविण्यास शिकतो. शिवाय मुलें चुका करतात याचीं कारणें पाहण्याकडे कडक शिस्तीच्या पुरस्कर्त्यांचें स्वाभाविकच दुर्लक्ष होतें व ते मुलांच्या मनोवृत्तींची उपेक्षा करतात; त्यामुळें मनोवृत्तींचा स्वाभाविक विकास होत नाहीं व मुलांच्या मनांत आईबापांविषयीं व एकंदर समाजाविषयीं थोडीशी तिरस्कारबुद्धि उत्पन्न होते.

नेहमीं शिक्षा भोगणारा किंवा मार खाणारा मुलगा कोडगा होतो, असें आपण व्यावहारिक भाषेंत म्हणतों. कोडगेपणा या शब्दाचें

शास्त्रीय भाषेंत स्पष्टीकरण करावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, त्या मुलाचा स्वाभिमान व आत्मविश्वास हीं नाहींशीं होतात. ' आपल्या हातून एक चूक झाली ही गोष्ट फार वाईट झाली, असें करणें हें आपणांस शोभणारें नाहीं, असें न होण्याबद्दल आपण जपलें पाहिजे;' अशा तऱ्हेची स्वाभिमानी वृत्ति त्याच्या ठायीं कधींच उत्पन्न होत नाहीं. ' हें असें चालावयाचेंच, आपल्या हातून जास्त चांगलें काम होणें शक्य नाहीं.' अशी त्याची वृत्ति बनते व सद्वर्तनास आवश्यक अशा आत्मविश्वासाचा, बाणेदारपणाचा आणि स्वाभिमानाचा त्याच्या ठायीं पूर्ण अभाव होतो. शरीरदंड वारंवार करणें एवढाच कांहीं कडक शिस्तीचा अर्थ नाहीं. जेथें दरक्षणीं शारीर दंड केला जात नाहीं, अशा कित्येक घरींसुद्धां शिस्त फाजील कडक असते. क्षुल्लक चुकांवरून मुलांना अहर्निश रागें भरण्यानें मुलांचें लक्ष स्वतःची चूक दुरुस्त करण्यापेक्षां वडिलांच्या या रागाकडेच जास्त लागतें व वडिलांच्या या रागाचाच त्यांना जास्त राग येतो. एखाद्या वेळीं भरपूर मिळणाऱ्या मारापेक्षांहि 'अमुक करूं नको, तमुक कां केलेंस?' यासारखी क्षुल्लक बाबतींतहि कडक निर्बंधांची अखंड टोंचणी जास्त असह्य होते. त्यायोगें मुलाच्या मनांत एक प्रकारची शिस्तीविरुद्ध बंडखोरीवृत्ति उत्पन्न होते व ती मधूनमधून डोकावूं लागते. ती वृत्ति दाबून टाकण्याकरितां शिस्त जास्त कडक केली तर ती वृत्ति आंतल्या आंत धुमसून एखाद्या वेळीं एकदम स्फोट होतो. मुलगा मनांतल्या मनांत कुढूं लागतो व अशा रीतीनें मनांत कुढत असतांना वडिलांच्या या कडक वागणुकीला स्वतःच्या मनानें जास्त कडक स्वरूप देतो व वडिलांविषयींचा त्याचा राग जास्त तीव्र होतो.

## शिस्तीचीं आंदोलनें

या कडक शिस्तीचे दुष्परिणाम टाळण्याकरितां कांहीं कांहीं पालक अगदीं विरुद्ध टोकाला जातात. अपराधाच्या मानानें त्यांच्या हातून केली जाणारी शिक्षा अत्यंत सौम्य असून पुष्कळ वेळां तर त्या शिक्षेला कौतुकाचें व उत्तेजनाचेंच स्वरूप येतें. स्वतःच्या अपराधाचें मुलानें केलेलें समर्थन कितीहि पोंचट असलें तरी ग्राह्य मानलें जातें हें पाहिलें म्हणजे कोणतें समर्थन आपल्या आईला किंवा वडिलांना पटेल याचा विचार करून, प्रसंग पाहून व इतरांचा कल पाहून, मुलगा आपल्या वर्तनाचें समर्थन करूं लागतो.

पालकांचाहि अशा वेळीं सर्वस्वीं दोष असतो असें नाहीं. पांचसात मुलें संभाळण्याची दगदग, गरिबीच्या संसाराचा योगक्षेम भागविण्याची काळजी, मधूनमधून येणारा स्वतःचा आजार व इतर दुःखें या सर्व संकटांनीं ग्रासलेल्या आईनें मुलांच्या वर्तनाकडे यापेक्षां किती जास्त लक्ष देणें शक्य आहे? सर्व दिवस कामाच्या मागें लागून विश्रांतीकरितां घरीं येणाऱ्या बापानेंहि मुलांच्या शिस्तीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं, तर तें स्वाभाविकच समजलें पाहिजे. अशा ढिल्या शिस्तींत वाढलेल्या मुलांचें वर्तन कसें राहील याची कल्पना कोणालाहि सहज करतां येईल.

मधला मार्ग श्रेष्ठ असें समजूनच कीं काय कांहीं पालक या दोन्ही टोकांच्या मधील मार्ग पत्करतात! त्यांची शिस्त कधीं कडक तर कधीं शिथिल अशा तऱ्हेनें आंदोलनें घेते व तिला स्थैर्य कधींच येत नाहीं. ह्या पद्धतीनें सुपरिणाम होण्याऐवजीं दोन्ही पद्धतींतील दोष मात्र पदरीं पडतो व कसें वागावें हेंच मुलांना समजेनासें होतें. कोणत्या अपराधाबद्दल किती शिक्षा होईल हें त्या अपराधावरून ठरण्याऐवजीं आईच्या अगर वडिलांच्या त्या वेळच्या लहरीवरून ठरत असल्यानें मुलांच्या अंगीं स्वाभाविकच बेपर्वाईची वृत्ति उत्पन्न होते. आपल्या हातून खरोखरीच कांहीं चूक झाली आहे याची जाणीव मुलाला होण्याचें एकीकडेच राहतें, उलट अशा लहरी आईबापांचाच त्यांना तिटकारा येतो. ही रागाची लहर जाऊन दुसरी सौम्य लहर येण्याची ते वाट पहात बसतात व अनुकूल वारा वाहूं लागतांच आपल्या उद्योगास ते पुनः सुरुवात करितात.

आई व बाप किंवा बाप व चुलता यांसारख्या घरांतील प्रमुख कर्त्यांच्या शिस्तीसंबंधीं कल्पना निरनिराळ्या असल्या म्हणजे ती तऱ्हा कांहीं निराळीच असते. मुलानें अपराध केला असतां त्यास वळण लावण्याऐवजीं त्यांचें आपसांतच भांडण सुरू होतें व पुष्कळ वेळां हें भांडण प्रत्यक्ष पाहून प्रेक्षक या नात्यानें स्वतःची करमणूक करून घेणारा मुलगा तेथें हजर असतोच. याचा योग्य तो उपयोग करून कधीं आईच्या पाठीशीं तर कधीं वडिलांच्या पाठीशीं दडून आपला कार्यभाग उरकण्याइतकी बुद्धि त्याच्या ठायीं खास असते! कोणत्या रस्त्यानें गाडी न्यावी याबद्दल हांकणाऱ्यांतच भांडण

उपस्थित झाल्यावर त्यांच्या भांडणाचा निकाल होण्याच्या पूर्वींच जर घोड्यानें गाडी खड्डयांत घातली तर तो दोष कांहीं घोडयाचा खास नव्हे.

## शशिकात :—अयोग्य शिस्त

पालकांच्या शिस्तीचा मुलांच्या वर्तनावर होणारा परिणाम चिरकालिक असतो इतकेंच नव्हे तर तो घरांत, शाळेंत किंवा क्रीडांगणावरहि दिसून येऊं शकतो. शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांच्याहि मतानें वांया गेलेल्या शशिकांताला कोठेंहि पाहिला असता तरी त्याच्या वागण्याच्या पद्धतीवरून त्याच्या घरच्या वळणाची कोणालाहि कल्पना येऊं शकली असती. वर्गांत तर तो वेळेवर यावयाचा नाहींच, पण नियमानें रोज येईल अशीहि खात्री नव्हती. कारण विचारलें तर त्यानें सांगितलेलें कारण खरें नसावयाचेंच. सिनेमा पाहणें आणि स्नेह्यासोबत्यांना घेऊन हॉटेलांतून चैन करीत हिंडणें हीच त्याची नित्याची करमणूक झाली होती. पैशांची अडचण भागविण्याचे त्यानें शोधून काढलेले मार्ग नवीन नसले तरी त्याच्या तीव्र बुद्धीचे द्योतक खास होते. वडिलांच्या खिशांतून किंवा आईच्या फणीकरंड्याच्या पेटींतून त्याला लागणारे पैसे तो शांतपणें घेई. मात्र असें करतांना तेथें असलेले सर्व पैसे कधींहि घ्यावयाचे नाहींत, किंवा सहज लक्षांत येईल एवढी मोठीहि रक्कम उचलावयाची नाहीं, हे नियम तो बिनचूक पाळीत असे.

शशिकांत हा सुखवस्तु आईबापांचा एकुलता एकच मुलगा होता. त्याचें वय बारा वर्षांचें होतें आणि त्या मानानें त्याची शरीरप्रकृति बरी होती. पण नेहमीं धाकांत वागविल्या जाणाऱ्या मुलांच्या शरीराप्रमाणें त्याचेंहि शरीर थोडें खुरटलेलें दिसे. आईबापांच्या दुर्लक्षामुळें त्याला वाईट मुलांची संगति फारच लहानपणीं जडली; आणि त्यांच्या सहवासानें अनेक वाईट संवयी त्याला लागल्या. बुद्धीनें तो मंद खास नव्हता; पण अभ्यासांत मात्र तो अतिशय मागें असे.

शाळेंतील पुस्तकी अभ्यास हेंच एक ध्येय असें त्याच्या बापाचें मत होतें, साप्ताहिक किंवा मासिक परीक्षांतील गुण हेंच एक अभ्यास मोजण्याचें माप त्याला माहीत होतें, आणि त्यांत उणेपणा दिसून आल्यास छडीचा मुक्तहस्तानें उपयोग करणें हाच एक रामबाण उपाय अशी त्याची प्रामाणिक

समजूत होती. "त्याला गुरासारखा बडवितो," असें त्याच्या माराचें वर्णन शशिकांताचे वर्गबंधु करीत. पण एके दिवशीं शशिकांताचे इतर प्रताप बापाच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न एका शिक्षकानें सद्धेतूनें केला तेव्हां, या सर्व गोष्टी धडधडीत खोट्या आहेत, असें बापानें सांगितलें व रागारागानें त्या शिक्षकाची त्यानें आपल्या घरांतून तावडतोब रवानगी केली. शिक्षकाचा सद्धेतु, त्यानें केलेलीं वर्णनें व आणलेले पुरावे यांचा विचारसुद्धां करण्याची जरूरी त्याला भासली नाहीं. पहिल्या तारखेला मुलाचें प्रगतिपत्रक काळजीपूर्वक पाहणें आणि त्यांत गुण कमी असल्यास ( आणि दर महिन्याला ते कमीच असत ) त्याबद्दल शशिकांताला झोडपून काढणें यापलीकडे बापाचें कांहीं कर्तव्य आहे, असें त्याला वाटत नव्हतें. 'विधायक कार्यक्रम' म्हणून आपल्यासमक्ष मुलाला तो पुस्तक घेऊन बसवीत असे, पण शशिकांत पुस्तक घेऊन अभ्यासच करतो कीं नाहीं आणि आपलें दुर्लक्ष झाल्याबरोबर शशिकांत तावडतोब तेथून निसटून जात असे, या गोष्टी लक्षांत घेण्याइतक्या महत्त्वाच्या आहेत असें त्याला वाटत नसे. या गोष्टीला एक दोन दिवस झाल्यानंतर मुलाला मुद्दाम कोठें तरी फिरावयास अगर करमणुकीकरितां तो घेऊन जाई. आपण मुलाला फार मारलें, याबद्दल स्वतःच्या मनाला वाटत असलेली रुखरुख घालविण्याचाहि त्याचा हा प्रयत्न कदाचित् असूं शकेल.

या एकान्तिक कडक शिस्तीचे परिणाम व्हावयाचे तेच झाले. शशिकान्तानें अभ्यास करावयाचें तर कधींच सोडून दिलें होतें. वारंवार होणाऱ्या शिक्षा चुकविण्याकरितां खोटें बोलण्याची संवय त्याला इतकी जडली होती कीं, आपण खोटें बोललों ही गोष्टहि त्याच्या लक्षांत येत नसे. शिक्षा भोगण्याचें अंगवळणीं पडल्यामुळें मानापमानाच्या उच्च भावना बधिर होऊन गेल्या होत्या. त्या इतक्या कीं, शिक्षकानें गोड शब्दांनीं त्याची समजूत घालून त्याचे दोष दाखविण्याचा प्रयत्न केला तेव्हां त्याच्या मनावर कांहींहि परिणाम होईना. उत्साह, आत्मविश्वास व महत्त्वाकांक्षा हे गुण नाहींसे झाले होते. क्रीडांगणावर खेळतांनासुद्धां या गुणांचा अभाव स्पष्टपणें दिसून येई. वर्गात किंवा सोबत्यांशीं खेळतांना अखंड उदास वृत्तीनेंच तो वावरे. मुलाच्या मनोवृत्ति समजून घेण्याचा बापानें प्रयत्न केला नाहीं व कडक शिक्षेच्या

धाकामुळें बापाशीं मोकळेपणानें बोलण्याचें मुलाला धारिष्ट झालें नाहीं. याचा साहजिकच परिणाम असा झाला कीं, बापलेक निरानिराळ्या जगांत वावरूं लागले व मुलाची वृत्ति बापाविषयीं व पर्यायानें सर्व जगाविषयीं पूर्ण बेपर्वाईची झाली. शशिकान्ताच्या आईलाहि बापाच्या करड्या अंमलांतच वागावें लागत असल्यानें मुलाच्या बाबतींत कुटुंबांतील तिचें महत्त्व संपूर्ण नाहींसें झालें होतें आणि त्यामुळें आईच्या प्रेमळ संगोपनानें घडून येणारा सूक्ष्म, कोमल व उच्च भावनांचा विकास शशिकान्ताच्या बाबतींत केव्हांहि दिसून आला नाहीं.

## शिस्तीची दिशा

शिस्त कशी नसावी याचें विवेचन आतापर्यंत केलें. मुलांनीं अमुक क्रिया करणें किंवा न करणें या गोष्टींवर शिस्त अवलंबून नसावी. तिचा संबंध कृतीशीं नसावा तर मुलांच्या मनोवृत्तीशीं असावा. शिस्तीच्या योगानें मुलांच्या अंगीं स्वतःबद्दल व आपल्या कुटुंबाद्दल प्रेम व अभिमान हीं जागृत होतील इकडे अखंड लक्ष ठेविलें पाहिजे. शिस्तीनें, धाकानें किंवा शिक्षेनें कांहीं गोष्टी लहानपणीं अंगवळणीं पाडतां येतील, परंतु तेवढ्यावरून त्या गोष्टी टिकतील अशी समजूत करून घेणें हें मात्र चुकीचें होईल. अमुक गोष्ट करणें हें मला किंवा माझ्या कुटुंबाला—कुळाला—कमीपणा आणणारें आहे, अशी वृत्ति उत्पन्न झाल्याखेरीज दुर्वर्तनापासून परावृत्त होणें अगर सद्वर्तन टिकून राहणें कठीण होईल यांत शंका नाहीं. लहानपणीं केवळ वडील मंडळींच्या सांगण्यावरून मुलें वागत असतात, पण मोठेपणीं विकार व भावना यांचाच मनुष्याच्या वर्तनावर खरा परिणाम होत असतो; म्हणून भावनांच्या बाबतींत स्थैर्य व निश्चितता हीं असल्याखेरीज सद्वर्तनाची खात्री देतां येणार नाहीं हें उघड आहे.

मुलांच्या मनांत कुटुंबाबद्दलचें हें प्रेम व हा अभिमान कायम राहण्याकरितां पालकांचें वर्तन दोषातीत असलें पाहिजे. पालकांच्या वर्तनांतील प्रत्येक दोष मुलांत तंतोतंत उतरेल हें म्हणणें तितकेंसें सत्यास धरून नाहीं. पालक स्वतःहि आपल्या दोषांचें अनुकरण मुलांनीं करूं नये या धोरणानेंच त्यांस वळण लावण्याचा शक्य तितका प्रयत्न करीत असतात. पण आईबापांचें वर्तन शुद्ध

नसल्यास सर्व कुटुंबाचें नैतिक वळण खालावतें. पालक हेच मुलाच्या वर्तनाचे लहान वयांतील आदर्श असल्यानें मुलांच्या दृष्टीसमोर उच्च ध्येय राहत नाहीं व याचा परिणाम मुलाच्या वर्तनावर पर्यायानें होणें अगदीं साहजिक आहे.

मुलाचें सद्वर्तन अगर दुर्वर्तन याबद्दल श्रेय अगर दोष यांपैकीं बराचसा भाग घरांतील वातावरण व शिस्त यांचेकडेच जातो. शाळांमधून अद्याप-पावेतों मुलांच्या वर्तनाचा विशेष विचार करण्याकडे व तें योग्य नसल्यास दुरुस्त करण्याचे उपाय योजण्याकडे फारसें लक्ष दिलें जात नाहीं हें खरें; पण उलट असेंहि म्हणतां येईल कीं, मुलाचें वर्तन मूळचें चांगलें असल्यास तें शाळेंत बिघडण्याचा संभवहि फार कमी असतो. हल्लींच्या शिक्षणपद्धतींत अनेक सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता सर्वांना मान्य आहे; परंतु शाळेंतील शिस्त व धोरण हीं कितीहि अपूर्ण असलीं अगर चालकांच्या दृष्टीनें तीं असमाधानकारक असलीं तरी सामान्य घरांमध्यें मुलांच्या वर्तनावर जितकें लक्ष ठेविलें जातें व जी शिस्त राखिली जाते त्यापेक्षां कितीतरी पटीनें ती चांगली असल्यामुळें दुर्वर्तनाचा दोष शाळेपेक्षां घरांतील परिस्थितीकडेच जास्त येतो. हें विधान सामान्यत: बरोबर असलें तरी शाळेंतील परिस्थितीचा परिणाम मुलाच्या मनावर अखंड होत असून नेहमींच तो इष्ट होतो असें नाहीं. त्यामुळें केव्हां केव्हां मुलाच्या दुर्वर्तनास शाळेंतील परिस्थिति अप्रत्यक्ष रीतीनेंहि कारणीभूत होऊं शकते.

## शाळेंतील परिस्थिति

सर्व शाळांची पद्धति व शिस्त या सारख्या नसतात. फार काय एकाच शाळें-तील शिस्तहि सर्वकालीं व सर्व वर्गांतून एकसारखी असत नाहीं. शिक्षकांच्या स्वभावांप्रमाणें व वर्गांतील मुलांच्या गुणदोषानुसार या गोष्टी बदलत असतात. शाळेचे नियम व अभ्यासक्रम हे सामान्यतः सर्व मुलांच्या दृष्टींनीं ठरविण्यांत येत असल्यामुळें एखाद्या विशिष्ट मुलाला ते कितपत मानवतील किंवा त्याच्या मनोवृत्तींवर त्यायोगें कोणता परिणाम होईल हें सांगणें शक्य नाहीं. मुलाच्या वयाला व स्वभावाला अनुरूप आणि त्याच्या शारीरिक व मानसिक शक्तींचा विकास होण्यास योग्य अशी शाळेंतील परिस्थिति असावयास पाहिजे. सर्व मुलांच्या मनोवृत्ति सारख्याच नसतात व त्यांच्या मानसिक विकासास

आवश्यक परिस्थितीहि निरनिराळी लागत असते; त्यायोगें एकच शाळा किंवा एकच वर्ग सर्व मुलांना सारखा मानवूं शकत नाहीं. अशी परिस्थिति उत्पन्न झाली म्हणजे शाळेंत जाणें मुलाला आवडत नाहीं, शाळा कंटाळवाणी होते व शाळा चुकविण्याचा तो शक्य तो प्रयत्न करूं लागतो. शाळा सोडून बाहेर पडल्यानंतर दुष्ट संगति व इतर मोह हीं त्याची पारख करण्यासाठीं टपूनच बसलेलीं असतात. घरच्या कडक शिस्तीमुळें शाळा चुकविणें अशक्य झाल्यास शाळेंतील अभ्यासाकडे लक्ष लागत नाहीं; इतकेंच नव्हे तर समानशील अशा इतर मुलांना हुडकून त्यांच्या संगतीनें शाळेंतील वातावरण बिघडवण्याचा व पर्यायानें इतर मुलांच्या वर्तनावरहि परिणाम करण्याचा प्रयत्न तो करतो.

मुलगा शाळेंत जाण्याचा कंटाळा करूं लागल्याबरोबर, सर्व दोष मुलाचा आहे, असें समजून पालकांनीं त्यास शिक्षा करण्याऐवजीं त्याची कारणमीमांसा करण्याकडे लक्ष देणें जरूर असतें. घरांतील मोकळें वातावरण सोडून शाळेंतील बंधन व शिस्त हीं सुरुवातीस थोडीं त्रासदायक वाटतात हें खरें; पण सामान्यतः ही भावना लवकरच नाहींशी होऊन मुलगा हौसेने शाळेंत जाऊं लागतो. परंतु मुलगा जेव्हां वारंवार शाळेचा कंटाळा करूं लागतो तेव्हां त्यास कांहीं तरी महत्त्वाचीं कारणें असलीं पाहिजेत हें उघड आहे. एखादा मुलगा मंद बुद्धीचा असल्यास शाळेंतील अभ्यास त्यास झेंपत नाहीं. वारंवार परीक्षेंत अपयश येऊन खालच्या वर्गांत राहण्याचा परिणाम असा होतो कीं, त्या मुलाच्या वर्गांतील बरींचशीं मुलें त्याच्यापेक्षां वयानें व शक्तीनें लहान असतात; पण त्यांच्यापेक्षां तो बुद्धीनें कमी असल्यानें इतर मुलांच्या थट्टेचा तो एक विषयच होऊन बसतो. त्यास स्वतःसहि बौद्धिक बाबतींत इतर मुलांपेक्षां आपलें श्रेष्ठत्व दाखवितां येत नसल्यामुळें त्यांना त्रास देऊन शारीरिक सामर्थ्याच्या बाबतींतील आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याचा मोह त्यास आवरणें कठीण पडतें. बुद्धिवान् मुलांच्या तुलनेनें आपल्या बुद्धीचा कमीपणा त्यास व इतरांसहि वाजवीपेक्षां जास्त भासूं लागतो व या बाबतींत त्याचा कमीपणा नैसर्गिक आहे व त्यांत त्याचा दोष नाहीं या गोष्टीकडे दुर्लक्ष होऊन इतर मंडळी त्यासच वारंवार दोष देऊं लागतात. या सर्वांचा परिणाम त्याच्या मनोवृत्तीवर होऊन त्याच्या अंगीं एक प्रकारचा निष्काळजीपणा येतो.

## दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

कमी बुद्धीच्या मुलाप्रमाणें अत्यंत बुद्धिवान् मुलालाहि शाळेंतील वातावरण प्रतिकूल होऊं शकतें. सामान्य बुद्धीच्या मुलांच्या मानानें ठरविलेले अभ्यास थोड्या वेळांत आटोपून टाकल्यानें बाकीच्या वेळांत तो निरुद्योगीच असतो व त्या वेळेचा त्यानें सदुपयोग करावा इकडे कोणाचें लक्ष नसल्यास खोड्या करण्यांतच तो वेळ घालविला जातो. या खोड्यांचें प्रमाण वाढत गेल्यास व त्यामुळें शिक्षकांच्या दृष्टीस त्याचें वर्तन आल्यास त्यास शाळेचा साहजिकच कंटाळा येऊं लागतो. पुष्कळ वेळां त्याच्या बुद्धिमत्तेमुळें शिक्षकांकडून त्यास जास्त सवलती मिळतात व त्याचा परिणाम स्वच्छंदी व अनियंत्रित वर्तनांत होतो. वर्गांतील मुलें त्याच्यापेक्षां कमी बुद्धीचीं असल्यामुळें व शिक्षकाच्या प्रशंसेच्या अतिरेकामुळें आपण फार श्रेष्ठ आहोंत अशी एक प्रकारची गर्विष्ठ वृत्ति उत्पन्न होते व त्या भरांत तो आपल्या सोबत्यांशीं नीट वागेनासा होतो.

हल्लींच्या शिक्षणपद्धतींत वेगवेगळ्या सांपत्तिक परिस्थितींत असलेलीं सर्व मुलें एकाच पद्धतीनें व एकाच शाळेंत शिकत असल्यामुळें गरीब मुलांचा व श्रीमंत मुलांचा अखंड सहवास घडत असतो. केव्हांकेव्हां याच्या योगानें गरीब मुलांना आपल्या श्रीमंत वर्गबंधूंची बरोबरी करण्याची इच्छा होते; परंतु तितक्या खर्चाची मुलांची हौस भागविणें त्यांच्या आईबापांना शक्य नसतें. याचा परिणाम त्यांच्या मनावर अनिष्ट होतो. आपल्या मित्रांशीं बरोबरीच्या नात्यानें राहण्यासारखी आपली स्थिति नाहीं याची जाणीव होण्याइतका जर तो मुलगा मोठा व समंजस नसला तर तो अन्य उपायांनीं आपली हौस भागविण्याचा प्रयत्न करील. हें शक्य झालें नाहीं अगर अनीतीचा अवलंब करण्याची त्याची तयारी नसेल तर तो मनांतल्या मनांत कुढतो व सामान्यतः शाळेंतील अभ्यासाकडे अगर इतर कामाकडे त्याचें लक्ष कमी होतें. केव्हां केव्हां एकाच वर्गांतील श्रीमंत व गरीब मुलें आपापले गट करितात व या गटांतून चुरशीचे सामने सुरू होतात.

### हस्तव्यवसाय

कांहीं मुलांना पुस्तकी शिक्षणाची आवड मुळींच नसते. हातांनीं काम करण्यांत त्यांचें कौशल्य व हौस हीं अवर्णनीय असतात; परंतु प्रचलित शिक्षणपद्धतींत हस्तव्यवसायाला स्थान नसल्यानें केवळ पुस्तकी शिक्षणावर भर

देणाऱ्या शाळेचा त्यांना तिटकारा वाटतो व अशा शाळेंत शिक्षण घेण्यास ते कंटाळा करूं लागतात. त्यांना बुद्धि कमी असते अगर इतर रीतींनीं त्यांच्यांत कांहीं उणेपणा असतो असें नाहीं, पण त्यांच्या विकासाची स्वाभाविक दिशा हस्तव्यवसायात्मक असल्यानें केवळ पुस्तकी शिक्षणानें त्यांची कुचंबणा होते. सक्तीनें शाळेंत जात असतांना वृत्ति असंतुष्ट राहते व म्हणून सवड सांपडेल तेव्हां शाळेचा अभ्यास सोडून आपल्या आवडत्या व्यवसायाकडे त्यांची प्रवृत्ति वळते. ही प्रवृत्ति नीट लक्षांत घेऊन तिचा विकास करण्याकडे लक्ष दिल्यास ते आपल्या कलेंत तर प्राविण्य संपादन करतातच, पण शाळेंतील इतर पुस्तकी ज्ञानहि—मनोवृत्ति संतुष्ट व समाधानी असल्यानें—त्यांना लवकर अवगत होतें, व त्यांच्या सर्व वृत्तींचा योग्य विकास होऊं शकतो.

मुलांना स्वभावतःच स्वस्थ बसणें आवडत नाहीं. त्यांचा क्रियाप्रचुर स्वभाव प्रसिद्धच आहे. शाळांमधून दिवसाचे पांच सहा तास स्वस्थ बसून वाचनलेखन करविण्याकडे प्रवृत्ति असलेल्या ह्या शाळा त्यांच्या नैसर्गिक स्वभावाच्या विरुद्ध असल्यानें त्यांस कधींच आवडत नाहींत. ही प्रवृत्ति लक्षांत घेऊन अलीकडे शिक्षणपद्धतींत क्रियात्मक भाग वाढविण्याकडे सुधारणा करणाऱ्यांचें लक्ष लागलें आहे हें प्रसिद्धच आहे. सामान्य मुलांचा हा चापल्यप्रिय स्वभाव कांहीं मुलांमध्यें जास्त प्रामुख्यानें दिसून येतो व अशा मुलांना शाळेंत जाणें ही एक प्रकारची शिक्षाच वाटते.

## करमणुकीचीं साधनें

लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना करमणुकीची व खेळाची आवश्यकता असते. सर्व दिवस कामाची दगदग करून आलेला शीण घालविण्याकरितां मोठ्या माणसांना करमणुक लागते व त्याकरितां प्रत्येकाच्या सोयीप्रमाणें प्रत्येकजण आपापली व्यवस्था पहात असतो. मुलांच्या बाबतींत करमणुकीचें व खेळाचें महत्त्व वडील माणसांप्रमाणें केवळ मनोरंजनाचें किंवा वेळ घालविण्याचें साधन इतकेंच नाहीं. त्यांच्या मानसिक शक्तींचा योग्य व स्वतंत्र रीतींनीं विकास होण्याचें तें एक साधन असल्यामुळें खेळाची प्रवृत्ति स्वाभाविक आहे व ती दडपून टाकणें अत्यंत हानिकारक आहे. सर्व वयांच्या मुलांना खेळांचा व करमणुकीचा ओढा अत्यंत असतो. तो योग्य मार्गानें पुरविण्याची व्यवस्था झाली नसल्यास अयोग्य मार्गानें करमणुकीचीं साधनें

संपादन करण्याचा ते प्रयत्न करितात. सामान्यत: या बाबतींत मुलांची सोय-गैरसोय पाहण्याकडे फार थोड्या पालकांचें लक्ष असल्यानें मुलांच्या दुर्वर्तनांत या करमणुकीच्या साधनांचा अभाव अगर त्यांची अयोग्य रीतीनें केलेली सोय या गोष्टी प्रामुख्यानें आढळून येतात.

शहरांतील राहणींत कुटुंबाच्या वांट्यास येणारी जागा दिवसेंदिवस संकुचित होत चालल्यानें मुलांच्या वांट्यास त्यांतील अत्यंत अल्पसा भाग येतो. अर्थात् घरीं खेळण्यास पुरेशी जागा नसल्यानें घराच्या बाहेर जाण्याशिवाय मुलांना गत्यंतर नसतें. मुंबईसारख्या शहरांत रस्त्यांतून मुलांना कोणतीं दृश्यें दिसतील व त्यांचे परिणाम त्यांच्या कोमल मनोवृत्तींवर काय होतील यांचें वर्णन करण्याची आवश्यकता नाहींच. बाहेरील संगति व वातावरण यांचे अनिष्ट परिणाम मुलांवर होऊं नयेत, याकरितां मुलांना करमणुकीची व खेळांची जरूर ती सोय पालकांनीं करून दिली पाहिजे. मुलगा हाहि कुटुंबांतील एक व्यक्ति आहे म्हणून इतर व्यक्तींप्रमाणें त्याच्याहि गरजा पुरविण्याकडे पालकांनीं पाहिलें पाहिजे. घरांतील प्रपंचाच्या दगदगीनें त्रासलेली आई किंवा कामावरून दमूनभागून घरीं आलेले वडील यांना मुलगा खेळ खेळत असला तर त्यांत मदत करण्यास किंवा त्याच्या करमणुकीच्या आनंदांत वांटेकरी होण्यास फुरसत व हौस रहात नाहीं ही गोष्ट खरी; पण मुलाच्या मनावर याचा परिणाम अत्यंत अनिष्ट होतो व आपल्या करमणुकीच्या आनंदाचे मदतनीस अगर वांटेकरी शोधण्याकरितां त्याला घराबाहेर जावें लागतें; आणि वर्तन बिघडण्यास तेथूनच सुरुवात होते. बाहेरची राहणी—विशेषत: शहरांतील—फार मोहमयी असते. स्टेशनें व त्यांवरील गाड्यांची व माणसांची रहदारी, नाना प्रकारच्या वस्तूंनीं शृंगारलेले बाजार, नाटकें, सिनेमा इत्यादि करमणुकीचीं स्थळें वगैरे गोष्टी मुलांच्या सहज प्रवृत्तींना उत्तेजक व मोह पाडणाऱ्या असतात. या सर्वांच्या अखंड हल्ल्यांपुढें मुलांच्या कोमल मनोवृत्तींचा टिकाव लागावयाचा असेल तर त्यांना घरांतील आईबापांच्या साहाय्याचें, प्रोत्साहनाचें व सहानुभूतीचें भरपूर पाठबळ असणें अवश्य आहे.

## जुगारी वृत्ति

जुगाराचे नाना प्रकार करमणुकीचीं साधनें म्हणून खेड्यांतून व शहरांतून सुरू असतात. साधी पैज मारण्यापासून सुरुवात होऊन पत्ते, गोट्या इत्यादि

खेळांतून, लॉटरी इत्यादि रूपांनीं व अखेर घोड्यांच्या शर्यतींच्या मैदानापर्यंत नाना रूपांनीं ही जुगारी वृत्तीच दृग्गोचर होत असते. हिचे परिणाम मुलांच्या मनावर फार घातुक होतात. ज्ञानतंतूंना उत्तेजकांची जरूर नेहमींच भासत असते व त्यांची ही हौस जशी जुगारांच्या अड्यांवर तृप्त होते तशी इतरत्र क्वचितच होईल. घटकोघटकीं बदलणारे नशिबाचे खेळ न खेळणाऱ्या प्रेक्षकांचेंहि मन रिझविण्यास पुरेसे होतात. मग स्वतःची करमणूक करून घेऊन इतरत्र आलेलें मनाचें औदासिन्य घालविण्याच्या हेतूनें तेथें आलेल्या मुलाला आनंदच वाटेल यांत आश्चर्य नाहीं. जुगारांत श्रमाशिवाय पैसा मिळूं शकतो म्हणून विशेषसे श्रम न करितां पैसे मिळविण्याची खोटी आशा उत्पन्न होते व या आशेच्या मागें एकदां लागलेला मुलगा सुख मिळविण्याकरितां श्रम करण्यास असमर्थ होतो; इतकेंच नव्हे तर श्रम करण्यांतहि त्याला आनंद वाटत नाहीं. जुगारांनीं पैशाची प्राप्ति होते ही आशा अगदीं चुकीची आहे. पैसे मिळतील त्यापेक्षां केव्हांहि जास्त जातात; पण जुगाराच्या दुष्परिणामांत सर्वांत जास्त महत्त्वाचा दुष्परिणाम असा कीं, त्यायोगें हलक्या लोकांची संगति जडते व एकदां त्या संगतींत प्रवेश झालेला मुलगा दुर्वर्तनाच्या पुढील पायऱ्या भराभर आक्रमूं लागतो.

## सिनेमाचे दोष

मुलांच्या दुर्वर्तनाचा बराचसा दोष हल्लींच्या वाढत चाललेल्या सिनेमाच्या प्रवृत्तीकडे आहे असा सामान्य समज आहे. दिवसेंदिवस सिनेमा हें करमणुकीचें फार लोकप्रिय साधन होत चाललें आहे ही गोष्ट खरी; व आपल्या देशांत दाखविण्यांत येणारे बरेचसे चित्रपट परदेशांतील लोकांच्या अभिरुचीस अनुसरून परदेशांत तयार केलेले असल्याकारणानें आपल्याकडील चालीरीतींशीं ते अत्यंत विसंगत असतात हेंहि अगदीं खरें आहे. परंतु सिनेमामुळें दुर्वर्तनाची प्रवृत्ति किती प्रमाणांत वाढूं लागते, हा बराच विचाराचा मुद्दा आहे. बऱ्याचशा चित्रपटांचीं कथानकें धाडसांच्या कृत्यांचीं व प्रेमविषयक असतात व त्यांत नायकांचीं कृत्यें बरींचशीं अतिशयोक्तिपूर्ण दाखविलेलीं असतात. परंतु, त्या कृत्यांमुळें दुर्वर्तनाची प्रवृत्ति उत्पन्न झाल्याचीं किंवा त्या कृत्यांचें अनुकरण करणारीं उदाहरणें फारशीं आढळत नाहींत. एखादा खेळ पाहून आल्यानंतर त्यांतील पात्रांचें अनुकरण मुलें खेळतांना करतात; पण त्या

अनुकरणाची व्याप्ति खेळापुरतीच मर्यादित असते. इतकें मात्र खरें कीं, मूळची प्रवृत्ति दुर्वर्तनाकडे जाणारी असल्यास चित्रपटांतील प्रसंगांनीं ती जागृत होते आणि साधनांची व योजनांची सूचनाहि केव्हांकेव्हां त्यांपासून ग्रहण केली जाते; पण अशा सर्व ठिकाणीं दुर्वर्तनाची प्रवृत्ति चित्रपटांनीं उत्पन्न झालेली नसून तिचीं कारणें निराळींच असतात. सिनेमा पाहण्याचा नाद व्यसनाइतक्या तीव्र थराला जाऊं शकतो व प्रसंगीं पैसे चोरून सिनेमाला जाणारीं मुलें आढळतात हें खरें; पण या ठिकाणीं कार्यकारण संबंध वाटतो तितका महत्त्वाचा नाहीं. चोरी करण्याच्या प्रवृत्तीचा अशा तऱ्हेनें सिनेमा-प्रमाणें पुष्कळ गोष्टींशीं संबंध जोडतां येईल.

सिनेमांतील मुख्य दोष असा कीं, त्यांतील बहुतेक सर्व चित्रपट अत्यंत उत्तेजक ( क्षोभक ) असतात. नाना प्रकारांचीं दुष्ट कृत्यें करणारा मनुष्य हा त्यांचा नायक असून त्याचीं धाडसाचीं कृत्यें इतक्या उठावदार रीतींनीं मनावर ठसविलीं जातात कीं, अखेर त्याचा जरी पराभव दाखविला असला, तरी त्याच्या या धाडसी जीवनापुढें तो पराभव स्मरणांतहि रहात नाहीं. दुष्ट कृत्यांचें फळ दुःखच असतें हें ठसविण्याकरितां कथानकें रचलेलीं नसून धाडसांच्या कृत्यांनीं मनोरंजन करण्याचा त्यांचा मुख्य हेतु असतो व म्हणून दुष्टांचा पराभव इतक्या सौम्य रीतीनें दाखविला असतो कीं, मुलांच्या तो लक्षांतहि येत नाहीं. मुलांच्या मनांवर या कृत्यांच्या उठलेल्या ठशांचा परिणाम अप्रत्यक्ष रीतीनें त्यांच्या सर्व कृत्यांवर होत असतो. सामान्यतः चित्रपटांतून वैषयिक प्रेम व स्त्रियांच्या शृंगारचेष्टा अत्यंत मनोवेधक व उत्तान रीतीनें दाखविल्या जातात. पाश्चात्यांच्या चालीरीती आपल्यापेक्षां भिन्न असल्यानें परदेशी चित्रपटांतून याचा अतिरेक कल्पनातीत असतो. या सर्वांचा परिणाम मुलांवर कसा होत असेल याची कल्पनाच करावी. ऐकलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टींपेक्षां पाहिलेल्या गोष्टी मनावर जास्त स्पष्ट ठसतात व मनाची खळबळ उडवून सोडणारा प्रसंग एकदां डोळ्यांनीं पाहिल्यानंतर तो विसरणें पुष्कळांना शक्य होत नाहीं. त्याच न्यायानें चित्र-पटांतील देखावे व प्रत्यक्ष पाहिलेलीं कृत्यें मुलांच्या दृष्टीसमोर अहर्निश राहतात व त्यांचें मानसिक जीवन कष्टप्रद करितात. सामान्य मुलांची ही स्थिति. त्यांत ज्यांचे विकार चंचल असतात, किंवा चित्रपटांनीं सूचित

केलेली कोणतीहि गोष्ट विचार केल्याशिवाय आचरणांत आणण्याकडे ज्यांची प्रवृत्ति असते अशांच्या मनावर तर हा वैषयिक ताण अगदीं असह्य होतो. शृंगारिक कादंबऱ्या किंवा गोष्टी यांच्या योगानेंहि असेच परिणाम घडतात; पण चित्रपटांतील सृष्टि प्रत्यक्ष असल्यानें तिचे परिणाम जास्त तीव्र होतात. शहरांतील सिनेमागृहांतून दाखविल्या जाणाऱ्या सर्व चित्रपटांची कसोशीनें छाननी करून लहान मुलांना, तरुण मुलांना व प्रौढ स्त्रीपुरुषांना पहाण्यास योग्य अशा चित्रपटांचें निराळें वर्गीकरण करण्यासाठीं परीक्षक-मंडळें इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांत नाहींत ही दुःखाची गोष्ट होय.

## संगतीचे परिणाम

आपल्या मुलाच्या दुर्वर्तनाचीं कारणें दाखवितांना 'अमक्याच्या संगतीनें माझा मुलगा बिघडला,' असें विधान बहुतेक आईबाप करितात. एखाद्या आळींतील अगर मुंबईच्या एखाद्या चाळींतील बिघडलेल्या मुलांची चौकशी करूं लागलों तर प्रत्येक मुलाचा बाप आपल्या शेजाऱ्याच्या मुलाला दोष देतांना आढळतो. सर्वांनीं एकमेकांना बिघडाविलें हें जरी खरें धरलें तरी या सर्वांना बिघडविणारा कोण, याचें उत्तर कांहीं त्यानें मिळूं शकत नाहीं. संगतीचा परिणाम वाईट होतो व जी गोष्ट मुलानें एकटें असतांना केली नसती ती तो सोबत्यांच्या संगतींत करतो ही गोष्ट खरी आहे. आपल्या बरोबरीच्या संवगड्यांच्या समूहांत बसून स्वतःच्या पराक्रमाचें रसभरित वर्णन करणारा मुलगा त्या वर्णनाला कमीपणा न येण्याबद्दल फार जपत असतो व पुष्कळ वेळां आपली ही पराक्रमाची कीर्ति कायम ठेवण्याकरितांच अनेक कृत्यें करीत असतो. त्या समूहांत दुसऱ्याच्या मनोविकारांना प्रोत्साहन देण्याची कला अवगत असलेला एखादा सोबती असल्यास तो आपल्या मित्रांना कधीं चढवून, कधीं थोडीशी निर्भर्त्सना करून आपणांला इष्ट असलेलीं कृत्यें करावयास कशीं लावतो हें समजण्याकरितां त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहावयासच हव्यात. शिक्षकांनीं किंवा आईबापांनीं केवळ सद्बुद्धीनें केलेल्या कृत्यांकडेहि निराळ्या दृष्टिकोनानें पाहण्यास त्यांना तो शिकवितो व अशा रीतीनें आईबापांचे सर्व प्रयत्नहि अशा मित्रामुळें व्यर्थ होतात.

या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी दुष्ट संगति हें दुर्वर्तनाचें मूळ कारण फार थोड्या वेळां असतें. मुलाची मनोवृत्ति इतर अनेक कारणांनीं दूषित

झालेली असल्यास तीवर होणारे कोणतेहि सूचक आघात फार लवकर ग्रहण केले जातात. अशा वेळीं संगतीचे परिणाम तात्काल होतात व ते बराच वेळ टिकतात. मूळचा सद्वर्तनी मुलगा वाईट संगतीनें सहसा बिघडत नाहीं. कारण अशा संगतींत तो सहसा मिसळत नाहीं व क्वचित् इतर आनुषंगिक कारणां-मुळें मिसळल्यास तो त्या संगतींतून लवकर सुटून आपल्या पूर्वमार्गावर येतो. असा एखादा सामान्यत: सद्वर्तनी समजला जाणारा मुलगा संगतीनें बिघडूं लागल्याचें आढळल्यास केवळ संगतीसच दोष देऊन स्वस्थ न बसतां कारण-परंपरेची सूक्ष्म छाननी करावयास हवी. घरीं योग्य तऱ्हेनें करमणूक करून घेण्याची सोय नसली तर संगतीची जरूर भासणें स्वाभाविक असते व मुलाला नाइलाजास्तव कोणाच्या तरी सहवास पत्करावा लागतो. सहवासाची इच्छा सर्वांना सामान्य तर असतेच. त्यांत एखाद्या मुलांत ती वृत्ति जास्त तीव्र असते व अशा मुलाला सोबत्याशिवाय करमतच नाहीं. घरीं आईबापांची वागवणूक योग्य नसली तर जेथें आपल्याला जास्त मान मिळतो अशा आपल्या संव-गड्यांकडे जाण्याची प्रवृत्ति साहजिकच होते. अशा अनेक कारणांमुळें वाईट मुलांची संगति जडत असते.

## संगति कशी जडते

पुष्कळ वेळां घरीं सद्वर्तनी समजला जाणारा मुलगा खरोखरी सद्वर्तनी नसतो. स्वत:चे अपराध शक्य तितके वडिलांच्या नजरेस न येऊं देतां आपले उद्योग चालविणारा मुलगा दुसऱ्याच्या संगतीनें उनाडपणांत जास्त प्रगति करूं लागला तर संगतीसच केवळ दोष देणें योग्य होणार नाहीं. स्वत:ची बुद्धि फारशी नसलेला किंवा शरीरानें अशक्त असलेला मुलगा घरीं सद्वर्तनीच समजला जातो. कारण आईबापांच्या सांगण्याप्रमाणें करण्या-पलीकडे घरीं त्यास कांहीं काम नसतें. स्वतंत्र विचार करण्याची ह्याची शक्ति बेताचीच असते, म्हणून बाहेरच्या जगाशीं संबंध आल्याबरोबर सोबती सांगतील त्याप्रमाणें वागण्यास तो सहज तयार होतो; किंवा स्वत:च्या अशक्तपणामुळें घरीं न साधणाऱ्या गोष्टी सोबत्यांच्या मदतीनें सहज साध्य करण्याची त्यास इच्छा होते. मुलांच्या मनोवृत्ति फार नाजूक असल्यानें त्या सहज दुखविल्या जातात. एखाद्या मुलाला कांहीं शारीरिक व्यंग असलें तर इतर मुलें त्याला चिडवितात; एखाद्याच्या कुटुंबांतील एखाद्या प्रमुख व्यक्तीचें

वर्तन थोडें दोषास्पद असलें अगर कुटुंबाच्या उपजीविकेचा धंदा विशेष प्रतिष्ठित समजला जात नसला तर तो उणेपणाहि मुलें काढल्याशिवाय राहत नाहींत; सर्व मुलांच्या वागण्याच्या पद्धति सारख्याच नसल्यानें एखाद्याची वागण्याची रीत सोबत्यांना आवडण्यासारखी नसते; अशा अनेक कारणांमुळें मुलाला आपल्यास अनुरूप अशा सद्वर्तनी सोबत्यांची संगति मिळवितां येत नाहीं व अशा वेळीं वर्तनानें स्पृहणीय नसलेल्या मुलांच्या संगतींत त्याला काल घालवावा लागतो. या सर्व विवेचनाचा अर्थ असा नाहीं कीं, संगतीनें दुष्परिणाम होतच नाहींत, किंवा सद्वर्तनी मुलानें वाटेल त्याची संगति धरली तरी त्याचें वर्तन बिघडूं शकत नाहीं. वर्तन बिघडविणारें संगति हें एकत्र महत्त्वाचें कारण नसतें. इतकेंच नव्हे तर पुष्कळ वेळां तें दुय्यम-प्रेरक-कारण असतें. इतर आनुषंगिक पोषक कारणांच्या समुच्चयानें मनोवृत्ति विशिष्ट तऱ्हेची तयार झाल्यामुळें तिचा वर्तनावर परिणाम होतो.

बरोबरीच्या दूषित मुलांची संगति ज्याप्रमाणें केव्हां केव्हां हानिकारक ठरते त्याच प्रमाणें मोठ्या माणसांच्या संगतीनेंहि मुलें बिघडतात. मोठीं माणसें दुर्वर्तनाचें प्रत्यक्ष शिक्षण क्वचितच देतात, पण त्यांच्या सहवासानें मुलांच्या दृष्टीसमोर उच्च ध्येय राहत नाहीं. स्वभावानें गोड व दिसण्यांत गोंडस असलेलीं लहान मुलें बहुतेक सर्वांना प्रिय होतात. पण अशीं मुलें मोठ्या माणसांच्या लाडानें बिघडण्याचा संभव पुष्कळ असतो.

संगतीचा दुसराहि एक परिणाम शाळांमधून अनेक वेळां दिसून येतो. प्रत्येक मुलगा एकटा असतांना जी गोष्ट करणार नाहीं तीच गोष्ट अनेक मुलें एकत्र जमलीं म्हणजे करण्यास धजावतात. एखाद्या समूहाचें वर्तन हें त्यांतील व्यक्तींच्या वर्तनाची बेरीज नसतें; तर त्यांतील अत्यंत खालच्या प्रतीच्या मुलाचें जें वर्तन ते समूहाचें वर्तन होतें. ती गोष्ट त्या समूहानें केली या जाणीवेनें प्रत्येकाकडे व्यक्तिशः जबाबदारी अत्यंत अल्प येत असते. म्हणून ज्या प्रवृत्ति इतर वेळीं नियंत्रित असतात त्यांना समुदायांत वाव मिळतो, व अशा तऱ्हेनें जें वर्तन घडतें तें त्या समुदायांतील कोणत्याच व्यक्तीस व्यक्तिशः संमत नसतें. एखादी सभा उधळून लावावयाची असली अगर एखाद्या शिक्षकाविरुद्ध तक्रार करावयाची असली तर ती गोष्ट किती सोपी आहे हें त्यांतील मर्म जाणणाऱ्यांस माहीत असतें. अशा रीतीनें समुदायांत सांपडल्या-

मुळें सद्वर्तनी मुलांच्या हातूनहि आक्षेपणीय वर्तन घडत असलें तरी त्याबद्दल व्यक्तिशः त्यांस दोष देणें हितावह होत नाहीं.

सामान्य माणूस दुर्वर्तनाच्या कारणांचा जों जों जास्त विचार करूं लागतो तों तों एखाद्या चक्रव्यूहांत सांपडून भांबावून गेल्यासारखी त्याची स्थिति होते. अमुक एक कारण महत्त्वाचें समजून त्याचा विचार करूं लागावें तोंच सर्व ठिकाणीं तें कारण अस्तित्वांत असूनहि दुर्वर्तन न घडल्याचीं उदाहरणें त्याला आढळूं लागतात. सर्वस्वीं प्रतिकूल परिस्थितींतून अत्यंत सदाचारी पुरुष निर्माण होतात, तर सर्व गोष्टींची अनुकूलता असतांनाहि स्वतःच्या वर्तनानें जगाला कलंक लावणारीं रत्नें कांहीं कमी सांपडत नाहींत! अशी स्थिति असल्यामुळें सर्व गोष्टींचा तुलनात्मक रीतीनें विचार केल्याशिवाय एखाद्या गोष्टीसच महत्त्व देण्यानें मुलांचें वर्तन सुधारण्याच्या दृष्टीनें कांहींहि मदत होऊं शकत नाहीं. या बाबतींत कांहीं सामान्य सिद्धांत ठरवून त्या अनुरोधानें एखाद्या मुलाच्या वर्तनाचा विचार न करतां प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणें विचार करून त्याची विशिष्ट मनोवृत्ति तयार होण्यास कोणतीं कारणें घडलीं असावींत याचाच विचार करावयास पाहिजे. अमुक कारणांनीं अमुक गोष्ट घडते असें म्हणण्यापेक्षां अमुक कारणांचा मुलांच्या मनोवृत्तींवर अमुक तऱ्हेचा परिणाम होणें शक्य आहे व जर तो परिणाम त्या तऱ्हेचा झाला असेल तरच दुर्वर्तन घडतें अशीं विधानें करणेंच शास्त्रीयदृष्ट्या बरोबर होईल. एकाच परिस्थितीचा प्रत्येकाचे मनोवृत्तीवर भिन्न तऱ्हेनें परिणाम होत असल्यानें परिस्थितीचा विचार करीत असतांना परिस्थितीमुळें मनोवृत्तीवर होणाऱ्या परिणामांचा विचार करणें जास्त आवश्यक आहे.

## प्रकरण आठवें

# अंतःकलह व इतर कारणें

### कलह आवश्यक आहे

कलह हेंच जीवनाचें स्वरूप आहे. सृष्टींतील प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्याकरितां जे गुण व्यक्तीला उपयोगीं पडले त्याच गुणांचा विकास झाला आणि ते गुण अंगीं असलेल्या किंवा संपादन करूं शकलेल्या व्यक्ति जगांत टिकाव धरूं शकल्या. आज ह्यात असलेल्या सर्व प्राण्यांना पिढ्यानुपिढ्या प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर द्यावी लागली आहे आणि ह्या झगड्यामुळेंच त्यांचे अंगी अनेक गुणांचा विकास झालेला आहे. म्हणून परिस्थितीशीं करावा लागलेला हा झगडा त्याज्य समजण्याचें मुळींच कारण नाहीं. उलट त्या कलहामुळें व्यक्तींतील जोमाचा व सुप्त गुणांचा आविष्कार होण्यास मदतच होत असते. या दृष्टीनें जीवनार्थ कलह हा अनेक अर्थांनीं व्यक्तीला व जातीलाहि उपकारकच होतो. स्वतःच्या अस्तित्वाकरितां प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत असतांना मानवी समाजांत ज्याप्रमाणें कांहीं विशिष्ट गुणांचा विकास होतो त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्यव्यक्तीलाहि बाळपणापासून कराव्या लागणाऱ्या या कलहामुळेंच मनोवृत्तीला विशिष्ट वळण लागतें आणि हें वळणच त्या व्यक्तीचें समाजांतील स्थान निश्चित करतें.

परिस्थितीशीं कराव्या लागणाऱ्या या कलहाचें महत्त्व मानसिक सद्गुणांचा विकास घडवून आणण्याचे कामीं किती आहे हें लक्षांत न आल्यामुळें कितीतरी पालक आपल्या मुलांना योग्य वळण लावण्यास असमर्थ होतात. मुलांचा मार्ग वाजवीपेक्षां अधिक सोपा केल्यानें त्यांच्या शीलविकासाच्या मार्गांत आपण अडचणीच उत्पन्न करून ठेवीत असतों. स्वतःच्या कष्टानें गरिबींतून मार्ग काढून ऊर्जितावस्थेस आलेल्या बापाला आपल्या मुलाला आपल्यासारखे कष्ट पडूं नयेत अशी इच्छा असणें स्वाभाविक आहे. पण त्या इच्छेस अनुसरून मुलांना सर्व सुखसोयी अनुकूल करून देतांना त्यांच्या अंगीं असलेल्या गुणांचा विकास घडवून आणण्यासारखी परिस्थिति प्रायः राखिली जात नाहीं. सुखवस्तु कुटुंबांत सर्व सोयी अनुकूल असतांना कृत्रिम दारिद्र्य उत्पन्न

करणें शक्य नाहीं व पुष्कळ वेळां इष्टहि नाहीं. तरीहि स्वावलंबन, स्वाभिमान व आत्मसंयमन या गुणांचा विकास होण्याकरितां जरूर त्या संवयी लावण्यासारखी परिस्थिति मुद्दाम राखणें अवश्य आहे. कलह हाच आयुष्यांतला आनंद आहे. प्रत्येक वेळीं परिस्थितीशीं झगडून विजयाचा जो आनंद मिळतो, त्यायोगें नवीन झगडा करण्यास जास्त सामर्थ्य आणि उत्साह येतो व अशानेंच आयुष्य सुखावह होत असतें.

### मानसिक कलह

परिस्थितीशीं कराव्या लागणाऱ्या या बाह्य कलहाप्रमाणेंच मनोवृत्तीशीं होणाऱ्या अंतःकलहाचेंहि वर्तनावर महत्त्वाचे परिणाम घडून येतात. दोन परस्परविरोधी प्रवृत्ति किंवा इच्छा उत्पन्न झाल्या असतां, किंवा स्वतः ठरविलेलें आयुष्याचें अगर वर्तनाचें ध्येय यांच्याशीं मनःप्रवृत्तींचा विरोध आला असतां मानसिक अंतःकलहास सुरुवात होते. अशा वेळीं विचारी मनुष्य किंवा प्रामाणिक व आत्मवंचना न करणारा मुलगा या विरोधी प्रवृत्तींचा उघडपणें समाचार घेऊन आपलें वर्तन ठरवितो. परंतु सर्वच व्यक्ति या अंतःकलहाची वासलात इतक्या मोकळ्यापणें लावतात असें नाहीं. व्यवहारांतील युद्धांत शत्रूंशीं गांठ पडली असतां उघड युद्ध करून जय मिळविण्याचा राजमार्ग सोडून गुप्त छापे घालण्याची पद्धति कांहींना आवडते. त्याचप्रमाणें या मनःप्रवृत्तींच्या युद्धांतहि मनोवृत्तींना दडपून टाकून, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून किंवा आपला पराजय झाला असतांना जयाचा खोटाच आविर्भाव करून मनुष्य जेव्हां वागूं लागतो तेव्हां या अंतःकलहाचे खरे तीव्र परिणाम दिसूं लागतात. विरोधी प्रवृत्तींपैकीं अप्रिय प्रवृत्ति दडपून टाकण्याचा प्रयत्न केल्यावर ती दडपली जाते, निदान तसा भास होतो हें खरें; पण वस्तुतः तिचें अस्तित्व नाहींसें होऊं शकत नाहीं. मनाला समुद्राची उपमा देऊन मनांत उत्पन्न होणाऱ्या वृत्ति ह्या त्यांतील लाटा आहेत अशी कल्पना करूं. शांत समुद्राच्या पृष्ठभागावर उत्पन्न होणाऱ्या लाटा स्पष्ट लक्षांत येणाऱ्या असून ठराविक मार्गानें जातांना आढळतात. पण पाण्याच्या सपाटीखालीं मधून मधून आपलें डोकें वर दाखविण्यास उत्सुक असलेला खडक लपलेला असेल तर ह्या पृष्ठभागावरील लाटांच्या तालबद्ध गतीला तो विकृत स्वरूप देऊन त्यांच्यांत खळबळ करून सोडतो. त्याचप्रमाणें अप्रिय म्हणून

दडपलेली प्रवृत्ति मनःसमुद्राच्या पृष्ठभागाखालीं—आपल्या जाणीवेच्या क्षेत्राच्या जरा खालीं—लपून राहते व आपल्या लक्षांत आलें नाहीं तरी मनोवृत्तींत खळबळ उडविण्यास कमी करीत नाहीं. अशा रीतीनें दडपलेल्या ह्या वृत्तीला अनुद्बुद्ध अवस्थेंतील वृत्ति असें म्हणतां येईल. अनुद्बुद्ध अवस्थेंत कायम असलेली ही वृत्ति निरनिराळ्या रूपांनीं डोकावूं लागते व मुलांच्या वर्तनावर परिणाम करते. मुलांचें वर्तन पुष्कळ वेळां चमत्कारिक होतें; त्याचीं कारणें किंवा संगति इतरांना तर लावतां येत नाहींच पण मुलाला स्वतःलाहि समजूं शकत नाहीं, याचें मुख्य कारण पुष्कळ वेळां अनुद्बुद्ध अवस्थेंतील या दबलेल्या प्रवृत्तीच असतात.

## कलहांची सुरुवात

या दबलेल्या प्रवृत्तींशीं तीव्र मनोविकारांचा अर्थातच संबंध असतो. कारण त्या प्रवृत्तींच्या योगें तीव्र मनोविकार उत्पन्न होत नसते तर त्यांना दाबण्याचें कारणच पडलें नसतें. तीव्र मनोविकारांच्या संबंधामुळेंच त्या दाबून टाकाव्या लागतात व त्या मनोविकारांमुळेंच त्या निरनिराळ्या रूपांनीं वर डोकें काढून वर्तनावर वारंवार परिणाम करीत असतात. असा अंतःकलह उत्पन्न होण्याचीं कारणेंहि अर्थातच मनोविकारांशीं संबंध असलेलींच असतात. त्यांपैकीं महत्त्वाचीं कांहीं कारणें पुढीलप्रमाणें. (१) पालक किंवा शिक्षक यांच्यावर मुलांचा विश्वास असतो व दिवसेंदिवस तो अधिक दृढ होत जावा अशा तऱ्हेनें शिक्षण देण्याची सर्व बाजूंनीं खटपट चालू असते. असें असतांना शिक्षकांनीं किंवा पालकांनीं असत्य भाषण किंवा फसवणुकीचे प्रकार केल्यास मुलांच्या मनाला धक्का बसतो. त्यांचें मन द्विधा होऊन मनांत तीव्र अंतःकलह उत्पन्न होतो. पालकांवर आजपर्यंत असलेली श्रद्धा व आदर हीं एकीकडे मनाला ओढीत असतात तर त्यांचें असत्य किंवा अविश्वासाचें आचरण मनाला दुसरीकडे ओढून त्यांच्यावर श्रद्धा ठेवण्यांत स्वतःची झालेली फसवणूक उघड करीत असतें. ( २ ) स्वाभिमानाचे गोडवे गाणारी पुष्कळ वडील मंडळी मुलांच्या स्वाभिमानाबद्दल फारच थोडा आदर दाखवितात. स्वाभिमानाला धक्का बसलेला कोणालाच आवडत नाहीं; नाजुक मनोवृत्तीच्या मुलांना तर हा अपमान विशेष जाणवतो. ज्यांच्याकडून प्रेमाची अपेक्षा मुलें करतात, त्यांनींच मुलांचा छळ केल्यास किंवा त्यांच्यावर खोटे

आरोप करून अपमान केल्यास मुलांच्या मनोवृत्ति दुखविल्या जाऊन तीव्र मानसिक कलह सुरू होतो. (३) पुष्कळ वेळां दिसण्यांत क्षुल्लक भासणारीं कारणेंहि अशा मनःकलहांच्या पाठीमागें असतात. तोतरेपणा, डावखोरेपणा किंवा ह्यांसारख्या दुसऱ्या एखाद्या शारीरिक विकृतीमुळें मुलें त्याला चिडवतात. त्याचा परिणाम तीव्र अपमानाच्या भावनेंत होतो व सर्व समाजाविषयींच अतिशय तिरस्कार उत्पन्न होऊन केव्हां केव्हां संगति टाळून एकलकोंडे बनण्याची तर केव्हां समाजावर सूड घेण्याची भावना बळावते. (४) सर्व मनोविकारांमध्यें रतिप्रवृत्तीमुळें उत्पन्न होणारे विकार अतिशय तीव्र स्वरूपाचे असतात व साहजिकच त्यासंबंधीं उत्पन्न होणारा अंतःकलहि तितक्याच तीव्र स्वरूपाचा असतो. शारीरिक विकासाच्या अनुषंगानें उत्पन्न होणारी स्वाभाविक रतिविषयक प्रवृत्ति ही अंतःकलहाचें कारण कधींच नसते. परंतु समाजाची शिकवण किंवा वडील मंडळींचें ह्यासंबंधींचें नियंत्रण ज्या प्रकारचें असेल त्या मानानें हा कलह तीव्र स्वरूप धारण करितो. ह्यासंबंधीं वडील मंडळींच्या अनुभवाचा किंवा मार्गदर्शकत्वाचाहि उपयोग मुलाला सहसा होऊं शकत नाहीं, त्यामुळें ह्या कलहाचा सर्व बोजा मुलाला एकट्याला सहन करावा लागतो आणि त्याच्या प्रतिक्रिया अधिक तीव्र होतात.

अशा तीव्र मनःकलहामुळें वर्तनावर कोणत्या प्रकारचे परिणाम होतात हें निश्चित सांगतां येणें शक्य नाहीं. अनेक कारणांमुळें या अनुद्बुद्ध अवस्थेंतील मनोवृत्तींचें एका विशिष्ट प्रकारच्या क्रियांशीं साहचर्य घडून येतें व त्यामुळें या मनोवृत्तींचा क्षोभ झाल्यास दुर्वर्तन घडूं लागतें. मोठ्या प्रयासानें दडपून टाकलेल्या या मनोवृत्ति वर येण्याचा प्रयत्न करूं लागल्याबरोबर त्या मनोवृत्तींना वाव देण्यापेक्षां समाजांत दुर्वर्तन समजलें जाणारें वर्तन घडलें तरी चालेल अशा प्रकारची भावना त्याच्या चित्तांत बद्धमूल होते; हेंच अशा दुर्वर्तनाचें आदिकारण असतें. शाळेंतून अगर घरांतून पळून जाणें, प्रसंगीं चोरी करणें, खोटें बोलणें, अशा स्वरूपाच्या कोणत्याहि क्रिया या सदरांत येऊं शकतात. त्या मनोवृत्तींचा व या क्रियांचा तादृश असा कोणताहि संबंध नसतो. एक प्रकारच्या सापेक्ष प्रतिक्षेपामुळें ( conditioned reflex )—त्या क्रियांच्या व मनोवृत्तींच्या मानलेल्या साहचर्यामुळें—या क्रिया सूचित केल्या जातात व लागलीच अमलांत येतात.

अंतःकलह व इतर कारणें
सं.
ता.
ठाणें.

## अंतःकलहाचीं कांहीं उदाहरणें

अशा दबलेल्या मनोवृत्तींमुळें उत्पन्न झालेल्या अंतःकलहाचीं उदाहरणें चाणाक्ष मनुष्याचा सहज लक्षांत येऊं शकतात. परीक्षेला Ivanhoe हें पाठ्यपुस्तक ( text-book ) म्हणून नेमलेलें आहे; अशा वेळीं Ivanhoe हाच चित्रपट दाखविला गेल्यास विद्यार्थ्यांची किती गर्दी लोटते हें पुष्कळांना माहीत आहे. चित्रपट पाहणें हें आपल्या अभ्यासास पोषक आहे, अशी एका मनोवृत्तीची समजूत करून चित्रपट पाहण्याच्या दुसऱ्या मनोवृत्तीची पूर्तता करण्याचें हें एक साधें व निरुपद्रवी उदाहरण आहे. वटपौर्णिमेच्या दिवशीं सावित्रीचा चित्रपट पाहण्यास गेलेल्या अगदीं सोवळ्या स्त्रिया सांगतात कीं, " चित्रपट पाहण्याची आह्मांला मुळींच इच्छा नव्हती. केवळ धार्मिक भावनेनें हा चित्रपट पाहण्यास आम्ही आलों." स्वतःची किंवा इतरांची फसवणूक करण्याकरितां त्या हें सांगत नसतात तर आपल्या सुप्त मनोवृत्तींची आपण पूर्तता करीत आहोंत याची त्यांना स्वतःला सुद्धां जाणीव नसते.

लहान मुलें सुद्धां आपल्या सुप्त मनोवृत्तींना वाव देण्याकरितां किती निरनिराळ्या मार्गांचें अवलंबन करितात तें नेहमींच्या परिचयांतील उदाहरणावरून स्पष्ट दिसून येतें. लखू हा वर्गांत शिक्षकाचें सर्व काम करण्यास तत्पर आणि आज्ञाधारक असा एक मुलगा होता. शरीरानें अशक्त असल्यानें इतर मुलें त्याला चिडवीत व मारामारींत त्याचा पराभव करीत. अनेक वेळां असें घडत गेल्यानें सर्व मुलांची त्याला भीति वाटूं लागली. तो शाळेंत इतरांच्या अगोदर येऊं लागला व इतर सोबती अर्ध्या वाटेवर गेल्याशिवाय तो वर्गांतून बाहेर पडत नसे. अशा वेळीं वर्गांत मागें राहण्यास सोयीची पडेल ती सबब तो स्वीकारी. आठवड्याच्या अगर महिना अखेरीच्या मार्कांची बेरीज करून शिक्षकांस मदत करण्यास लखू एका पायावर तयार असे. इतर मुलांची वाटत असलेली भीति घालविण्यास शिक्षकांची मर्जी संपादन करणें त्याला इष्ट वाटलें. त्याच प्रमाणें स्वतःच्या भित्रेपणाला किंवा दुबळेपणाला सद्वर्तनाचा मुलामा देण्याची व इतरांच्या बालिश आडदांडपणाला विकृत स्वरूप देऊन स्वतःची प्रौढी अखंड मिरवण्याची त्याला हौस वाटत होती. प्रसंगीं शिक्षकांच्या कानाशीं लागून

स्वतःला जो शारीरिक पराक्रम गाजवितां येत नसे तो शिक्षकामार्फत तो गाजवून घेई व अशा रीतीनें आपल्या मनांतील प्रवृत्तींचा कलह तो दाबून ठेवीत असे. स्वतःचा शारीरिक कमीपणा, इतरांची भीति, त्यांचा सूड घेण्याची किंवा त्यांच्यापेक्षां आपण श्रेष्ठ आहोंत हें दाखविण्याची इच्छा व आपण करतों हें सर्व चांगलेंच आहे हें लोकांना पटवून देण्याची आवश्यकता इत्यादि अनेक प्रवृत्ती ह्या वर्तनाच्या मुळाशीं होत्या.

हीं उदाहरणें साधीं व सरावानें सहज लक्षांत येण्यासारखीं असतात; पण श्रीधरच्या उद्धटपणाचें कारण मात्र पुष्कळांच्या लक्षांत लवकर येऊं शकलें नाहीं. श्रीमंत कुलीन आईबापांचा श्रीधर हा थोरला मुलगा, वयानें तेरा वर्षांचा, प्रकृतीनें सुदृढ, बुद्धीनें चलाख, व वर्तनानें सच्छील. एकंदरींत तो मन आकर्षण करून घेणारा मुलगा होता. वर्गांत आपल्या हुषारीनें त्यानें शिक्षकांचें प्रेम संपादन केलें होतें. पण एकाएकीं त्याच्या वर्तनांत उद्धटपणा व भांडखोरी वृत्ति बळावूं लागली. त्याच्या शिक्षकांना हें पाहून वाईट वाटलें व त्यास समजुतीच्या चार गोष्टी सांगण्याचा प्रयत्न त्यांनीं केला; पण त्याचा परिणाम उलट होऊन त्याचा उद्धटपणा वाढूं लागला. मित्रांशीं तर त्याचीं भांडणें अखंड चालत व वर्गांतील कोणत्याच मुलाशीं त्याचें पटेनासें झालें. खरी गोष्ट अशी कीं श्रीधरला वयाच्या मानानें रतिविषयक जिज्ञासा उत्पन्न होऊं लागली होती; त्याचा फायदा घेऊन कांहीं दुष्ट मित्रांनीं त्याला तद्विषयक बरीच विकृत माहिती दिली. ही सर्व माहिती, त्याच्या मित्रांनीं त्याला देऊं केलेली दीक्षा, त्याचें घरचें उत्कृष्ट वळण व त्याच्या पालकांनीं बद्धमूल केलेल्या रतिविषयक खोट्या लज्जेच्या भावना यांचा तीव्र विरोध त्याला भासूं लागला. ह्या निरनिराळ्या वृत्तींचें तुमुल युद्ध चालू असल्यामुळें त्याच्या मनाची शांति नाहींशी झाली, इतकेंच नव्हे तर प्रेमळपणानें किंवा सहानुभूतीनें बोलणारा कोणताहि मनुष्य पाहिला कीं, त्याला त्याच्या मित्रांची व त्यांच्या साहचर्यानें त्यांनीं करून दिलेल्या रतिविषयक माहितीची आठवण होई व त्याचा प्रतिकार करण्याकरितां तो सर्व मित्रांशीं व शिक्षकांशीं उद्धटपणें वागूं लागे. त्याच्या या उद्धटपणाचे व मित्रांशीं केलेल्या भांडणांचे परिणाम असे झाले कीं, त्यानें सर्वांची सहानुभूति गमावली आ बांया गेलेला हुषार मुलगा म्हणून त्याची ख्याति झाली.

## अंतःकलहाचें बीज

मनांत असलेल्या कांहीं वृत्ति दडपून ठेवण्याची इच्छा या अंतःकलहाच्या मुळाशीं असते. आपल्या मनांत अशा तऱ्हेच्या वृत्ति आहेत, ही गोष्ट उघड करण्याची त्याला भीति किंवा लाज वाटत असते व म्हणून या वृत्ति नाहीं-तच असें भासविण्याचा मुलगा प्रयत्न करतो. पण त्या वृत्तींना गप्प करणें इतकें सोपें नसतें; म्हणून आपल्या वर्तनाचा संबंध दुसऱ्या प्रकारच्या वृत्तींशीं आहे असें भासविलें जातें. आपल्या अंगीं अशक्तपणा आहे ही गोष्ट कबूल करण्याची लखूची तयारी नव्हती म्हणून इतरांपेक्षां अभ्यासांत श्रेष्ठता मिळविण्याचा तो प्रयत्न करीत होता. ही गोष्ट चांगलीशी साधेना तेव्हां "आडदांडपणा वाईट असतो, माझ्यासारखा शांत स्वभावाचा मुलगाच चांगला," अशी तो स्वतःची व इतरांची समजूत करून देऊं लागला. पण हें त्याला स्वतःलाहि पटेना; म्हणून इतर मुलांच्या खोट्या कागाळ्या करून शिक्षकांकडून त्यांच्यावर सूड उगविण्याचा उपक्रम त्यानें केला. या ठिकाणीं लखूला एक गोष्ट पटवून देण्याची जरूर होती कीं, सर्वच व्यक्ति सर्वगुणसंपन्न नसतात. एखाद्याचें शरीर अशक्त असलें तर दुसऱ्याच्या अंगीं दुसरा एखादा नैसर्गिक दोष असेल. स्वतःच्या दोषांकडेच अखंड लक्ष देण्यापेक्षां ज्या गोष्टी आपल्याला सहज साधूं शकतात, त्याच गोष्टींत प्रावीण्य मिळ-विण्याचा प्रयत्न करणें जास्त चांगलें. ही वृत्ति लखूचे ठायीं उत्पन्न झाली असती म्हणजे त्याला स्वतःच्या अशक्तपणाची लाज वाटली नसती व तो झांकून ठेवण्याकरितां त्यानें दुर्वर्तनाचा मार्गहि स्वीकारला नसता. रतीशीं संबंध असलेल्या बाबींविषयीं सभ्यतेची मर्यादा राखणें जरूर असतें. पण त्यांत खोट्या लज्जेची तीव्र भावना बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं, हें श्रीधरला कोणीं पटवून दिलें असतें तर त्याचा अंतःकलह तात्काल नाहींसा झाला असता.

## आत्मवंचनाची दुष्ट संवय

ह्या अंतःकलहाची सुरुवात इतकी अजाणतां होत असते कीं, अशा तऱ्हेच्या आपल्या कांहीं वृत्ति दडपून ठेवण्याचा आपण प्रयत्न करीत आहोंत याचें त्या व्यक्तीला स्वतःला सुद्धां ज्ञान नसतें. त्याच्याशीं मोकळ्या मनानें संभाषण करून व त्याच्या वर्तनाचें सूक्ष्म अवलोकन करून तळाशीं असलेल्या

ह्या वृत्ति उघड केल्याबरोबर त्याला स्वतःला सुद्धां पुष्कळ वेळां आश्चर्य वाटतें. अशा तऱ्हेनें इतरांची व स्वतःची फसवणूक करून घेण्याची ही वृत्ति हळूहळू मनांत रुजत जाते व प्रसंगीं पुष्कळ तीव्र स्वरूपाचे मानसिक रोग उत्पन्न करते.

लहान मुलें चालतांना अडखळून पडलीं म्हणजे त्यांची समजूत काढण्याकरितां जवळच्या दगडाला अगर दुसऱ्या एखाद्या वस्तूला शिक्षा करण्याची पालकांची पद्धति असते. स्वतःच्या चुकीबद्दल दुसऱ्याला दोष देण्याची ही सुरुवात आहे व संवयीनें ही वृत्ति अंगवळणीं पडली म्हणजे मोठेपणीं मुलें स्वतःचे दोष लपवून त्यांचें माप बेमालूमपणें दुसऱ्यावर घालूं पाहतात. अडखळून पडल्याबद्दल दगडाला दोष देण्याची वृत्ति आणि परीक्षेंत नापास झाल्याबद्दल "परीक्षक वाईट होते" किंवा "प्रश्नपत्रिका अवघड होत्या" असें म्हणण्याची वृत्ति ह्यांत तत्त्वतः अंतर कोणतें? मुलानें मागितलेली वस्तु त्याला देण्याची पालकांची इच्छा नसली म्हणजे "ती वस्तु वाईट आहे," असें म्हणून त्याची समजूत ते काढूं पाहतात; तोच मुलगा मोठा झाला म्हणजे जी गोष्ट स्वतःला साधत नाहीं तिला तो नांवें ठेवूं लागतो व स्वतःच्या दोषांना गुण समजूं लागतो. स्वतःच्या अशक्तपणामुळें धक्काधक्की न साधणारा मुलगा त्या धक्काधक्कीला दुष्टपणाचें स्वरूप देतो व स्वतःच्या अशक्तपणावर सौजन्याचा मुलामा चढवितो. मानसिक अंतःकलहाचे दुष्परिणाम टाळण्याचा महत्त्वाचा उपाय असा कीं, आत्मवंचनेची संवय कधींहि मुलांना लागूं देतां कामा नये. स्वतःच्या मनोवृत्तींची पूर्ण ओळख करून घेऊन त्याप्रमाणें वागण्यास मुलांना शिकवावें. सर्वच वृत्तींना वाव देतां येत नाहीं, याची त्यांना जाणीव करून द्यावी व व्यवहारांत अनेकांना अनेक वेळां अपयश येतें हें लक्षांत घेऊन खेळाडूच्या उमद्या वृत्तीनें अपयशाचा स्वीकार करण्याची संवय ठेवावी. धडाडीनें उघड सामना दिल्यानेंच यश मिळण्याचा संभव जास्त असतो.

## मंद बुद्धीचा संबंध

दुर्वर्तनाच्या कारणांचा विचार करतांना आपणांस असें दिसून आलें कीं, भोंवतालच्या जगाशीं संबंध आल्यामुळें किंवा स्वतःच्या मनोवृत्तींमुळें उत्पन्न होणाऱ्या प्रवृत्ति व विकार यांच्या योग्यायोग्यतेचा विचार करून अयोग्य

प्रवृत्तींचें संयमन करण्यांत आलें तरच सद्वर्तन घडतें. आपल्या कृत्यांच्या होणाऱ्या परिणामांची आगाऊ कल्पना करून कोणतीं कृत्यें योग्य व कोणतीं अयोग्य, कोणत्या प्रवृत्तींना वाव दिल्यानें आपलें कृत्य समाजास ग्राह्य ठरेल व आपण केलेलीं कोणतीं कृत्यें समाज चालूं देणार नाहीं याचा विचार करून निर्णय करण्याइतका मुलाच्या बुद्धीचा विकास झाला असल्याशिवाय अयोग्य प्रवृत्तींना नियमन करण्याचें महत्त्वच त्याला वाटणार नाहीं. साहजिकच अशा मुलांना आपल्या कृत्यांच्या योग्यायोग्यतेचा निर्णय करतां येत नाहीं, व जरूर तें आत्मसंयमन त्यांच्या ठायीं आढळत नाहीं. दुर्वर्तनाचा काय किंवा कोणत्याहि वर्तनाचा काय सर्व आधार मनुष्याच्या मनोवृत्ति असल्यानें बुद्धीचा अपक्वपणा हें दुर्वर्तनाचें बरेंच महत्त्वाचें कारण समजलें जातें. तुरुंगांतून किंवा रेफर्मेटरीं(व्रात्यशाळा)तून शिक्षा झालेल्या मनुष्यांची मानसशास्त्रदृष्ट्या तपासणी केली असतां मंदबुद्धि अपराध्यांचें प्रमाण बरेंच आढळतें. शेंकडा १० पासून ४०।५० पावेतों हें प्रमाण केव्हां केव्हां जातें असें कांहीं तज्ज्ञांचें मत आहे. शाळांमधूनहि सामान्यतः मंद बुद्धीच्या मुलाचें वर्तन असमाधानकारक असण्याचा संभव बराच जास्त असतो, असा बहुतेक शिक्षकांचा अनुभव आहे.

परंतु अपराधी मुलांत मंदबुद्धि मुलांचें प्रमाण जास्त आढळतें येवढ्यावरून मंदबुद्धित्व हें दुर्वर्तनाचें महत्त्वाचें कारण समजतां कामा नये. एकदां अपराध घडल्यानंतर तो लपविण्याचें कार्य बुद्धिवान् मुलांना जास्त चांगलें साधण्याचा संभव असतो. शिवाय स्वतः अपराध करून त्याचा दोष आपल्या शेजारच्या बावळटसर मुलावर लादण्याचें काम कांहीं बुद्धिवान् मुलें बेमालुमपणें उरकतात. ह्या दोनहि कारणांमुळें अपराधी मुलांत मंदबुद्धि मुलांचें प्रमाण जास्त आढळण्याचा संभव असतो. बुद्धीचा विकास अपूर्ण झाला असल्यास कार्यांच्या योग्यायोग्यतेचा निर्णय नीट करतां येणार नाहीं हें खरें, परंतु सर्वच कार्यांत हा निर्णय प्रमुख असतो असें नाहीं. शिवाय प्रवृत्ति व विकार यांना संयमन करण्याची कला ही सर्वस्वीं बुद्धिमत्तेवर अवलंबून नसून शिक्षण, संवयी, परिस्थिति इत्यादि अनेक गोष्टींवर अवलंबून असते. म्हणून केवळ बुद्धीच्या मंदतेमुळेंच दुर्वर्तन घडेल असें निश्चयानें सांगणें कठीण पडतें. दुर्वर्तनी मुलांपैकीं शेंकडा ७२ मुलांच्या बुद्धीचा विकास अगदीं योग्य

प्रमाणांत झाला असल्याचें परदेशांतील अभ्यासकांना आढळून आलें आहे. शिवाय जीं दुर्वर्तनी मुलें शिक्षकांनीं किंवा इतरांनीं केलेल्या प्रयत्नांनीं सुधारून योग्य मार्गाला लागतात तीं सर्वच बुद्धिवान् असतात असेंहि नाहीं. या सर्व गोष्टींवरून बुद्धीचें मंदत्व हें दुर्वर्तनाचें वाटतें तितकें महत्त्वाचें कारण नसावें. अनुभवानें किंवा शिक्षणानें जें ज्ञान मनुष्य संपादन करतो तें मंद बुद्धीच्या मुलाला संपादन करणें अशक्य असतें. त्यामुळें मनुष्याचें वर्तन समाजमान्य राहण्यास ह्या शिक्षणाचा व ज्ञानाचा जो उपयोग होऊं शकतो तो त्याच्या बाबतींत होऊं शकणार नाहीं, म्हणून मंदबुद्धित्व हें अभावात्मक कारण होऊं शकतें. मंदबुद्धित्वामुळें दुर्वर्तन घडलें असें म्हणण्याऐवजीं मुलांची बुद्धि मंद होती म्हणून सद्वर्तन राखण्यास अवश्य तितकें ज्ञान त्याला संपादन करतां आलें नाहीं असें म्हणणेंच जास्त युक्त होय. इतर गोष्टी अनुकूल असतील तर केवळ मंदबुद्धित्वामुळें दुर्वर्तन घडणार नाहीं असा या विवेचनाचा इत्यर्थ आहे.

### मंद बुद्धीचीं लक्षणें

मानसशास्त्रदृष्ट्या बुद्धीची बरोबर परीक्षा करण्याचीं पुष्कळ साधनें अलीकडे उपलब्ध झालीं असून त्यायोगें प्रत्येकाच्या बुद्धीचें माप बरेंचसें बिनचूक करतां येतें. वयाच्या मानानें मनुष्याच्या बुद्धीचा विकास होत असतो त्यामुळें एका विशिष्ट वयाचा मुलगा कोणत्या गोष्टी करूं शकतो हें अनुभवानें व पुष्कळ मुलांवर प्रयोग करून निश्चित करण्यांत आलें व एक यादी तयार करण्यांत आली. 'अ'चें वय दहा वर्षांचें आहे अशी कल्पना करूं. सामान्यत: दहा वर्षांचा मुलगा ज्या गोष्टी करूं शकतो म्हणजे दहा वर्षांच्या मुलाचा मनोविकास जितका असावयास पाहिजे तितकाच 'अ'चा असेल तर 'अ'ची बुद्धि सामान्य समजली जाते. 'ब' चें वय पंधरा वर्षांचें आहे. पण त्याचा मनोविकासहि 'अ'च्या इतकाच असेल तर त्याची बुद्धि दहा वर्षांच्या मुलाइतकीच समजली जाते. म्हणजे 'ब' चें 'कालवय' (chronological age) पंधरा वर्षांचें आहे पण त्याचें 'मनोवय' (mental age) दहा वर्षांचें आहे असें म्हणतात; म्हणून 'ब' हा मंदबुद्धि मुलांच्या सदरांत पडेल. 'क' ह्या तिसऱ्या मुलाचें वय आठ वर्षांचें असतांना त्याचा मनोविकास दहा वर्षांच्या मुलाइतका असेल तर

त्याचेंहि मनोवय दहाच समजलें जाईल; पण त्याचें कालिक वय आठच असल्यानें त्याला तीव्रबुद्धि मुलांच्या सदरांत घालावें लागेल; कारण तो जेव्हां 'ब' च्या वयाचा होईल तेव्हां त्याचें मनोवय किती तरी अधिक असेल. वय वाढत गेलें तरीहि ज्यांच्या बुद्धीचा विकास होत नाहीं, ज्यांचें मनोवय बारापेक्षां जास्त वाढूं शकत नाहीं अशा मुलांना मंदबुद्धि असें सामान्य नांव देण्यांत येतें. ह्या मंदबुद्धि मुलांतहि बुद्धीच्या कमीअधिक विकासाप्रमाणें अनेक वर्ग पाडण्यांत येतात. मानसशास्त्रीय परिभाषेच्या फारशा खटाटोपांत न शिरतां सामान्य वाचकांकरितां इतकें सांगतां येईल कीं, ज्यांचें मनोवय सहा वर्षा-पेक्षां जास्त वाढूं शकत नाहीं, म्हणजे ज्यांचें वय कितीहि वाढलें तरी ज्यांची बुद्धि सामान्यतः सहा वर्षांच्या मुलाइतकीच राहते अशीं मुलें अगदीं खुळीं समजलीं जातात व तीं केव्हांहि स्पष्टपणें ओळखूं येऊं शकतात. अशा मुलांच्या संरक्षणाची व योगक्षेमाचीहि तरतूद इतर संबंधी मनुष्यांनाच करावी लागते. मनोवय दहा पावेतों असलेलीं मुलें निरोप पोहोंचविणें किंवा अशाच स्वरूपाचें हलकें काम करूं शकतात. ठराविक पद्धतीनेंच करावयाचें काम ते केवळ संवयीनें करूं शकतात. यंत्रें चालू असतांना त्यांकडे लक्ष ठेवणें व योग्य देखरेख ठेवणाऱ्या इसमाच्या हाताखालीं तो सांगेल तें काम करणें अशासारखीं कामें करण्यास मनोवय बारा पावेतों असावें लागतें. मंदबुद्धि मुलांचा मोठा दोष असा असतो कीं, त्यांना कोणत्याहि कार्याची योजना आगाऊ करतां येत नाहीं, किंवा आखून ठेवलेल्या योजनेप्रमाणें काम पार पाडतां येत नाहीं.

सामान्य बुद्धि, शिक्षणानें अगर परिश्रमानें संपादन केलेलें ज्ञान, व सहज साध्य होणाऱ्या स्वाभाविक कला या गोष्टी अगदीं भिन्न आहेत. एखादा मुलगा बुद्धिवान् असूनहि शिक्षणाची सोय न झाल्यामुळें अज्ञानी असूं शकेल किंवा नैसर्गिक अनुकूलता नसल्यामुळें गायनवादनासारख्या कलांत त्याची गति होणार नाहीं. त्याचप्रमाणें केव्हां केव्हां सामान्य बुद्धि बेताचीच असतांहि एखाद्या कलेंत प्राविण्य निसर्गसिद्ध असूं शकेल. एखाद्या मुलाच्या वर्तनावर त्याच्या बुद्धिमत्तेचा परिणाम कोणत्या प्रकारचा झाला आहे याचा विचार करतांना बुद्धि, ज्ञान आणि कला यांच्यामधील हा भेद नीट दृष्टीसमोर ठेविला पाहिजे. शिक्षणाच्या अभावामुळें आलेलें अज्ञान सहज दूर होऊं

शकतें, पण नैसर्गिक बुद्धिमत्तेंत असलेला दोष दुरुस्त होऊं शकत नाहीं. त्याच-प्रमाणें नीतिकल्पना (moral sense) असा एक बुद्धीचा विभाग कल्पितां येणें शक्य किंवा इष्ट आहे कीं काय असाहि एक वाद मानसशास्त्रज्ञांत मधून मधून चालतो. सत् व असत् कोणतें याचा निर्णय करण्याचें काम हा एक मनाचा स्वतंत्र व्यापार असून बुद्धीच्या इतर सर्व अंगांचा विकास झाला असतांहि या अंगाचा विकास झाला नसल्यास तो मनुष्य दुर्वर्तनी होऊं शकेल असें ह्या पक्षाचें म्हणणें आहे. परंतु निरनिराळीं कार्यें करणारे मनाचे निरनिराळे विभाग पाडणें अलीकडील शास्त्रज्ञांस संमत नाहीं. मनुष्याच्या नीतिविषयक कल्पना, सत् व असत् यांच्या विषयींचे निर्णय हे समाजाच्या उत्क्रांतीप्रमाणें व सामाजिक संस्थांच्या विकासाप्रमाणें नेहमीं बदलत असतात. मनुष्याची सामान्य बुद्धि, मिळालेलें शिक्षण व आलेले अनुभव यांच्या योगानें मनुष्य आपल्या नैतिक कल्पना बनवीत असतो; म्हणून अशा तऱ्हेचा निर्णय करणारा बुद्धीचा स्वतंत्र विभाग कल्पिण्याचें कारण नाहीं असें त्यांचें मत आहे. ज्या ज्या वेळीं चांगल्यावाईटांचा निर्णय करण्यास असमर्थ असलेल्या एखाद्या दुर्वर्तनी मुलाचें उदाहरण आढळतें त्या त्या वेळीं त्याच्या ठायीं सामान्य बुद्धीचाच विकास अपूर्ण असल्याचें आढळून येईल यांत शंका नाहीं.

मंदबुद्धि मुलाची विचार व निर्णय करण्याची शक्ति बेताचीच असते. म्हणून परिस्थितीमुळें त्याच्या मनांत उत्पन्न झालेले विकार किंवा प्रवृत्ति तो तात्रडतोब कृतींत उतरवितो. एखाद्या दुर्वर्तनी मुलानें सुचवून दिलेलें एखादें काम करण्यास तो मागेंपुढें पहात नाहीं, किंवा त्याच्या योग्यायोग्यतेचा विचार करीत बसत नाहीं. त्या कृत्यास उत्तेजन देणारा मुलगा आपल्या हातांत बाहुल्यासारखा त्याचा उपयोग करून प्रसंग आल्यास स्वतः नामानिराळा राहून सर्व दोष त्याचेवर सहज ढकलूं शकतो. त्याच्या मनाचा विकास झाला नसला तरी त्याच्या शरिराची वाढ पूर्ण झाली असल्यानें तो आपल्या शरीरसामर्थ्याचा दुरुपयोग करण्याचा संभव जास्त असतो; कारण आत्मसंयमन करण्याइतकी त्याची विचारशक्ति प्रबळ नसते. वयानें व शिक्षणानें त्याच्या बरोबरीच्या बुद्धिवान् मुलांशीं त्याच्या मानसिक उणेपणामुळें त्याची मैत्री जडणें फारसें संभवनीय नसतें. अशा वेळीं आपणापेक्षां कमी वयांच्या व अशक्त मुलांशीं तो दोस्ती करतो व पुष्कळ

वेळां आपल्या शरीरसामर्थ्याच्या जोरावर त्यांना भीति दाखवून अगर सक्तीनें त्यांचेकडून अनेक बऱ्यावाईट गोष्टी करवून घेतो. मंदबुद्धि मुलांनीं केलेले अपराध अगदीं साध्या स्वरूपाचे, लहान मुलांना शोभतील अशा रीतीनें केलेले असतात. आगाऊ विचार करून किंवा एखादी योजना करून त्या बरहुकूम एखादें कृत्य पार पाडणें त्यांना अगदीं अशक्य असतें. इतकेंच नव्हे तर अपराध केल्यानंतर मागाहून आपलें हें कृत्य उघडकीस येऊं नये म्हणून जी खबरदारी सामान्य मनुष्य घेत असतो तीहि ते घेत नाहींत.

## सुधारणेची दिशा

कोणत्याहि मुलाच्या वर्तनाला वळण लावतांना संवयीचें महत्त्व अतिशय आहे; पण मंदबुद्धि मुलांच्या बाबतींत तर संवयीनें सद्वर्तन अंगवळणीं पाडण्याखेरीज दुसरा उपाय सहसा यशस्वी होत नाहीं. विचारशक्तीचा विकास बेताचाच झाला असल्यानें शीलाचें महत्त्व तर त्यांना पटत नाहींच; पण दूर-दृष्टीचाहि अभाव असल्यानें आपल्या क्रियांचे तात्काळ होणारे परिणामच त्यांच्या लक्षांत येतात. कांहीं दिवसांनंतर दिसून येणारे सुपरिणाम त्यांच्या दृष्टिपक्षांत येत नाहींत, तोंपर्यंत थांबण्याची त्यांची तयारीहि नसते. म्हणून अशा मुलांशीं वागतांना केवळ संवयीनेंच कांहीं क्रिया त्यांच्या अंगवळणीं पाडाव्या लागतात. एखादें काम त्यांच्याकडून करवून घेतांना 'मी सांगतों म्हणून कर' ही अधिकाराची वाणीच त्यांना पटूं शकते. सूक्ष्म कारण मीमांसा त्यांना आकलन होत नाहीं आणि अशी कारणमीमांसा करून त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केल्यास ते उलट भांबावूनच जातात. वडील मंडळी सांगतील तेंच कृत्य चांगलें आणि तेंच करावें हें शिक्षण संवयीनेंच पटवावें लागतें, आणि असें करतांना वर्तनाचे चांगले किंवा वाईट परिणाम बक्षिसाच्या अगर शिक्षेच्या रूपानें तात्काल दिसतील अशी खबरदारी घ्यावी लागते.

## बुद्धिवान् मुलांचें दुर्वर्तन

अत्यंत बुद्धिवान मुलगाहि केव्हांकेव्हां दुर्वर्तनी आढळतो. पण अशा गोष्टी फार क्वचितच घडतात. स्वतःच्या बुद्धिमत्तेमुळें खऱ्याखोट्याची जाणीव त्यास लवकर होते व दुर्वर्तन परिणामीं हितकर होत नाहीं हें त्यास तत्काळ

समजून येतें, त्यामुळें सामान्यतः समाजानें ठरविलेल्या धोरणानेंच तो जात असतो. परंतु अशा मुलांची मनोवृत्ति फार सूक्ष्म व नाजूक असल्यानें कोणत्याहि गोष्टीचा परिणाम त्यांच्या मनावर तीव्र व ताबडतोब होतो. दोन किंवा अधिक परस्परविरोधी मनोवृत्तींचे परिणाम एकसमयावच्छेदानें होऊं लागून ' हें करावें कीं तें करावें ? ' अशा संशयांच्या कात्रींत सांपडून अशीं मुलें केव्हां केव्हां फार चमत्कारिक तऱ्हेनें वागतात. स्वतःचा स्वार्थ किंवा अंतःप्रवृत्ति एकीकडे नेत असतां स्वतःची महत्त्वाकांक्षा किंवा कर्तव्याची जाणीव दुसरीकडे ओढूं लागते. या दोन विरोधी प्रवृत्तींमधील मार्ग शोधण्याच्या भरांत त्यांच्याकडून जें वर्तन घडतें तें पुष्कळ वेळां समाधानकारक नसतें. सामान्य बुद्धीच्या व विशेषतः मंद बुद्धीच्या मुलांना हे विरोधी प्रवृत्तींचे परिणाम व त्यांचे सूक्ष्म भेद क्वचितच समजत असल्यानें मानसिक कलहाचा प्रश्न त्यांच्या बाबतींत उत्पन्न होऊं शकत नाहीं. अशा एखाद्या बुद्धिवान् मुलाच्या आईबापांची बुद्धि जर सामान्य प्रतीचीच असेल, तर मुलाच्या तीव्र बुद्धीच्या जोपासनेस योग्य असें वातावरण घरीं असूं शकणार नाहीं. स्वतःच्या बुद्धिमत्तेचा विकास व आईबापांनीं घातलेले निर्बंध किंवा घरांतील स्थिति यांच्या मध्यें सांपडलेल्या त्या मुलाचें वर्तन पुष्कळ वेळां पालकांना त्रासदायक होतें. स्वतःच्या उच्च महत्त्वाकांक्षा व त्यास अनुरूप असें त्यानें ठरविलेलें ध्येय साधण्याकरितां परिस्थितीच्या दडपणांतून सुटण्याकरितां त्यानें केलेल्या प्रयत्नांनाच पुष्कळ वेळां आपण दुर्वर्तन असें नांव देतों. पुष्कळ वेळां अशा मुलाला त्याच्या तीव्र बुद्धीच्या योगानें समाजांतील उच्च दर्जाच्या लोकांच्या मुलांत प्रवेश मिळतो; पण जर त्याच्या घरची स्थिति गरिबीची असेल तर त्याच्या या सोबत्यांच्या श्रीमंतीमुळें स्वतःचा कमीपणा त्याला जास्त तीव्रतेनें भासूं लागतो व त्यामुळें त्याच्या वर्तनांत केव्हां केव्हां बराच चमत्कारिकपणा येतो. अशा सर्व प्रसंगीं त्याचें जें वर्तन घडतें त्यास त्याची बुद्धिमत्ता कारण नसते. मूळ कारणीभूत दुसऱ्याच गोष्टी असून त्याच्या वर्तनाची दिशा व मार्ग हीं ठरविण्यांत मात्र त्याला त्याच्या तीव्र बुद्धिमत्तेचा बराच उपयोग होतो.

## विकार व भावना

सामान्य मनुष्याच्या वर्तनांत विचारापेक्षां सहजप्रवृत्ति व विकार यांचेंच महत्त्व कसें जास्त असतें याचें विवेचन थोड्या विस्तारानें मागें आलेंच

आहे. थोड्याशा अनुभवानें आपल्या सहजप्रवृत्तींना व विकारांना योग्य वळण लावण्याचें कार्य मनुष्याला साधतें. परंतु कांहीं व्यक्तींत या सहज प्रवृत्ति जास्त तीव्र असल्यानें त्यांचें संयमन अगर नियमन करणें कठीण जातें व केवळ याच कारणानें दुर्वर्तन घडल्याचीं कांहीं उदाहरणें सांपडतात. रोगामुळें आलेल्या शारीरिक अशक्ततेच्या वेळीं अगर पौगण्डावस्थेंत असलेल्या अस्थिर मनोवृत्तीमुळें विकारांना संयमन करण्याची शक्ति बरीच कमी होते. अशा वेळीं सहज प्रवृत्तींचा व विकारांचा जोर जास्त होऊन जीं दुर्वर्तनें घडतात त्यांचें विस्तृत विवेचन पौगण्डावस्थेच्या विवेचनांत आलें आहे, तें सर्वच ठिकाणीं थोडेंबहुत लागू पडतें. पौगण्डावस्थेचा अस्थिर काल निघून गेल्यावर बहुतेक मनुष्यांची ही संयमनशक्ति योग्य प्रमाणांत येते. पण कांहीं मनुष्यांची ही शक्ति कधींच पूर्ण विकसित होत नसल्यानें त्यांच्या सहजप्रवृत्ति आणि विकार नेतील तिकडे जाणेंच त्यांना भाग पडतें. दुसरीहि एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, या व्यक्तींमध्यें मानसिक अस्थिरतेमुळें किंवा ज्ञानतंतूंच्या विकारांमुळें प्रवृत्ति व विकार हीं जास्त तीव्र असतात आणि त्याच कारणांमुळें त्यांना संयमन करण्यास सामान्य मनुष्यांपेक्षां जास्त कष्ट पडतात. ज्या सहज ( innate ) दोषांमुळें त्यांचे विकार प्रबळ होतात, त्याच दोषांमुळें त्यांची संयमनशक्तिहि कमी होते म्हणून त्यांना दुहेरी त्रास होतो.

मनुष्याच्या अनेक सहजप्रवृत्ति व मनोविकार हींच त्यास सर्व प्रकारचीं कार्यें करावयास लावून त्याचें वर्तन निश्चित करीत असतात. याच प्रवृत्ति व विकार एखाद्या केंद्राभोंवतीं एकत्र होतात आणि विशिष्ट धोरणानें परस्परांस पूरक होतील अशा तऱ्हेनें जेव्हां त्या मनुष्यास वागावयास लावतात तेव्हां त्यांना आपण भावना (sentiment) असें म्हणतों. धर्मनिष्ठा, कुलाचा, शाळेचा अभिमान, राष्ट्रप्रीति, यांसारख्या प्रत्येक भावनेमध्यें, प्रवृत्ति व विकार यांचें सर्व सामर्थ्य एकवटलेलें असतें. स्वतःचें कुळ, आईबाप व इतर संबंधी, आपलें गांव अगर राष्ट्र यांविषयीं मनुष्याच्या मनांत ज्या प्रकारच्या भावना असतील त्यांस अनुसरून त्याच्या वर्तनाला निराळी दिशा लागत असते. आवडत्या मित्रानें दिलेल्या क्षुल्लक वस्तूच्या योगानें कितीतरी उलाढाली होतात, याची कल्पना भावनाप्रधान मनुष्यांना असतेच. शाळेच्या वर्गांतील सर्व मुलांनीं अमुक गोष्ट करावयाची असें ठरविलें तर त्या वर्गांतील प्रत्येक

मुलगा आपल्या वर्गाला कमीपणा न येण्याबद्दल उत्साहानें झटूं लागतो. अशा वेळीं कोणत्याहि निर्बंधाला दाद न देणारा मुलगासुद्धां स्वतःच्या वर्गाकरितां किती मनोनिग्रह करूं शकतो व प्रसंगीं किती मानसिक सामर्थ्य दाखवितो हें चांगल्या प्रकारें निदर्शनास येतें.

## भावनांचें सामर्थ्य

क्षणोक्षणीं बदलणाऱ्या व सैरावैरा धांवणाऱ्या प्रवृत्ति व विकार यांना एकत्र करून त्यांचें सर्व सामर्थ्य एकाच ध्येयाकरितां खर्च करावयास लावण्यास भावनाच विशेष कारणीभूत होतात. मानसिक सामर्थ्याचा सर्व सांठा, प्रवृत्ति व विकार यांतच असतो. परंतु भावनांच्या अभावीं तें सर्व सामर्थ्य सुप्त स्थितींत असतें. एखाद्या वस्तूविषयीं, संस्थेविषयीं अगर योजनेविषयीं आपलेपणाची भावना उत्पन्न झाल्यास हें सर्व सामर्थ्य एकत्र गोळा होऊन मनुष्य त्याकरितां प्रयत्न करूं लागतो व अशा रीतीनें—त्या भावना योग्य प्रकारच्या असल्यास—त्याचें स्वतःचें, समाजाचें व राष्ट्राचेंहि कल्याण साधतो. घड्याळांतील कमानीची सर्व शक्ति किल्ली दिल्याबरोबर एकदम खर्च झाली असती, तर त्या शक्तीचा उपयोग कांहींहि झाला नसता. पण बॅलन्स व्हीलच्या योगानें त्या शक्तीला योग्य मर्यादेंत ठेवून तिचा कांटे फिरविण्याकडे उपयोग केला गेल्यानें घड्याळ हें यंत्र म्हणून उपयोगीं पडूं शकतें. त्याचप्रमाणें मनुष्याच्या विकारांची शक्ति भावनेच्या योगानें मर्यादित ठेवली जाते आणि त्यामुळें समाजाच्या व राष्ट्राच्या हिताकरितां तिचा उपयोग होतो.

एखाद्या दुर्वर्तनी मुलाच्या दुर्वर्तनाचा विचार करितांना त्याच्या भावना कोणत्या स्वरूपाच्या आहेत, याची माहिती असणें अगत्याचें असतें. कारण त्याच्या दुर्वर्तनाच्या कारणांचा संबंध त्याच्या भावनांमुळें स्पष्ट समजण्याचा संभव असतो, इतकेंच नव्हे तर त्याचें वर्तन दुरुस्त करण्याची योजना ठरवितांनाहि ह्या भावनांच्या अनुरोधानें प्रयत्न केल्यास यश येण्याचा बराच संभव असतो. मनुष्याच्या मनांतील सर्व प्रवृत्तींच्या चंचलपणामुळें घडोघडीं बदलत असलेलें त्याचें वर्तन अशा एखाद्या भावनेच्या अनुरोधानेंच स्थिर होऊं शकतें. वर्तनांत एकसूत्रीपणा व स्थैर्य हीं आणण्याकरितां योग्य भावनांची जोपासना करावी लागते, व त्याकरितां मुलाच्या मनांतील पूर्वीच्या कल्पना व भावना यांची माहिती करून घेतल्यानें कोणत्या प्रकारच्या भावनांचा

सं. ....... नं. ......

विकास केल्यानें त्याच्या वर्तनांत स्थैर्य येऊं शकेल, याबद्दल प्रयत्न करण्याची दिशा समजूं शकते. एखाद्याचा कुलाभिमान जागृत केल्यानें त्याचें वर्तन सुधरूं शकतें तर दुसऱ्या एखाद्याच्या प्रवृत्ति व विकार यांना योग्य वळण देणारी समाजकार्यासारखी दुसरी एखादी भावना उपकारक होऊं शकेल.

### टॉम ब्राउन–जबाबदारीची जाणीव

मुलांच्या स्वाभाविक भावनांचा योग्य उपयोग करून घेऊन त्यांना सच्छील बनविण्याची कला अवगत असलेल्या उत्कृष्ट शिक्षकाला किती गोष्टी साधतां येतात, याचें सविस्तर वर्णन *Tom Brown's School Days* या कादंबरींत आढळतें. टॉम हा रुग्बीच्या शाळेंतील पहिल्या प्रतीचा उनाड मुलगा, आणि त्याचा दोस्त ईस्ट याच्या नादानें त्यानें केलेल्या खोड्या सर्वांच्या पूर्ण परिचयाच्या झाल्या होत्या. दोनहि मुलें जात्या गुणी असून त्यांच्या खोड्यांत अनीतीपेक्षां खोडकरपणाचाच अंश अधिक होता ही गोष्ट खरी होती, पण एकमेकांच्या सहवासांत त्या खोड्या प्रमाणाबाहेर जात व हीच संवय कायम राहिल्यास उच्छृंखलपणांतच सर्व आयुष्य जाण्याचा संभव. अशा स्थितींत टॉमला ताळ्यावर आणण्याच्या हेतूनें डॉ. आर्नोल्ड यांनीं टॉमला हवी असलेली वसतिगृहांतील खोली राहण्याकरितां दिली. मात्र त्याच्या जोडीला ईस्टच्या ऐवजीं आर्थर नांवाच्या नुकत्याच आलेल्या–शरीरानें नाजुक परंतु बुद्धीनें चलाख व सच्छील अशा–मुलाला ठेविलें. यांत ईस्टची संगति सोडविण्याचा मुख्य हेतु होताच, पण त्या खोलीविषयीं टॉमला वाटत असलेल्या उत्सुकतेचा फायदा घेऊन ईस्टच्या वियोगामुळें टॉमला वाटणारी अस्वस्थता कमी करण्याचाहि एक हेतु होता. त्याचबरोबर आर्थर-सारख्या लहान मुलाला संभाळण्याची जबाबदारी आपणांवर आहे या भावनेनें टॉमच्या वर्तनांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा हेतु अतिशय खोल असला तरी महत्त्वाचा होता. अखेर डॉ. आर्नोल्ड यांच्या अपेक्षेप्रमाणें ह्या जबाबदारीच्या जाणीवेमुळें टॉमच्या वर्तनाला निराळी दिशा लागून तो एक आदर्श मुलगा झाला; इतकेंच नव्हे तर त्याला त्या वेळीं लागलेल्या वळणाचा त्याच्या सर्व आयुष्यावर परिणाम झालेला आहे. एखाद्या भावनेमुळें आपल्या सर्व उच्छृंखल प्रवृत्तींचें नियमन करावयास लावल्याचें हें एक नमुनेदार उदाहरण आहे.

## वर्तनावर परिणाम करणारीं इतर कारणें

ज्यांच्या योगानें वर्तनांत बदल घडून येतो, अशा बहुतेक महत्त्वाच्या कारणांचा विचार आतांपर्यंत झाला. वर्तनावर ज्यांचा थोडाबहुत परिणाम होतो अशा कारणांचें क्षेत्र फार विस्तृत असल्यानें आतां त्यांपैकीं कांहीं विशेष महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करून हें प्रकरण संपवूं. (१) अशा कारणांपैकीं सहसा लक्षांत न येणारें कारण म्हणजे दुर्वर्तनाची संवय लागणें हें होय. कोणत्याहि एका कारणामुळें एकदां दुर्वर्तन घडलें म्हणजे दुसऱ्या खेपेला पूर्वीचीं सर्व कारणें दुरुस्त झालीं असलीं तरीहि तसेंच वर्तन करण्याची इच्छा होते व अशा गोष्टी दोनचारदां झाल्या म्हणजे मग दुर्वर्तन करण्याला कांहीं कारणच लागत नाहीं. केव्हां केव्हां ही संवय इतकी अंगवळणीं पडते कीं, शिक्षेचा किंवा इतर उपायांचा तर उपयोग होत नाहींच; पण मुलाला स्वतःला इच्छा असूनहि आपलें मन आवरतां येत नाहीं. जुन्या संवयी मोडण्याकरितां नवीन संवयी अंगवळणीं पाडणें हाच एक परिणामकारक उपाय होय.

(२) हवामानासारख्या नैसर्गिक परिस्थितीचा मनुष्याच्या वर्तनावर कितपत परिणाम होतो हा प्रश्न वादग्रस्त आहे. आंकडेच गोळा करूं लागलों तर कांहीं नियम काढतां येणें शक्य होईल ही गोष्ट खरी. उन्हाळ्यांत घरीं करमेनासें झाल्यामुळें अगर पावसाळ्यांत मनाला उदासीनता प्राप्त होण्यासारखी हवा पडल्यास त्याचा परिणाम मनावर थोडाबहुत होईल, नाहीं असें नाहीं. पण प्रत्यक्ष दुर्वर्तनाशीं याचा संबंध अगदींच थोडा येईल. उन्हाळ्यांत शाळांना सुट्ट्या असल्यामुळें मुलें रिकामीं राहतात व म्हणून दुर्वर्तनाचीं उदाहरणें जास्त घडलीं तर त्याचा दोष कांहीं हवामानावर अर्थातच देतां येणार नाहीं.

(३) सूर्यावरील डागांचा संबंध जगांतील वाटेल त्या घडामोडींकडे लावतां येतो असें दिसतें; कारण मॉस्कोच्या प्रो. शिजेव्हिस्की (Tchijeviski) यांनीं त्यांचा संबंध दुर्वर्तनाशीं लावला आहे ( *Popular Science Monthly*, July 1928 ). सूर्यावरील डागांपासून पुष्कळ इलेक्ट्रॉन्स तयार होतात व त्यांचा परिणाम मनुष्याच्या मेंदूतील विकार व संकल्प ( volition ) यांच्या केंद्रांवर होतो व साहजिकच मनुष्याला आपली जबाबदारी विसरून वागण्याची प्रवृत्ति होते असें त्यांचें म्हणणें आहे. पण विचारांत घेण्याइतका हा

घटक महत्त्वाचा नाहीं; आणि तसा तो असला तरी त्या विचाराचा प्रत्यक्ष उपयोग कांहीं नाहीं ही गोष्ट निराळीच !

(४) दारूचा आणि दुर्वर्तनाचा संबंध प्रसिद्धच आहे. दारूच्या व्यसनामुळें संयमन करण्याची शक्ति कमी होते, म्हणून ज्या गोष्टी चांगल्या स्थितींत मनुष्यानें केल्या नसत्या त्या दारूच्या धुंदींत मनुष्य करतो. आपल्याकडे अद्यापि मुलापर्यंत दारूचें व्यसन गेलें नसल्यानें याचा जास्त विचार करण्याचें कारण सध्यां नाहीं. तरीहि बाप दारूबाज असला तर घरांतील भांडणें व इतर आनुषंगिक गोष्टी यांमुळें मुलांचें वर्तन बिघडण्यासारखी परिस्थिति उत्पन्न होईल यांत शंका नाहीं.

(५) चहा, काफी हीं पेयें उत्तेजक असून त्यांचा परिणाम ज्ञानतंतूंवर होतो व वर्तनतील स्थैर्य नाहींसें होऊन उच्छृंखलपणानें वागण्याची प्रवृत्ति होते.

(६) लहान मुलांना आपल्या वयास अनुरूप अशा पुष्कळ प्रकारच्या हौशी अगर नाद ( hobby ) असतात. नाणीं, तिकिटें किंवा चित्रें गोळा करणें, मातीचीं किंवा कागदाचीं घरें बांधणें, फोटोग्राफी, चित्रकला, गोष्टी लिहिणें, किंवा कविता करणें, अशा प्रकारच्या हौसेच्या व्यवसायांत मुलांचें मन एकदां रमूं लागलें म्हणजे त्यांच्या रिकाम्या वेळेचा तर सदुपयोग होतोच; पण त्यांच्या नित्याच्या व्यवसायास पुरून शिल्लक उरलेल्या त्यांच्या शक्तीचा ओघ ह्या दिशेकडे वळल्यामुळें दुर्वर्तनाकडील मार्ग आपोआपच बंद होतो. पण केव्हां केव्हां एकाद्या मुलाला कोणतेच नाद नसतात. तेव्हां तो मुलांच्या करमणुकीच्या प्रचलित मार्गांनीं करमणूक करून घेत नाहीं. घरींहि या बाबतीकडे कोणी लक्ष देणारा नसल्यास मुलाचा वेळ निरुद्योगी-पणांत जातो व मन रिकामें राहतें. अर्थात् दुर्वर्तनास सवड सांपडते. अशा नादांचा अभाव व रिकामें मन हीं दुर्वर्तनाचीं अभावात्मक कारणें समजलीं जाण्यास हरकत नाहीं. खेळणारा व खोड्या करणारा मुलगा पुष्कळांना त्रासदायक वाटतो, पण मुलांच्या या नैसर्गिक प्रवृत्तींचा ज्यांच्या ठायीं अभाव आहे अशीं मुलेंच अखेर स्वतःला व इतरांना खरीं त्रासदायक होतात.

## रोगांचा संबंध

(७) रोगांचा दुर्वर्तनाशीं दोन प्रकारें संबंध येऊं शकतो. एखादा रोग झाल्यामुळें शरिरास अशक्तता येते किंवा कायमचें कांहीं व्यंग राहतें व त्यामुळें

तात्पुरता किंवा कायमचा तो मनुष्य आपले नेहमींचे व्यवसाय चालविण्यास असमर्थ होतो. शाळेचा अभ्यास, खेळ किंवा चांगल्या तऱ्हेनें करमणुंक करून घेणें कठीण झाल्यास दुर्वर्तनाकडे प्रवृत्ति होण्याचा संभव कांहीं अशक्य नाहीं. दुसऱ्या कांहीं उदाहरणांमध्यें रोगांमुळें कांहीं व्यंग झालें नसलें तरी अखंड अस्वस्थता राहते. बारीकसारीक दुःख, सहसा दुसऱ्यास न समजणारें किंवा न सांगतां येणारें दुःख (उदा० डोळ्यांची आग, दांत दुखणें, मूळव्याध वगैरे) अखंड किंवा मधूनमधून चालू असल्यामुळें ज्ञानतंतु उत्तेजित व अस्थिर स्थितींत राहतात. त्यायोगें थोडासा अशक्तपणा तर येतोच पण विशेषतः मनाला अस्वस्थता जास्त येते. संयमनशक्ति कमी होते, साध्या गोष्टीहि सहन होऊं शकत नाहींत व त्याचा परिणाम वर्तनावर घडण्याचा बराच संभव असतो.

(८) सामान्यतः शरिराच्या नाजुक भागीं होणारें दुःख बऱ्याच वेळां अशा तऱ्हेनें मानसिक स्थिति बिघडविण्यास कारणीभूत होतें. डोळे किंवा कान दुखत असले किंवा त्यांस कायमचा कांहीं विकार असला तर शिक्षण संपादन करण्याच्या बाबतींत किती अडथळा येईल, व त्यायोगें दुखण्यानें येणाऱ्या मानसिक अस्वस्थतेंत किती भर पडेल याची कल्पना कोणासहि सहज येईल. पण अभ्यासापेक्षांहि याचा परिणाम मुलांच्या करमणुकींवर व खेळांवर जास्त होतो. एक तर त्यांस खेळांत किंवा करमणुकीच्या दुसऱ्या प्रकारांत चांगल्या तऱ्हेन भाग घेतां येत नाहीं आणि या दुखण्यामुळें स्वभाव थोडासा चिरचिरा झाला असल्यामुळें इतर मुलें त्यांच्याशीं नीट वागण्यास फारशीं उत्सुक नसतात. चांगल्या व बरोबरीच्या मुलांची संगति व योग्य करमणुकीचे प्रकार या दोन्ही गोष्टी संपादन करणें त्यांस कठीण होऊं लागतें. त्यामुळें त्यांची प्रवृत्ति वाईट संगति व हलक्या दर्जाच्या करमणुकींकडे वळते. शाळेंतहि अभ्यासांत समाधानकारक प्रगति करणें त्यांस अशक्य होतें व (त्यांच्या या असमाधानकारक प्रगतीची योग्य मीमांसा करून त्या अनुरोधानें त्यास शिक्षण देण्याइतकी आपल्या शाळांत प्रगति झाली नसल्यानें) शाळेचा व अभ्यासाचा साहजिकच कंटाळा येतो. मग अर्थातच दुसरे व्यवसाय करावेसे त्याला वाटल्यास त्यांत कांहींच आश्चर्य नाहीं.

(९) तोतरेपणासारख्या दिसण्यांत निरुपद्रवी दोषाचेहि वर्तनावरील

परिणाम कमी महत्त्वाचे नसतात. समाजांत व संभाषणांत भाग घेणें कठीण झाल्यानें शक्य तितकें एकटें राहण्याची व इतरांची संगति टाळण्याची प्रवृत्ति होते. तोतरेपणाचा संबंध मनोविकारांशीं असल्यानें तोतरीं मुलें केव्हांकेव्हां चंचल प्रवृत्तीचीं असतात व विकारवश लवकर होतात. त्यामुळें त्यांच्यावर संगतीचा परिणाम लवकर होतो. अशा सर्व प्रकारच्या उदाहरणांत वैद्यकीय तपासणी शक्य तितकी चांगल्या तऱ्हेनें करून घेणें अवश्य आहे. पण हे शारीरिक दोष दुरुस्त करण्याकरितां योग्य ते उपाय योजून सर्व काम भागेल असें नाहीं; कारण एक तर सर्व दोष दुरुस्त करण्यासारखे नसतात; शिवाय हे दोष फक्त मनःस्थितीचा एक अंश असल्यानें भोंवतालच्या परिस्थितींत योग्य ते बदल केल्याशिवाय झालेला परिणाम दुरुस्त होऊं शकत नाहीं.

### अंतःस्रावक ग्रंथि

(१०) मुलांच्या वर्तनाचा विचार करतांना मनोवृत्ति आणि विकार यांचे कडेच आपण जास्त लक्ष देतों; पण त्या मानानें हे मनोविकार उत्पन्न करणाऱ्या कारणांकडे आपलें लक्ष जात नाहीं असें म्हणणारा एक शास्त्रज्ञांचा वर्ग आहे. शरिरांतील रक्तांत घडून येणाऱ्या रासायनिक फेरफारांमुळें हे विकार उत्पन्न होत असतात; आणि अंतःस्रावक ग्रंथींतील स्रावामुळें या रासायनिक क्रिया घडून येतात, असें त्यांचें म्हणणें आहे. अर्थातच या अंतःस्रावक ग्रंथींचें कार्य योग्य रीतीनें घडवून आणण्यास समर्थ असें एखादें औषध सांपडलें तर मनुष्याचें दुर्वर्तन ताबडतोब दुरुस्त होईल असें ते सांगतात.

शरिरांत ठिकठिकाणीं अनेक ग्रंथी ( glands ) असून त्या ग्रंथींतून विशिष्ट प्रकारचे रस तयार होत असतात. या ग्रंथींपैकीं कांहींतून स्रवणारे स्राव ( secretions ) प्रत्यक्षपणें दिसत नाहींत; तयार झाल्याबरोबरच तेथील रक्त-वाहिन्यांत ते मिळून जातात म्हणून या प्रकारच्या ग्रंथींना अंतःस्रावक ग्रंथी ( endocrines–ductless glands ) असें नांव देतात. या ग्रंथींतून उत्पन्न होणाऱ्या स्रावांचा शरिराच्या विकासावर व आरोग्यावर बराच महत्त्वाचा परिणाम होतो; पण त्याबरोबरच या स्रावांच्या रासायनिक घटनेंत बदल झाल्यास किंवा त्यांचें प्रमाण कमीजास्त झाल्यास त्यांचा मनोविकारांवरहि पुष्कळ परिणाम होतो असें आतां सिद्ध झालें आहे. या ग्रंथींपैकीं मानेंत असलेली थायरॉइड ( thyroid ) ग्रंथी सर्वांत जास्त महत्त्वाची समजली जाते.

या ग्रंथींतील स्रावाच्या प्रमाणांत फरक पडल्यास किंवा ह्या ग्रंथीची अवास्तव वाढ झाल्यास मनुष्याचे विकार अत्यंत उत्तेजित होतात आणि अविचारी धाडसाचीं कृत्यें करण्याकडे—प्रसंगीं मारामारी, खून यांसारख्या कृत्यांकडेहि—त्यांची प्रवृत्ति होते. डोक्यांत मेंदूच्या खालीं असलेल्या लहानशा (pituitary) ग्रंथीचें कार्य व्यवस्थित नसल्यास मनुष्यास स्वतःवरील जबाबदारीची जाणीव कमी होते. अशीं मनुष्यें सामान्यतः सुस्वभावी पण स्वच्छंदी वागणुकीचीं असतात व लहानसान चोऱ्या करणें, खोट्या सह्या करून किंवा अशाच सौम्य प्रकारांनीं दुसऱ्यांस फसविणें यांसारखीं कृत्यें करतात. अत्याचाराचीं किंवा धाडसाचीं कृत्यें करण्याकडे यांची प्रवृत्ति सहसा होत नाहीं. रति-विषयक अत्याचार ( sexual crimes ) करणाऱ्या मनुष्यांच्या ( gonads) जननेंद्रियाच्या ग्रंथींत कांहीं विकृति असल्याचें आढळून आलें आहे. शरिरांतील इतर अंतःस्रावक ग्रंथींचाहि अशा तऱ्हेनें वर्तनाशीं संबंध लावण्यांत येतो. योग्य प्रकारची शस्त्रक्रिया करून किंवा विशिष्ट पद्धतीनें तयार केलेले ग्रंथींच्या स्रावांचे अर्क पोटांत देऊन या ग्रंथींचें कार्य नियमित करतां येतें व मग अर्थातच वर्तन दुरुस्त होतें.[१] सॅन क्वेंटिन (San Quentin, U. S. A) येथील तुरुंगांतील सुमारें साठ कैद्यांवर अशा तऱ्हेनें प्रयोग करून पाहिले असून त्या सर्वांच्या वर्तनांत इष्ट असा बदल झाल्याचा उल्लेख डॉ. स्टॅन्ले आणि डॉ. रेनाल्डस् यांनीं केला आहे. शाळेंतील वर्तन असमाधानकारक असलेल्या पांचशें मुलांची शारीरिक तपासणी करून पाहिली असतां, त्यांतील पन्नास मुलांच्या अंतःस्रावक ग्रंथी विकृत (disordered) स्थितींत आढळल्या असें डॉ. ल्युरी यांना आढळून आलें.[२] गेल्या महायुद्धांत सक्तीची लष्कर-भरती सुरू झाल्यानंतर पुष्कळ सुखवस्तु लोकांना लढाईवर जावें लागलें. ही मंडळी परत आल्यावर त्यांच्या वर्तनांत बराच बदल झाल्याचें दिसून आलें. लढाईंतील कष्ट व शिस्तीचें वातावरण यांचा परिणाम थोडाबहुत झाला असेलच. पण युद्धांतील धकाधकीच्या जीवनाचा त्यांच्या ॲड्रीनल ग्रंथीवर परिणाम झाल्यामुळें हा बदल झाला, असें प्रो. हक्स्ले यांचें मत आहे.[३]

---

१ *Popular Science*, July, 1930. २. American Psychiatric Association, Atlanta. ३. *Science News Letter*, August 6, 1927.

प्रकरण नववें

# सद्वर्तनाचें शिक्षण व त्याचे मार्ग

" Knowledge of honesty will not make a person honest; observation that another is honest will not make him honest; punishment for dishonesty will not make him honest. Train in him an attitude of fair-play, a desire to be honest and he will be honest." —John J. B. Morgan

## शील आणि मनःस्वभाव

शील व सद्वर्तन हे शब्द इतके व्यापक व अनेकार्थी आहेत कीं, त्यांची निश्चित व्याख्या करणें कठीण आहे. मुलाचें बिघडलेलें वर्तन दुरुस्त करून त्यास शीलसंपन्न करतांना शीलासंबंधींच्या आपल्या कल्पना निश्चित स्वरूपाच्या असल्याशिवाय आणि त्याच्या संवर्धनाच्या मार्गांची पूर्ण विचिकित्सा केल्याशिवाय शीलसंवर्धनाचा आपला प्रयत्न योग्य मार्गानें होण्याचा संभव कमी. अमुक करूं नको, अमुक केल्यास पाप लागेल अशा तऱ्हेनें विशिष्ट क्रियांच्या निषेधावरच भर देणारी शीलाची व्याख्या असंस्कृत समाजांत किंवा अगदीं लहान वयाच्या मुलांपुरती चालूं शकेल; पण शिक्षणानें मन सुसंस्कृत झाल्यावर व प्रत्येक क्रियेच्या कार्यकारणभावाची मीमांसा करण्याची प्रवृत्ति वाढूं लागल्यावर नीतिमत्तेचा व शीलाचा आधार जास्त भक्कम पायावर उभारणें जरूर असतें. मनुष्यस्वभावाच्या व मानसिक प्रवृत्तींच्या ज्ञानाची वाढ वेगानें होत असतां जर आपण शीलाच्या या प्राथमिक कल्पनांनाच चिकटून बसलों तर आपली विचारसरणी व आचरण यांत अंतर पडल्याशिवाय राहणार नाहीं.

अमुक क्रिया करणें हें सद्वर्तन व अमुक क्रिया करणें हें दुर्वर्तन अशा स्वरूपाची शीलाची व्यावहारिक व्याख्या करण्यापेक्षां अमुक एका विशिष्ट परिस्थितींत अमुक एका निश्चित प्रकारचें वर्तन खात्रीनें करण्याचा अगर घडून येण्याचा जो मनःस्वभाव त्यास शील म्हणणें जास्त सयुक्तिक होईल.

व्यवहारांत परिणामतः या दोन्ही व्याख्या जरी समानार्थी असल्या—म्हणजे सद्वर्तनाला सद्वर्तनच म्हटलें—तरी या दुसऱ्या व्याख्येंत शील हा एक मनःस्वभाव आहे व तो अनेक कारणांमुळें एका विशिष्ट तऱ्हेचा बनून जातो या गोष्टीवर जास्त भर देण्यांत आला आहे. आईबापांच्या व शिक्षकांच्या आज्ञा बिनबोभाट पाळणाऱ्या मुलाचें वर्तन कोणीहि चांगलेंच म्हणेल; पण त्या मुलाला शीलवान् म्हणण्यापूर्वी त्याच्या मनःस्वभावाचें थोडेंसें अवलोकन करावें लागेल. भीतीमुळें, परिस्थितीनें भाग पाडल्यामुळें, किंवा दुसरें कांहीं करणें शक्य नाहीं म्हणून, आज्ञा पाळणाऱ्या मुलापेक्षां, वडिलांबद्दल प्रेम व आदर असल्यामुळें, किंवा समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें इतर व्यक्तींबद्दल काळजी केली पाहिजे या जाणिवेनें स्वभावतः आज्ञा पाळणारा मुलगा निःसंशय जास्त शीलवान् समजला पाहिजे. पहिल्याचें वर्तन विशिष्ट क्रियांपुरतेंच मर्यादित आहे, तर दुसऱ्याच्या मनःस्वभावाची रचनाच निराळ्या तऱ्हेनें झाली असल्यामुळें त्याच्या सर्वसामान्य वर्तनावर त्या मनःस्वभावाचा परिणाम दिसून येईल.

आजकालचें युग हें व्यक्तिस्वातंत्र्याचें आहे. प्रत्येक मनुष्य आपलें हित पाहण्यास पूर्ण स्वतंत्र आहे व त्यास असें करण्याचा पूर्ण हक्क आहे असें सर्व समजतात. पण अशा तऱ्हेनें एका व्यक्तीप्रमाणें समाजांतील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य असल्यामुळें आपल्या स्वतःच्या हिताबरोबरच त्याला इतर व्यक्तींच्या हिताचा विचार करावा लागतो. म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या मीपणाच्या—अहं-तेच्या क्षेत्राचा विस्तार होऊन वयं-तेचा—सामाजिक जाणीवेचा समावेश त्यांत होऊं लागतो. वयंतेची ही जाणीव, आपल्याप्रमाणें समाजांतील इतर व्यक्तींबद्दल आदर व अशा तऱ्हेचें वर्तन करण्याचा मनःस्वभाव यासच आपण शील म्हणतों. ज्याला ही वयं-तेची जाणीव पूर्णपणें झाली आहे, त्या मनुष्याला इतरांच्या सुखांत व्यत्यय आणल्याशिवायच आपणांला सुखाचा उपभोग घेणें शक्य आहे ही गोष्ट पटते आणि अशा तऱ्हेनें वागणें हा त्याचा मनःस्वभाव बनून जातो. ज्याचा मनःस्वभाव विशिष्ट तऱ्हेच्या शिक्षणानें निश्चित झालेला असतो, ज्याचा ध्रुवबिंदु अढळ असतो असा मनुष्य समाजाच्या कोणत्याहि परिस्थितींत असला किंवा कोणत्याहि स्थित्यंतरांत सांपडला तरी त्याच्या वर्तनाविषयीं त्याला स्वतःला आत्मविश्वास असतो व इतरांनाहि त्याच्याविषयीं निश्चित विधानें करतां येतात.

## नीतिपाठ व संवयी

अशा तऱ्हेचा मनःस्वभाव बनविणें,—योग्यायोग्यतेचा विचार करून नेहमीं योग्य मार्गाचीच निवड करणें व त्या निवडलेल्या योग्य मार्गानेंच नेहमीं जाणें, अशा तऱ्हेचा स्वभाव तयार करणें—यासच शीलाचें शिक्षण देणें असें म्हणतां येईल. शील किंवा सद्वर्तन ही निःसंशय आचारप्रधान बाब असल्यामुळें केवळ व्याख्यानरूपानें त्याचें शिक्षण कितपत होईल, याबद्दल शंकाच आहे. नीतिपाठाचें पुराण नियमानें श्रवण करणारीं मुलें व्यवहारांत किती प्रामाणिकपणें वागतील किंवा समाजांतील आपलीं कर्तव्यें कितपत जबाबदारीनें पार पाडतील, याविषयीं कांहीं निश्चित सांगतां येणार नाहीं. चांगलें व वाईट, सद्वर्तनाच्या व दुर्वर्तनाच्या मर्यादा अशांसारख्या प्रश्नांविषयीं निश्चित मत बनविण्याकरितां पुस्तकांचा, व्याख्यानांचा व नीतिपाठांचा उपयोग होईल. पण त्यांचाहि अतिरेक झाल्यास वावदूकता वाढते आणि आपल्या कशाहि वर्तनाचें, स्वतःस व इतरांस पटेल असें समर्थन करण्याचीच प्रवृत्ति वाढण्याचा संभव असतो. विशिष्ट तऱ्हेचें वर्तन बिनचूक घडून यावयाचें म्हणजे त्या तऱ्हेचें वर्तन अंगवळणीं पडावयास हवें; म्हणजे आपल्या भोंवतीं असलेल्या परिस्थितीचा विशिष्ट तऱ्हेनेंच विचार करण्याची संवय लागावयास हवी व परिस्थितींतील विशिष्ट गोष्टींना विशिष्ट प्रकारचें महत्त्व देण्याचीहि संवय झालेली असावी. उदाहरणार्थ, शिक्षकांच्या किंवा वडिलांच्या रागें भरण्याला अगर आपल्याविषयीं असलेल्या बऱ्यावाईट मताला किती किंमत द्यावयाची याची तात्त्विक चर्चा करण्यापेक्षां त्यांच्या मताला योग्य महत्त्व देण्याची संवय मुलाला लागलेली असली तर त्या मताकरितां तो आपलें वर्तन निःसंशय बदलील.

विचार करण्याची, आचरण करण्याची, अगर परिस्थितीचें महत्त्व ओळखण्याची संवय हाच शीलसंवर्धनाचा मुख्य आधारस्तंभ आहे. कोणतीहि गोष्ट पुनः पुनः केल्यानेंच संवय जडते. जुनी संवय मोडून नवी संवय लावतांना जुन्या गोष्टींऐवजीं नवीन गोष्टींचें आचरण, ती नवी संवय मुलांच्या अंगवळणीं पडेपर्यंत, करणें हाच एक मार्ग आहे. शाळांतून किंवा समाजांतून सद्गुणांचें प्रत्यक्ष आचरण करूनच मुलांना शीलाचें शिक्षण देतां येईल; अशा तऱ्हेनें त्यांना आचरण करण्याच्या अनेक संधि आणून देणें व

अशा वेळीं त्यांच्याकडून योग्य वर्तन होईल अशाबद्दल काळजी घेणें हाच शीलसंवर्धनाचा मार्ग आहे. व्यवहारांत वागतांना दर घटकेला आपण आपल्या वर्तनाचा विचार करूनच वर्तन करितों असें नाहीं. अनुभवानें व संवयीनें अमुक प्रकाराचें वर्तन आपल्या इतकें अंगवळणीं पडलेलें असतें कीं, आपण फारसा विचार केल्याशिवायच तसें वर्तन तावडतोब करतों. मुलांच्या बाबतींतसुद्धां वर्तनाच्या या पद्धति शक्य तितक्या लवकर अंगवळणीं पडणें हेंच जरूर असतें.

शील ही एक मनोवृत्ति किंवा मनाचा स्वभाव असल्यानें शीलसंवर्धनाच्या बाबतींत विशिष्ट क्रिया मुलांकडून करवून घेतांना त्या क्रिया ज्या वृत्तीनें, ज्या हेतूनें तीं मुलें करितात तिकडेच जास्त लक्ष देणें अवश्य असतें; कारण प्रत्येक क्रिया योग्य वृत्तीनें व इष्ट ध्येय साधण्याच्या हेतूनें केली गेली नसेल तर तिचें शीलाच्या दृष्टीनें महत्त्व कमी होईल हें निःसंशय आहे. केवळ सक्तीनें मुलांकडून कांहीं सत्कृत्यें करवून घेतांना त्यांच्या मनोवृत्ति पुष्कळ वेळां त्या सत्कृत्यांच्या अगदीं विरुद्ध प्रकारच्या असण्याचा संभव जास्त असतो व म्हणून शिकविणाराचा इष्ट हेतु बाजूलाच राहून अनिष्ट परिणाम मात्र केव्हां केव्हां घडून येतात. उदाहरणार्थ, आई आजारी असतांना तिच्या खोलींत गडबड करणाऱ्या बाबूला गप्प बसण्यास बाबांनीं फर्माविलें. लहान बाबूला सक्तीनें गप बसविणें ही कांहीं फारशी कठीण गोष्ट नाहीं; पण त्यायोगानें बाबूच्या मनोवृत्तींत आईविषयीं प्रेम किंवा काळजी या भावना उत्पन्न होण्यास मुळींच मदत होऊं शकत नाहीं व म्हणून अशाच स्वरूपाची दुसरी परिस्थिति उत्पन्न झाल्यास त्याच्या वर्तनांत या भावना दिसणार नाहींत. उलट आईच्या प्रकृतीकरितां गडबड न करणें जरूर आहे ही गोष्ट बाबूला पटवून दिली असती तरीहि बाबू गप्प बसला असता. पण तसें केल्यानें आईबद्दल काळजी करण्याची त्याला संवय लागली असती व आईविषयींचें प्रेम त्याच्या वर्तनांत दिसूं लागलें असतें. येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं मुलांच्या मनोवृत्तींवर किंबहुना कोणाच्याहि मनोवृत्तीवर दुसऱ्या मनुष्याचा ताबा फार थोडा चालूं शकतो, म्हणून शीलसंवर्धन करणें——मनोवृत्तींना वळण लावणें—या गोष्टी फार कौशल्यानें व काळजीपूर्वक कराव्या लागतात.

## समाजाचें वातावरण

कोणत्याहि प्रकारचें वर्तन करितांना मनुष्य आपल्या प्रवृत्तींना अनुसरून व जरूर तेथें त्यांचें नियमन करून वागत असतो, म्हणून आत्मसंयमनाचा एकच सद्गुण अनेक वेळां निरनिराळ्या नांवांनीं व्यवहारांत ओळखला जातो. परोपकार, प्रामाणिकपणा, सत्यवादित्व इत्यादि अनेक सद्गुण हे पर्यायानें आत्मसंयमनाचेच प्रकार आहेत. विशिष्ट तऱ्हेनें आपल्या प्रवृत्तींचें नियमन करण्याकरितां मनुष्यापुढें आपल्या वर्तनाचें कांहीं ध्येय असावें लागतें व हें ध्येय प्रत्येक मनुष्य विचार करून ठरवीत नसून, ज्या समाजांत तो वागत असेल त्या समाजाच्या नैतिक वळणाच्या वातावरणाच्या अनुषंगानें तो ठरवीत असतो. समजाची संस्कृति, त्याचा इतिहास, आजपर्यंत त्या समाजावर आलेलीं संकटें व त्या समाजांत उत्पन्न झालेल्या थोर पुरुषांनीं त्याला वळण लावण्याचे केलेले प्रयत्न या सर्वांच्या योगानें त्या समाजाचें नैतिक वातावरण बनलेलें असतें. व त्याचा परिणाम त्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर होत असतो. सर्व राष्ट्र हा एक समाज असून त्याचे पोटभेद पडत जातात व अशा तऱ्हेनें प्रत्येक गांव, प्रत्येक आळी, प्रत्येक घर, प्रत्येक शाळा व शाळेंतील प्रत्येक वर्ग हा एक लहानसा समाज होत जातो. या प्रत्येक लहानशा समाजाचीं वर्तनविषयक विशिष्ट ध्येयें असून त्यांचा परिणाम त्या लहानशा समाजांतील प्रत्येक मुलावर होत असतो. मुलांचें वर्तन दुरुस्त करण्याचा प्रयत्न करितांना ते ज्या छोट्या समाजांत राहत असतात, त्या समाजाचें वातावरण समजून घेतलें पाहिजे व त्याचा मुलांच्या वर्तनविषयक ध्येयांवर जो परिणाम झाला असेल तो विचारांत घ्यावयास पाहिजे. नाहींतर पालक व शिक्षक यांचा समाज व त्यांचीं नैतिक ध्येयें निराळीं आणि ज्या जगांत मुलें वावरतात तें त्यांचें जग निराळें अशी विभागणी होऊन पालकांच्या म्हणण्याचा मुलांच्या मनांवर फारसा परिणाम होण्याचा संभव नाहीं.

या ठिकाणीं असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, जर मुलांना यांनीं स्वतः ठरविलेल्या ध्येयाप्रमाणें व त्यांच्या स्वतःच्या मनोवृत्तींना अनुसरूनच वागूं देण्यांत आलें तर त्यांचें शील योग्य तऱ्हेचें तयार होणार नाहीं. आपल्या तत्त्वाकरितां किंवा नीतीनें वागल्यामुळें येणारीं संकटें व पडणारे क्लेश सहन करण्याची त्यांची तयारी अशानें होणार नाहीं

व ही त्यांच्या शीलांत एक मोठी उणीव राहून जाईल. असें होण्याचा संभव कदाचित् असेल. पण व्यवहारांत आपण अशा कितीतरी गोष्टी करतों कीं, ज्या आपण स्वखुषीनें कधींहि केल्या नसत्या. कर्तव्य म्हणून अगर मनाची हौस म्हणून आपण त्या अप्रिय व कष्टप्रद गोष्टी करण्यास तयार होतों. याचप्रमाणें ही कर्तव्याची बुद्धि किंवा विशिष्ट तऱ्हेच्या मनाच्या हौशी (interests) यांचा विकास होईल असा प्रयत्न जर करण्यांत आला तर नीतीनें वागल्यामुळें येणारीं सर्व संकटें व क्लेश सहन करण्याची मुलांची तयारी होईल.

## सुधारणेच्या प्रयत्नांतील दोष

दुर्वर्तनाची संवय लागून तें अंगवळणीं पडल्यानंतर दुरुस्त करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां प्रथमपासूनच काळजी घेऊन दुर्वर्तनाची प्रवृत्ति मूळांतच खुडून टाकणें केव्हांहि चांगलें. दुर्वर्तनाची प्रगति इतरांच्या लक्षांत येण्याइतकी होण्यापूर्वींच त्याची सुरवात झालेली असून काळजीपूर्वक पाहिल्यास तीं लक्षांत येण्यासारखी असते. परिस्थितीमुळें वारंवार दुर्वर्तनास उत्तेजन मिळणें, किंवा केलेलें दुर्वर्तन छपविण्यांत यश येऊन त्याचा फायदा मिळणें व अशांसारखीं सहज लक्षांत येणारीं इतर कारणें मूळांतच नाहींशीं करणें शक्य असतें; परंतु हें न साधलें तरीहि दुर्वर्तनी मुलांपैकीं कितीतरी मुलें सुधारून सुमार्गास लागलेलीं आपण पाहतों. तेव्हां कोणत्याहि मुलाच्या बाबतींत प्रथमतः पूर्ण आशा धारण करावी; निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. ज्या ज्या कारणांमुळें दुर्वर्तन घडून आलें त्यांचा योग्य विचार करून तीं दूर करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल तर यश येण्याची आशा पुष्कळ असते. पुष्कळ वेळां इतक्या पद्धतशीरपणें प्रयत्नच केला जात नाहीं. एखाद्या मुलानें कांहीं दुर्वर्तन केल्यास त्या वेळच्या आपल्या लहरीप्रमाणें एखादा तात्पुरता उपाय योजून पुनः तो असें करीतोंपर्यंत—किंवा केलेलें आपल्या लक्षांत येईतोंपर्यंत—स्वस्थ बसणें ही वागण्याची तऱ्हा कांहीं प्रयत्न या संज्ञेस पात्र होऊं शकत नाहीं.

(१) मुलांच्या वर्तनांकडे आपल्या स्वतःच्या सोयी, गैरसोयींच्या दृष्टीनेंच पाहणें अगदीं चुकीचें आहे. त्यांचें वर्तन दुरुस्त करण्याकरितां जे प्रयत्न करावयाचे असतील त्यांत विशिष्ट पद्धति व हेतु हीं प्रामुख्यानें असलीं पाहिजेत. जी कारणमीमांसा आपण निश्चित केली असेल, तीस अनुसरून

एकादा उपाय योजिला पाहिजे. त्यांत यश न आल्यास त्याचा विचार करून आपले उपाय योजण्याच्या बाबतींत काय चुकलें हें शोधून काढावयास पाहिजे व त्या दृष्टीनें पुनः प्रयत्न करावयास पाहिजे. व्यापारांत किंवा धंद्यांत आपल्या मनासारखी एखादी गोष्ट घडून येत नसल्यास ज्याप्रमाणें आपण पुन: पुनः प्रयत्न करितों व पद्धतशीरपणें तिचा पिच्छा पुरवितों त्याप्रमाणें या बाबतींतहि आपल्या प्रयत्नांची शिकस्त कां करूं नये ?

(२) मुलांचें दुर्वर्तन दुरुस्त करण्याकरितां आईबापांनीं किंवा शिक्षकांनीं केलेल्या प्रयत्नांत आणखी एक दोष असतो. तो असा कीं, ते सर्व प्रयत्न ' विध्वंसक ' असतात. हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, कोणताहि ' विधायक ' कार्यक्रम अनुसरला जात नाहीं. ' अमुक करूं नको, तमुक करूं नको 'अशासारख्या नकारात्मक आज्ञा (आणि त्याहि मोघम भाषेंत) व त्या आज्ञा अंमलांत आणण्याकरितां कांहीं ठराविक मार्ग हेंच प्रयत्नांचें स्वरूप असतें. मुलाला पुष्कळ गोष्टी करतां येत नाहींत हें आपणांस समजलें, पण त्यास काय करतां येतें हें समजून घेण्याचा प्रयत्न करावयास नको काय ? केवळ नकारात्मक आज्ञांमुळें उलट त्या क्रियांकडे, विरोधी भक्तीनें कां होईना, पण जास्त लक्ष वेधलें जातें. उलट ज्या क्रिया मुलाला साधतात, ज्या बाबतींत त्याचें वैशिष्ट्य दिसून येईल अशा क्रिया करण्याकडे त्याचें लक्ष वेधल्यास दुसरीकडील लक्ष आपोआपच कमी होऊन त्याचें वर्तन सहज, न कळत सुधारतें. ज्या मुलामध्यें एकहि सद्गुण नाहीं, ज्याला कोणतीच गोष्ट साधत नाहीं असा मुलगा क्वचितच आढळतो व म्हणून अशा तऱ्हेच्या विधायक कार्यक्रमाला पुष्कळ वेळां यश येतें.

(३) मुलांचें जग आणि त्यांच्या मनोवृत्ति या पुष्कळांना आकलन होत नाहींत. मित्राला दिलेलें अभिवचन, धोतराचे कांठ, टोपीचा रंग किंवा पोषाखांतील पद्धतीविषयीं आवडीनावडी, वर्गांत ठराविक जागेवर बसण्याची इच्छा अशासारख्या गोष्टी वडील माणसांना मुळींच महत्त्वाच्या वाटत नाहींत; पण त्यांच्या योगानें मुलांच्या जगांत केवढाल्या क्रांत्या घडून येत असतात ! मुलांच्या वर्तनालाहि हेतु व उद्देश असतात, मुलांनाहि मान अपमान इत्यादि सूक्ष्म विकार असतात, इत्यादि गोष्टींकडेहि अनेक वेळां दुर्लक्ष होतें. मुलांच्या वर्तनाची सहानुभूतिपूर्वक चौकशी करून त्यांचा विश्वास

संपादून करणें हीं मुख्य गोष्ट साधल्याशिवाय त्यांच्या खऱ्या मनःस्थितीशीं परिचय करून घेणें अशक्य होतें.

( ४ ) मुलांशीं बोलतांना-वागतांना आईबाप व शिक्षक वगैरे वडील मंडळी पुष्कळ वेळां खोटीं विधानें करितात किंवा मुलाला फसविण्याचा प्रयत्न करितात. असें करण्यांत मुलांचें कल्याण करण्याचाच त्यांचा हेतु असतो यांत शंका नाहीं. पण ही गोष्ट मुलांच्या लक्षांत आल्याबरोबर त्याचा परिणाम फार घातुक होतो. वडील मंडळीहि प्रसंगीं असत्य बोलतात तर आपणांसहि असत्य विधानें करण्यास काय हरकत आहे? असें यांना वाटतें; एवढेंच नव्हे तर वडील मंडळींबद्दल मुलांना स्वाभाविक थोडाबहुत जो आदर असतो तोहि कमी होतो. त्याचा परिणाम मुलांच्या सर्वसामान्य मनोवृत्तींवर घडून येऊन केव्हां केव्हां सर्वच आदरणीय वस्तु व व्यक्ति यांबद्दल आदर कमी होतो; आणि सद्गुणांविषयींचीहि आदरबुद्धि कमी होते. अशा तऱ्हेनें सद्वर्तनाचा मुख्य पाया डळमळूं लागतो. मुलांच्या मनोवृत्तीशीं परिचय करून घेण्याकरितां मुलांशीं सरळ व मोकळेपणानें वागून त्यांचा विश्वास व आदर हीं संपादन करणें हाच योग्य मार्ग होय.

## पालक-शिक्षकांची मनोवृत्ति

( ५ ) मुलांनीं एखादें दुर्वर्तन केल्यास ताबडतोब विकारवश होणारी व स्वतःची विचारशक्ति बाजूस सारणारी कांहीं मंडळी असतात. अशा विकारवशतेमुळें मुलांच्या वर्तनावर कांहीं परिणाम झालाच तर तो उलट दिशेनें होत असतो. वर्तन सुधारणें म्हणजे पूर्वीच्या वाईट संवयी घालवून चांगल्या लावणें इतका सोपा व मर्यादित अर्थ घेतला तरीहि तो प्रश्न शैक्षणिक आहे, विकारवश होऊन केलेल्या अविचारी धडपडीमुळें सुटण्यासारखा नाहीं ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवावी.

( ६ ) मुलांच्या वर्तनाचा विचार करतांना स्वतःची मनस्थिति पूर्वग्रहांपासून सर्वस्वीं अलिप्त ठेवण्याची खबरदारी फारच थोडे पालक घेऊं शकतात. एखाद्या अपराधाबद्दल मुलांना शिक्षा करितांना नीतिमत्तेचें उच्च ध्येय डोळ्यांपुढें ठेवून व मुलांचें आत्यंतिक कल्याण करण्याच्या एकमेव हेतूनेंच आपण वागतों असें जरी ते म्हणत असले व त्याप्रमाणें भासविण्याचा

स्थळ प्रत

प्रयत्न करीत असले तरी पुष्कळ वेळां या शिक्षक-पालकांच्या आग्रहामागचे गूढ हेतु निराळेच असूं शकतात. त्यांच्या लहानपणीं किंवा जगांत इतर ठिकाणीं त्यांना जे अनुभव आले असतील, त्यांचे सूक्ष्म परिणाम त्यांच्या स्वतःच्या मनोवृत्तींत सुप्त स्थितींत असतात व मुलांच्या वर्तनानें त्यांच्या या सूक्ष्म मनोव्यापारांना चालना मिळून मुलांच्या क्षुल्लक अपराधांना वाजवीपेक्षां जास्त महत्त्व ते देतात. पतीकडून फारसा मान मिळत नसलेल्या व घरांतील वडील मंडळीच्या सासुरवासांत वाढलेल्या आईच्या मनांत स्वतःच्या कमीपणाची भावना फार तीव्र असते; अशा वेळीं मुलानें सहज दिलेल्या उत्तरांत तिला भयंकर उद्धटपणा भासतो व आपला अधिकार राखण्याकरितां ती मुलाला जी शिक्षा देते ती अगदीं अन्याय्य असते. बालपणीं भोगलेल्या हालांमुळें व अनुभविलेल्या आपत्तींमुळें समाजाकडे पाहण्याची ज्याची दृष्टीच विकृत झाली आहे अशा शिक्षकाला मुलांच्या साध्या वर्तनांतहि अनेक दोष दिसूं लागतात. मुलांच्या चुकांचा विचार करतांना स्वतःच्या मनोवृत्तीचाहि विचार करण्याची संवय ठेवणें व सर्व पूर्वग्रह बाजूला ठेवून मुलांच्या वर्तनाकडे निर्विकार दृष्टीनें व त्यांच्या अडचणी समजून घेण्याच्याच हेतूनें पाहणें अगत्याचें आहे. विशेषतः ज्यांना मुलांत वागून त्यांच्या वर्तनांत बदल घडवून आणण्याचें जबाबदारीचें काम पत्करावयाचें आहे, त्यांनीं मुलांच्या मनांतील अंतर्व्यापारांशीं सहानुभूतीनें परिचय करून घेण्याचें कधींहि टाळतां कामा नये.

## चिकित्सेची पूर्वतयारी

वर्तन दुरुस्त करणें ही प्रत्येक मुलाच्या मनोवृत्तीवर अवलंबून असणारी वैयक्तिक बाब आहे; अर्थात् ती 'सब घोडे बारा टक्के' याप्रमाणें 'अमुक दुर्वर्तनास अमुक उपाय' अशासारख्या वर्गीकरणांत न येणारी आहे. म्हणून प्रत्येक मुलाविषयीं शक्य तितकी माहिती मिळवून त्याची मनोवृत्ति कोणत्या स्वरूपाची आहे, याचें ज्ञान प्रथम करून घेतलें पाहिजे. वरून सारख्याच दिसणाऱ्या एकाच प्रकारच्या दुर्वर्तनाचीं कारणें निरनिराळीं असण्याचा संभव असतो व म्हणून त्याला निरनिराळे उपाय योजावे लागतात. दुर्वर्तनाच्या सर्व संभवनीय कारणांची चौकशी करून त्याबरोबरच मुलाच्या विशेष शक्ति व मनोविकार कोणते आहेत व कोणत्या मार्गानें त्यास शिक्षण व वळण

देण्याचा प्रयत्न करतां येईल, याचीहि माहिती करून घेण्याचा प्रयत्न करावा. विशेषतः खालील बाबींसंबंधीं पूर्ण ज्ञान करून घेणें अवश्य असतें:—(१) मुलाची कौटुंबिक माहिती–आईबाप व इतर मंडळी यांची मनःस्थिति; (२) मुलाची स्वतःची जन्मापासूनची आरोग्यविषयक व इतर परिस्थिति; (३) सांपत्तिक परिस्थिति व त्याचे कुटुंबांतील इतर मंडळीशीं असलेले संबंध; (४) त्याची मनोवृत्ति, बुद्धि, शाळेंतील प्रगति व त्यास साधणाऱ्या कला, खेळ व इतर हौशी; (५) त्याच्या भावना व स्वभाव; (६) त्यानें आजपर्यंत केलेलें वर्तन व दुर्वर्तन; (७) त्याचे शारिरिक व मानासिक विशेष दोष असतील तर तेहि लक्षांत घेतले पाहिजेत; (८) या सर्वांइतकीच महत्त्वाची गोष्ट, मुलगा सुधरूं लागल्यावरहि त्याच्यावरील लक्ष कमी न होऊं देणें ही होय. पूर्वींचे स्नेहीसोबती व पूर्वींचीच परिस्थिति मोह पाडण्यास सदैव तयार असतांना आपले श्रम फुकट जाऊं नयेत अशी इच्छा असणाऱ्या सर्व आई-बापांनीं व शिक्षकांनीं मुलांवर अखंड लक्ष ठेविलें पाहिजे व मोह आवरण्याकरितां मुलांना जरूर ती मदत करण्याविषयीं अखंड तत्पर असलें पाहिजे.

एखाद्या मुलाचें वर्तन समाधानकारक नाहीं असें आढळून आल्याबरोबर त्याचे वर्तनाला वळण लावण्याचा कार्यक्रम आखतांना कोणत्या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे याची चर्चा पूर्वींच्या प्रकरणांतून ठिकठिकाणीं आलीच आहे. बुद्धिबळाच्या खेळांत एखादें प्यादें सरकवितांना ह्या नवीन डावामुळें आपला काय फायदा होतो इतकेंच पाहून भागत नाहीं. त्या प्याद्याची पूर्वींची जागा सुटल्यामुळें त्याचा इतर मोहऱ्यांना व इतर मोहऱ्यांचा त्याला असलेला आधार सुटण्याचा संभव असतो, त्याचप्रमाणें त्याच्या नवीन जागीं त्याला नवीन जोराची आवश्यकता भासते. इतर मोहऱ्यांनाहि त्याचा आधार मिळून सर्वच डावाची परिस्थिति बदलून जाते. सद्वर्तनाचा कार्यक्रम निश्चित करतांनाहि मुलाशीं संबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींचा आणि त्यांच्या एकमेकांशीं व मुलांशीं असलेल्या संबंधाचा विचार करावा लागतो. त्याच्या वर्तनावर परिणाम करणारीं कारणें दूर करणें जरूरच आहे; तसेंच शीलाची मनोवृत्ति घडवून आणण्याच्या सामान्य तत्त्वांकडेहि लक्ष द्यावें लागतें. अमूक उपाय रामबाण आहे असें सांगणें कठीण आहे. पण सामान्य तत्त्वांच्या दृष्टीनें कांहीं उपायांची रूपरेषा खालीं दाखविली आहे.

स्थळ प्रत
सं. .......... नं. ..........

## शारीरिक दोष

(१) आनुवंशिक किंवा केवळ शारीरिक दोष दुरुस्त करणें क्वचितच शक्य होतें. असे दोष जास्त प्रामुख्यानें आढळून येत असल्यास अशा मुलाला कायमचा निराळा ठेवणें व त्यावर अखंड लक्ष ठेवणें यांशिवाय दुसरा इलाज नसतो. पण अशीं उदाहरणें फारच क्वचित् असतात. अतः[illegible] इंद्रियांचे विकारहि औषधोपचारानें किंवा शस्त्रक्रियेनें दुरुस्त झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें अलीकडे घडलीं आहेत.

(२) अशा तऱ्हेचें शारीरिक व्यंग जरी दुरुस्त करतां आलें नाहीं, तरी जेथें तें व्यंग लक्षांत येणार नाहीं अशा परिस्थितींत मुलाला ठेवून त्या व्यंगाचे दुष्परिणाम टाळतां येतील; किंवा तें व्यंगहि त्याला उपकारकच होईल असाहि मार्ग सांपडूं शकेल. उदाहरणार्थ, वयाच्या मानानें विशेष सशक्त असलेल्या मुलाला आपल्या शक्तीचा दुरुपयोग करण्याचे प्रसंग कमी येतील अशी व्यवस्था करतां येते; किंवा तोतरें बोलणाऱ्या मुलाला बोलण्याचे प्रसंग कमी आणून त्याचे हस्तव्यवसायाचे किंवा इतर गुण त्याच्या सोबत्यांच्या लक्षांत भरतील अशी व्यवस्था केल्यास त्याला चिडविण्याची सोबत्यांची, व चिडून कांहीं तरी करण्याची त्या मुलाची स्वतःची, अशा दोन्ही प्रवृत्ति थांबवितां येतात. अशक्त मुलाला आपला अशक्तपणा अखंड भासत राहिला तर त्याला मानसिक शांति ठेवणें कठीण पडतें व आपल्याकडे इतरांचें अधिक लक्ष वेधून आपलें महत्त्व वाढविण्याकरितां त्याला कांहींतरी विशेष करावें लागतें. अशा तऱ्हेची परिस्थिति टाळणें कांहीं अगदींच अशक्य नसतें.

(३) आपल्या मुलाच्या शारीरिक व मानसिक शक्तींची वाढ क्रमाक्रमानें अखंड होत आहे, ही गोष्ट पालकांचे लक्षांत सहसा नसते. मुलगा लहान असो अगर मोठा असो, त्याच्याशीं वागण्याची त्यांची ठराविक पद्धति बहुशः एकसारखीच असते. मुलाच्या मानसिक शक्तींचा विकास क्रमानें होत असतो, म्हणून ज्या मानानें त्याच्या या मानसिक शक्ति वाढतील त्या मानानें त्यास जास्त स्वातंत्र्य देऊन आपल्या शक्तींचा योग्य उपयोग करण्याची संधि दिली पाहिजे. अशा स्वातंत्र्याचा योग्य उपयोग त्यानें करावा, याची खबरदारी घेऊन त्याच्याशीं आपलें वर्तन या धोरणानें अखंड ठेविलें पाहिजे. अगदीं लहान मुलाप्रमाणें त्यास पूर्ण दाबांत देवणें किंवा तो मोठा झाला

आहे असें म्हणून एकदमच सर्व शिस्त सोडून देणें या दोन्ही गोष्टी हानिकारक आहेत. पौगण्डावस्थेच्या सुरुवातीस मानसिक अस्वस्थतेच्या कालांत (वयाच्या १२–१५ वर्षांपावेतों) शिस्तीचा कडकपणा थोडा सैल करून मुलांच्या सर्वच वर्तनाचा थोडा सहानुभूतिपूर्वक विचार करावयास हवा. भडकलेल्या घोड्याला जरासें चुचकारून शांत करण्याऐवजीं त्यास चौदावें रत्न दाखवून जास्तच भडकविल्यास घोड्यासुद्धां मालकहि खड्ड्यांत पडण्याचा संभव. मनोवृत्तींचें हें वादळ शांत होईपर्यंत जरा कौशल्यानें जहाज संभाळून घेतलें तर जहाज सुरक्षित राहून त्याचा पुढील प्रवासहि जास्त सुखकर होतो.

## कुटुंबांतील शिस्तीचें वळण

(४) मुलांच्या वर्तनाशीं संबंध असलेल्या कारणांपैकीं परिस्थितीशीं संबंध असलेलीं कारणचें दुरुस्त करणें जास्त शक्य व सुलभ असतें. पुष्कळ वेळां एखाद्या आळींतील किंवा पेठेंतील मुलांच्या समुदायाचें वळणच इतकें अनिष्ट असतें कीं, त्या संगतींतून मुलाला दूर करण्याखेरीज गत्यंतर नसतें. अशा वेळीं राहण्याची जागाच बदलावी हें उत्तम. पण हें नेहमींच साधतें असें नाहीं. पण जेव्हां घरांतील परिस्थितीच मुलाला मानवत नसते, उदाहरणार्थ, आईचा अगर बापाचा स्वभाव चमत्कारिक असतो किंवा मुलाला वळण लावण्याची त्यांना पात्रता नसते किंवा घरांतील दुसऱ्या एखाद्या नातेवाईकाचें व मुलाचें पटत नसतें अशा वेळीं मुलाला त्या घरांतून काढून दुसरीकडे–निदान कांहीं दिवस त्याच्या वर्तनास कांहीं स्थैर्य येईतोंपर्यंत तरी–ठेवणें जरूर असतें. मुलावर प्रेम करणारे दुसरे जवळचे नातेवाईक असल्यास त्यांच्याकडे अशी व्यवस्था होणें शक्य असतें. अशा प्रसंगीं अर्थात् केवळ आईचा अगर बापाचा स्वभाव अशासारख्या बाह्य परिस्थितीवरून निदान न ठरवितां या परिस्थितीचा मुलाच्या मनावर काय परिणाम होत आहे हें पाहणें महत्त्वाचें आहे. पुष्कळ वेळां घरांतील एखाद्या व्यक्तीमुळें सर्व घरांतील शांति व आनंद ही नाहींशीं होत असून मुलाचें वर्तन हा केवळ त्यांतला एक पोटभाग असतो. चिडखोर म्हातारा चुलता अगर एखादी भांडखोर आत्याबाई घरांत असल्यास कुटुंबांतील सर्वच व्यक्तींच्या स्वभावांवर व वर्तनांवर परिणाम होतो. आपसांत भांडणें वाढून कोणाचेंच कोणाशीं पटेनासें होतें. अशा वेळीं सर्वच परिस्थितीचा सामग्र्यानें विचार करून उपाय योजावयास पाहिजे.

अशा परिस्थितींत मुलांस सहानुभूतीनें शिक्षण देऊन इष्ट वळण लावण्यास योग्य पण केवळ तिऱ्हाईत अशा गृहस्थांच्या घरीं ठेवण्याचा प्रयोग परदेशांत केला जातो असें म्हणतात. अशासारखा प्रयोग करून पाहिल्यास त्याचे सुपरिणामच होतील असें वाटतें. ज्यांच्या घरांतील शिस्त व वळण हीं स्पृहणीय आहेत आणि ज्यांना मुलांस शिकविण्याची व योग्य मार्ग दाखविण्याची हौस आहे, अशा सद्गृहस्थांनीं, ज्यांचें वर्तन केवळ घरांतील अनिष्ट वळणामुळें बिघडूं लागलें आहे, अशीं दोनतीन मुलें आपल्या घरीं ठेवून घेतलीं तर त्या मुलांच्या वर्तनांत पुष्कळच इष्ट बदल घडून येईल व त्यांच्या भावी आयुष्यासहि निराळें वळण लागेल. खर्चाचा प्रश्न महत्त्वाचा होईल ही गोष्ट खरी; पण मुलाला सुधारण्याची इच्छा असल्यास तो प्रश्न सोडविण्याचे मार्ग सापडूं शकतील. अशा प्रकारें दुसऱ्याचीं मुलें आपल्या घरीं ठेवणें मध्यम स्थितींतील लोकांना व केव्हां केव्हां त्या मुलांच्या आईबापांनाहि रुचणारें नाहीं. पण मुलांच्या हिताच्या दृष्टीनें व सार्वजनिक हितबुद्धीनें असा प्रयोग करणें बरेंच इष्ट आहे.

## करमणुकीचीं साधनें

(५) घरच्या गरिबीमुळें अगर इतर कारणांनीं खेळाचीं अगर करमणुकीचीं इतर साधनें कमी पडत असतील तेथें तीं अवश्य पुरविलीं पाहिजेत. खेडेगांवांपेक्षां मोठ्या शहरांतून हा प्रश्न जास्त महत्त्वाचा होत चालला आहे. सार्वजनिक वाचनालयांप्रमाणें मुलांकरितां सार्वजनिक क्रीडामंदिरांचीहि आवश्यकता भासूं लागली आहे. मुलांच्या जीवनक्रमांत खेळांचें व करमणुकीचें महत्त्व निदान पुस्तकांइतकें तरी खास आहेच व म्हणून या क्रीडामंदिरांची उपयुक्तता पुस्तकालयांपेक्षां निःसंशय कमी नाहीं. अशा क्रीडामंदिरांतून मुलांना अनुरूप अशी सर्व साधनसामग्री भरपूर ठेवन एखादा बालमित्र असा मानसशास्त्रज्ञ देखरेखीकरितां ठेवून दिल्यास शहरांतील मुलांच्या रिकाम्या वेळेचा व उनाडपणाचा एक महत्त्वाचा प्रश्न सुटेल. बहुतेक शाळांच्या रविवारीं व सुट्टीच्या दिवशीं बंद असलेल्या इमारतींचाहि अशा कृत्यांकडे उपयोग करण्याचें मनांत आणल्यास मुलांच्या मनांतील शाळेविषयींची अप्रीतिहि बरीच कमी होईल.

## दुर्वर्तनी मुलांची सुधारणा

(६) कांहीं मुलांची वृत्तीच अशा तऱ्हेची असते कीं, करमणुकीची किंवा खेळाची इतर मुलांना वाटणारी नैसर्गिक हौस त्यांना वाटत नाहीं. असें होण्याचीं अनेक कारणें असूं शकतात. पण संवयीनें हळुहळू उत्तेजन देऊन खेळांची व सच्छील सोबत्यांच्या संगतीची गोडी लावून अशी आवड उत्पन्न करणें जरूर आहे व शक्यहि आहे. अशा मुलाचें मन योग्य प्रकारच्या खेळाकडे लागलें म्हणजे साहजिकच त्याचें इतर वर्तनाकडे दुर्लक्ष होतें. अर्थात् एका मुलाला ज्या तऱ्हेचे नाद असतील किंवा जे खेळ आवडतील तेच दुसऱ्याला आवडतील असें नाहीं; पण मुलांच्या स्वभावास अनुसरून असलेले खेळ व नाद यांची गोडी मुलाला लागली नाहीं तर त्याचें मन एक प्रकारें अपक्व राहतें व दुर्वर्तनाची प्रवृत्ति होऊन मनाचा कंटाळा घालविण्याची साहजिकच इच्छा होते.

(७) आपल्याकडील बहुतेक शाळांतील शिस्त व शिक्षणपद्धति जवळ जवळ एकछापी ( Uniform ) असते; त्यामुळें शाळांचा मुलांच्या वर्तनाशीं जो संबंध येतो तो सर्वत्र सारखाच असतो. तरीहि निरनिराळ्या वर्गांतून विद्यार्थी व शिक्षक यांच्या स्वभावांप्रमाणें शिस्तीचें वळण निरनिराळें असतें. अशा वेळीं योग्य शिक्षक व योग्य सहवासी असलेल्या वर्गांत त्या मुलाची 'बदली' केल्यास वर्तन दुरुस्त होऊं शकतें. मात्र वर्गांतील विषय व ते शिकविण्याच्या पद्धति यांच्यापेक्षां मुलाच्या स्वभावास कोणतें वातावरण जास्त मानवेल हेंच पाहण्याकडे लक्ष दिलें पाहिजे आणि ही गोष्ट अगदीं सोपी खास नाहीं.

## शारीरिक शिक्षा

( ८ ) वर्तन दुरुस्त करण्याकरितां शरीरदंडाचा उपयोग कितपत होतो या प्रश्नाची चर्चा वारंवार केली जाते. एखादा अपराध झाला कीं, त्याचें प्रायश्चित्त त्यास ताबडतोब मिळालेंच पाहिजे, असें म्हणणारा एक पक्ष आहे; तर शिक्षांच्या मानसिक दुष्परिणामांवर भर देऊन शिक्षा मुळींच करूं नये असें त्याच्याविरुद्ध प्रतिपादन केलें जातें. शिक्षा अजीबात नाहींशी करून केवळ विधायक–शिक्षणात्मक–उपायांवरच भर देणें सर्व समाजाच्या दृष्टीनें कितपत हितकारक होईल हें सांगणें कठीण आहे. तुरुंगांची सुधारणा

करण्याची लाट अमेरिकेंत अतिरेकाला गेली असून त्याचा परिणाम गुन्ह्यांची संख्या वाढण्यांतच झाला आहे, असें कांहीं विचारी लोक प्रतिपादन करूं लागले आहेत. त्याचप्रमाणें शाळांतून किंवा घरांतून शिक्षा अजीबात करावयाची नाहीं असें ठरविलें तर सर्वसामान्य मुलांच्या वर्तनावर परिणाम इष्ट असाच होईल असें सांगतां येणार नाहीं.

शिक्षेच्या भीतीनें मुलगा पुनः अपराध करण्यास सामान्यतः प्रवृत्त होणार नाहीं ही गोष्ट खरी. त्याचप्रमाणें एकाला शिक्षा केल्यास दुसऱ्या कित्येकांवर वचक बसून दुर्वर्तनापासून तेहि परावृत्त होतात. कांहीं नाजूक व भावना-प्रधान प्रकृतीच्या लोकांना शारीरिक शिक्षा करणें हा एक रानटीपणाचा प्रकार वाटत असला तरी योग्य प्रकारें केलेल्या वास्तविक शिक्षेंत अमानुषतेचा अगर क्रूरतेचा भाग फारसा नसतो. विशेषतः कांहीं मुलें आपल्या शक्तीच्या जोरांत लहान मुलांना मारहाण करितात किंवा अशाच प्रकारचे तत्त्वतः भ्याडपणाचे दुसरे अपराध करितात अशांना शारीरिक शिक्षेशिवाय दुसरी शिक्षा समजूंच शकत नाहीं.

परंतु सामान्यतः घरीं किंवा शाळेंत ज्या शिक्षा केल्या जातात, त्यांचे परिणाम मात्र पुष्कळ वेळां अनिष्ट होतात. शिक्षा करण्यांत सूड घेण्याची वृत्ति जरी स्पष्टपणें दिसत नसली तरी बहुतेक वेळां अपराध दुरुस्त करण्याच्या हेतूनें त्या केल्या जात नसून केवळ विकारवशतेनें—रागाच्या भरांत—केल्या जात असतात. जो अपराध होऊन गेला त्याबद्दल शिक्षा करण्यानें कोणतें कार्य साधणारें असतें ? अपराध झाला तो कांहीं 'न झाला' असा करितां येणार नाहीं. पण पुनः असा अपराध होऊं नये म्हणून, म्हणजे भविष्यकालीन अपराध टाळण्याकरितां शिक्षा करावयाची असते. शिक्षेचें हें स्वरूप शिक्षा करितांनां फारच थोड्यांच्या दृष्टीसमोर असतें.

शिक्षा ही झालेल्या अपराधाबद्दल नसून होणारा अपराध थांबविण्याकरितां असते व म्हणून तिचें स्वरूप, प्रकार, कडकपणा, अगर सौम्यपणा या गोष्टी भविष्यकालीन अपराध थांबविण्याच्या अनुरोधानेंच ठरवावयाच्या असतात. अपराध करणें अगर न करणें याचीं कारणें प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावधर्मा-नुरूप भिन्न असल्यामुळें शिक्षेचें स्वरूपहि त्या अनुरोधानें भिन्न भिन्न होईल;

म्हणजे एकच अपराध अनेक मुलांनीं केला तर सर्वांना सारख्याच शिक्षा न करतां त्यांच्या त्यांच्या वैयक्तिक गुणांच्या अनुरोधानें त्या निरनिराळ्या करावयास पाहिजेत. ही गोष्ट न्यायाची होणार नाहीं असें कांहीं म्हणतील, पण वर्तन दुरुस्त करण्याच्या दृष्टीनें शिक्षेचें हेंच तत्त्व योग्य आहे यांत शंका नाहीं.

## तिचे दुष्परिणाम

पण शारीरिक शिक्षेचे मानसिक परिणाम इतके अनिष्ट होतात कीं, त्यामुळें ह्या शिक्षेचा उपयोग फारच काळजीपूर्वक करावा लागतो. मनोवृत्तींस चालना देण्याऐवजीं शरीरदंडाचा उपयोग केल्यानें मुलांच्या सूक्ष्म मनोभावना दुखविल्या जातात. त्यांचें अंतःकरण कठोर होऊन पुष्कळ वेळां बेफिकीर वृत्ति वाढते. शरीरदंड हा एक प्रकारचा अपमान आहे. हा अपमान सहन करण्यास मुलांना वारंवार भाग पाडल्यानें त्यांची मानापमानाची जाणीव बोथट होऊन जाते व अंतःकरण कठोर होऊन कोणत्याच उच्च भावनांचा परिणाम त्यांच्यावर होईनासा होतो. मानवी मनांतील या उच्च मनोवृत्ति नाहींशा करून एका अर्थानें त्यांना आपण पशुकोटींत आणून ठेवीत असतों. एकाद्या मुलाला शिक्षा केल्यानंतर—विशेषतः त्याच्या बरोबरीच्या सोबत्यांच्या समक्ष केल्यानंतर—त्याच्या अंतःकरणाला व स्वाभिमानाला जो धक्का बसतो त्याचे परिणाम पुसून जाण्यास बराच कालावधि लागतो. वडिलांपासून त्याची चित्तवृत्ति दुरावते व अंतःकरणांत वडील माणसांबद्दल एक प्रकारचा क्रोध, तिरस्कार व बेपर्वाईची वृत्ति तो बाळगतो. तो मुलगा जर उनाड मुलांच्या कंपूंपैकीं एक असला तर शिक्षा हा त्याला एक सन्मानच वाटतो. त्याच्या कंपूंत त्याचें वजन वाढतें व दुर्वर्तनास जास्तच उत्तेजन येतें. तीव्र मनोविकार असलेल्या, भावनाप्रधान मुलांवर तर शारीरिक शिक्षेचे परिणाम फारच अनिष्ट होतात व ते चिरकाल टिकतात. त्वचेची दुःख सहन करण्याची शक्ति ( sensitiveness ) व मानापमानाची जाणीव ह्या सर्वांच्या सारख्या नसतात या महत्त्वाच्या गोष्टीकडे शिक्षा करणाऱ्यांचें लक्ष क्वचितच असत नाहीं. कणखर त्वचा व सुदृढ ज्ञानतंतु असलेल्या एकाद्या मुलाला दहा छड्यांनीं विशेष दुःख होणार नाहीं तर दुसऱ्याला दोन छड्या सहन करणेंहि कठीण होईल.

अमुक अपराधास अमुक शिक्षा अशा प्रकारचे नियम करण्याची पद्धति कांहींनीं सुचविली आहे. रागाच्या भरांत अवास्तव शिक्षा वडिल माणसांकडून अगर शिक्षकांच्या हातून होण्याचा संभव टाळण्याच्या दृष्टीनें या नियमांचा कदाचित् उपयोग होईल; पण त्याचा परिणाम मुलांच्या वृत्तींवर निराळाच होतो. एखादें दुर्वर्तन हातून घडल्यास 'याच्यापेक्षां तुम्ही जास्त काय कराल?' अशा प्रकारची बेफिकिरीची वृत्ति वाढते; इतकेंच नव्हे तर 'आपला हेतु साधला तर ठीकच, नाहींच साधला तर इतकी शिक्षा होईल,' अशा हिशेबी वृत्तीनें मुलगा केव्हां केव्हां वागूं लागतो. 'कांहीं प्रयत्न फसले तरी दुसरे प्रयत्न साधारण नाहींत कशावरून?' असें मानून वर्तन सुधारण्याची खटपट तो करीतच नाहीं; शिवाय एखादें वर्तन नीतिदृष्ट्या चांगलें आहे अगर वाईट आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत येत नाहीं ती नाहींच.

शारीर दंडाचा उपयोग होतो, चांगली आठवण राहील अशी कडक शिक्षा पद्धतशीरपणें न चुकतां केल्यानें दुष्कृत्यांची पुनरावृत्ति होत नाहीं ही गोष्ट कोणीच नाकारीत नाहीं. पण ही सुधारणा घडवून आणण्याकरितां जी किंमत द्यावी लागते ती या उपयोगाच्या मानानें अतिशय जास्त असते; इतकेंच नव्हे तर जीं दुष्कृत्यें थांबविण्याकरितां शिक्षा उपयोजिली गेली त्या दुष्कृत्यांच्या दुष्परिणामापेक्षांहि शिक्षेचे दुष्परिणाम जास्त भयप्रद होतात! शिक्षेमुळें मुलांच्या मनावर भीतीचा पगडा अखंड बसून राहतो व त्यामुळें कायमचा भित्रेपणा अंगीं येऊन मुलांच्या मनांतील धडाडी व महत्त्वाकांक्षा मारल्या जातात. शरीरबलाचा उपयोग करून मुलांच्या मनावर परिणाम करूं पाहणें याचा अर्थ असा होऊं शकेल कीं शरीरबलापेक्षां उच्च भूमिकेवरील गोष्टी मुलांना समजूं शकत नाहींत असें आपण गृहीत धरतों. त्यांना वारंवार शिक्षा करीत गेल्यानें त्यांची मनोवृत्ति खालावून त्यांच्या उच्च भावनांच्या विकासाला मोठाच अडथळा आपण उत्पन्न करून ठेवतों. मुलांना शीलसंपन्न करणें म्हणजे त्यांची मनोभूमिका अधिकाधिक उच्च बनविणें होय. शारीरिक शिक्षा ही शिक्षा करणारा व भोगणारा या दोघांच्याहि कनिष्ठ मनोवृत्तींनाच चालना देणारी असल्यानें त्यायोगें मनोभूमिका उन्नत होणें कठीण आहे.

## मुलांच्या वसाहती

(९) मुलांच्या वर्तनावर भोंवतालच्या परिस्थितीचा इतका परिणाम झालेला असतो कीं, त्या परिस्थितींत केव्हां केव्हां आमूलाग्र बद्दल केल्याशिवाय भागत नाहीं. ज्या समाजांत मुलें रहात असतात त्या समाजांत त्यांच्या वृत्तींची योग्य जोपासना होणें शक्य होत नाहीं, अशा वेळीं शहरापासून थोडेंसें दूर मुलांची एखादी स्वतंत्र वसाहत केल्यास या नवीन समाजाची परिस्थिति पूर्णपणें आपल्या कह्यांत ठेवतां येते व त्यामुळें मुलांच्या मनोवृत्तींस पोषक असें वातावरण राखणें तेथें जास्त सुलभ होतें. अमेरिकेंतील 'जॉर्ज ज्युनियर रिपब्लिक' व त्याच्याच धर्तीवर चालणाऱ्या अमेरिका व इंग्लंड यांतील इतर संस्थांनीं अशा तऱ्हेच्या मुलांच्या स्वतंत्र वसाहती चालविल्या असून त्यांचे परिणाम समाधान-कारक झालेले आहेत. रानांतील मोकळ्या वातावरणांत शरीर तयार करण्या-कडे व उद्योग करण्याकडे मुलांची साहजिकच प्रवृत्ति होते व त्या दृष्टीनें लक्ष ठेवणारे मार्गदर्शक मिळाल्यास मुलांच्या सर्व शक्तींचा विकास योग्य प्रमाणांत होऊं लागतो. अशा वातावरणामध्यें पौगण्डावस्थेच्या मानसिक अस्वस्थतेच्या कालांत मुलांच्या सर्व प्रवृत्तींना भरपूर वाव मिळूं शकतो. प्रत्येक प्रवृत्ति, प्रत्येक ध्येय, चांगलें अगर वाईट असो, प्रयोगरूपानें आचरणांत आणलें जाऊन त्याचे सुपरिणाम अगर दुष्परिणाम अनुभवानें ठरविले जातात. मोकळ्या व स्वतंत्र वातावरणांत वाईट वर्तन, अहितकर ध्येयें, आपोआपच मागें पडतात, आणि मुलांच्या मनोवृत्तींचा अनिरुद्ध विकास होण्याची संधि मिळते. म्हणून कांहीं काळानें त्या वृत्तींना आपोआपच स्थैर्य येऊन समाजांत त्या मुलाचें वर्तन स्पृहणीय समजलें जातें. स्वावलंबन व स्वतंत्रबुद्धि (initiative) यांचा विकास होण्यास भरपूर वाव मिळाल्यामुळें अशा एखाद्या संस्थेंत कांहीं काळ घालवून बाहेर पडलेला मुलगा समाजांतील आपली जबाबदारी ओळखून स्वतःचें वर्तन तर शुद्ध ठेवतोच, पण जरूर तर आपल्या भोंवतालच्या परिस्थितीलाहि इष्ट वळण लावण्यास मदत करूं शकतो.

मुलांच्या या वसाहतींचे इष्ट परिणाम घडून येणें हें त्या वसाहतींतील परिस्थितीपेक्षां तींतील सूत्रचालक व्यक्तींच्या गुणांवर व कौशल्यावरच जास्त अवलंबून आहे. क्रमाक्रमानें विकास पावणाऱ्या मुलांच्या निसर्गसिद्ध मनोरचनेवर विश्वास ठेवून जरूर तेथें त्यांच्या विकासास येणारे अडथळे दूर

करणारा, स्वत: पडद्यामागें राहून अप्रत्यक्षत: या विकासास सर्वस्वीं मदत करणारा मनुष्यच अशा रीतीनें त्यांच्या वर्तनाला वळण लावूं शकतो. जरूर तें खत व पाणी घालून बी रुजत घातल्यानंतर त्याची वाढ होईतों दम हा धरलाच पाहिजे. कृत्रिम प्रयत्नानें व सक्ती करून त्या झाडाच्या वाढीस आपण अपायच करूं. याच न्यायानें स्वतःच्या व्यक्तित्वाचें दडपण कोणत्याहि प्रकारें भासू न देतां मुलांच्या मनोरचनेच्या व विचारांच्या स्वाभाविक विकासास जो भरपूर अवसर देऊं शकतो तोच त्यांना अहर्निश योग्य मार्ग दाखवूं शकतो आणि तोच मुलांच्या वर्तनावर कायमचा व हितकारक परिणाम करूं शकतो.

## सन्मित्रांची संगति

(१०) संगतीचा किंवा मुलांच्या लहानलहान संघांचाहि परिणाम आपल्या मुलांच्या वर्तनावर अनिष्ट होत आहे, असें आढळून आल्याबरोबर पुष्कळ लोक अशा मित्रांची संगति ताबडतोब सोडून देण्यास मुलांना सांगतात व केव्हां केव्हां तर कोणत्याच मुलाची संगति ठेवण्यास कांहीं काळ परवानगी दिली जात नाहीं. पण मित्रप्रेम, मैत्रीविषयीं निष्ठा या भावना मुलांमध्यें असतात व व्यवहारांतील अनेक अनुभव येऊन मुलें अद्याप शहाणीं झालीं नसल्यानें त्यांच्या या भावना फार तीव्र व उच्च असतात; म्हणून आपल्या मित्रांची संगति सोडून देण्याचें—मित्रद्रोहाचें पातक—त्यांच्या मतानें फार भयंकर असतें. त्यांच्या या मैत्री चिरकाल टिकतात असें नाहीं; पण असतात तोंपर्यंत त्या फार तीव्र असतात. अशा स्थितींत आपल्या मुलांच्या मित्रांशीं जास्त परिचय करून घेऊन खरोखरी ते मित्र किती वाईट आहेत याचा निर्णय स्वतंत्रपणें करावयास हवा. मुलाच्या मित्रांना अनेक प्रसंगीं—फराळाच्या, खेळण्याच्या वगैरे निमित्तांनीं—वारंवार घरीं बोलावून त्यांचे स्वभाव, वर्तनाची पद्धति, शील व वळण इत्यादींविषयीं बारकाईनें अवलोकन करावें. एखाद्या मित्राची संगति खरोखरीच स्पृहणीय न वाटल्यास त्या संगतीचे दोष मुलांच्या मनांत भरतील अशी योजना करावी व जास्त चांगल्या मित्रांची संगति लावण्याचा प्रयत्न करावा. मुलांना या वयांत संगतीची आवड नैसर्गिक असल्यानें संगतीनें मुलगा बिघडेल म्हणून त्याला घरांतच ठेवण्याचा प्रयत्न करणें चुकीचें आहे. सहसा तो साधत नाहीं व साधलाच तर जे

दुष्परिणाम टाळण्याकरितां तो केला जातो त्यापेक्षांहि वाईट परिणाम मात्र त्या प्रयत्नानें घडून येतात.

### उच्च ध्येय

(११) पौगण्डावस्था हा सामाजिक ध्येयांचा काल आहे. केवळ स्वतः-पुरताच विचार न करतां समाजासंबंधींचे विचार मुलांच्या डोक्यांत या वयांत येत असतात. या प्रवृत्तीचा फायदा घेऊन नानाप्रकारांचे संघ तयार केल्यास मुलांच्या सर्व प्रवृत्ती व शक्ति या एका दिशेनें वाहूं लागतात व त्यांचा जोम व उत्साह यांचा उपयोग हितकारक होऊं शकतो. बालवीर, युवकसंघ यांसारख्या चळवळी या काळांत अनुरूप असून मुलांच्या पुढें उच्च ध्येय ठेवून त्या ध्येयाकरितां एकनिष्ठेनें काम करण्याची संवय मुलांना सहज लागते. आपल्या देशाच्या विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळें या चळ-वळींतहि राजकीय गोष्टींचा संबंध टाळणें अपरिहार्य झालें आहे, हा भाग निराळा. व्यायामसंघ, वाङ्मयोत्तेजक संघ किंवा अशाच स्वरूपाचें सामाजिक कार्य करण्याचे अनेक संघ या वयांत तयार करतां येणें शक्य असतें. एखादा योग्य मार्गदर्शक मिळाल्यास असल्या संघांच्या हातून कार्यहि थोडेंबहुत होऊं शकतें; निदान मुलांच्या सैरावैरा धावणाऱ्या मनोविकारांना काम मिळून इतर उद्योग तरी थांबतात.

( १२ ) सद्वर्तनाचा मुख्य आधार स्वाभिमान होय. दुर्वर्तन हें आपणांस कमीपणा आणणारें आहे, अशी ज्याची भावना कायम झाली असेल तोच मुलगा सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितींतहि आपलें वर्तन स्थिर ठेवूं शकतो. कारण त्याच्या सद्वर्तनाचें मूळ बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसून मनांतील निश्चयावर अवलंबून असतें. मुलांचा वारवार अपमान करून, कारणांवाचून अगर क्षुल्लक कारणांकरितां अवास्तव शिक्षा करून, मर्मभेदी भाषणांनीं अगर अपशब्दांनीं त्यांचा पाणउतारा करून, पुष्कळ लोक मुलांचा स्वाभिमान नाहींसा करीत असतात. ज्यांना स्वतःबद्दल आदर व अभिमान वाटतो, तेच समाजांतील इतर व्यक्तींबद्दल आदर दाखवूं शकतात व तेच समाजाचे सर्व नियम आदरपूर्वक पाळतात. अगदीं लहानपणापासून मुलांत स्वाभिमान उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्यानें त्याचे हातून अपराध

पुन: न घडण्याची जास्त खात्री सांगतां येते. स्वत:प्रमाणें आपले आई-बाप, कुळ, शाळा, अगर राष्ट्र यांजबद्दलचा अभिमान, त्याचप्रमाणें एखाद्या सद्गुणी सदाचारी पुरुषांवरील भक्ति यांच्या योगानें सद्वर्तन राखण्यास जी प्रेरणा मिळते ती इतर फारच थोड्या गोष्टींनीं मिळूं शकेल.

## धार्मिक प्रवृत्तींचा विकास

( १३ ) धार्मिक वृत्तीचा विकास योग्य तऱ्हेनें झाल्यास तिचा वर्तनावर पुष्कळ हितकर परिणाम होऊं शकतो. या वयांत मुलांची बुद्धि फार तीव्र होत असल्यानें अमेरिकन बोधकथेंतील जॉर्ज वॉशिंग्टनला नवीन मिळालेल्या कुऱ्हाडीप्रमाणें आपली ही तीव्र बुद्धि ते प्रत्येक नव्याजुन्या कल्पनेवर चालवून पहातात. अलीकडील मुलें धर्मलंड व नास्तिक बनत चाललीं आहेत असा आक्षेप आपण पुष्कळ वेळां ऐकतों. त्याचा अर्थ इतकाच कीं, मुलें आपली बुद्धि धार्मिक कल्पनांवर चालवून पाहूं लागलीं आहेत. त्यांत नास्तिकपणापेक्षां जिज्ञासा व एक प्रकारची बौद्धिक कसरत करण्याची हौस हेच हेतु मुख्य असतात. म्हणून त्यांच्या बुद्धीस पटेल अशा तऱ्हेनें धर्मातील तत्त्वज्ञानाची मांडणी केल्यास त्यांचा नास्तिकपणा कमी होऊन धार्मिकवृत्ति वाढते. प्रत्येकाच्या वैयक्तिक आवडीनावडीं-प्रमाणें व बुद्धीच्या विकासाप्रमाणें धर्माचीं निरनिराळीं अंगें प्रत्येकाच्या मनांत भरतात. सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय, मनुष्याचा परम पुरुषार्थ व ध्येय, परमेश्वराचें–परब्रह्माचें–स्वरूप इत्यादि तात्त्विक बाजूंत कांहींना आनंद वाटेल; धर्मातील वैराग्य व त्यागवृत्ति, सार्वजनिक हिताकरितां सर्वस्व अर्पण करण्याची तयारी या वृत्ती कोणाच्या मनावर जास्त प्रामुख्यानें ठसतील; अवतारी पुरुषांचीं चरित्रें व परमेश्वराचीं अवतारकृत्यें, भक्तांचीं संकटें निवारण करण्याकरितां ईश्वरानें केलेले चमत्कार हीं पुष्कळांचें अंत:करण वेधून घेऊं शकतात; धार्मिक समारंभ, जयंत्या, उत्सव यांची आवड तर सरहा सर्वांनाच असते. अशा स्थितींत धर्माच्या निरनिराळ्या अंगांच्या आश्रयानें मुलांच्या वर्तनाला पुष्कळ वळण लावतां येईल. तारुण्यांतील भावनाप्रधान कालांत धार्मिक प्रवृत्तींचा विकास केल्यानें जी आस्तिक्यबुद्धि उत्पन्न होते तिचीं मुळें फार खोलवर रुजलीं जाऊन पुढील सर्व आयुष्यभर त्याचे हितकर परिणाम दृष्टीस पडतात.

## दुर्वर्तनी मुलाची सुधारणा

अमुक केलें तर पाप लागेल, अमुक कृत्याला यम अमुक शिक्षा करतो, अशासारख्या कल्पना मुलांना या वयांत पटणाऱ्या नसतात. विशिष्ट क्रियांविषयीं अशी पापपुण्यमय भावना वाढविल्यानें त्यांच्या मनाचें समाधान तर होत नाहींच; पण सामान्यतः सद्वर्तन किंवा शीलाची मनोवृत्ति तयार होण्यास त्यायोगानें फारशी मदत होत नाहीं. परमेश्वराबद्दल आदर व आस्तिक्यबुद्धि किंवा अवतारी पुरुषांविषयीं भक्ति वाढविल्यानें आयुष्यास एक प्रकारें उच्च आदर्श प्राप्त होतो व मुलांच्या मनोविकारांना उच्च भूमिके-प्रत नेल्याचें श्रेय मिळतें.

### यश आणि आत्मविश्वास

(१४) अंगीकृत कार्यांत यश आल्यास दुप्पट उत्साहानें पुढील मार्ग मनुष्य आक्रमूं लागतो हें आपण नेहमीं पाहतोंच; मुलांच्या जगांतहि त्यांच्या कार्यांत यश येणें हेंहि तितकेंच महत्त्वाचें आहे. ज्या मुलाला नेहमींच यश येतें त्याच्या अंतःकरणांत आत्मविश्वास वाढून पुढील कार्यांत त्या आत्म-विश्वासाच्याच जोरावर तो यश मिळवितो. उलट नेहमींच अपेशी ठरणाऱ्या मुलाला कोणतेंच काम अंगावर घेऊन पार पाडण्याची इच्छा होणार नाहीं; इतकेंच नव्हे तर इतर मुलांपेक्षां आपण कमी कर्तृत्ववान् आहोंत या जाणी-वेनें समाजांत मिसळण्याचेंसुद्धां तो टाळतो. आपली वागणूक चांगली असावी, आपल्याला लोकांनीं चांगलें म्हणावें, अशी मुलांची अंतरींची इच्छा असते व त्याकरितां त्यांचे प्रयत्न चालू असतात. असे सर्व प्रयत्न यशस्वी कसे होतील याबद्दलची जबाबदारी वडील मंडळीवरच आहे. प्रसंगीं स्वतःला न झेंप-णारी गोष्ट मुलांनीं अंगावर घेतल्यास एखादे प्रसंगीं येणारें अपयश त्यांच्या सामर्थ्याचा त्यांना परिचय करून देण्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरेल; पण सामा-न्यतः यशाचा मार्गच यशस्वी होतो. आपल्या प्रयत्नाकडे पालकांचें लक्ष असावें व सफळ झालेल्या प्रयत्नांबद्दल योग्य तें कौतुक किंवा शाबासकी मिळावी अशी त्यांची अपेक्षा असते व ही छोटीशी अपेक्षा पूर्ण केल्यानें मुलांच्या वर्तनावर कल्पनातीत परिणाम होऊं शकतो.

मुलांनीं कसें वागावें या बाबतींत मुलांच्या वयाच्या व शक्तीच्या मानानें अधिक अपेक्षा करण्याची पुष्कळ वडील मंडळींना संवय असते. कुटुंबांतील किंवा शेजारच्या एखाद्या अतिशय सुवृत्त मुलाशीं वारंवार तुलना करून

आपल्या मुलाचा कमीपणा त्याच्या नजरेस आणण्यांतहि कांहीं लोक अतिशय दक्ष असतात. असें करून मुलांना अधिक चांगलें वागण्यास आपण प्रोत्साहन देत आहोंत अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते; पण परिणाम मात्र उलट होतो. त्या सुवृत्त मुलाचा इतर मुलें द्वेष करूं लागतात व भांडणें वाढतात. शिवाय मुलांच्या मनांत स्वतःचा कमीपणा इतका खोल रुजतो कीं, अधिक चांगलें काम करण्याची त्यांची इच्छाच समूळ नाहींशी होते. आटोक्याच्या पलीकडे असलेलें ध्येय गांठण्यांत वारंवार अपयश आल्यानें तें ध्येय साधण्याचा प्रयत्नच मुलांनीं सोडून दिला तर तो दोष मुलांचा नसून इतकें उच्च ध्येय त्यांच्यापुढें अहर्निश राखणाऱ्या पालकांचाच समजला पाहिजे.

## प्रवृत्तींचें शोधन

( १५ ) स्वतःच्या प्रवृत्तींना अनुसरून वागण्याचा प्रयत्न नेहमींच साधतो असें नाहीं; आणि तसें वागणें नेहमींच इष्ट असतें असेंहि नाहीं. अशा वेळीं मूळ प्रवृत्ति असंतुष्ट राहिल्यानें वर्तनावर जो दुष्परिणाम होण्याचा संभव असतो तो टाळण्याचा मार्ग असा कीं, त्या प्रवृत्तींस अनुसरून आणि समाजास व मुलाच्या परिस्थितीस मान्य होण्यासारख्या दिशेनें कार्य करण्याची संधि आणून देणें. अशा रीतीनें मूळ प्रवृत्तींना निरनिराळ्या मार्गानें वाव देण्याच्या पद्धतीला प्रवृत्तींचें शोधन (sublimation) असा पारिभाषिक शब्द मानसशास्त्रज्ञ वापरतात. पुष्कळ वेळां प्रवृत्ति मूळ स्वरूपांत दडपून टाकून त्याच अजाणता शोधित स्वरूपांत वावरतांना दिसतात. हौसेखातर रिकाम्या वेळांत फोटोग्राफीचा व्यासंग करणारा वकील किंवा खेडेगांवांतील मुखत्यार वकिलाचें काम करणारा शाळामास्तर हे आपल्या अनुद्बुद्ध प्रवृत्तींनाच—ज्या त्यांच्या नेहमींच्या व्यवसायांत प्रगट होऊं शकत नाहींत त्यांना—निराळ्या रूपानें वाव करून देत असतात. मुलांच्या बाबतींतहि त्यांच्या वर येऊं पाहणाऱ्या प्रवृत्तींचें शोधन करून त्यांना योग्य व्यवसाय लावून देण्याचें काम पालकशिक्षकांनीं करणें हें त्यांचें एक कर्तव्यच आहे.

पौगण्डावस्थेच्या सुरुवातीबरोबरच कांहीं मुलांचा धार्मिक विषयांची चर्चा करण्याकडे किंवा स्नानसंध्यादि अनुष्ठानाकडे तीव्र ओढा दिसून येतो; त्याचें खरें कारण असें आहे कीं, त्या कालीं उत्पन्न होणाऱ्या रतिविषयक व प्रेमविषयक प्रवृत्तींचें शोधन होऊन या मार्गानें त्या प्रवृत्ति व्यक्त होऊं लागतात.

ईश्वराविषयीं प्रेम व समाजसेवा यांचीं अनेक अंगें यांकडे तरुण मुलांच्या प्रवृत्तींचा ओघ वळविल्यानें त्यांच्या पुष्कळशा असंतुष्ट प्रवृत्तींना वाव मिळतो व मनावरील दडपण कमी होतें. व्यायाम, विशेषतः कुस्ती व खेळांचे इतर प्रकार यांच्यामुळें तारुण्यांतील वाढत्या जोमाचें समाधान होतें व त्यावरोबरच आनंद प्राप्त होऊन अनिष्ट विषयांकडील विचारांचा ओघ थांबतो. मुलांची आत्मप्रदर्शनाची हौस (exhibitionism) भागविण्याकरितां खेळांचा आणि शाळांतून केल्या जाणाऱ्या नाट्यसंभाषणादि प्रयोगांचाहि उपयोग होतो. काव्य, चित्रकला या कलांचा व्यासंग वाढविण्याला प्रोत्साहन दिल्यानें मुलांच्या चित्तांत दबून बसलेल्या व वर येऊं पाहणाऱ्या पुष्कळ विचारांना राजरोसपणें जगांत वावरावयास संधि मिळूं शकते. शाळेंतील शिक्षणाला कंटाळून किंवा तेथील अभ्यासक्रम संपला म्हणून उद्योगधंद्यांत पडूं इच्छिणाऱ्या मुलाला त्याच्या अंतःप्रवृत्तींना भरपूर वाव देणारा उद्योग लाभूं शकला तर तो त्या धंद्यांत अधिक समाधानानें राहूं शकतो; त्याचप्रमाणें शाळांमधून किंवा घरच्या नित्य व्यवसायांतून मुलांच्या ज्या प्रवृत्तींचें समाधान होऊं शकत नाहीं, अशा प्रवृत्तींचें शोधन करणें व त्यांस अनुरूप अशा व्यवसायांत मुलांचा रिकामा वेळ गुंतविणें हें मुलांचें शारीरिक व मानसिक आरोग्य राखण्याला पोषक असतें. प्रवृत्तींचें शोधन करण्याचे मार्ग अनेक असून त्या मार्गांनीं त्या प्रवृत्तींना वळण लावण्याचें काम कुशल मार्गदर्शकाला सहज साधूं शकतें.

## अवेक्षणाची पद्धति

(२६) मुलांनीं सद्वर्तनी बनावें याकरितां त्यांचेसंबंधीं, पालक, शिक्षक वगैरेंचे प्रयत्न चालू असतातच; पण उनाड मुलांना ताळ्यावर आणण्याइतकें कौशल्य, त्याकरितां अवश्य असणारें ज्ञान व सांपत्तिक परिस्थितीची अनुकूलता सर्वच कुटुंबांत आढळून येणें शक्य नाहीं. शिवाय मुलांच्या सद्वर्तनाप्रमाणें दुर्वर्तनाचीहि जबाबदारी कांहीं वेळां प्रत्यक्षतः व अप्रत्यक्षपणें नेहमींच समाजांतील वातावरणावर असल्यानें त्यांना शीलसंपन्न करणें हें समाजाचें एक कर्तव्य आहे. नागरिकांच्या शीलाचा दर्जा वाढल्यानें समाजाचाच अखेर फायदा होणार आहे या दृष्टीनेंहि समाजानें या बाबीकडे लक्ष देणें जरूर आहे. या बाबतींत आपणांकडे अद्याप फारशी प्रगति झाली नाहीं हें

खरें; पण सन १९२४ सालीं मुलांकरितां एक कायदा झाला असून त्याचा फायदा मुंबईतील मुलांना थोडाबहुत मिळूं शकतो. लहानलहान गुन्हे करणाऱ्या अल्पवयी मुलांना त्यांच्याकरितां चालविलेल्या एका स्वतंत्र कोर्टापुढें उभें करण्यांत येतें व त्यानंतर तुरुंगांत न पाठवितां त्यांचे वर्तनाला इष्ट असें वळण लावणाऱ्या शाळांतून किंवा त्या हेतूनें मुद्दाम चालविलेल्या संस्थांमध्यें हीं मुलें पाठविलीं जातात. या कायद्याचा व संस्थांचा इष्ट हेतु साधण्याकरितां त्या संस्थांतून काम करणाऱ्या व्यक्तींच्या अंगीं असलेल्या कौशल्यावरच सर्व गोष्टी अवलंबून राहणार हें उघड आहे.

मुलांकरितां स्वतंत्र न्यायकचेऱ्या ठेवून मुलांच्या वर्तनाकडे अधिक लक्ष देण्याची पद्धति प्रथम अमेरिकेंत १८६९ मध्यें सुरू झाली व आज ती तेथें बरीच पूर्णावस्थेस गेली आहे. तेथें अठरा वर्षांपावेतोंच्या (कांहीं संस्थानांत २१ वर्षांपावेतोंच्या ) मुलांच्या अपराधांची चौकशी या न्यायाधीशांपुढें केली जाते. न्यायाधीश हा मुलांना शिक्षा करण्याकरितां बसला नसून त्यांचें मानसिक सामर्थ्य वाढवून तें व्यक्त करण्याची संधि त्यांना पुनः देणें हें त्याचें काम आहे, या तत्त्वावरच त्या कचेऱ्यांतील सर्व काम चालतें. त्यांच्या अनुषंगानें 'अवेक्षण' ( Probation )ची जी पद्धति प्रचारांत आली आहे, तिचे परिणाम खरोखरीच समाधानकारक होतात. अपराधी मुलाला समज देऊन न्यायाधीश त्याला एका 'अवेक्षका'च्या स्वाधीन करतो व त्या अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं मुलानें रहावें हा त्या मुलाच्या शिक्षेचा महत्त्वाचा भाग असतो. एका अवेक्षकाकडे ७०-७५ मुलें दिलीं जातात. या सर्व मुलांवर त्याची देखरेख अखंड आणि संपूर्ण असते. मुलाची परिस्थिति कशी आहे याचा पूर्ण अभ्यास करून त्यानें कसें वागावें याबद्दल तो मुलाला योग्य त्या सूचना देतो व ज्या मानानें मुलगा आपली पात्रता दाखवील त्याप्रमाणें त्यास अधिकाधिक स्वतंत्रता देण्याची योजना हा अवेक्षक ( Probation Officer ) करतो.

या पद्धतीनें प्रत्येक मुलाकडे वैय्यक्तिक लक्ष देणारा एक कृतकपालक तयार होत असल्यानें मुलाच्या वर्तनांत पुष्कळ सुधारणा थोडयाच वेळांत घडून येऊं शकते. समाजांतील स्वतःचा दर्जा कमी करणारी कोणतीहि अपमानकारक शिक्षा भोगावी न लागल्यामुळें मुलांचा स्वाभिमान

कायम राहतो. आपले नित्याचे व्यवसाय करण्याला मुलाला पूर्ण मोकळीक असल्यामुळें त्याच्या नेहमींच्या परिस्थितींत तो कसा वागतो हें प्रत्यक्ष पाहावयास सांपडतें व त्याच्या वागणुकींत जी सुधारणा घडून येते ती कायमची असते. अवेक्षक अधिकाऱ्यांच्या हातीं कायद्यानें अमर्याद सत्ता दिली असते आणि त्या सत्तेचा उपयोग करून मुलाच्या घरची परिस्थितिसुद्धां तो बरीच सुधारूं शकतो व अशा रीतीनें मुलाच्या दुर्वर्तनाला कारणीभूत होणारी एक महत्त्वाची बाब त्याच्या आटोक्यांत येऊं शकते.

## फिरता शिक्षक

( १७ ) पण न्यायासनासमोर उभें राहण्याची पात्रता अंगीं येण्याइतकी वर्तनांत प्रगति झाल्यानंतर त्यांच्याकडे लक्ष देण्यापेक्षां अगोदरपासूनच त्यांच्या वर्तनाकडे लक्ष पुरविल्यास पुष्कळच कमी श्रमांत इष्ट गोष्ट साध्य होईल हें उघड आहे. शिवाय शाळेंत किंवा घरीं उनाडपणा करणारा मुलगा पोलिसच्या तावडींत सांपडण्याइतके मोठे गुन्हे करतोच असें नाहीं. पण म्हणून त्याचें वर्तन समाधानकारक असतेंच असें कांहीं नाहीं. याकरितां शाळेमध्यें नेहमींच्या विषयांच्या अध्यापनाकरितां ज्याप्रमाणें कांहीं तज्ज्ञ शिक्षक नेमले जातात त्याचप्रमाणें प्रत्येक शाळेंत 'वर्तनाचा तज्ज्ञ' नेमण्याची पद्धति अमलांत आणण्याचा प्रयोग अमेरिकेंत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झाला आहे व त्याचे चांगले परिणाम दृष्टोत्पत्तीस येत आहेत. मानसशास्त्राचा अभ्यास केलेला, स्वतःच्या चारित्र्यानें व कुशलतेनें मुलांच्या पालकांवर छाप पाडूं शकणारा, व सहानुभूतीनें मुलांचीं अंतःकरणें काबीज करूं शकणारा हा तज्ज्ञ फिरता शिक्षक (Visiting Teacher) अभ्यासक्रमांतील कोणताहि विषय न शिकवतां शाळेचा इष्ट हेतु साध्य करण्यांत फार महत्त्वाची मदत करूं शकतो. पालकांच्या व शिक्षकांच्या वारंवार गांठी घेऊन त्यांचे पूर्वग्रह दूर करणें, मुलांच्या मार्गांतील अडथळे काढून टाकणें, प्रसंगीं मुलांच्या शारीरिक आरोग्याकरितां योग्य उपचार करणारा तज्ज्ञ गांठून देणें किंवा पालकांची सांपत्तिक स्थिति सुधारण्यासहि प्रसंगीं योग्य सल्ला देणें अशीं विविध कामें त्याला करावीं लागतात. वर्षानुवर्ष मुलांच्या मागें अज्ञात रूपानें राहून जरूर तेव्हां व जरूर तितकेंच त्याला साहाय्य करण्यास तयार असणारा हा शिक्षक मुलांचा स्वाभिमान वाढवूं शकतो व

पालक, शिक्षक आणि मुलगा या तिघांचाहि परस्परांशीं सलोखा राखण्याकरितां मध्यस्थी करूं शकतो. मुलांचा समाज व सामाजिक परिस्थितीचे मुलांच्या मनोवृत्तीवर होणारे परिणाम हीं याच्याइतकीं कोणाच्याच लक्षांत येण्याचा संभव नसतो.

* * * *

मुलांच्या वागणुकींत इष्ट तो बदल घडवून आणण्याकरितां सुचविलेले हे उपाय अगदीं साधे व सोपे दिसतात. मुलांच्या क्षुल्लक चुकांना भयंकर स्वरूप न देतां व स्वतःचें मन विकारग्रस्त होऊं न देतां शांतपणें विचार करणें ही गोष्ट कांहीं खरोखरीच कठीण नाहीं. मुलांचा विश्वास संपादन करून आपल्याशीं अधिक मोकळेपणानें वागण्यास त्यांना उत्तेजन देणें व अगदीं साध्या शब्दांत, व्याख्यानबाजी न करतां निर्विकारपणें सद्वर्तनाचें महत्त्व त्यांचा मनावर बिंबविणें या गोष्टीहि अल्प श्रमानें सहज साध्य होऊं शकतात. मुलांच्या मनावरील दडपण कमी करून त्यांच्या मनोवृत्तीस अनुरूप अशा व्यवसायांत त्यांचें मन गुंतविणें व घरांतील वातावरण शांत व प्रेमळ राखून त्यांच्या मानासिक व आध्यात्मिक विकासास सवड देणें या गोष्टीसुद्धां अशक्य कोटींतील आहेत असें नाहीं. पण या साध्या व सोप्या गोष्टी योग्य वेळीं व अधिक दक्षतेनें करण्याची सावधगिरी जर पालक व शिक्षक घेतील तर आमची बालसृष्टि दुर्वर्तनाचा सहारा न बनतां नंदनवनाप्रमाणें फुलेल आणि पालक वर्गाला, समाजाला व राष्ट्राला भूषण व आधार होऊन राहील यांत तिळमात्र शंका नाहीं.

ग्रंथ संग्रहालय

# महत्त्वाचे संदर्भ-ग्रंथ

Healy : *Individual Delinquent*—Little Brown.
Healy and Bronner : *Delinquents and Criminals*—Macmillan.

Burt : *The Young Delinquent*—University of London.
Morgan : *Psychology of the Unadjusted School Child*—Macmillan

Stanley Hall : *Adolescence*—Appleton.
Waddle : *Introduction to Child Psychology*—Houghton Mifflin.

*Character Education: Report of the Committee on Character Education of National Education Association*—U. S. Bureau of Education, Bulletin, (1926) No. 7.
*Building Character: Proceedings of the Mid-West Conference on Parent Education, 1928*—University of Chicago.

Sayles: *Problem Child at School*-Commonwealth Fund.
*Encyclopœdia Brittanica*—Articles on *Probation* and *Children's Courts.*

Mercier : *Conduct and its Disorders*—Macmillan.
George : *Junior Republic*—Appleton.

Sayles : *Problem Child at Home*—Commonwealth Fund.
Nudd : *Purpose and Scope of Visiting Teacher Work*—Commonwealth Fund.

# कांहीं पारिभाषिक शब्द

परिमाण—Standard
प्रतिक्षेप—Reflex
अपेक्षा—Condition
सापेक्ष प्रतिक्षेप—Conditional reflex
सह-ज—Innate
सहजप्रवृत्ति—Instinct, ( in-nate tendency )
संचयप्रवृत्ति—Collective instinct
रतिप्रवृत्ति—Sexual instinct
रतिशिक्षण—Sex education
संयमन—Inhibition
नियमन—Regulation
रूपांतर—Modification
शोधन—Sublimation
प्राग्जन्म—Pre-natal
प्रेरक—Exciting (cause)
पोषक—Predisposing ( ,, )
नैतिक—Moral.
अनैतिक—Immoral
निर्नैतिक—Non-moral
नैतिक वळण—Moral tone
पौगण्ड—Adolescence
जाणीव—Feeling
विकार—Emotion
भावना—Sentiment
निर्णय—Judgment
संकल्प—Volition
मनीषा—Imagination
व्यक्तित्व—Personality
विकृति—Abnormality
अनुत्क्रांत—Degenerate
मनोवय—Mental age
कालवय—Chronological age
अनुद्‌बुद्ध—Sub-conscious
अंतःस्रावक ग्रंथी—Endocrine
परिस्थिति—Environment
अवेक्षण—Probation

# सूची


अंतःकलह १०५, १०६, १०७ १०९
अंतःस्रावक ग्रंथि १२५
अपक्रांतीचीं चिन्हें ४५
असत्य ६३
अवेक्षण ( probation) १५०
आई,—चे लाड ८३, सावत्र ८४
आज्ञा—नकारात्मक १३३
आत्मप्रदर्शनाची हौस १४९
आत्मविश्वास, ८९, १४८
आत्मवंचना १३१
आत्मसंयमन ३१, ८१, ११९
आनुवंशिक संस्कार ३६,४०, ४१ १३७
एकुलता एक मुलगा ८३
करमणुक—साधनें ९७, १२३, १३९
कुटुंब—भंगलेलें ८२, त्याचें वळण ८८, १३८
कौतुक ८६
क्रोध ५८
खेळ १३९, १४०
चहा कॉफी १२३
चिडविण्याची हौस ५९
चोरी ६८, ७७, ७८, ८१
जागा—आकुंचित ७६, ९८
जुगार ९८
डाग—सूर्यावरील १२२
तोतरेपणा १२४, १३७
दारिद्र्य ७३
दारु ४६, १२३
दुर्वर्तन—व्याख्या १०, वर्गीकरण २७, विविध कारणें २८, १०४, पोषक व प्रेरक कारणें ३१
द्वेष ५८
धार्मिक प्रवृत्ति १४७
नाद १२३
नीति—स्वरूप १०, विकास १२, अवस्था १९, वळण ८८
परिस्थिति २८, ७०, ७३, सांपत्तिक ७३, कौटुंबिक ८२, ८७, शाळेंतील ५०, ९४
पळून जाणारीं मुलें ६२
पालकांचें वर्तन ९३, १३४
पौगण्ड २३, ५१, ५४-५७, ६७, ६९
प्रेम ८६, ९३
बुद्धि—सामान्य ११४
बुद्धिवान् मुलगा ९६, ११७
भावना ९३, ११९, १२१
मंद बुद्धि ११४
मंदबुद्धि मुलगा ९५, ११२, ११६, ११७
मानसिक विकास १८
यश १४८
युद्धप्रवृत्ति १५, ५९

रतिप्रवृत्ति १७, ६४, शिक्षण ६५ ६६, अंतःकलह ११०
रोग ४६, ४७, १२३
वयं-ता १२८
वसाहती, मुलांच्या १४४
विकार १८, ९३, ११८
व्यक्तित्व २४
व्यक्तिस्वातंत्र्य १२८
शारीरिक दोष ४४, ११७, विकास ४७, ४८, जोम ३७, ५१, ५३
शाळा ८, ५१, ९४, १४०
शिक्षक, फिरता ११२
शिक्षा, शारीरिक ८८, १४०, १४१
शिस्त १३, ५२, ८१, ८८–९०, ९३, १३७
शील ८, १२७, १३०
समाज—त्याचें कर्तव्य ५, नियम १२, ३१, वळण १३१
सहजप्रवृत्ति १३, १४, १८, ३१ १४९
सिनेमा ९९
संगति ७८, १०१, १०२, १४५
संघ ६०, १०३, १४६
संचयप्रवृत्ति १६
संवय ४, ५५, ११७, १२२, १२९
स्वभाव ३९, १२७
स्वाभिमान, मुलांचा ७८, ८९ १४६
हवामान १२२
हस्तव्यवसाय ९६

मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाड व बडोदें संस्थान येथील शिक्षणखात्यांनीं
मजूर केलेलें

लेखक: न. ल. आठवले } **राणा कोल्हा** { किंमत सहा आणे

(लहान मुलांकरितां मुद्दाम लिहिलेली सचित्र मनोवेधक कादंबरी)

## कांहीं निवडक अभिप्राय

**केसरी:—**

+ + ' राणा कोल्हा ' राजदरबारीं जाणारा आहे, + + व इतर जनावरांच्या तोंडाला पानें पुसून त्यांच्यावर मात करणारा आहे. ++ या गोष्टीला कादंबरीचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे हें याचें वैशिष्ट्य आहे. यांत कादंबरीप्रमाणें नायक आहे, नायिका आहे, खलनायक आहे, कथानकाचा ओघ, स्वभावाचा विकास व मुख्य म्हणजे जिज्ञासेची तार खेंचून धरण्याचा गुण हा कादंबरीचा सारा परिवार त्यांत आलेला आहे. + + त्याच्या या विशिष्ट योग्यतेमुळेंच ७००–८०० वर्षांपूर्वी जन्मलेला ' राणा कोल्हा ' लॅटिन भाषेतून फ्रेंच भाषेंत, डच भाषेंत, तेथून इंग्रजी व तिच्या द्वारें मराठींत उड्या मारीत चालला आहे. गटेसारख्या महाकवीच्या कटिखांद्यावरहि तो खेळलेला आहे. भाषा सुबोध व सरस आहे. + + चित्रें बरीच घातलीं असल्यानें बालवाचकांकडून त्याचें कोडकौतुक विशेषच होण्यासारखें आहे.

(२) दा. क्र. ४५१०

**नवाकाळ:—**

........ मुलांची मनोवृत्ति लक्षांत घेऊन मूळ कथानकांतील गुंतागुंत काढून टाकण्यांत आली आहे व आरंभापासून शेवटपर्यंत गोष्टीचें मनोरंजकत्व कायम राहील अशा रीतीनें गोष्टीची मांडणी करण्यांत आली आहे.

**महाराष्ट्र:—**

........त्यांतील कथा अत्यंत मनोरंजक असून त्या वाचून मुलांची उत्तम करमणूक होईल. पुस्तकाची भाषा सुबोध असून त्यांत ठिकठिकाणीं चित्रेंहि दिलीं आहेत.

**ज्ञानप्रकाश:—**

........कथा मुलांना मनोरंजक वाटल्यावांचून राहणार नाहीं. व्यवहारांतहि दुष्ट माणसें बुद्धिची विलक्षण करामत दाखविणारीं असतात, त्यामुळें सरस व सालस माणसांना त्यांच्यापासून निष्कारण त्रास कसा सोसावा लागतो, ही स्थिति या कथेवरून चांगल्या प्रकारें निदर्शनास येतें.

एकच प्रत हवी असल्यास किंमत व टपालखर्च मिळून साडेसहा आण्यांचीं तिकिटें आगाऊ पाठवावीं.

मिळण्याचीं ठिकाणें:—

**(१) न. ल. आठवले, ४५ बुधवार, पुणें २**

**(२) ‘ समर्थ भारत ’ छापखाना, ९४७ सदाशिव, पुणें २**

**(३) पुणें व मुंबई येथील सर्व प्रसिद्ध बुकसेलर्स.**